१६७५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
वा. क्र.

# आमची अकरा वर्षे

## लीलाबाई पटवर्धन

शंकर पाटील

REFBK-0006624

३८७७७
२।७।६५

# आमचीं अकरा वर्षें

लीलाबाई पटवर्धन, बी. ए.

REFBK-0006624

—प्रथमावृत्ति—

नोव्हेंबर, १९४५] [किंमत ४ रुपये

प्रकाशक
यशवंत गोपाळ जोशी,
६२३।१५ सदाशिव, पुणें २

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

मुद्रक
श्रीपाद रघुनाथ राजगुरु
राजगुरु प्रेस, ४०५ नारायण, पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों वि: ......

# अर्पण

येवो अथाङ्ग पाणी
वारा असो तुफानी
जावो पुढेंच तारू
हे खात हेलकावे
आकाशिच्या कुऱ्हाडी
माथां खुशाल पाडी
आघात सोसण्याचें
सामर्थ्य मात्र यावें
काळीज धुग्‌धुगे तों
कर्तव्य हें टळेना
अन् गात गात व्हावें
हेंही तुझ्याच नांवें

ज्यांच्या अभावीं या स्मृति जागृत
झाल्या त्यांनाच समर्पण.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३६८०८ दि: २।१२
क्रमांक २२३१५

# हकीगत

माझ्या मनांत पुष्कळ दिवसांपासून माधवरावांच्या सहवासांत घालविलेल्या दिवसांच्या आठवणी लिहावयाचें होतें. परन्तु मी योग्य संधीची वाट पहात होतें. कांहीं गोष्टी कांहीं काल गेल्याखेरीज लिहिणें बरें नसतें; पण त्या लिहिल्याशिवाय चरित्रनायकाचा योग्य परिचयही करून देतां येत नाहीं. परन्तु अलीकडे मला असेंही वाटूं लागलें आहे कीं योग्य कालाची मी वाट पहात बसलें व तो दुर्दैवानें माझ्या हयातींत आलाच नाहीं तर एक महत्त्वाच्या कर्तव्याचें माझ्या हातून पालन झालें नाहीं असें होईल.

आमचें लग्न झाल्यावर माधवराव जुन्या गोष्टी सांगतांना पुष्कळ वेळां म्हणत असत, "माझें चरित्र मीच लिहिणार आहें. माझ्या मागून दुसऱ्या कोणी माझ्यासंबंधीं बेजबाबदारपणानें कांहीं तरी लिहिण्यापेक्षां आपणच स्वतः खरी हकीगत लिहावी हें बरें. माझ्या हातून जर ही गोष्ट झाली नाहीं तर तूं तरी अवश्य हें काम कर."

माधवराव ऐन उमेदींत एकाएकीं निघून गेले. त्यांच्या हातूनच हें काम झालें असतें तर जिज्ञासूंना व अभ्यासकांना माधवरावांच्या यथार्थ व्यक्तिदर्शनाचा लाभ मिळाला असता. दुर्दैवानें त्यांची आज्ञा पाळण्याचें काम माझ्याकडे आलें आहे. मला जसजसें आठवलें तसतसें मी लिहित गेलें. कांहीं कांहीं आठवणी दोन दोन तीन तीन वेळां लिहिल्या. बरेंचसें लिहिलेलें फाडून टाकलें व कांहीं लिहिलेलें सहेतुकपणें गाळावें लागलें. याप्रमाणें हें पुस्तक तयार झालें आहे. विशेष सांगायचें म्हणजे मला जरी त्यांनीं आपल्या लहानपणच्या अनेक आठवणी सांगितल्या होत्या तरी सर्वच कांहीं मला एकटीला आतां खात्रीपूर्वक लिहितां आल्या नसत्या. 'पूर्वायुष्य' हें प्रकरण लिहितांना मला अनेकांची मदत घ्यावी लागली. लहानपणच्या अनेक आठवणी व पटवर्धनांच्या घराण्याची माहिती कै. माधवरावांच्या मातोश्री ती. श्री. उमाबाई पटवर्धन ह्यांनीं सांगितली. त्यांनीं घर सोडल्यानंतरच्या बऱ्याचशा आठवणी व हकीगती त्यांचे बालमित्र रा. रामभाऊ मराठे यांनीं सांगितल्या व त्यांच्या संग्रहीं असलेल्या माधवरावांच्या

पत्रव्यवहारावरून मी त्या उधृत केल्या. त्यांच्या स्वभावावर व चारित्र्यावर प्रकाश पाडणारीं हीं पत्रें जर रामभाऊंनीं जपून ठेवलीं नसती तर त्यांच्या पूर्वायुष्यांतील बरीचशी हकीगत मला लिहितां आली असतीच अशी मलाही खात्री देतां येत नाहीं. ह्या पत्राबद्दलचा थोडा उल्लेख येथें केल्याशिवाय मला राहवत नाहीं. १९३३–३४ सालीं माधवरावांनीं, स्वतः रामभाऊंना लिहिलेलीं पत्रें ते घरीं घेऊन आले होते. माधवरावांना अशी एक खोड होती कीं ज्या कागदपत्रांची त्यांना जरुरी नसे ते ते तेव्हांच फाडून टाकीत. तेव्हां हीं पत्रें आणतांना रामभाऊंनीं बजावलें होतें कीं "माझीं पत्रें तूं घेऊन जा पण त्यांचा फाडून सत्यानाश करण्याचा अधिकार तुला नाहीं. तुझें काम झालें कीं तीं तूं मला परत कर" माधवरावांचा उद्देश त्यावेळीं आत्मचरित्र लिहिण्याचा होता. तेव्हां तें लिहितांना त्या पत्रांचा उपयोग आपल्याला होईल म्हणून त्यांनीं तीं पत्रें आणलीं. परन्तु त्यांचा तो हेतु सिद्धीस जाण्याच्या आधींच माधवराव वारले. शेवटीं त्या पत्रांचा उपयोग मला झाला. रामभाऊंचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील. त्याशिवाय त्यांचे बालमित्र रा. विठ्ठलराव घाटे यांनीं तर मला हें चरित्र लिहितांना फार मोठी व अनेक तऱ्हेची मदत केली आहे. रा. रघुनाथराव खरे, श्रीधर नीळकंठ कर्वे, या सर्वांची पूर्वायुष्य प्रकरण लिहितांना फार मोठी मदत झाली आहे. माधवरावांच्या या सर्व बालमित्रांखेरीज 'पूर्वायुष्य' प्रकरण लिहिणें मला एकटीला साधलें नसतें. तेव्हां त्यांची मी फार आभारी आहे. हें पुस्तक लिहिण्यांत माधवरावांच्या निमित्तानें वाङ्मयक्षेत्रांत प्रवेश करण्याचा माझा हेतु नाहीं. तो माझा अधिकार नाहीं, व तशी माझी आकांक्षाही नाहीं. केवळ हें कर्तव्य करून, वाङ्मयक्षेत्रांत कर्तव्य म्हणून पडलेलें माझें पाऊल मी परत घेणार आहे.

माधवरावांच्या आयुष्यांतलीं हीं शेवटचीं अकरा वर्षें फार महत्त्वाचीं होतीं. या काळांत त्यांच्या जीवनाला व मतांनाही एक प्रकारचें स्थैर्य येत गेलें या स्थैर्याचें प्रतिबिंब त्यांच्या या काळांतील काव्यावर व इतर व्यवसायांवर पडलें आहे. या काळांत समाजविन्मुख माधवराव हळूहळू समाजांत वावरूं लागले, भाषणें करूं लागले, त्यांचा मित्रपरिवार वाढला. त्यांना अनेक अनुयायी मिळाले. त्यांच्या काव्यावर, व त्यांच्या सामाजिक धार्मिक भाषाविषयक विचारांवर

चर्चा होऊं लागली. त्यांचें खाजगी आयुष्यही या त्यांच्या सार्वजनिक आयुष्याला जुळेल असेंच होतें, व तें मी रात्रंदिवस त्यांच्या सहवासांत राहून पाहिलें आहे, अनुभविलें आहे. कित्येक गोष्टींत त्यांचा स्वभाव लहरी व चमत्कारिक असला तरी त्यांच्या अनेक सद्‌गुणांमुळें व प्रेमळपणामुळें त्याचा त्रास मला जाणवला नाहीं. हीं अकरा वर्षें मी अत्यंत सुखांत घालविली कॉलेजांत शिकावयाला लागल्यापासून आमचें लग्न होईपर्यंत जवळजवळ १७, १८ वर्षें माधवराव एकटेच रहात होते, कौटुंबिक रहाणीची माधवरावांना संवय नव्हती. एकट्यानेंच एका खोलींत रहावें, भूक असेल तर जेवावें, चिंतनांत वाचनांत व लेखनांत रात्रीच्या रात्री काढाव्या, असा त्यांचा क्रम असे. वयाच्या चौतिसाव्या वर्षी संसार करण्याची त्यांच्यावर पाळी आली. आधीं त्यांना जड गेलें व मला फारच जड गेलें. पण त्यांच्या सरळपणामुळें, नितांत प्रामाणिकपणामुळें, शुद्ध व सात्त्विक आचरणामुळें आमच्या संसाराची घडी जमत गेली. पुढें मुलें आलीं. त्यांनीं आपल्या इवलाल्या हातांनीं माधवरावांना बद्ध केलें. चिंतनांत जागरणें करणारे माधवराव मुलांची जोपासना करण्यांत जागूं लागले. सांसारिक कर्तव्याच्या पालनांत माधवरावांच्या जीवनांत एक प्रकारचा संयम व शांतपणा आला. या संयमाचा व शांतपणाचा परिणाम त्यांच्या सामाजिक जीवनावर झाल्याखेरीज राहिला नाहीं.

माधवरावांच्या संसारी जीवनांतील सत्याचें, प्रामाणिकपणाचे, प्रेमळपणाचे, हे प्रयोग आठवणीच्या रूपानें मी माझ्या अल्पबुध्दीप्रमाणें वाचकांपुढें मांडले आहेत. त्यांचें वाङ्मय व जीवन यांतील परस्परसंबंध शोधण्याचें काम मी त्यांच्यावर सोंपविते; तो अधिकार माझा नाहीं. मात्र मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं माधवराव ही व्यक्ति त्यांच्या वाङ्मयापेक्षां कोणत्याही दृष्टीनें कमी ठरणार नाहीं. किंबहुना माधवराव ही व्यक्ति त्यांच्या वाङ्मयपेक्षांही श्रेष्ठ होती असें त्यांच्या अनेक मित्रांप्रमाणें माझेंही मत आहे.

आतां शेवटचें अत्यंत महत्त्वाचें काम आभाराचें. हें चरित्र लिहीत असतां माधवरावांच्या निकट सहवासांत वावरणाऱ्या आणखीही कांहीं मंडळींनीं मला मनःपूर्वक मदत केली. प्रा० क्षीरसागर, रा. गोपीनाथ तळवळकर, रा. के. नारायण काळे ह्यांनीं मला वेळोवेळीं अनेक प्रकारें सल्ला दिला. प्रा० निरंतरांचे श्रम तर अवर्णनीय आहेत.

प्रुफें तपासण्यापासून तों तीं छापून प्रसिद्ध होईतोंवर वाटेल त्या वेळीं छापखान्यांतून माझ्याकडे व माझ्याकडून छापखान्यांत त्यांनीं खेपा घातल्या. सर्व प्रकारें त्यांनीं मला मदत केली. हें सर्व माधवरावांच्याबद्दल त्यांच्या असलेल्या भक्तीला साजेसेंच झालें.

परन्तु सर्वांत उल्लेखनीय गोष्ट म्हणजे ग्रंथांतील चरित्रनायकाशीं अर्थाअर्थीं संबंध नसतां केवळ मला मदत करण्याच्या सद्हेतूनें प्रेरित होऊन ज्यांनीं मला मदत केली, त्यांत रा. ब. मा. महाशब्दे, M. A., B. Com. ह्यांचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे.

प्रकाशकांचे आभार मी कोणत्या शब्दांत मानूं हें माझें मलाच समजत नाहीं. ते माधवरावांचे जवळचे स्नेही; परन्तु माझी त्यांची तोंडओळखही कधीं नव्हती. त्याचप्रमाणें मी कोणी प्रसिद्ध लेखिका नव्हे तर माझा ग्रंथ केवळ माझ्या नांवावर त्यांनीं छापावा. परन्तु मी आठवणी लिहिल्या आहेत हें समजतांच केवळ माधवरावांच्या प्रेमाखातर त्यांनीं हा ग्रंथ प्रकाशित करायचें ठरविलें.

'निवान्त'
डेक्कन जिमखाना,
पुणें, ता. २९-११-४५.

लीलाबाई पटवर्धन

# प्रकाशकाचें पान

माधवराव पटवर्धन यांचा माझा परिचय फार गंमतीदार तऱ्हेनें झाला.

त्यावेळीं माझें ' श्रीमुखांत ' हें नाटक नुकतेंच प्रसिद्ध झालें होतें व मी तें माझ्या स्नेह्यांना ' सप्रेम भेट ' म्हणून देण्याकरितां एके ठिकाणीं गेलों होतों. त्या स्नेह्यांना मी पुस्तक दिलें. तेथें माधवराव पटवर्धन बसले होते. माझ्या स्नेह्यांनीं माझी व पटवर्धनांची तेव्हां ओळख करून दिली. माझ्या जवळ माझे पुस्तकाची आणखी एक प्रत शिल्लक होती. मी सादर भावानें त्यांवर माधवराव पटवर्धनांचें नांव लिहून माझे पुस्तकांची प्रत माधवराव पटवर्धन यांस देऊं लागलों. पण त्यांनीं ती घेण्याचें नाकारलें व म्हटलें " तुम्ही नवीन लेखक आपल्या पुस्तकाची एक प्रत आम्हांला देतां व त्याबद्दल आमचीं सर्व पुस्तकें तुम्हांस मिळावीं अशी अपेक्षा करीत राहतां म्हणून आपलें पुस्तक मला नको ! "

हें ऐकून मलाहि राग आला व मी म्हटलें "माझ्या बाबतींत ती धास्ती आपणांला नको. मी कविता फारशी कधींच वाचीत नाहीं !"

त्यानंतर तीन चार वर्षें तशींच गेलीं. माधवराव पटवर्धन व मी एक-मेकांना रस्त्यांत भेटत होतों पण आमचा नमस्कारही कधीं होत नसे.

एक दिवस मी मंडईत चाललों होतों आणि माधवराव पटवर्धन मंडई-तून परत चालले होते. आम्ही एकमेकांकडे पाहिलें आणि तसेंच आप-आपल्या मार्गानें निघालों. माधवराव दहावीस पावलें पुढें गेले तोंच मला हांक ऐकूं आली " जोशीबुवा—"

ती हांक माधवरावांची होती. मी मागें वळून त्यांचे जवळ गेलों आणि त्यांना नमस्कार केला. माधवरावांनीं सस्नेह भावानें माझा हात आपल्या हातीं घेत म्हटलें, " जोशीबुवा, माझा तुमच्याबद्दल गैरसमज होता ! "

मी हंसत म्हटलें, "पण माझा तुमच्याबद्दल कधींच नव्हता ! " माधवरावहि हंसले आणि म्हणाले, " परवां तुमची रत्नाकरांत आलेली ' परिजातकाचीं फुलें ' ही गोष्ट वाचली. इट इज ए हॉंटिंग स्टोरी ! राहून राहून आठवण होत राहणारी ती गोष्ट आहे. आणि त्या वेळेपासून ठरविलें तुमच्याशीं बोलायला लागायचें ! "

त्या वेळेपासून आमचा स्नेह वाढत गेला. त्यांनीं आपलीं पुस्तकें मला देण्यास आरंभ केला. मीही माझीं पुस्तकें त्यांना देऊं लागलों.

त्या दिवशीं माधवराव आपलें 'नकुलालंकार' हें पुस्तक मला भेट देण्याकरितां आले होते. त्यांनीं मला पुस्तक दिलें. मी त्यांना चहा दिला. आम्ही अवांतर बऱ्याच गप्पा मारल्या. नंतर माधवराव म्हणाले, "जोशी-बुवा, आमचें तुमच्याकडे येणें राहिलें आहे तें देऊन टाका—"

माझ्या कांहींच लक्षांत येईना. मी म्हटलें, "मी तुमचें काय देणें राहिलें आहे?"

माधवराव मिस्किलपणानें हंसत म्हणाले, "श्रीमुखांत!—"

"पण तें पुस्तक आतां मिळत नाहीं!" मीही हंसत हंसतच उत्तर दिलें.

"ठीक आहे—नवी आवृत्ती निघेल तेव्हां द्या!"

—आणि बहुधा तीच माधवरावांची आणि आमची शेवटची मनमोकळी भेट.

या गतगोष्टींच्या स्मृति "आमचीं अकरा वर्षें" या पुस्तकाचें प्रकाशन करतांना मला होत आहेत. लीलाबाईंची आणि माझी तशी ओळख कधींच झाली नव्हती. पुढें प्रस्तुत पुस्तकांची प्रुफें वाचीत असतांना पुस्तक प्रकाशनार्थ पत्करल्याचा दुहेरी आनंद झाला. आणि वाटलें माधवरावांची आणि माझी ओळख नसती तरी मी हें पुस्तक प्रकाशनार्थ आनंदानें स्वीकारलें असतें.

पुस्तकाचीं प्रुफें तपासतांना लीलाबाई ज्या कावरेबावरेपणानें प्रुफें तपाशीत होत्या तो कावरेबावरेपणा अत्यंत हृद्य होता. "अकरा वर्षांतील" मजकूर वाचतांना जणुं त्या काळांत त्या वावरत असल्यासारखी त्यांची वृत्ति—आणि तो काळ तर हातचा निघून गेलेला याची स्पष्ट जाणीव—अशा मनाच्या एक प्रकारच्या सहजावस्थेंत त्यांनीं हें पुस्तक लिहिलें होतें व त्याच सहजावस्थेंत त्या प्रुफें तपाशीत होत्या. आपण पुस्तक म्हणजे कांहीं 'वाङ्मय' लिहीत आहों—ही अस्पष्ट जाणीवहि त्यांच्या ठिकाणीं दिसली नाहीं. त्यामुळेंच वाङ्मयदृष्ट्याही हें पुस्तक इतकें चांगलें झालें आहे असें मला वाटतें. त्यांत कुठे कृत्रिमता किंवा दुराभिमान आलेला नाहीं. हें पुस्तक वाचतांना वाचकांना कै. रमाबाई रानडे यांच्या आठवणी, कै. लक्ष्मीबाई टिळक यांच्या 'स्मृतिचित्रें' व कमलाबाई देशपांडे यांच्या 'स्मरण-साखळी' या पुस्तकांची आठवण होणें अगदीं अपरिहार्य आहे असें मला वाटतें. कै. माधवराव पटवर्धनांना हें पुस्तक पाहून जास्तच अभिमान वाटला असता. असो.

—यशवंत गोपाळ जोशी

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | पूर्वायुष्य | १ |
| २ | आमचें लग्न | २४ |
| ३ | आमचा नवा संसार | ३८ |
| ४ | वेताळ | ५३ |
| ५ | कांहीं गंमतीदार अनुभव | ६० |
| ६ | व्यक्तिदर्शन | ६९ |
| ८ | प्रवास | ८६ |
| ९ | माधवरावांचे स्नेही | १०० |
| १० | माधवरावांच्या कांहीं कवितांचा जन्म | १२९ |
| ११ | सार्वजनिक जीवनांतील माधवराव | १४८ |
| ११ | अलीकडील कांहीं वर्षें | १५७ |
| १२ | अखेर | १७९ |


नजरचुकीनें प्रकरणांचे क्रमांक छापतांना क्रमांक **सात** अजिबात घालावयाचा राहून गेला आहे व क्रमांक **अकरा** दोनदां पडला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत.
अनुक्रम ३८५५७ वि: चरित्र
क्रमांक ७२३४ नों दि. २।७।६५



जळगांव सम्मेलनाध्यक्ष

१९३६

६६२८

# पूर्वायुष्य : : १

[ आमचा विवाह होण्यापूर्वीची माधवरावांच्या जीवनाबद्दलची माहिती अर्थात् मीं त्यांच्या आतेष्टांकडून मिळविली. कांहीं त्यांनीं स्वतःही सांगितली. ती मी या प्रकरणांत देत आहें. आमच्या विवाहानंतर त्यांचे जे स्वभावविशेष मला दिसले त्यांची पार्श्वभूमि असें त्यांचें विवाहपूर्व आयुष्य आहे. चरित्राची माहिती पूर्ण करण्याच्या दृष्टीनेंही विवाहपूर्व आयुष्याबद्दल कांहीं लिहिणें माझें कर्तव्य आहे असें लेखिकेच्या दृष्टीनें वाटलें.

या प्रकरणाच्या शेवटीं त्यांचे जिवलग स्नेही श्री. नीळकंठ श्रीधर कर्वे ऊर्फ राजाभाऊ कर्वे यांनीं सांगितलेली हकिगत त्यांच्याच शब्दांत दिली आहे. हें प्रकरण व त्याचें परिशिष्ट हीं एकमेकांस पूरक होतील असें मला वाटतें. ]

पटवर्धनांचें मूळचें गांव पोमेंडी. परंतु धंदा व शिक्षण या निमित्तानें पटवर्धनांच्या घराण्यांतील कांहीं मंडळी गुजराथेंत तर कांहीं पुण्याला स्थायिक झाली. त्यांपैकीं माधवरावांचे आजोबा दादा–विनायक नारायण पटवर्धन हे गुजराथेंत भंडोचला अव्वल कारकून होते. त्यांचें पेन्शन घेईपर्यंतचें आयुष्य गुजराथेंतच गेलें. त्यांचे धाकटे बंधु म्हणजे माधवरावांचे चुलत आजोबा-आप्पाकाका-दिनकर नारायण पटवर्धन–हे नेहमीं पुण्याजवळ अवळसेस राहात असत. येथें दादांची व आप्पाकाकांची थोडी जमीन होती. घरची शेती पाहाण्याचें काम अप्पाकाकाच करीत असत. पुढें पेन्शन घेतल्यावर दादा अवळसला येऊन राहिले. दादांचे सगळ्यांत धाकटे बंधु-धोंडो नारायण यांना चुलत्याच्या मांडीवर दत्तक दिलें होतें. त्यांचें चोळखणआळींत एक घर होतें. परंतु धोंडोपंत व त्यांचे चिरंजीव प्लेगच्या कहरांत पुढें वारले.

दादांचीं तीन अपत्यें म्हणजे माधवरावांचे चुलते कृष्णराव विनायक पटवर्धन, माधवरावांच्या आत्याबाई-आऊताई व सगळ्यांत धाकटा मुलगा त्रिंबक विनायक पटवर्धन म्हणजेच माधवरावांचे वडील.

माधवरावांच्या चुलत्यांनीं म्हणजे कृष्णरावांनीं तरुणपणींच संन्यास घेतला होता. पुढें १९१८ नंतर ते जे हिमालयांत यात्रेला गेले ते परत आलेच नाहींत. त्यांच्या धाकट्या बहिणीनें ( आऊताईनीं ) त्रिंबकरावांचें लग्न करून

दिलें. माधवरावांचें आजोळ बडोद्याला सहस्रबुद्ध्यांच्याकडे. आजोळची साधारण गरिबीच होती. माधवरावांचे थोरले मामा महादेव विश्वनाथ सहस्रबुद्धे यांना बडोद्यांतच एक लहानशी नोकरी होती. आतां त्यांनीं पेन्शन घेतलें आहे. पुढें माधवरावांचे आजोबा वारल्यावर माधवराव व त्यांचीं इतर भावंडें ह्यांचें शिक्षण मामांच्या नेतृत्वाखालींच झालें. जरी माधवरावांचें पुढें कांहीं कारणांनीं मामांशीं पटलें नाहीं तरी माधवरावांचें आपल्या मामांवर व मामांचें माधवरावांवर प्रेम होतें. कांहीं झालें तरी लहानपणीं आपण मामांच्या जवळ होतों, त्यांनीं आपल्या खस्ता खाल्ल्या आहेत, हें माधवराव कधीं विसरले नाहींत. पुढें माधवरावांनीं आपली **छंदोरचना** याच मामांना अर्पण केली.

माधवरावांचे वडील सॉर्टरच्या कामावर होते. त्या कामाकरितां त्यांना फिरतीवर राहावें लागे. त्यामुळें सासूबाई-माधवरावांची आई-उमाबाई ह्या बडोद्याला मधून मधून येऊन राहात.

त्रिंबकराव-उमाबाईंना एकंदर पांच अपत्यें झालीं. त्यांत सर्वांत थोरले माधवराव. माधवरावांच्या पाठीवर एक बहीण झाली. ती जन्मल्याबरोबरच वारली. नंतर गणपतराव, केशवराव, विनायकराव व सगळ्यांत धाकट्या भगिनी यमूताई.

माधवरावांचा जन्म बडोदें मुक्कामीं ता. २१ जानेवारी १८९४ सालीं झाला. त्यांचें मूळचें नांव गजानन असें होतें. लहानपणीं ते दोन महिन्यांचे असतांना फार रडत असत, म्हणून त्यांच्या आत्याबाईंनीं त्यांची जोड्यांनीं तुला केली व त्यांच्या घराण्यांतील मूळ पुरुषाचें महादेव हें त्यांचें नांव ठेवलें. तेव्हांपासून त्यांचें रडें बंद झालें असें त्यांच्या आई सांगतात. १९१३ सालीं कॉलेजांत ज्युनियर बी. ए.च्या वर्गांत असतांना त्यांनीं आपलें महादेव नांव बदलून त्याचें 'माधव' केलें. माधवरावांचें लहानपण बडोदें, भडोच व आवळस या गांवीं गेलें. त्यांचें प्राथमिक शिक्षण बडोदें व आवळस मिळून झालें. लहानपणीं ते अति व्रात्य होते. झाडावरून दोनचार वेळ तरी पडले असावेत. एका ठिकाणीं बसून अभ्यास करणें त्यांना कधीं माहीतच नव्हतें. सदोदित उनाडक्या करीत गांवांतून हिंडणें हेंच त्यांचें मुख्य काम. माधवराव स्वतःच असें सांगत कीं, 'लहानपणीं मी बडोद्याला असतांना जोंपर्यंत मला समजत नव्हतें तोंपर्यंत आळींतल्या देवळांतून हिंडून देवापुढें ठेवलेल्या पैशांतून एखादा

तरी पैसा मी पुजाऱ्याला न कळत लांबवीत असें. पुढें समजूं लागल्यावर ही माझी खोड गेली.'

१९०३ सालीं आवळस येथें त्यांची मुंज झाली. तेव्हांच्या काळाप्रमाणें माधवराव मुंज झाल्यावर एकादशी, चतुर्थी वगैरे उपवास करीत. भगवद्गीता व अमरकोश त्यांचा तोंडपाठ होता असें सासूबाई सांगतात.

१९०६ सालीं बडोद्याला कुस्तींत त्यांचा डावा हात मोडला होता. हात तसाच गळ्यांत बांधून ते भडोचला आत्याबाईकडे गेले. आत्याबाईंनीं माधवरावांचा हात बरा होण्याकरितां जिवाचें रान केलें. हात बरा झाला. त्यांत दोष असा कांहीं राहिला नाहीं. परंतु त्या हातानें त्यांना फारसें जड ओझें उचलतां येत नसे. जेव्हां जेव्हां ते आपला हात मोडल्याची हकीगत सांगत तेव्हां तेव्हां त्यांना आत्याबाईची आठवण होई व त्यांच्या डोळ्यांत पाणी उभें राही.

१९०५ ते १९०९ सालपर्यंत जी क्रांतीची चळवळ हिंदुस्थानांत झाली होती तिची झळ बडोदा नगरीलाही लागली होती. त्या वेळीं माधवराव १४-१५ वर्षांचे असावेत. ते तेव्हां हायस्कूलमध्यें होते. भावनाप्रधान माधवराव, क्रांतिवादी बनले. ते व त्यांच्या बरोबरीच्या आणखी कांहीं मित्रांनीं कांहीं रासायनिक द्रव्याच्या सहाय्यानें बॉम्ब तयार करण्याचा प्रयत्न केला. त्यांत माधवरावांचे दोन्ही हात भाजले. तें त्यांना एक मोठें दुखणेंच झालें होतें. आठ पंधरा दिवस हातांनीं त्यांना अंथरुणावर लोळविलें. परंतु घरची मंडळी रागावतील म्हणून हात भाजल्याचें खरें कारण त्यांनीं सांगितलें नाहीं.

खाडिलकरांचें कीचकवध हें नाटक त्या वेळच्या राजकीय परिस्थितीचें वर्णन करणारें होतें म्हणून तें माधवरावांना फार आवडत असें. त्यांतली भीमाचीं व कीचकाचीं भाषणें ते व त्यांचे स्नेही रामभाऊ मराठे ह्यांनीं पाठ केलीं होतीं. माधवराव भीम होत व रामभाऊ कीचक होत व मोठा सुंदर अभिनय करून तीं भाषणें ते दोघे म्हणत. माधवरावांचें दुय्यम शिक्षण बडोद्याला बडोदा हायस्कूलमध्यें झालें. माधवराव बडोदा हायस्कूलमध्यें असतांना तेव्हांच्या त्यांच्या स्नेह्यांत रा. रघुनाथ दामोदर खऱ्यांची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे. त्या वेळीं ते दोघेही इंग्रजी ४थ्या इयत्तेंत होते. खरे यांच्या मामांचें घर कोठीच्या नाक्यावर शास्त्री यांच्या पोळेजवळच होतें. खरेही आपल्या मामांच्याकडेच राहात. खरे व माधवराव ह्यांच्या स्वभावांत तसें पाहिलें

तर कांहींच साम्य नव्हतें. खरे अत्यंत व्यवस्थित तर माधवराव स्वतः अतिशय अव्यस्थित. परंतु दुसऱ्याचा व्यवस्थितपणा त्यांना फार आवडे. ह्या गुणामुळेंच ते एकमेकांच्याकडे ओढले गेले. शाळेंत असतांना खऱ्यांचा गणित विषय अगदीं कच्चा होता. माधवरावांचें गणित चांगलें होतें. त्यांनीं खऱ्यांना गणित विषयाचा अभ्यास करण्यास मदत केली. परंतु खऱ्यांचा मराठी विषय चांगला होता. तेव्हां बडोद्यास जे गणपतिउत्सव होत त्यांत त्या वेळचे बडोदा हायस्कूलमधले माधवराव व खऱ्यांचे मराठीचे शिक्षक रा. पेंडसे मुलांना उत्तेजनार्थ मराठी निबंध व भाषणाला कांहीं बक्षिसें ठेवीत. त्या उत्सवांत खरे व माधवराव यांनीं बरेच वेळां तीं बक्षिसें मिळवलीं होतीं. पुढें माधवराव कविता करूं लागले. खऱ्यांनींहि थोडीशी काव्यरचना केली. परंतु ती हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच. माधवरावांच्या कविता खऱ्यांना फार आवडत. माधवराव अत्यंत भावनाप्रधान तर खरे अत्यंत व्यवहारी. तेव्हां तसें त्या दोघांत कोणत्याच प्रकारचें साम्य नव्हतें. पुढें व्यवसायभेदामुळें खरे व माधवराव एकमेकांना बरेच दुरावले. परंतु माधवराव आपल्या बालमित्राला मोठेपणींही विसरले नाहींत.

शाळेंत असतांना माधवरावांचे बरोबरच्या मुलांशीं कधींच जमत नसे. बहुतेक सर्वांशीं त्यांचें भांडणच असे. पुढें समजूं लागल्यावर त्यांचा हा स्वभाव थोडासा कमी झाला. परंतु पुढेंही त्यांच्या मित्रांनाच त्यांच्याशीं जमवून घ्यावें लागलें. माधवराव तेव्हांहि तऱ्हेवाईकच राहिले.

माधवरावांच्याभोंवतीं जे त्यांचे स्नेही होते त्यांची गुंफण त्यांचे मराठीचे शिक्षक रा. पेंडसे ह्यांनीं एका कारिकेंत केली होती. त्यांतील एकच ओळ आतां मला आठवते आहे. ज्या दुसऱ्या ओळींत खऱ्यांचें नांव होतें, ती कारिका अशी:—

पटवर्धन एमटिश्च भाटे, घाटेच गोगटे,

माधवरावांच्या अंगीं असा एक गुण होता कीं, दुसऱ्याच्या अंगीं जर त्यांना एखादा चांगला गुण आढळला तर त्याचें ते कौतुक करीत. त्यामुळेंच खऱ्यांशीं माधवरावांची ओळख झाली व पुढें ती कायम टिकली. खऱ्यांची खोली अगदीं नमुनेदार असे. माधवराव आपल्या चमत्कारिक मनःस्थितींत खऱ्यांच्या खोलींत दिवस घालवीत. त्याला कारण हेंच कीं, खऱ्यांचा व्यवस्थितपणा माधवरावांचें मन सुप्रसन्न करी.



माधवराव पटवर्धन. रामभाऊ मराठे

(१९०९)

मधून मधून शाळेला सुट्टी झाली म्हणजे माधवराव आपल्या आजोबांच्या-कडे-अप्पाकाकांच्याकडे आवळंसेस जात. हें आवळस गांव आतां मुळशीच्या धरणांत बुडालें. पौडपासून आवळस जवळ होतें. तेथें अप्पाकाका, रमाकाकू-अप्पाकाकांच्या पत्नी-माधवरावांच्या आजी व त्यांच्या चुलत आत्याबाई-धोंडोपंतांची कन्या-राहात असत. आत्याबाई—येसूताई—माधवरावांच्याच वयाच्या. त्यामुळें त्यांचें एकमेकांवर अतिशय प्रेम. त्या आवळस गांवांतील घराचें व त्या शेजारून वाहाणाऱ्या ओढ्याचें वर्णन माधवरावांनीं एका कवितेंत केलें आहे. ती कविता म्हणजे '.आमुचें घर छान, शेजारीं वाहे ओढा कागदी होड्या सोडा, दूर जाती.' लहानपणच्या अनेक आठवणी सांगतांना त्या घराचें वर्णन ते नेहमीं सांगत. ते व येसूताई-घराशेजारीं वाहाणाऱ्या ओढ्याकाठीं बसून कागदाच्या नावा ओढ्यांत सोडून त्यांची तासचेतास गंमत पाहात ओढ्या कांठीं बसत. कोरफडीच्या वरलें साल काढून आंतला गर पाण्यांत बुडवून तो बर्फ म्हणून खात असत. त्याच आत्याबाईंच्या मांडीवर माधवरावांच्या तिसऱ्या नंबरच्या बंधूंना—केशवरावांना—दत्तक दिलें. दत्तक घरचें त्यांचें नांव—हरी गोविंद गोखले. कुलाबा जिल्ह्यांतील महाडजवळच्या गोरेगांवीं त्यांची मोठी शेती आहे. ते त्या गांवचे खोत आहेत. येसूताईंचें माधवरावांच्यावर अतिशय प्रेम. माधवराव वारले त्या सुमारास येसूताई यात्रेला गेल्या होत्या. त्या ते वारल्यावर आठ दिवसांनीं पुण्याला आल्या. त्यांना अतिशय दुःख झालें. परत जातांना त्यांना रडें आवरेना. दुःखाच्या भरांत, "आतां माझें माहेर संपलें. मी पोरकी झालें. मला मायेचें कोणी उरलें नाहीं. तरी माझें तुझ्याकडे व तुझ्या मुलांच्याकडे तितकेंच लक्ष आहे हें विसरूं नकोस" असें सांगून त्या टांग्यांत बसल्या. सध्यां त्या यात्रा करीत हिंडत असतात. परंतु केव्हां तरी पत्र व खाऊ पाठवायला त्या विसरत नाहींत.

१९०९ सालीं माधवराव मॅट्रिक झाले. नंतर अभ्यास करण्याच्या निमित्तानें त्यांनीं देवांच्या चाळींत एक खोली घेतली. इंटरमीजिएट होईपर्यंत ते जेवायला फक्त आजोळीं जात. अप्पाकाका मुलांना व आत्याबाईंना पुरेसें घरचें भात पाठवीत. त्रिंबकराव अण्णा थोडे पैसें पाठवीत. परंतु तेवढ्यांत सर्वांचा उदरनिर्वाह होणें शक्य नव्हतें म्हणून माधवरावांना स्वतःच्या पुढील शिक्षणाकरितां शिकवण्या कराव्या लागल्या.

हळूहळू माधवरावांच्या विचारांत फरक पडूं लागला. त्यांनीं एकादशा,

चतुर्थ्या सोडून दिल्या. जुन्याला चिकटून राहाणें त्यांना आवडेना. संध्या करणें, शेंडी राखणें हें त्यांच्या सुधारकी विचारांना रुचेना. कॉलेजांत गेल्यावर ते केस राखूं लागले. त्यांचें सुधारकी वागणें त्यांच्या मामांना आवडेना. म्हणून त्यांना आपल्या मातोश्री व मामांच्या पासून निराळें राहाणें भाग पडलें. त्यांच्या बालमित्रांपैकीं रामभाऊ मराठे ह्यांची त्यांना त्या काळांत पैशाच्या दृष्टीनें फार मोठी मदत झाली.

त्यांना काटकसरीची संवय लहानपणापासूनच होती. माधवरावांच्या मामांनीं आपला एक खाकी कोट माधवराव इंग्रजी ४ थ्या इयत्तेंत असतांना दिला होता. तो कोट ते कॉलेजांत गेल्यावरही घालीतच असत. माधवरावांच्या मित्रांनीं, तो ठिगळें लावलेला कोट आतां टाकून द्या व दुसरा शिवा म्हणून सांगून पाहिलें; परंतु त्यांनीं तो कोट बी. ए. पास होईतोंवर बदलला नाहीं. बी. ए. झाल्यावरच नवा कोट शिवला.

माधवराव फारसी घेऊनच मॅट्रिक झाले. फारसी भाषा त्यांना स्वतःला आवडत नव्हती. परंतु वडिलांच्या इच्छेकरतां त्यांना ती घ्यावी लागली. अण्णांना-माधवरावांच्या वडिलांना-आपला मुलगा मॅट्रिक झाल्यावर कोठें तरी सरकारी कचेरींत कारकुनी करील; त्या दृष्टीनें पर्शियन भाषाच जास्त उपयोगी पडेल असें वाटलें, म्हणून त्यांनीं मुलाची इच्छा नसतांना ती भाषा त्यांना घ्यायला लावली. परंतु माधवरावांनीं त्या भाषेंतही पुढें प्रावीण्य मिळविलें. वास्तविक ते १९१४ सालींच बी. ए. व्हायचे, परंतु माधवरावांचा त्या वर्षीं अभ्यास झाला नाहीं. माधवरावांनीं बी. ए. ला गणित विषय घेतला होता. परंतु आयत्या वेळेला त्यांचा अभ्यास झाला नाहीं व ते परीक्षेला बसले नाहींत. त्या सुमारास त्यांनीं रामभाऊंना एक पत्र लिहिलें होतें. त्यांतील उतारा पुढें दिला आहे. ह्यावरून त्यांच्या त्या वेळच्या मनःस्थितीची कल्पना येईल.

ता. २२ जून १९१४.<br>
सायंकाळीं ७ वाजतां.<br>
देवांची चाळ.

" परीक्षेस यंदा बसणें अशक्य आहे. माझें डोकें मनस्वी दुखत आहे. गेले सहा महिने खडतर तपश्चर्येप्रमाणें घालवून केवळ वेळेच्या अभावामुळें माझ्या

आयुष्यांत मजवर हा असा प्रसंग येत आहे. परंतु मी पुरुष आहे व माझें मन आतां अधिकाधिक दृढ होत चाललें आहे. मी परत कॉलेजांत दाखल होईन व एखाद्याला हेवा वाटेल अशी राहाणी ठेवीन, व शेवटीं यशस्वीच होईन.

माझ्याविषयीं पुष्कळांचें प्रतिकूल मत झालें आहे व होईल. परीक्षेस बसणें म्हणजे कांहीं मोठेसें काम नाहीं; परंतु मस्तक भणाणून गेल्यामुळें पेपर बरोबर लिहितां येणार नाहींत आणि अपयशाचा कलंक तर मला नको. आज मी स्वतःच्या पायावर उभा राहाण्यास समर्थ आहें. लोकांचा शरमिंदा मी होणार नाहीं."

त्यांच्या मामांचा व आईचा ह्या बाबतींत त्यांच्याशीं मतभेद झाला व तेव्हां-पासून आजोळच्या घराण्याशीं त्यांचा कायमचा संबंध तुटला. त्यासंबंधींचा रामभाऊंच्या पत्रांतील उतारा—

"मामांनीं माझ्यावर संवई वाईट व सुधारक आहेस असा आरोप ठेवला, व जुन्या तऱ्हेनें घरीं राहून अभ्यास करावयाचा असला तरच आमच्याकडे राहायला ये म्हणून लिहिलें. मी घरीं राहायला येणार नाहीं व स्वतःचें तुमच्या-संबंधीं असलेलें कर्तव्य विसरणार नाहीं म्हणून ताबडतोब पत्र लिहिलें.

"कर्तव्याच्या मार्गावर जमीन कापूं लागलों आहे. त्यानेंच मला दिलासा दिला आहे. व तोच मला उजेड दाखवील.

* * * *

"इथें गंधर्व आणि 'भारत' अशा दोन नाटक मंडळ्या आल्या आहेत, हें तुला राजा ( राजाभाऊ कर्वे ) च्या पत्रावरून समजलें असेलच. तुला नाटकाला यायचें असल्यास जरूर ये. पण नाटकाला येण्याचा मेहेरबानी करून तूं मला आग्रह करूं नकोस. केव्हां केव्हां माझ्या स्थितीचा विचार करूं लागलों म्हणजे मला वाटतें कीं, मी अत्यंत गरि-बीनें दिवस काढले पाहिजेत. नाटकादि सुखापासून माझ्या अनावर मनास मी अगोदरपासूनच अलिप्त ठेविलें पाहिजे. माझी प्रकृति चांगली आहे. मनाला मात्र मधून मधून फार निराशा वाटते. माझें जीवित म्हणजे एक कधीं न संपणारी रात्र आहे, असें वाटूं लागलें आहे.

"अभ्यास चालू आहे. फारसी भाषा उत्तम येण्यास अरबी भाषेचें थोड-बहुत तरी ज्ञान आवश्यक असल्यानें मी घरींच परवांपासून अरबी शिकायला सुरुवात केली आहे."

बडोदा कॉलेजमध्यें असतांनाच माधवरावांनीं वादविवाद सभेंतदेखील निरनिराळ्या विषयांवर भाषणें केलीं व बक्षिसें मिळविलीं. ह्याबद्दल रामभाऊ-च्या एका पत्रांत उल्लेख आहे तो असा—

ता. १८ सप्टेंबर १९१५

"वादविवाद मंडळीच्या दुसऱ्या बैठकींत 'जातिभेद' या विषयावर झालेल्या वादविवादांत मला पुन्हा बक्षीस मिळालें. तिसऱ्या बैठकींत "पाश्चात्य सुधारणा व तिची आवश्यकता" या विषयावर रा. मुकर्जी यांच्या अध्यक्षते-खालीं चर्चा झाली. मला पुन्हा पाहिलें बक्षीस मिळालें. शिवाय मला दुसरी स्कॉलरशिप मिळाली आहे. गेल्या परीक्षेंत माझा नंबर दुसरा आला."

१९१५ सालीं माधवराव बडोदा कॉलेजमध्यें बी. ए. च्या वर्गांत होते. शाळेंत असतांना माधवराव फारसे कोठें चमकले नाहींत. परंतु कॉलेजांत असतांना त्यांची हुषार विद्यार्थ्यांत गणना होत होती. निरनिराळ्या भाषांचें ज्ञान आपल्याला पाहिजे म्हणून फारसीकरितां अरबीचें ज्ञान तर त्यांनीं मिळविलेंच, परंतु लहानपण गुजराथेंत गेल्यामुळें गुजराथीही त्यांना चांगलें येत होतें. हिंदी ते बोलूं शकत होते. फारसी भाषा त्यांना नाइलाजानें घ्यावी लागली. संस्कृत शिकण्याची त्यांची आवड राहून गेली, परंतु पुढें त्यांनीं संस्कृत-चाही अभ्यास केला. अलीकडे अलीकडे जर्मनही ते शिकत होते. कानडी भाषा आपल्याला यावी म्हणून त्यांनीं १९३९ सालीं त्याही भाषेच्या मूळा-क्षरांचा अभ्यास करायला सुरुवात केली होती. इंग्रजी व मराठी भाषेंत त्यांचा हातखंडा होता हें सर्वश्रुत आहेच.

माधवराव हुषार तर होतेच, परंतु ते प्रयत्नवादी होते. कोणतीही गोष्ट डोक्यांत आल्यावर ती ते मनापासून करीत. त्यांच्या पुढील आयुष्यांतील यशाचें कारण त्यांचा मनावरील ताबा, दृढ निश्चय व प्रयत्न हेंच आहे.

माधवराव वास्तविक बी. ए. १९१४ सालींच व्हावयाचे, परंतु मनाच्या अस्वस्थ परिस्थितींत त्यांचें अभ्यासाकडे नीट लक्ष लागेना. इंटर आर्टस्च्या परीक्षेंत त्यांनीं उत्तम यश मिळविलें होतें. माझ्या माहितीप्रमाणें त्यांना स्कॉलरशिपही मिळाली होती. तेव्हां बी. ए. च्या परीक्षेंतसुद्धां आपण वर यावें, आपल्याला उत्तम यश मिळावें असें त्यांना वाटणें साहाजिकच होतें. इंटर झाल्यानंतर त्यांनीं बी. ए. ला प्रथम इंग्रजी घेतलें. इंग्रजी पुस्तकें स्वतः विकत घेण्याची त्यांना ऐपत नव्हती. तेव्हां शेक्सपियरचीं कांहीं नाटकें त्यांनीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८६०५ वि: चरित्र



बसलेले :— माधवराव पटवर्धन. उभे :— विठ्ठलराव घाटे.
बडोदा कॉलेज, ३१ डिसेंबर १९१२.

सबंधच्या सबंध हातानें लिहून काढली. परंतु ह्या सर्व गोष्टींत त्यांचा फार वेळ गेला. वेळेवर अभ्यास झाला नाहीं. तेव्हां त्यांनीं इंग्रजी विषयाला रजा देऊन इतिहास घेतला. त्या विषयाचाही अभ्यास त्यांनीं रात्रीचा दिवस करून केला; परंतु मनाच्या चमत्कारिक परिस्थितींत तो त्यांच्या हातून झाला नाहीं. त्यांनीं पुन्हा विषय बदलला. गणित विषयाच्या अभ्यासाला सुरुवात केली. ह्या विषयांत बडोदा कॉलेजचे प्राध्यापक कै. प्रो. पेंडसे ह्यांनीं त्यांना फार मदत केली. परंतु ऐनवेळीं माधवराव गडबडले. त्याही विषयाची तयारी व्हावी तशी त्यांच्या हातून झाली नाहीं. त्यांनीं पुन्हा गणित सोडून पर्शियन घेतलें व अखेरीस १९१६ सालीं ते बी. ए. झाले. तरी त्यांनीं ज्या प्रकारचें यश आपल्याला यावें अशी अपेक्षा केली होती त्या प्रकारचें यश शेवटीं त्यांना मिळालें नाहीं. ते बी. ए. लाही दुसऱ्या वर्गांतच आले.

ह्या सर्व गोष्टीला कारणें म्हणजे घरच्या भानगडी, लहरी व अत्यंत भावना-प्रधान स्वभाव आणि मनाची अस्थिरता. नाहींतर माधवरावांसारख्या हुषार विद्यार्थ्याला पहिला वर्ग मिळविणें कांहीं अशक्य नव्हतें.

१९१६ सालीं ते बी. ए. च्या परीक्षेला बसले. त्याआधीं त्यांच्या मनाची स्थिति कशी झाली होती, त्यासंबंधीं ते रामभाऊंना लिहितात. " माझा धीर अधिकाधिक वाढत चालला आहे. शरीराला सोसतील तितके परिश्रम घेऊन मी अभ्यास करीन व अध्यापकांची मर्जी संपादन करीन. आजपर्यंत मी रोजीं सुमारें पांच तास अभ्यास करीत आलों आहे. उद्यांपासून सहा तासाखालीं एक दिवसही अभ्यास करणार नाहीं. वर्गांतले अभ्यास पुढें गेले असल्यामुळें मला आज थोडा त्रास होत आहे. वार्षिक परीक्षा सुमारें १। महिन्यानें होईल. तींत माझा जो परिणाम होईल, त्यावरून मला बराच अनुभव मिळेल. Honours मी बहुतकरून फारसी भाषेंत घेईन. या विषयांत मी जर तरबेज झालों तर **फर्ग्युसन कॉलेजांत फारसी भाषेचा प्राध्यापक होण्याची माझी आकांक्षा आहे.** सध्यां तर हा विचार पाण्यावरच्या बुरुजाप्रमाणें आहे. आज ह्या विषयांत मी हुशार नाहीं, तसा मठ्ठही नाहीं. भावी परिस्थिति आजच्या परिश्रमावर बांधली जाणार आहे.

चैनीचे विचार मला सोडून दिले पाहिजेत. पैशाची किंमत ओळखून मला आतां मार्गक्रमण केलें पाहिजे. कुणास ठाऊक उद्यांचा दिवस कसा येतो ! आजपासून मी राहाणींत साधेपणा आणणार. मला एक जण म्हणतो. You

will go to dogs माझी उत्तरोत्तर अवनति कशी होते हेंच मला पाहाणें आहे. लोक मला सांगतात कीं, "ज्यांच्या बोलण्याचा तुमच्यावर परिणाम होईल असें तुम्हाला कुणी राहिलें नाहीं." दुर्दैवानें असें आहे खरें. म्हणून मला म्हणावें लागतें, माझ्या भडकलेल्या मनाचा लगाम खेचून धरायला माझ्यावांचून दुसरें कोण आहे? एखादी आज्ञा निमूटपणें पाळण्याचें बाळकडू मला पाजिलें आहे कुणीं?

सध्यां माझ्यापुढें असलेल्या मार्गांत कांटे खचून भरलेले आहेत. भोंवतीं अंधार आहे. पण त्या अंधारांतूनदेखील तो पाहा एक तारा प्रसन्न मुद्रेनें खुणावीत आहे. रस्ता कांट्यांनीं भरलेला आहे. म्हणून कपाळावर हात मारून काय फायदा आहे! दृढनिश्चयाचे जोडे पायांत घालून चालूं लागलें कीं तोच मार्ग हिरवळीप्रमाणें वाटूं लागतो.

प्रिय राम, यापुढें माझी कितीही निराशा झाली तरी मी हताश होऊन कर्तव्यपराङ्मुख होणार नाहीं. आज माझ्या हृदयांत सतत प्रयत्नाच्या बिछान्यावर महत्त्वाकांक्षा शांत चित्तानें पहुडली आहे. मी माझ्याकडून होईल तितकी सुधारणा करीत आहें."

आणखी एका पत्रांतील उतारा—

२७ एप्रिल १९१६

मार्चच्या पहिल्या आठवड्यांत अभ्यासासाठीं मुंबईस रवाना झालों. परंतु ज्या विद्यार्थ्याबरोबर पुस्तकांची उजळणी करण्याचें ठरविलें होतें त्यानें पत्ता बदलला. त्याची भेट होऊं शकली नाहीं. पुढें ज्या इतर मुलांबरोबर अभ्यास केला त्यांची तयारी आमच्याइतकी मुळींच नव्हती.

मी अभ्यास नेटानें करूं लागलों. दररोज दहाबारा तास वाचन होई. पुढें परीक्षेला एक आठवडा राहिला. ऑनर्सची तयारी जय्यत झाली. परंतु वेळेच्या अभावीं आवश्यक इंग्लिश विषय कच्चा राहाणारसें वाटूं लागलें. फारसी या विषयावर वाजवीपेक्षां अधिक काळ खर्च केला, आणि प्रमाणबद्धतेकडे लक्ष पुरविलें नाहीं. याबद्दल मला 'न भूतो न भविष्यति' असा पश्चात्ताप झाला. विपरीत परिस्थितीशीं सहानुभूतीच्या अभावीं झगडण्यांत मज्जातंतूंना किती ताण बसला होता याची फारशी कल्पना नव्हती. त्यांतून अशा नाजूक प्रसंगीं माझी घोडचूक माझ्या नजरेस आल्यानें मी वेडा होण्याच्या बेतांत आलों

अगोदरच शक्ति न कळतां क्षीण होत चालली होती. त्यांत माझी झोंप उडाली. शक्तीचा ऱ्हास झपाट्यानें होऊं लागला. अभ्यासावर चित्त जडेना. अशा स्थितींत माझे सहाध्यायी श्री. जानी हे मला दिलासा देत व एकट्यानें अभ्यास होईना म्हणून मजकडून अभ्यास करवून घेत. ही त्यांची कृति केवळ बिनमोल होय. तिचा मोबदला माझ्या हातून कसा दिला जाईल? परंतु रात्रीं मला ब्रह्मांड आठवत असे.

परीक्षेला तीन दिवस राहिले तेव्हां डॉ. म्हात्रे यांचें औषध सुरू केलें. मला जिना चढवत नव्हता कीं तासभर लिहवत नव्हतें; शिवाय परीक्षेच्या पेपर्सची अगोदर थोडीबहुत तरी उजळणी करायला हवी होती. तेव्हां तयारी असूनही मोठ्या कष्टानें ऑनर्सचे पेपर टाळावे, परंतु वर्ष फुकट न जाईल असें करावें असें ठरलें. डॉक्टर रात्रीं झोंपेचें व दिवसां उत्तेजनाचें अशीं दोन औषधें देत असत. परीक्षेच्या मंडपाकडे जातांना फाशीच्या स्तंभाकडे चालविलेल्या कैद्या-प्रमाणें माझी स्थिति झाली होती. माझ्या नंबर २४५च्या टेबलापुढें बसल्यावर मला आतां घेरी येते कीं काय अशी भीति वाटली. मी औषधाचा एक भाग घेतला. पेपर हातांत पडल्यावर शून्य मनानें लिहावयास सुरुवात केली. हळू-हळू आठवूं लागलें."

आपल्याला मार्गदर्शन करणारें कोणी नाहीं ह्याची जाणीव त्यांना फार होती. त्यामुळें ते आपल्या स्वतःच्या मनावर ताबा ठेवण्याचा आपणच प्रयत्न करीत. केव्हां ते पुन्हा भावनांच्या आहारीं जात. त्याकरितां त्यांनीं स्वतःला मार्गदर्शन करणारीं अनेक पुस्तकें वाचलीं. आपलें बोलणें चालणें नमुनेदार असावें, असें त्यांना फार वाटे. म्हणून ते 'चेस्टरफील्डस ॲडव्हाइस टु यंग मेन' व "चेस्टरफील्डस् लेटरस् टु हिज सन' हे वारंवार वाचीत व त्याप्रमाणें आपलें आचरण ठेवण्याचा प्रयत्न करीत. त्याचप्रमाणें आपण आदर्श विद्यार्थी असावें म्हणून टॉडस् स्टूडंटस् मॅन्युअलचीही पुनः पुनः पारायणें करीत.

कै. श्री. सौ. काशीबाई हेर्लेकरांना ते आईच्या ठिकाणीं मान देत व त्यांना ते 'आई'च म्हणत. त्यांच्या दोन कन्या कु. शांताबाई हेर्लेकर, श्री. सौ. शांताबाई कशाळकर, बी. ए. व कु. गीताबाई हेर्लेकर, श्री. सौ. शालिनीबाई रानडे, बी. ए. यांचाही त्यांच्याशीं परिचय झाला. त्यांतल्या त्यांत शांताबाईशीं त्यांची दाट ओळख झाली.

देवाच्या चाळींत राहात असतांना एके रात्रीं त्यांनीं कंदिलाला एक दोरी बांधली. त्याचा उजेड आपल्या टेबलावर पडेल अशा रीतीनें तो बांधला व तो पाहाण्यासाठीं त्यांनीं काशीबाईंना-आईंना हांक-मारली. आई आल्या. त्यांनीं माधवरावांनीं खुंटीला दोरी बांधून खालीं सोडलेला कंदील पाहिला आणि त्या म्हणाल्या " पटवर्धन, तुमच्या अभ्यासाची लांबण ह्या कंदीलासारखीच लागली आहे." माधवरावांना त्यांचें बोलणें जिव्हारीं लागलें, आणि तेव्हांपासून त्यांनीं आपल्या लहरीवर ताबा ठेवून मनापासून अभ्यास केला. माधवरावांनीं कोणत्याही गोष्टीचा एकदां निश्चय केला कीं, तो निश्चय कशीही परिस्थिति येवो ते तो पार पाडीत आणि त्याचाच परिणाम म्हणजे १९१६ सालीं ते बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले व पुढे एम. ए. होण्याचा त्यांनीं त्याच वेळीं निश्चय केला. परंतु आर्थिक अडचण त्यांच्या पुढें होतीच. कुटुंबांतून बाहेर पडले तरी आत्याबाईंना थोडीबहुत त्यांना मदत करावीच लागे. शिवाय घरच्या मंडळींचीही थोडीबहुत जबाबदारी त्यांच्यावर होतीच.

त्यांचा जसा शांताबाईंशीं स्नेह होता, तसाच स्नेह सौ. राधाबाई पवार व लक्ष्मीबाई कन्हैय्यालाल चौधरी ह्यांच्याशीं होता. माधवराव कॉलेजांत असतांना ह्या सर्व त्याच कॉलेजांत शिकत होत्या. लक्ष्मीबाई ह्या शांताबाईंच्या मैत्रीण. माधवरावांची त्यांच्याशीं ओळख शांताबाईंच्यामुळें झाली. ते त्यांना आपल्या थोरल्या बहिणीप्रमाणें मान देत. बी. ए. झाल्यावर जेव्हां माधवरावांना कोठें तरी नोकरी करण्याची गरज भासली तेव्हां लक्ष्मीबाईंचे मेहुणे म्हणजे लक्ष्मीबाईंच्या भगिनीचे पति मेजर बलदेवप्रसाद पाठक ह्यांच्या मुलाचे ट्यूटर म्हणून १९१७ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत ते कोट्याला (राजपुताना) गेले. लगेच दुसऱ्या वर्षीं म्हणजे १९१८ सालीं ते मुंबईला आले व एम्. ए. च्या अभ्यासासाठीं एल्फिन्स्टन कॉलेजांत त्यांनीं आपलें नांव दाखल केलें. मध्यंतरीं म्हणजे १९१८ सालीं बडोदा-अहमदाबाद येथें प्लेग झाला व त्या प्लेगच्या कहरांत त्यांचे धाकटे बंधु गणपतराव वारले. त्याच सालीं त्यांच्या मैत्रीण लक्ष्मीबाई क्षयाच्या विकारानें वारल्या. त्यांच्याबद्दल माधवरावांना फार आदर होता. त्यांच्या मृत्यूची हकीगत माधवरावांनीं रामभाऊंना कळविली त्या पत्रांत माधवराव लिहितात, " माझ्या प्रिय भगिनी-लक्ष्मीबाई ह्या इहलोक सोडून गेल्या. त्यांचे गुणानुवाद करण्यास आज मी समर्थ नाहीं. त्यांच्या मृत्यूनें

माझें फार मोठें नुकसान झालें आहे.'' माधवरावांची ' दिवंगत लक्ष्मीस ' ही कविता त्यांना उद्देशून आहे.

१९१८ सालीं माधवराव फारसी व इंग्रजी घेऊन एम. ए. झाले व दुसऱ्या वर्गांत आले. वास्तविक ते पहिल्या वर्गांतच यायचे, परंतु फार थोड्या मार्कांनीं त्यांचा पहिला वर्ग गेला. फारसी भाषा जरी त्यांना फारशी आवडत नव्हती तरी त्या भाषेचाही त्यांनीं उत्तम अभ्यास केला होता. ते बडोद्याला असतांना १९१५ सालीं प्रो. पेंडश्यांना फारसी शिकवीत असत. प्रो. पेंडसे हे माधवरावांचे गणिताचे प्रोफेसर; माधरावांचें फारशीचें ज्ञान पाहून पेंडसेही त्यांच्यावर खुष असत.

माधवरावांचे सगळ्यांत धाकटे चुलत आजोबा-धोंडोपंत व त्यांचा मुलगा प्लेगच्या दिवसांत एका दिवसाच्या अंतरानें वारले. त्यांचें घर हक्कानेंच माधवरावांचे आजोबा दादा व अप्पाकाका यांना मिळालें. पुण्यांतील ह्या घराची व्यवस्थाही अप्पाकाकाच पाहात. सन १९१८ च्या सुमारासच माधवरावांचें आजोबा-दादा वारले. ते आवळसला अप्पाकाकांच्या जवळच वारले. त्यांच्यानंतर अप्पाकाकाही माधवरावांचा एम. ए.चा निर्णय बाहेर पडल्यावर त्याच सालीं वारले. त्यांना मूलबाळ कांहींच नसल्यामुळें त्यांची थोडीबहुत जमीन व घराचा अर्धा वांटा मामंजींना मिळाला. पुढें मुळशी धरणांत मामंजीच्या शेतीचा गांव बुडाला त्याबद्दल सरकारनें त्यांना नऊ हजार रु. दिले.

पटवर्धन कुटुंबांतील जवळजवळ सर्वच व्यक्ति करारी, स्वाभिमानी व लहरी होत्या. माधवरावांना समजूं लागल्या पासून त्यांना कुटुंबसुख असें कधींच लाभलें नाहीं असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. ते पुण्यास फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसर असतांना, त्यांचे वडील त्रिंबकराव हे नोकरी सोडून, स्थायिक होण्याच्या विचारानें पुण्यास आले. सासूबाईही धाकट्या मुलांच्या शिक्षणाकरितां पुण्यास येऊन राहिल्या. त्याच सुमारास माधवरानांनीं चोळखण आळींतील पटवर्धनांच्या मालकीचें घर वडिलांच्या सांगण्यावरून विकलें; त्यामुळें कुटुंबांत वितुष्टपणा आला होता. पुढें त्रिंबकराव सासूबाईंच्या-पासून विभक्त झाले व निराळे राहूं लागले ते मूलचेच लहरी व तऱ्हेवाईक होते. १९३३ सालीं ते अधिक लहरी व तऱ्हेवाईक झाले. पुढें त्यांचें

वेडांत रूपांतर झालें; माधवराव व त्यांचे बंधु विनायकराव ह्यांनीं त्यांना येरवड्याच्या दवाखान्यांत ठेविलें. तेथेंच १९३७ सालीं ते वारले.

पुण्याचें घर व आवळसची शेती विकून त्रिंबकरावांना अठरा हजारांपर्यंत रक्कम मिळाली होती. त्यांपैकीं सुमारें सहा हजार रुपये रमाकाकू सासूबाई, विनायकराव, माधवराव यांचे हिस्से व यमूताईच्या लग्नाकरितां ठेवलेली कांहीं रक्कम अशी वडील बंधु माधवराव यांच्या त्रिंबकरावांनीं स्वाधीन केली. यांतून दरमहा १५रु. माधवराव-रमाकाकूंना वाईस पाठवीत. फर्ग्युसनमध्यें असेतोंवर ते आपल्या पगारांतून चाळीस रुपये सासूबाईंना देत. मामंजींकडून मिळालेली रक्कम डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडे व्याजी लाविलेली होती. तिच्यापैकीं चार हजार दोनशें रु. त्यांनीं एका स्नेह्याला संकटकाळीं कर्जाऊ म्हणून दिले. ते कधींच परत आले नाहींत. पैसे समाईक कुटुंबाच्या मालकीचे होते म्हणून माधवराव पोटाला चिमटा घेऊन कुटुंबाचें हें कर्ज सव्याज फेडीत होते. अमळनेरला अवघा १०० रु. पगार असतांना सुद्धां, ते अगदीं नियमितपणें दरमहा कर्ज-फेडीची रक्कम पाठवीत होते; त्याच सुमारास आत्याबाईंना त्यांच्या निकृष्टावस्थेंत दरमहा १५ रु. पाठवीत असत व केवळ तीस रुपयांत आपला खर्च भागवीत असत. सर्व तपशील देण्याचा हेतु हाच कीं, दैवयोगानें जरी माधवरावांचें त्यांच्या कुटुंबियांशीं कधींच पटलें नाहीं व लग्न होईतोंवर त्यांना एकटेंच राहावें लागलें, तरी कौटुंबिक जबाबदारी त्यांनीं कधींही टाळली नाहीं. उलट ती पार पाडतांना मुकाट्यानें हाल सहन केले.

माधवराव फर्ग्युसनमध्यें १९१८ ते २४ पर्यंत प्रोफेसर होते. ते फारसी व इंग्रजी हे विषय शिकवीत असत. पंचवीस सालीं राजीनामा देऊन ते बाहेर पडले. त्यापूर्वीं फर्ग्युसनमधून राजीनामा देण्याच्या आधीं वर्षभर म्हणजे १९२४ जुलै ते १९२५ अखेर त्यांनीं अमळनेरच्या प्रताप हायस्कूलमध्यें शिक्षकाचें काम केलें. अमळनेरच्या अज्ञातवासांतच त्यांनीं 'विरहतरंग' लिहिलें. फारसी-मराठी कोश प्रसिद्ध केला. तो प्रसिद्ध झाल्याची ता. २३-१२-२५ अशी आहे. १९२६ सालीं ते पुण्यास परत आले व महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या भावेस्कूलमध्यें शिक्षक म्हणून नोकरीस राहिले. या संस्थेंत ते दोन वर्षें होते. आरंभीं ते घाट्यांच्याकडेच राहात; पण पुढें डेक्कन जिमखान्याच्या मार्केट बिल्डिंगमध्यें एक खोली घेऊन राहूं लागले. याच ठिकाणीं 'सुधारकाची' रचना झाली. १९२४ ते २८ च्या दरम्यान माधवरावांना जगाचे, विशेषत:

पुण्याच्या दिखाऊ उथळ सुधारक जगाचे जे बरे वाईट अनुभव आले ते या काव्यांत प्रतिबिंबित झाले आहेत.

माधवरावांच्या सख्ख्या आत्याबाईचें सासर भडोचला सोहोन्यांच्याकडे होतें. आत्याबाईचे आऊताईचें-पति भिक्षुक होते; पुढें ते वारल्यावर त्यांच्या पोषणाची जबाबदारी माधवरावांच्यावर पडली. माधवरावांचें लहानपण आत्याबाईच्या जवळ गेलेलें; त्यामुळें साहजिकच माधवरावांचा ओढा आत्याबाईच्याकडे जास्त होता. त्यांनीं आत्याबाईंना कधीं दूर केले नाहीं. आत्याबाईसुद्धां अत्यंत करारी व बाणेदार होत्या; परंतु त्या जुन्या मताच्या, त्यामुळें त्यांचें व माधवरावांचें एकत्र राहाणें मात्र कधीं जमलें नाहीं. त्यांच्या पतीच्या निधनानंतर त्या भडोचजवळ सिनोर ह्या गांवीं राहूं लागल्या; मधून मधून त्या माधवरावांच्या जवळ येऊन राहात. त्यांना माधवरावांनीं लग्न करावें असें फार वाटे; परंतु माधवराव त्यांना सांगत "आत्याबाई, मी इतका जातिनिष्ठ नाहीं. शिवाय मला बायको शिकलेली पण सुंदर पाहिजे. मग ती परजातींतील असली तरी मला त्याची पर्वा नाहीं." आत्याबाईंना प्रथम प्रथम हें ऐकून भाचा बहकल्याचें फार वाईट वाटे. पण पुढें त्या त्यांना म्हणत कीं, "तूं तुझ्या इच्छेप्रमाणें लग्न कर, पण संसाराला लाग."

त्यांच्या डोळ्यांदेखत माधवरावांचें लग्न झालें नाहीं. त्या १९२७ सालीं सिनोर येथें वारल्या. त्यांच्या मृत्यूचें दुःख माधवरावांना फार जाणवलें. त्या वारल्या त्या दिवशीं ते लहान मुलांसारखे रडले; पण तेव्हां त्यांनीं निश्चय केला कीं, आपल्या आत्याबाईच्या इच्छेप्रमाणें लग्न करायचें. त्या वारल्यावर सहा महिन्यांनीं आमचें लग्न झालें. माधवरावांना आपल्या आत्याबाईची आठवण झाली म्हणजे ते मला म्हणत "तुला त्यांनीं पाहिलें असतें, तर तुझें खरें कोडकौतुक त्यांनीं पुरवलें असतें. त्यांतून मी ब्राह्मणाच्या मुलीशीं लग्न केलें हें पाहून तर त्यांनीं मोठा सत्यनारायणच केला असता.—"

### राजाभाऊ कर्वे (नीलकंठ श्रीधर कर्वे) यांचें पत्र

कै. माधवरावांचा व माझा स्नेह १९११ सालीं मी बडोद्यास शाळेंत असतांनाचा. त्यापूर्वीं त्यांची माझी नुसती ओळख होती. माझे वडील त्या वेळीं मामलेदार होते. तेव्हां माझें भडोचला सुटींत जाणें होई. माधवरावही मधून मधून आपल्या आत्याबाईच्याकडे म्हणून भडोचला येत. आत्याबाईच्या शेजारींच माझे एक स्नेही रामभाऊ मराठे राहात असत. माधवराव, रामभाऊ

व मी जवळजवळ वयानें सारखेच. रामभाऊंचा व माधवरावांचा परिचय जास्त. ते माझ्यापेक्षां जास्त शिकलेले, परंतु त्यांच्या ज्या गप्पागोष्टी चालत, त्या मी मनःपूर्वक ऐकत असें; माधवराव हे एक बडोदा कॉलेजमधील हुषार विद्यार्थी व माझ्यापेक्षां जास्त शिकलेले तेव्हां मला त्यांच्याबद्दल अत्यंत आदर होता.

पुढें मी बडोद्यास शिक्षणाकरितां राहिलों. माझे वडील फिरतीवर असल्या-मुळें, मी देवांच्या चाळींत वरल्या मजल्यावर एका लहानशा खोलींत राहात होतों. त्याच सुमारास माधवराव इंटरमीजियेट झाले होते. ते युनिव्हर्सिटींत दुसरे किंवा तिसरे आले असावेत व त्यामुळें त्यांना १५-२० रु.ची शिष्यवृत्तिही मिळाली होती. मामांच्या घरीं अभ्यासाला स्वतंत्र खोली नव्हती, म्हणून ते खोलीच्या शोधांतच होते. परंतु बाहेर स्वतंत्र राहाण्यास तेवढे पैसे अपुरे पडत होते म्हणून कांहीं दिवस ते अभ्यासाकरितां कॉलेजच्या वसतिगृहांत राहून जेवायला घरीं जात. पुढें एक दिवस त्यांची माझी भेट झाल्यावर मी त्यांना स्वतंत्र खोली घेऊन राहात असल्याचें सांगितलें. लगेच कांहीं दिवसांनीं ते माझ्या खोलींत राहायाला आले. तेथून आजोळ जवळच असल्यामुळें, त्यांना घरीं जेवायला जाणें सोपेंच पडूं लागलें; शिवाय त्यांचें माझ्याकडे राहाणें मलाही फायद्यांचेंच होतें.

माधवरावांचे मामा व बाकीची घरची मंडळी पुराणमताभिमानी व माधव-राव सुधारक ह्यामुळें त्यांचें आपल्या नातेवाईकांशीं पटलें नाहीं व पुढें त्यांनीं घरीं जेवायला जाण्याचेंही सोडलें.

माधवराव-महत्त्वाकांक्षी; नुसतें बी. ए. होण्यांत त्यांच्या मनाला समाधान वाटेना. बी. ए.च्या परीक्षेंत वरच्या वर्गांत आलें पाहिजे अशी त्यांना जबर इच्छा होती. ते निराळे स्वतंत्र राहूं लागल्यापासून नुसत्या शिष्यवृत्तीच्या पैशावर त्यांचें भागेना म्हणून त्यांना शिकवण्या करणें भाग पडलें. परंतु त्यामुळें अभ्यासांत व्यत्यय येऊं लागला. अभ्यासाला वेळ मिळेनासा झाला; व त्यांत मानसिक त्रासाची भर पडली. त्यामुळें माधवराव तऱ्हेवाईक बनले.

बी. ए. ला. प्रथम त्यांनीं इंग्रजी घेतलें होतें. माधवराव शाळेंत होते तेव्हांपासूनच त्यांचा इंग्रजी विषय फार चांगला होता. ते शाळेंत असतांना त्यांना वाडिया या आडनांवाचे पार्शी शिक्षक इंग्रजी शिकवीत होते. त्यांचे माधवराव अत्यंत आवडते विद्यार्थी माधवराव मॅट्रिक झाल्यावर त्यांचे गुरु

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६७७ वि: अरिम
क्रमांक १२३३४ नों दि: २।७।८६



माधवराव पटवर्धन
१९१५ मध्यें

वाडिया यांनीं त्यांना त्यांचें इंग्रजी उत्तम असल्याचें एक सर्टिफिकेटही दिलें होतें. पुढें बडोदा कॉलेजांत गेल्यावरही माधवरावांचें जाणें-येणें वाडिया मास्तरांच्याकडे होतें व त्यांच्या आग्रहामुळेंच माधवरावांनीं पुढें बी. ए. ला इंग्रजी विषय घेतला. परंतु सहा महिन्यांनीं त्यांना असें आढळलें कीं, त्या विषयाचा अभ्यास जसा व्हायला पाहिजे तसा आपला होत नाहीं. असें त्यांना दिसतांच त्यांनीं इंग्रजी विषयाला रजा दिली व इतिहास विषय घेतला. सबंध वर्ष संपत आलें, बी. ए.ची परीक्षा जवळ आली तरी माधवरावांचीं इतिहासाचीं चारशें पानें वाचावयाचीं शिल्लकच होतीं. माधवरावांना पुन्हा असें वाटलें कीं, आतां आपणांस परीक्षेला बसणें शक्य नाहीं. त्यांनीं पुन्हा विषय बदलला व गणित विषयाच्या अभ्यासाला सुरुवात केली. परंतु त्याही विषयाचा त्यांचा अभ्यास नीट झाला नाहीं व शेवटीं ते फारसी घेऊन बी.ए. झाले. या सर्व अनिश्चित वृत्तीचें कारण एकच. माधवराव अत्यंत भावनाप्रधान, हळव्या मनाचे, पण तितकेच करारी व निश्चयी होते. त्यामुळेंच ते पुढें बी. ए. झाले.

माधवराव दुसऱ्याची सोय जाणणारे होते. त्यांनीं जेव्हां असें पाहिलें कीं, आपल्या विक्षिप्त वर्तनानें मला त्रास होतो तेव्हां त्यांनीं लगेच माझ्या खोलीशेजारची मोठी खोली भाड्यानें घेतली; तरी आमच्या खोलीचें दार एकच होतें. त्यांच्या मनाच्या तळमळीचे ते दिवस मीं प्रत्यक्ष पाहिलेले आहेत. बडोद्याचा उन्हाळा ११० किंवा ११६ अंशावर असतांना ऐन दुपारच्या वेळीं माधवराव दुपारीं बारा वाजल्यापासून संध्याकाळीं चारपांच वाजेपर्यंत अंगावर घोंगडी पांघरून झोंपत. त्यांना त्या मनाच्या चमत्कारिक स्थितींत झोंप कधींच लागत नव्हती. परंतु कांहीं तरी कारणानें सैतान त्यांच्या अंगांत शिरला कीं दिवसच्या दिवस, न खातां न पितां पलंगावर डोक्यापासून पायापर्यंत पांघरूण घेऊन ते आपले स्वस्थ पडत. अशा स्थितींत आम्हाला त्यांच्याशीं बोलण्याचें धैर्य नसे. सैतानाचें साम्राज्य संपलें कीं माधवराव पलंगावरून उठत. कशावर तरी त्यांची कविता तयार होई. ती एकदां लिहून काढली कीं माधवराव शांत होत; पुन्हा आपल्या दिवसाच्या कार्यक्रमाला लागत; कित्येक वेळीं पाव-बिस्किटें खाऊनच राहात. शिक्षणानें ते माझ्यापेक्षां किती तरी पुढें. त्यामुळें त्यांचा मान ठेवून मला त्यांना जेवढें सांगतां येईल तेवढें सांगण्याचा प्रयत्न मी करी. केव्हां त्याचा

उपयोग होई, केव्हां माझें सांगणें व्यर्थ जाई. अशाही स्थितींत त्यांच्यावर ताबा चालवणाऱ्या दोनच व्यक्ति होत्या. एक श्री. सौ. काशीबाई हेलेंकर व दुसऱ्या कु. लक्ष्मीबाई चौधरी. माझ्या सांगण्याचा उपयोग झाला नाहीं म्हणजे मीं त्यांच्यापैकीं कोणाला तरी माधवराव जेवले नाहींत म्हणून सांगावें. त्यांनीं मग त्यांना जेवायला न्यावें. असे प्रसंग वारंवार घडत.

माधवराव कांहीं बाबतींत मोठे भाग्यवान् होते. त्यांना उदरनिर्वाहाकरितां तीनचार शिकवण्या कधींच कराव्या लागल्या नाहींत. जवळजवळ तीनचार वर्षें ते एकाच घरीं शिकवणी करीत होते. त्या वेळचे गार्डन सुपरिंटेंडेंट रा.कोठावाला म्हणून होते. त्यांच्याकडे पहिल्या वर्षीं २० रु. ची शिकवणी होती. पुढें तेथेंच त्यांना ३०, ४०, ४५, रु. वाढले. त्यांच्या मुलीला व मुलाला ते शिकवीत असत.

वेगळे राहूं लागल्यावर माझ्याबरोबरच ते हनुमान क्लबमध्यें जेवूं लागले. देवाची चाळ ही त्या वेळीं कॉस्मोपॉलिटनप्रमाणें होती. त्यांत सर्व तऱ्हेचे लोक राहात. ह्या चाळीच्या तिसऱ्या मजल्यावर एका भागांत हा आमचा हनुमान क्लब होता. तेथेंच तो क्लब चालविणारे विद्यार्थी राहात असत. दुसऱ्या भागांत ज्या कांहीं खोल्या होत्या त्यांत हेलेंकर मंडळी राहात असत.त्यांच्याच शेजारीं ह्या आमच्या दोन खोल्या होत्या. मी व माधवराव चहा एके ठिकाणींच करीत असूं. माधवराव नेहमीं चहा करीत. मागाहून चहाचें सामान आवरण्याचें व कपबशा विसळण्याचें काम माझें असे. माधवरावांना दूध आवडत नसे. चहांत जेवढें दूध पडेल तेवढेंच दूध ते घेत. परंतु मी आजारी असल्यामुळें बरेच दिवस नुसतें दूध घेत असें. बडोद्याला दूध चांगलें व स्वस्त त्यामुळें आमच्या दोघांच्या चहाला दोन पैशांचें दूध अगदीं भरपूर होई. माधवरावांनीं कांहीं दिवस प्रकृतीकरितां दूध पिण्याचें ठरविलें; परंतु ते दूध पिण्यासाठीं रा. बापूराव शिंद्यांच्याकडे जात असत. कित्येकदां माधवरावांच्या बरोबर मीही बापूरावांच्याकडे जात येत असें.

माधवरावांचा समाजसुधारणेकडे जास्त ओढा. समाजसुधारणा व्हायला पाहिजे असें त्यांना मनापासून वाटे व तशी सुधारणा व्हावी म्हणून आपणाकडून शक्य तेवढी खटपट करणें, आपण तसें वागणें हें त्यांचें त्या वेळचें ध्येयच होतें. त्यामुळें बापूराव शिंदे हे जातीनें मराठा परंतु जातिभेदाचा प्रश्न माधवरावांच्या मनांत कधीं आला नाहीं.

काशीबाई हेर्लेकरांची गणना त्या वेळच्या बडोद्यांतील सुशिक्षित व कर्त्या स्त्रियांत होत होती. त्यांच्या मुली कॉलेजचें शिक्षण घेत होत्या, म्हणूनच केवळ माधवरावाचा ओढा त्यांच्याकडे जास्त.

श्री. काशीबाईच्याबद्दल माधवरावांना आदर वाटत असे. ते त्यांना 'आई' म्हणत. व त्यामुळेंच पुढें त्या कुटुंबाशीं त्यांचा घरोबा वाढला. तेथेंच लक्ष्मीबाई चौधरी, शांताबाई व माधवराव ह्यांचे मोठमोठ्या विषयावर वादविवाद चालत. मी ते मोठ्या कौतुकानें ऐकत असे.

माधवरावांचें जाणेंयेणें लक्ष्मीबाईचे मेहुणे मेजर बलदेव प्रसाद पाठक व त्या वेळचे सरसुभे रा. गणेश सदाशिव भाटे ह्यांच्याकडेही असे. गणपतरावांचे धाकटे बंधु रघुनाथ सदाशिव भाटे—नामदेव—हे माधवरावांचे परम स्नेही. परंतु माधवरावांचें येथें जाणेंयेणें वाढलें, कारण गणपतराव हे पुनर्विवाहित होते—सुधारक होते त्या वेळचे बहुतेक सर्व सुधारक सधनच होते. त्यामुळें त्यांना तोंडावर नांवें ठेवण्यास कोणी धजावत नसे. मध्यमवर्गीय अशा श्री. सौ. काशीबाई हेर्लेकरच; पण त्यांची तपश्चर्याच एवढी दांडगी होती कीं, त्यांना पाहिल्यावर विरोधकांची मान आपोआपच नम्र होई. परंतु माधवरावांची परिस्थिति थोडी भिन्न होती. एकतर तेव्हां ते विद्यार्थी होते; जुन्या सनातनी मध्यमवर्गाच्या कुटुंबांत त्यांचा जन्म झालेला; त्यामुळें माधवरावांचे ओळखीचे लोक त्यांचा उपहास करीत, हेटाळणी करीत, त्यांना नांवें ठेवीत. परंतु माधवरावांनीं त्या गोष्टीची कधीं पर्वा केली नाहीं. तसे ते हेकेखोर, हटवादी व तऱ्हेवाईक होते. लोक आपल्याला हसतात ना? नांवें ठेवतात ना? तर मग ती गोष्ट ते मुद्दामच करीत.

एकदां मला असें आठवतें कीं, माझ्या प्रकृतीकरितां डॉक्टरनीं मला एग्-मिक्श्चर घ्यायला सांगितलें होतें. परंतु मी पडलों ब्राह्मण. अंड्याचें औषध राजरोस कसें घ्यायचें हा मला प्रश्न पडला. मी जरी माधवरावांच्या सहवासानें सुधारणावादी झालों होतों तरी प्रत्यक्ष कांहीं करायची वेळ आली कीं माझें धैर्य नष्ट होई. मला एग्मिक्श्चर घ्यायला डॉक्टरनीं सांगितलें आहे हें माधवरावांना माहीत होतें. त्यांनीं मी जेव्हां डॉक्टरच्या सांगण्याप्रमाणें तें घेत नाहीं असें पाहिलें तेव्हां त्यांनीं मला कारण विचारलें. मी तात्पुरतीं उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं. परंतु माधवरावांनीं मी तें घ्यायला भितों आहें हें ओळखलें. ते मला म्हणाले, "राजाभाऊ, आपल्याला औषध म्हणून अंडें

घ्यायचें आहे. त्यांत लोकांना काय म्हणून भ्यायचें ? मी तुला करून देतों ” म्हणून आपणच अंडीं आणून मला ते सर्वांच्यासमोर एग्‌मिक्श्चर करून देऊं लागले. इतकेंच नव्हे तर अंडीं ठेवलेली बशी समोर टेबलावर ठेवूं लागले. त्यांचें स्नेही जमले म्हणजे त्यांच्या देखत अंडें फोडून आपण स्वतः खाऊन दाखवूं लागले. हें कां तर त्यांना तें आवडत होतें म्हणून नव्हे तर चुकून माझ्या तोंडून कोठें गेलें होतें कीं, अशी गोष्ट उघड उघड कशी करायची; म्हणून त्यावर त्यांनीं हा तोडगा काढला. माझें औषध घेणें तर बाजूलाच राहिलें, पण आमच्यांत अशी निषिद्ध गोष्ट राजरोस करावी कीं नाहीं त्याबद्दलच वाद सुरू झाला.

माधवराव एके काळीं शाळेंत असतांना क्रांतिकारकही होते. त्यांनीं तशी कांहीं कामगिरी केली नाहीं; परंतु त्या विचारांची छाप त्यांच्या मनावर कांहीं दिवस होती; परंतु लहान वयांतल्या त्यांच्या त्या मताला निश्चितता मात्र आली नाहीं. ते कुस्ती व मलखांब खेळत. क्रांतिवीर बनायचें असेल तर शरीरसुदृढतेची आवश्यकता आहे म्हणून तो नाद त्यांना लागला होता. साधारण १९०५ ते १९०९ पर्यंत महाराष्ट्रांत तेव्हां क्रांतीची लाट उसळली होती. तिचा ध्वनि बडोद्यांत महाराष्ट्रीय लोकांत मधून मधून उमटत असे. तेव्हां त्या वेळचे हे छोटे वीर मोठ्या आवेशानें क्रांतीच्या गप्पा मारीत आणि म्हणूनच त्या वेळेस माधवराव ज्या शास्त्र्यांच्या पोळेंत राहात होते तेथें एक नारायणगुरूची तालीम होती, त्या तालमींत ते कुस्ती खेळायला जात; आणि त्याचा परिणाम म्हणजे त्यांच्या समोर राहाणाऱ्या दत्तू मराठे-बरोबर कुस्ती खेळत असतांना माधवरावांचा हात मोडला. ही गोष्ट १९०६ सालची असावी. त्यानंतर हा त्यांचा नाद सुटला.

माधवरावांना बैठे खेळ खेळण्याचा नाद मुळींच नव्हता. गप्पा, वादविवाद, कविता, वाचन यांची आवड त्यांना जास्त. कित्येक वेळीं आम्ही रात्रीं जेवून आलों कीं मी आणि माझे स्नेही-वर्गबन्धु-केळकर, वैद्य वगैरे यांच्याबरोबर गप्पा मारण्यांत माधवराव इतके रंगून जात कीं, पहाट केव्हां झाली हेंसुद्धां आम्हांला कळत नसे. मग पहाट झाली म्हणून माधवराव चहा पिऊन अभ्यासाला लागत व मी झोंप काढीत असे. पण असें महिन्यांतून एखादेच वेळीं होई. परंतु माधवराव वक्ते व आम्ही श्रोते. गप्पांना विषय अमुकच असे असें नाहीं. माधवरावांना अहंकार कधीं शिवला नाहीं. वास्तविक आम्ही शाळेंत,

ते कॉलेजांत; परंतु आमच्याबरोबर गप्पा कशा माराव्या, त्यांत आपल्याला कमीपणा आहे, असें माधवरावांना कधीं वाटलें नाहीं.

पुढें कांहीं दिवसांनीं आमच्या शेजारीं शंकर पंढरीनाथ भागवत, जे हल्लीं सोलापुरास रंगाचे व्यापारी असून भागवत चित्रमंदिराचे ( सिनेमागृहाचे ) मालक आहेत ते राहावयास आले. त्यांची घरची गरिबी होती व थोड्या पैशांत त्यांना खर्च भागवावा लागे. म्हणून महिन्यांतून कांहीं दिवस पोळी व कांहीं दिवस बटाटे किंवा रताळीं उकडून त्यावर ते आपली गुजराण करीत. माधवरावांना त्यांची ही आहारपद्धति पसंत पडली व तेही त्यांच्यांत सामील झाले; पण हें फार तर वर्ष, दीड वर्ष चाललें असेल.

माधवरावांचा कविता करण्याचा नाद जसा वाढूं लागला तसा आमचा विविध विषयांवर होणारा गप्पांचा अड्डा क्वचितच होऊं लागला. त्या काळांत त्यांच्या अनेक कविता झाल्या. ते त्या मला म्हणून दाखवीत. परंतु त्यांच्या काव्यावर बरीवाईट चर्चा करण्याचें धैर्य मला कधीं झालें नाहीं. कारण माझें ज्ञान बेताचें. मला तसें करणें संकाचाचें वाटे. माधवराव माझ्यावर रागावत व कित्येक वेळीं चिडून म्हणत कीं, 'तुझ्यापुढें कविता म्हणणें म्हणजे दगडापुढें म्हणण्यासारखें आहे. इतका कसा रे तूं अरसिक!' पुढें पुढें बापूराव शिंद्यांचा व त्यांचा परिचय वाढूं लागला. त्यांच्या कवितेला उत्तम श्रोता मिळाला व माझ्यावरची ही आपत्ति टळली. रात्रीं, बेरात्रीं ते लहर आली कीं शिंद्यांच्याकडे जात. त्यांना घेऊन ते फिरायला जात. वास्तविक बापूराव बडोद्याला मोठे सरकारी अधिकारी, माधवरावांच्यापेक्षां वयानेंही मोठे, परंतु ते माधवरावांशीं बरोबरीच्या नात्यानें वागत. पुढें त्यांची ओळख चंद्रशेखर कवींशीं झाली. हळूहळू त्यांच्या बैठकी चंद्रशेखरांच्या घरीं होऊं लागल्या. त्यांच्या कवितेला योग्य मार्गदर्शक मिळाले. मी शाळेंत असतांना माधवराव माझे पालकही होते. माझ्या प्रगतिपुस्तकावर ते सही करीत. मधूनमधून माझा जो विषय कच्चा असेल तो ते मला शिकवीत. मी नापास झालों कीं, ते माझ्यावर रागावत. तें त्यांचें रागावणें कळकळीचें असे. माधवराव इतके अनियमित वागत, परंतु ते कधीं आजारी पडल्याचें मला आठवत नाहीं. मी वारंवार आजारी पडे. माझी शुश्रूषा ते मनापासून करीत. कांहीं वेळेला मलाच संकोच वाटे, पण माधवराव अत्यंत प्रेमळ. ते जरी लहरी असले तरी त्यामुळें ते तुटक झाले नाहींत. ज्यांच्याशीं त्यांचा

जिव्हाळ्याचा संबंध होता त्यांच्याबद्दलचें कर्तव्य त्यांनीं मनापासून कळकळीनें केलें.

माधवरावांचें पाळण्यांतलें नांव महादेव. त्यांच्या आत्याबाई त्यांना 'महादेव' असेंच म्हणत. पुढें इंटर झाल्यावर माधवरावांनीं आपलें महादेव नांव बदलून 'माधव' केलें. आत्याबाईनीं त्यांना महादेव म्हटलें कीं ते चिडत. परंतु आत्याबाईनीं त्यांना सांगितलें, "आम्ही जें तुझें नांव ठेवलें आहे तेंच तुझें खरें नांव. नांवें अशीं कधीं कुणीं बदललीं आहेत काय ? त्या नांवानेंच आम्ही तुला हांक मारणार."

ते एकदां अभ्यास करूं लागले कीं मनापासून आठआठ दहादहा तास करीत. एखादे वेळीं संध्याकाळीं ५ वाजतां झोंपून रात्रीं १ वाजतां उठत. कधीं रात्रभर जागून पहाटें ४–५ वाजतां निजायचे. परंतु तऱ्हेवाईक, लहरी, भावनाप्रधान स्वभावामुळें हा नियम ७–८ दिवसांपेक्षां जास्त वेळ टिकत नसे. कारण ५–७ दिवसांनीं त्यांचा सैतान जागा होई. त्यांच्या लहरी स्वभावामुळें जशीं अनेक माणसें जोडलीं गेलीं तशीं त्यांच्या स्वभावाचें आकलन न झाल्यामुळें त्यांतलीं कांहीं तुटलींही. त्यांच्या लग्नानंतर हळूहळू पूर्वींचीं सर्व माणसें त्यांच्या भोंवतीं गोळा झालीं. त्यांच्या स्वभावांतही फरक होऊं लागला; स्नेहीसोबती जास्त वाढूं लागले.

ह्याचें श्रेय त्यांच्या सुविद्य पत्नीला आहे. त्यांच्या सहवासानें त्यांचा लहरीपणा कमी झाला. माधवराव माणसाळले, आमचे झाले.

माधवराव १९१८ सालीं पुण्याला फर्ग्युसनमध्यें प्रोफेसर म्हणून आले. त्या सुमारास मी पुण्यांतच होतों. ते नातूंच्या चाळींत राहात. मी त्यांच्याकडे झोंपावयाला जाई. त्या सालीं आठवण ठेवण्यासारखी एक गोष्ट झाली. ती अशी—

१९१८ सालीं लोकमान्य टिळकांना त्यांच्या विलायतच्या कामगिरीबद्दल सर्व पुणेंकरांतर्फे एक मानपत्र देण्याचें ठरलें होतें. तें मानपत्र एकमतानें द्यावें असें ठरलें होतें. परंतु त्या गोष्टीला विरोध करणारी कांहीं मंडळी होतीच. तेव्हां ज्ञानप्रकाशमध्यें विरोधकांचीं पत्रें व चर्चा येऊं लागली. रँगलर र. पु. परांजपे विरोधकांत प्रमुख होते. त्यांच्या बाजूनेंच माधवरावही विरोधकांत सामील झाले.

ज्या दिवशीं रे-मार्केटच्या मैदानांत सभा होती. त्या दिवशींविरोधकांच्या बाजूला फक्त माधवराव बसले होते. बाकी कोणीही विरोधक हजर नव्हते. सर्व ठराव मांडून झाल्यावर "ह्याला कोणाचा विरोध आहे का?" असें विचारण्यांत आलें. माधवरावांनीं एकट्यांनींच हात वर केला. लोकांनीं ह्यांच्याविरुद्ध एकच गिल्ला करून त्यांना खालीं बसायला लावलें. सभा संपल्यावर त्यांना मारण्याकरतां लोक टपून बसले होते. सभेच्या चालकांनीं त्यांच्या संरक्षणार्थ कांहीं लोक दिले व त्यांना घरीं पोहोंचविण्यांत आलें. तेव्हांपासून माधवरावांना, एक विक्षिप्त व्यक्ति म्हणून लोक ओळखूं लागले.

माधवरावांना शिक्षणाचा, विद्वत्तेचा गर्व नव्हता. ते जसे त्यांच्या साहित्यिक विद्वान् मित्रांत मिसळत तसे ते आमच्यांतही मिसळत. त्यांच्या विद्वान् मित्रांशीं ते साहित्यावर चर्चा करीत. आमच्याशीं ते घरगुती विषयावर चर्चा करीत; कळकळीनें आमची विचारपूस करीत; बरोबरीच्या नात्यानें वागत. त्यांचा माझा लोभ शेवटपर्यंत टिकला. अलीकडे पुण्याला आल्यावर ८, १५ दिवसांत त्यांची माझ्या घराकडे फेरी झाली नाहीं असें कधीं झालें नाहीं. ते अनेक कामांत व्यग्र असले तरी माझी व माझ्या कुटुंबाची विचारपूस केल्याशिवाय ते राहिले नाहींत. वास्तविक माझा व्यवसाय निराळा, त्यांची योग्यता केवढी मोठी! पण बडोद्याच्या त्यांच्या माझ्या स्नेहांत अंतर कधींच पडलें नाहीं.

शेवटीं दैवयोग असा कीं, १९१६ सालीं आम्हीं दोघांनीं बडोदें सोडलें. ते मुंबईला पुढील शिक्षणाकरितां गेले. मी पुण्याला आलों. १९३९ सालीं ते वारले तेव्हां मी बडोद्यास, जेथें आम्ही राहात होतों त्याच चाळीखालीं उभा राहून माधवरावांच्या निधनाची वार्ता ऐकली. मी लहान मुलासारखा रडलों."

# आमचें लग्न : : : २

माधवरावांना मी आमच्या विवाहाच्या आदल्याच वर्षीं म्हणजे १९२७ सालीं प्रथम पाहिलें. त्या वर्षीं श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या अध्यक्षतेखालीं पुण्याला साहित्य-संमेलन भरलें होतें. त्या संमेलनाकरितां भास्करराव तांबे ग्वाल्हेरहून मुद्दाम आले होते. भास्करराव हे माझ्या वडिलांचे (रा. रा. गं. बा. गरुड, सेवासदनचे जनरल सेक्रेटरी) परम स्नेही; ते आमच्या म्हणजे गरुडांच्या घरींच उतरले होते. साहित्य-संमेलनानंतर बाबांच्या व तांबे-काकांच्या इच्छेवरून प्रो. मायदेवांनीं काव्यगायनाचा एक कार्यक्रम मुद्दाम आमच्या घरीं घडवून आणला. त्या रात्रीं 'रविकिरण मंडळा'चे बहुतेक सदस्य हजर होते. 'यशवंत' 'गिरीश' यांच्या कविता झाल्यावर माधव-रावांना कोणी तरी 'सुधारकां'तील कांहीं भाग वाचून दाखविण्याचा आग्रह केला. तेव्हां हेच कवि 'माधव जूलियन' हें मला माहीत नव्हतें. मीं जमलेल्या स्त्रियांपैकीं कोणाला तरी "हे कवि कोण?" म्हणून विचारलें. लगेच एका व्यक्तीनें मला आश्चर्यानें विचारलें, "वा गंगू, अजून तुला हे कोण तें माहीत नाहीं? हेच ते सुप्रसिद्ध कवि "माधव जूलियन." हाच त्यांना पाहण्याचा माझा प्रथम प्रसंग. त्या आठ दिवसांत आमच्या घरीं तांबे-काकांच्यामुळें जाणाऱ्या-येणाऱ्या मंडळींची गर्दी असे. आमचे घर म्हणजे अगदीं लग्नघर झालें होतें. तांब्यांना भेटण्याकरतां माधवराव पुन्हा एकदां आले असतां तांबेकाकांनीं माझी त्यांच्याशीं ओळख करून दिली. त्यानंतर तांबेकाका होते तोंवर माधवराव अनेकदां आमच्या घरीं येत असत. आमचा परिचयही झाला. परंतु ते मला संकोची दिसले. ते फार कमी बोलत व शक्यतर बोलण्याचें टाळीत. ते थोडे त्रासिक व आपल्यांतच गढलेले असे दिसत. एकंदरींत ते माणूसघाणे असावेत असा माझा त्यांच्याबद्दलचा पहिला ग्रह झाला.

सम्मेलनानंतर एक दिवस प्रा. वामन मल्हार जोशी बाबांच्याकडे आले व त्यांनीं माधवरावांचें नांव लग्नाकरितां सुचविलें. दोनचार दिवसांनीं बाबांनीं मला माधवरावांच्याबद्दल विस्तृत माहिती, फर्ग्यूसन कॉलेज प्रकरणासह

सांगितली व मीं ती सर्व शांतपणें ऐकून घेतली आणि यत्किंचितही न थांबतां उत्तर दिलें, “असल्या स्थळाबद्दल विचार न करणें बरें” व बाबांनींही कोणत्याच प्रकारें या बाबतींत आग्रह धरला नाहीं. परंतु गु. तात्यांचें मत माधवरावांच्याबद्दल चांगलें दिसलें. मी नाहीं म्हणतें हें बाबांनीं त्यांच्या कानांवर घातलें. त्यांनीं माझी मूर्खांत गणना केली. ते बाबांना म्हणाले.” “माधवरावांच्या फर्ग्यूसन कॉलेजप्रकरणांतील कंड्या खऱ्या नाहींत आणि थोडें तथ्य असलें तरी ते सज्जन आहेत. मला वाटतें, गंगूला तेथें द्यायला कांहींच हरकत नाहीं. माधवरावांशीं मी त्या बाबतींत पत्रव्यवहार करीन.” असें ते सांगून गेले आणि बाबाही त्या गोष्टीला तयार झाले आणि पुढील पत्रव्यवहार माझ्यापासून गुप्त ठेवण्यांत आला.

सन १९२८ सालीं मी जी. ए.च्या परीक्षेला बसलें. परंतु इंग्रजी विषयांत नापास झालें. नापास होण्याचें कारणही मोठें विचित्र घडलें. इंग्रजीची पहिली प्रश्नपत्रिका हातीं आली. प्रश्न मला अगदीं सोपे वाटले. त्या आनंदांत पहिल्या पानावरील पांच प्रश्न सोडविले व प्रश्नपत्रिकेची मागील बाजू न पाहातांच दोन तासांत उत्तरपत्रिका सुपरवायझरच्या हातांत देऊन मी बाहेर पडलें. पायऱ्या उतरतां उतरतां माझ्या मनांत विचार आला, “मीच सर्वांच्या आधीं बाहेर आलें तेव्हां माझें कांहीं लिहावयाचें राहिलें तर नाहीं?” मीं प्रश्नपत्रिका उलटून पाहिली. माझ्या काळजांत धस्स झालें. जवळजवळ निम्मे प्रश्न मीं सोडूनच दिले होते. मग मात्र मला चैन पडेना. ह्याचा परिणाम असा झाला कीं, पुढला General English व Poetry चा पेपर मला वाईट गेला. कांहींच लिहायचें सुचेना, आणि शेवटीं व्हायचें तेंच झालें. त्या गोष्टीनें माझ्या मनाला धक्काच बसला; आजपर्यंत मीं कधींही नापास झालें नव्हतें. साधारण बऱ्या मुलींत माझी गणना होत होती. आणि त्यामुळें कॉलेजांत मला पंधरा रुपयांची एक शिष्यवृत्तीही मिळाली होती. परंतु दुःखांत सुख एवढेंच होतें कीं, इंग्रजीखेरीज मला बाकीच्या विषयांत चांगले गुण मिळाल्यामुळें इतर सर्व विषयांतून मी सुटलें.

हा अनुभव मला नवीनच होता. मला कांहीं सुचेना व पुढें काय करावें याचा विचार लवकर होईना. केवळ एका विषयांकरितां पुन्हा वसतिगृहांत जाऊन राहणेंही मनाला बरें वाटेना. शेवटीं प्रा. गोपाळ महादेव चिपळूणकरांनीं

आपल्या कन्याशाळेंत मला कांहीं तासांकरितां शिक्षिकेचें काम देण्याचें ठरविलें व वेळ घालविण्याचें हें साधन मलाही बरें वाटलें.

पुढल्या वर्षीं म्हणजे १९२९ सालीं पुन्हा राहिलेल्या विषयाला मी बसावयाचें नक्की ठरविलें होतें.

माझे वडील माझ्या लग्नाची खटपट जोरांत करीत होते. मी नापास झालें तेव्हां त्यांच्या मनानें परत उचल खाल्ली. माझेंही मत लग्नाला प्रतिकूल नव्हतें. बाबा जें करतील तें माझ्या चांगल्याकरतांच करतील अशी माझी खात्री होती. त्यांनीं दोन चार स्थळें पाहिलीं; परंतु कांहीं ठिकाणीं माझें रूप, कांहीं ठिकाणीं बाबांचा स्वतःचा पुनर्विवाह तर कांहीं ठिकाणीं माझी स्वतःची नापसंती आड आली. बरींच स्थळें पाहिल्यानंतर माधवरावच बाबांना पसंत पडले. माधवराव तेव्हां महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटींतील भावेस्कूलमध्यें शिक्षकाचें काम करीत होते व डेक्कन जिमखान्याच्या पोस्टऑफिसाजवळच्या चाळींत वरल्या मजल्यावर खोली घेऊन राहात होते. त्या वर्षीं वामनराव व माधवराव दोघेही मुंबई विद्यापीठाचे परीक्षक होते. वामनरावांनीं मुंबईला माधवरावांच्याकडे जाऊन "गरुड आपली मुलगी तुम्हांला द्यायला तयार आहेत. तुम्हाला विचार करायचा असल्यास करा" असें सांगितलें.

माधवरावांचें बाबांना उत्तर आलें कीं, "मी पुण्याला येत आहें. आपण मला भेटावें." बाबा एप्रिलच्या १५–१६ तारखेच्या सुमारास त्यांना भेटायला गेले. त्यांचें बोलणें झालें. माधवरावांनीं सांगितलें, "माझी तुमच्या मुलीशीं जरी थोडी ओळख असली तरी ती माझी सर्व हकीगत ऐकून घेऊन माझ्याशीं लग्न करायला तयार असेल तर मीही लग्नाला संमति देईन." मीही आढेवेढे घेतले नाहींत. आमच्या लग्नाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. माधवरावांनाही त्या वेळीं आणखी दोनचार मुली सांगून आल्या होत्या. परंतु त्यांतील एकदोन माधवरावांनीं नापसंत केल्या आणि त्यांना पसंत असलेल्या एकदोघींनीं "असल्या माणसाशीं लग्न करण्यापेक्षां विहिरींत उडी घेणें बरें" असें सांगून साफ नकार दिला. राहतां राहिलें मी. बाबांच्या संमतीनें माधवराव मला भेटूं लागले. या भेटींत कोणतीही हकीगत मजपासून चोरून न ठेवतां त्यांनीं मला स्वतःबद्दलचें माजलेलें काहूर सांद्यंत सांगितलें.

माधवराव सन १९१८ सालीं जेव्हां एम्. ए. झाले, तेव्हां त्यांनीं प्रयत्न केला असता तर त्यांना कोठेंही सरकारी नोकरी मिळाली असती किंवा बडोदें संस्थानांतही मोठ्या हुद्यावर ते लागले असते. परंतु त्यांना सरकारी नोकरी नको होती. कोठें तरी सार्वजनिक काम करण्याची आवड त्यांना पहिल्यापासून होती व म्हणूनच ते फारसी व इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून सन १९१८ सालीं डी. इ. सोसायटींत आले व त्यानंतर एक वर्षानें ते त्या संस्थेचे तहाहयात सभासद झाले. इंग्रजी व फारसी भाषेंत तर त्यांचा हातखंडा होताच, परंतु त्यांचें गणितही फार चांगलें होतें व त्यांचा मराठीचा व्यासंगही दांडगा होता. त्यामुळें माधवराव लवकरच नांवारूपाला आले. माधवराव दिसायला सुंदर होते. त्यांची राहाणी आधुनिक पद्धतीची होती. डी. इ. सोसायटींत आले तेव्हां माधवराव अगदीं तरुण म्हणजे सारे २४ वर्षांचे होते. त्या वेळचे त्यांचे सहाध्यायी व सहाध्यापक सांगत कीं, ते दिसण्यांत रुबाबदार व सुंदर दिसत, त्यामुळें विद्यार्थ्यांच्या मनावर त्यांची चटकन् छाप पडत असे.

माधवराव फर्ग्युसन कॉलेजांत आल्यावर लवकरच 'रविकिरण मंडळ' स्थापन झालें. एका नवीन प्रकारच्या प्रेमकाव्याला सुरुवात झाली. माधवरावांनीं फारसी गज्जलवृत्तें मराठींत आणलीं. त्या वृत्तांत नवीन प्रकारच्या कविता रचल्या. ते जसे तरुणांचे आवडते कवि झाले तसेच जुन्या पिढीच्या गैरसमजांचे व रोषाचेही विषय झाले. या काळांत अद्‌भुतरम्य अशा काव्यसृष्टींत माधवराव विहार करीत होते. या वेळीं त्यांचा एखाद्या सुंदर व सुविद्य मुलीशीं परिचय झाला असता व त्याचें रूपांतर प्रेमविवाहांत झालें असतें तर सर्व सुरळीत झालें असतें व पुणें सोडण्याची माधवरावांवर पाळी आली नसती. पण २०।२५ वर्षांपूर्वींचा समाज वेगळा होता. त्या वेगळ्या समाजांत रविकिरण मंडळानें कांहीं वेगळ्या प्रथा पाडल्या. मंडळाच्या बैठकी होत, त्यांत सदस्यांच्या बायका असत व कांहीं निवडक मित्रमंडळी या बैठकींना सपत्नीक हजर असत. या बैठकींत काव्यगायन होई, चहापान होई व अनेक प्रश्नांवर चर्चा होई. मंडळी रविवारीं चहासाठीं जमत म्हणून मंडळाचें आरंभींचें नांव 'सन्–टी–क्लब' पडलें. या बैठकींना कोणा ना कोणाच्या ओळखीनें २-४ मुलीही येऊं लागल्या. त्यांतील एक मुलगी दिसायला बरी, थोडी धीट, टेनिस बऱ्यापैकीं खेळणारी, इंग्रजी उत्तम बोलणारी अशी होती. रविकिरण मंडळाच्या

भावनाप्रधान सुधारक तरुण कवींना तिच्यांत नवयुगाची तरुणी दिसली. तिचा व मंडळाच्या बऱ्याच सदस्यांचा व त्यांच्या बायकांचा बराच परिचय झाला.

एका सदस्यानें—माधवरावांनीं नव्हे—तिच्यावर कविताही केली. माधवरावांची व तिची विशेष ओळख झाली. या सर्व प्रकारांत गैरवाजवी असें कांहींच नव्हतें; पण वीस वर्षांपूर्वी माधवरावांच्या मोकळ्या सुधारकी वागण्याला व त्यांच्या गज्जलांना नसतेंच महत्त्व मिळालें. यांतच डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील दोन तटांच्या भांडणाची भर पडली व माधवरावांचें वर्तन सोसायटीच्या दृष्टीनें अनिष्ट ठरलें. त्यांच्यावर अनीतिकारक वर्तनाचा कधींच आरोप नव्हता. पण समाजाला त्याचें काय? त्यानें अल्पावधींत पराचा कावळा केला व माधवरावांवर सोसायटी सोडल्यानंतर पुण्यास सामाजिक बहिष्कार पडला. कांहीं निवडक मित्रांखेरीज त्यांना पुण्यास घरें बंद झालीं. रस्त्यांत कुणी भेटलें तर चांचरत बोलून चटकन् पुढें होई. ते, 'गिरीश' व घाटे यांच्याबरोबर फिरावयाला निघाले म्हणजे रस्त्यांतील बायका आपआपसांत कुजबुजत. १९२४–२५ सालचे माधवराव म्हणजे एक हेटाळणीचा विषय होता. त्या वेळीं माधवरावांना जो विचित्र अनुभव आला त्याचें वर्णन खालील सुनीतांत त्यांनीं स्वतःच्या शब्दांत केलें आहे—

*हा रस्त्यांत दिसे न तों पटपटा संभाषणें थाम्बतीं*
*दृष्टी यावर रोखिली प्रकटवीं साशङ्क कौतूहल*
*याची पाठ फिरे न तोंच उसळे हेटाळणीचें हंसें*
*मागूनी विषदग्ध शब्द सुटती काळीज भेदावया*

पूर्वी उल्लेखिलेल्या तरुण मुली अशा माणसाशीं लग्न करण्यापेक्षां, जर विहिरींत उडी घ्यायला तयार झाल्या तर त्यांत कांहींच नवल नाहीं! गमतीची गोष्ट एवढीच कीं, त्या मुलींपैकीं एकजण पुढें आपल्या पुरोगामी आयुष्यक्रमानें व वाङ्मयानें नांवारूपास आली.

१९२४ सालीं सोसायटीनें त्यांचें सभासदत्व एक वर्षाकरतां रद्द केलें आणि माधवरावांनीं २८ ऑगस्ट १९२५ रोजीं सोसायटीचा राजीनामा दिला. त्यांनीं या सोसायटीवरचें आपलें प्रेम व्यक्त करणारी 'प्रेम होईना तुझ्यानें प्रेम माझें राहूं दे' ही प्रसिद्ध कविता केली.

मराठी ग्रंथ ... 
अनुक्रम 3८७०० ... दि: 2/7/67
१२३४



बसलेल्या :— माधवरावांच्या मातोश्री ती. सौ. **उमाबाई पटवर्धन.**
**सौ. लीलाबाई पटवर्धन.**
उभे :— **माधवराव पटवर्धन, सुधा** व चि. **दिनू.**
(इ. स. १९३५)

पुणें सोडल्यावर माधवराव अंमळनेरला प्रताप हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून राहिले व १ ऑगस्ट १९२६ रोजीं परत पुण्यास येऊन ते महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटींत दाखल झाले.

वरील बरीचशी हकीकत माधवरावांनीं मला मोकळ्या मनानें सांगितली. यांतील कांहीं हकीगत मला पुढें कळत गेली; पण सोयीसाठीं मीं ती थोडक्यांत वर दिली आहे. हिच्यामुळें माधवरावांच्या कांहीं चाहत्यांची निराशा होण्याचा संभव आहे, पण माझा त्याला निरुपाय आहे. सत्य एवढेंच आहे. तें यापेक्षां जास्त भडक व जास्त अद्‌भुतरम्य नाहीं.

माधवराव मला नुसती हकीकत सांगून थांबले नाहींत. त्यांनीं माझी व त्या मुलीची ओळख करून दिली. आमच्या दोघींचें मोकळ्या मनानें बोलणें झालें. पुढील हकीकत लिहिण्यापूर्वी एवढेंच सांगतें कीं, त्या मुलीचें पुढें लग्न झालें व ती संसारांत सुखी आहे. माधवरावांच्या हकीकतीवर माझा विश्वास बसला. परंतु ते मला निक्षून म्हणाले, "लग्न हा जन्माचा संबंध आहे. तेव्हां तुम्हांला माझ्याशीं लग्न करणें धोक्याचें वाटत असलें तर तुम्ही केव्हांही नकार देऊं शकतां." मीं त्या गोष्टीवर पुष्कळ विचार केला. या बाबतींत बोलायचें म्हणजे बाबांशींच ! माझ्या भोंवतालची मंडळी आमच्या लग्नाला फारशी अनुकूल नव्हती. सर्वच माधवरावांच्याबद्दल साशंक. तेव्हां कोणाचाही सल्ला घेणें मला अशक्य होऊन बसलें. किंबहुना कोणाचा सल्ला घेण्याचा प्रयत्न केला असता तरी कोणीही मला असेंच म्हटलें असतें कीं, हें तूं काय करतें आहेस? ह्या भानगडींत तूं मुळींच पडूं नकोस. पुढें पश्चात्ताप करायची वेळ येईल." मीं त्यानंतर एकच ठरविलें कीं, ज्या अर्थीं इतक्या मोकळेपणानें ही हकीकत माधवरावांनीं मला सांगितली, त्या अर्थीं ती कांहीं खोटी असणार नाहीं ! मनाचा हिय्या करून मीं त्यांच्याशीं लग्न करायचा निश्चय केला !

दुसरे दिवशीं फर्ग्युसन कॉलेजचे प्रा. विश्वनाथ बळवंत नाईक, सदाशिव पेठेच्या हौदाजवळच्या पोस्टाजवळ माझ्या वडिलांना भेटले. बाबांनीं त्यांच्याजवळ आमच्या लग्नाचा प्रश्न काढला. त्यांनीं ताबडतोब सांगितलें कीं, "माधवरावांना मुलगी देण्यांत कोणचीच हरकत नाहीं. इतर कंड्यांवर तुम्ही विश्वास ठेवूं नका. ते सज्जन आहेत." प्रा. नाईकांसारख्या जुन्य

मताच्या, सात्त्विक व प्रतिष्ठित गृहस्थानें असें सांगितल्यावर बाबांचा जीव खालीं पडला व त्या दिवशीं संध्याकाळीं माझ्या लग्नाचा विचार निश्चित झाला.

त्या दिवशीं संध्याकाळीं माधवराव माझ्याकडे आले. त्यांना मीं माझा निश्चय सांगितला आणि आमचें लग्न ठरलें. जातां जातां त्यांनीं मला पुन्हा सांगितलें कीं, " मी जबाबदारी घेण्याचें ठरविलें आहे. कधींही कर्तव्यभ्रष्ट होणार नाहीं." माझाही जीव खालीं पडला. मनाची जरी निश्चिती झाली तरी लग्न होईतोंवर माझें चित्त ठिकाणावर नव्हतें. मला सारखें वाटे कीं, समजा, लग्नानंतर, आधींच्या नुसत्या कंडया म्हणून ज्यांवर आपण विश्वास ठेवतों, त्या जर खऱ्या आहेत असें उघडकीस आलें तर आपल्या आयुष्याचें काय होईल ?

लग्नापूर्वी एक दिवस माधवराव माझ्याकडे आले. ते अतिशय संत्रस्त मनःस्थितींत दिसले. मीं कारण विचारलें. ते म्हणाले–" हें पहा, कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत फारसी विषयाकरतां एक लेक्चरर पाहिजे आहे. माझे स्नेही मला, त्या जागेकरतां अर्ज करा असा आग्रह करीत आहेत. परंतु मला संस्थानांत नौकरी करायची नाहीं. तुमचें काय मत आहे ? भावेस्कूलमधील शिक्षकाची नौकरी मी आतां केवळ तुमच्याकरतां सोडणार. आतां प्रोफेसर होण्याची माझी हौस फिटली." मी क्षणभर गोंधळलें. काय उत्तर द्यावें सुचेना. एकदां वाटे, त्यांना सांगावें कीं, ' तुम्ही अर्ज करा ' परंतु त्यांच्या कष्टी मुद्रेकडे पाहून मोठेपणाचा क्षणभर झालेला मोह मीं बाजूला सारला व म्हटलें, "तुम्हांला त्यांत सुख नसलें तर तसें करूं नका. मला सद्यःस्थितींतही समाधान वाटेल." माझें बोलणें ऐकून त्यांना समाधान वाटलें. त्यांची मुद्रा पालटली. पुन्हा थोडा वेळ आमच्या इकडल्या तिकडल्या गोष्टी झाल्या; परंतु अजूनही त्यांना कांहीं तरी विचारायचें आहे असें मला त्यांच्या मुद्रेवरून दिसलें. थोड्या वेळानें पुन्हा ते म्हणाले, " तुमचा स्वभाव फार चांगला आहे असें मला वामनराव म्हणत होते आणि म्हणूनच मी तुमच्याशीं लग्न करणार आहे. माझ्या एका प्रोफेसर मित्रानें तुमच्या रूपाबद्दल नापसंती दर्शविली. पण मीं त्यांना हेंच सांगितलें कीं, मुलगी स्वभावानें फार चांगली आहे, म्हणूनच मी लग्नाला तयार झालों. ही गोष्ट तुमच्या पुढल्या आयुष्यांत तुम्हांला पटवून देतां आली पाहिजे." मी ह्यावर काय बोलणार ? आत्मस्तुति कुणाला प्रिय नसते ? परंतु माझ्या स्वभा-

वाची ही स्तुति मला मनांतून जरी आवडली तरी आपला स्वभाव चांगला आहे हें पटवून देण्याची जबाबदारी पत्करणें ही गोष्ट मला अत्यंत कठीण वाटली. “ माझ्याकडून शक्यतों प्रयत्न करीन.” इतकेंच त्यावर मीं उत्तर दिलें.

आमचें लग्न ठरलें आणि पांचसात दिवसांनीं माधवरावांना एक मुलगी सांगून आली. मुलगी एम्. बी., बी. एस. झालेली होती. माधवरावांच्या मनाची थोडी चलबिचल झाली आणि ती होणें अगदीं साहजिक होतें. त्यांनीं एकदां लग्न करायचें ठरवलें. ध्येयपूर्तता झाली नाहीं म्हणून प्रचलित हिंदु-पद्धतीनें म्हणजे मुलगी पाहून पसंत करून ठरवून लग्न करायचें, ह्याच मार्गाचा अवलंब त्यांना करावा लागला. त्याप्रमाणें त्यांनीं बाबांशीं बोलूनच आमचें लग्न ठरलें. ह्यांत त्यांना एकच समाधान वाटत होतें. तें म्हणजे गरुडांचें घराणें सुधारक. बाबांनीं पुनर्विवाह केला होता. माझी आई सुशिक्षित होती. त्याच-प्रमाणें घरांतील सर्व मंडळी सुशिक्षित, अगदींच जुन्या घराण्यांतली नाहींत म्हणून त्यांचें माझें लग्न ठरलें. परंतु त्यांना शक्य तोंवर मुलगी पदवीधर हवी आणि जमल्यास मुंबई विद्यापीठाचीच पदवीधर हवी होती. परंतु तोही योग जुळून आला नाहीं.

मी शिकत होतें. पदवी मिळायला मला वर्षभर अवकाश होता. परंतु त्यांनीं बाबांना होकार दिला होता व लग्न जरी झालें तरी मला वसतिगृहांत ठेवून माझें शिक्षण पुरतें करायचें असा त्यांनीं मनाशीं निश्चय केला होता व तसें त्यांनीं मला बोलूनही दाखविलें होतें. सर्व कांहीं ठरल्यावर वरील स्थळ त्यांना सांगून आलें होतें. जरा आधीं म्हणजे पंधरा दिवसांपूर्वीं ही गोष्ट घडली असती तर त्यांनीं आधीं त्याच स्थळाबद्दल विचार केला असता. हा प्रसंग घडल्या-नंतर ते माझ्याकडे आले. त्यांनीं मला असें असें स्थळ सांगून आलें आहे म्हणून सांगितलें. मीं त्यांना शांतपणानें सांगितलें कीं, “ अजूनही वेळ गेली नाहीं. तुम्ही मला नकार देऊं शकतां. मागाहून पश्चात्ताप होण्याची पाळी येऊं नये.” त्यांनीं थोडा विचार केला. “ मी आतां एक निश्चय कायम केला आहे व तोच अमलांत आणणार आहें. बाबांना मीं शब्द दिला आहे. माझ्या शब्दाला मला जागलेंच पाहिजे. माझी मनोदेवता मला सांगते कीं, तुमच्या बाबतींत माझी निराशा होणार नाहीं.” असें ते म्हणाले व बरोबर आणलेलें त्यांचें आवडतें टॉडस् स्टूडंटस् मॅन्युअल त्यांनीं माझ्यापुढें धरलें व पहिलेंच पान उघडलें. वरल्या मथळ्याखालीं लिहिलें होतें.

## दुर्बुद्धि ते मना, कदा नुपजो नारायणा

खालीं तारीख होती २३–५–२८

पुढें चौकशी करतां त्या मुलीची हकीगत कळली व तिच्याशीं लग्न केलें नाहीं हेंच बरें केलें असा समाधानाचा सुस्कारा माधवरावांनीं सोडला.

लग्नाची तारीख २९ मे १९२८ ठरली. माधवरावांच्या मनांत १४ जूनला नोंदणीपद्धतीनें लग्न करावें असें होतें. परंतु बाबा कांहीं झालें तरी या बाबतीत जुन्या मताचे होते. त्यांना तें कसेंतरीच वाटलें. त्यांनीं ती गोष्ट कबूल केली नाहीं व आमचें लग्न वैदिक पद्धतीनें करण्याचें ठरलें. परंतु जुने ब्राह्मण बाबांच्या पुनर्विवाहामुळें आमच्या घरीं येण्याला अर्थातच नाखूष होतें. बाबांनीं हिंगण्याचे एक शिक्षक व माझे गुरु देवशास्त्री यांना विवाह-विधीसाठीं बोलाविलें.

माधवरावांच्या बाजूनें कोणीच नव्हतें. कार्य दोन्हीकडून करण्याची जबाबदारी बाबांच्यावरच होती. माधवरावांनीं एक पैही हुंडा घेण्याचें नाकारलें.

माधवरावांच्या वडील–मातोश्रींना हा देशस्थाशीं संबध, तोही पुनर्विवाहित देशस्थाशीं मान्य होणें शक्य नव्हतें. म्हणून त्यांच्यापैकीं कुणालाच लग्नाला बोलावलें नव्हतें. माधवरावांच्या बाजूनें देवदेवक फर्ग्यूसन कॉलेजांतील प्रोफेसर व त्यांचे स्नेही वि. अ. आपटे ह्यांनीं बसविलें. शास्त्रोक्त विधींखेरीज बाकी सर्व गोष्टींना काट दिला होता. त्या काळाप्रमाणें आमचें लग्न सुधारकी पद्धतीनें झालें.

गौरीहार पुजायला बसणार इतक्यांत माधवरावांनीं मला मांडवांत हांक मारली व माझी ओळख आपल्या बहिणींशीं करून दिली. त्यांतील एक त्यांच्या सख्ख्या भगिनी श्री. सौ. यमूताई शहाणे व दुसरी त्यांची आतेबहीण डॉ. सौ. इरावतीबाई कर्वे. माधवरावांना सख्खी बहीण आहे हें तोंपर्यंत मला माहीतही नव्हतें. लग्नाची वेळ जवळ आली तरी माधवरावांच्या गळ्यांत जानवें नव्हतें. जवळच बसलेल्या रा. श्री. के. क्षीरसागरांनीं आपल्या गळ्यांतील जानवें माधवरावांना काढून दिलें. सोवळें तर ते नेसलेच नाहींत. लग्नाची तारीख ठरेपर्यंत त्याचा गवगवा फारसा होऊं नये म्हणून लग्न ठरल्याची बातमी जवळजवळ खाजगीच ठेवली होती. म्हणून आमच्या लग्नाला पुण्यांतील फक्त निवडक पण प्रसिद्ध मंडळी हजर होती.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत



श्री. सौ. लीलाबाई व प्रा. माधवराव पटवर्धन.

( १९२१ मे )

त्या वेळींही त्यांचे हितचिंतक व स्नेही पुण्यांत पुष्कळ होते. कोणीकडून तरी माधवरावांचें लग्न होऊन ते पुन्हा आपल्या पूर्वपदावर स्थापित व्हावे असें त्यांच्या अनेक चहात्यांना व स्नेह्यांना मनापासून वाटत होतें. तेव्हां आमच्या लग्नाच्या वेळीं व नंतर कोल्हापूरला जाऊन माधवरावांच्या आयुष्याला स्थैर्य येईतोंवर त्यांना त्यांच्या स्नेह्यांनीं सर्व प्रकारची मनापासून मदत केली.

लग्न लागलें व आम्ही इतर मंडळींना भेटण्याकरतां मांडवांत जाण्यास निघालों. इतक्यांत माधवरावांचें लक्ष माझ्या कपाळाकडे गेलें. ते मला म्हणाले, "कुंकू फार मोठें झालें आहे, तें लहान कर आणि मग मंडळींत ये." माझें लक्ष माझ्या पोषाखाकडे नव्हतेंच. मी आपल्याच विचारांत गर्क होतें. माधवरावांच्या सांगण्याप्रमाणें मीं कुंकू लहान केलें, परंतु जातां जातां मनांत विचार आला कीं, आजपर्यंत आईबापांची आज्ञा मानली. आतां पतीच्या आज्ञेप्रमाणें वागलेंच पाहिजे. "न स्त्रीस्वातंत्र्य मर्हति।"

मंडळींत स्त्रिया जेथें बसल्या होत्या तेथें पुढेंच डॉ. श्री. कमलाबाई देशपांडे बसलेल्या दिसल्या. त्यांना पाहून मला आनंद तर झालाच, परंतु आश्चर्यही वाटलें. मी त्यांना विचारलें, "तुम्ही येथें कशा ? तुम्ही तर सातारला गेलां होतां ना?" त्यांनीं उत्तर दिलें, "मी तुझ्या लग्नाकरितां मुद्दाम येथें राहिलें." मला फार समाधान वाटलें. कारण मला ज्या कांहीं थोड्या व्यक्तींबद्दल आदर वाटतो, त्यांत त्या प्रमुख आहेत. ज्यांनीं माझ्यावर लहानपणापासून प्रेम केलें अशा पुष्कळ स्त्रिया माझ्या लग्नाला आवर्जून आल्या होत्या.

माधवरावांनीं माझी ज्या कांहीं थोड्याच व्यक्तींशीं तेथें ओळख करून दिली, त्यांतील दोनच व्यक्ति आज माझ्या डोळ्यांपुढें स्पष्ट दिसतात. त्यांतील एक प्रि. वै. का. राजवाडे होत. मीं त्यांना नमस्कार केला. त्यानंतर तात्यासाहेब कोल्हटकरांच्याकडे वळून माधवरावांनीं त्यांच्याशीं माझा परिचय करून दिला. तेव्हां त्यांना दूरचें दिसत नव्हतें. ते माझ्या अगदीं जवळ आले. त्यांनीं माझ्याकडे नखशिखांत पाहिलें व उलट नमस्कार केला. जमलेल्या मंडळींत बरीच मंडळी माझ्या परिचयाची होती. त्यांतील कांहीं

स्त्री–पुरुष मुद्दाम माझ्याशीं येऊन बोलले. परंतु मनाच्या गोंधळलेल्या परिस्थितींत माझें कोणाकडे फारसें लक्ष नव्हतें.

त्या वेळीं माझ्या मनाची स्थिति मोठी चमत्कारिक होती. लग्नामुळें होणारा साहजिक आनंद मला तेव्हां मुळींच झाला नाहीं. वास्तविक माधवरावांच्यांत कांहींच कमी नव्हतें. ते दिसायला सुंदर होते, तरुण होते, विद्वान् होते, पदवीधर होतें, नवीन मताचे व आचाराचे होते. माझ्या लग्नाबद्दलच्या अपेक्षा त्याहून मुळींच निराळ्या नव्हत्या. किंबहुना माधवराव सर्व बाबतींतच अपेक्षेपेक्षांही सरस होते. त्यांची त्या वेळीं पुण्यांत जी कुप्रसिद्धी होती तशी नसती तर माझा आनंद गगनांत मावला नसता. परंतु एकच एक भूत, लग्न होईतोंवर व पुढें सहवासानें तसें कांहीं नसल्याबद्दल खात्री पटेतोंवर मला भेडसावीत होतें. पुढें सहवासानें ती भीति नष्ट झाल्यावर जेव्हां माझी खात्री झाली तेव्हां मी त्यांच्या सहवासांत अत्यंत सुखी झालें.

लग्नाच्या जेवणावळीच्या दिवशीं दुपारीं एक सुंदर मुलगा आमच्या दाराशीं येऊन उभा राहिला. मी समोरच कोणाशीं तरी बोलत उभी होतें. "माधवराव पटवर्धन कोठें आहेत?" म्हणून त्यानें मलाच विचारलें, व मीं माडीकडे बोट दाखविलें. तो वर गेला, जेवला. जातांना माझी माधवरावांनीं ओळख करून दिली. तेंच माझे सगळ्यांत धाकटे दीर. डॉ. विनायक त्रिंबक पटवर्धन हे हल्लीं मलायांत इपोला असतात. एम्. बी. बी. एस्. झाल्यावर त्यांनीं तेथेंच खाजगी दवाखाना काढला.

लग्नाच्या दिवशीं दुपारीं माधवरावांनीं कोल्हापूरला अर्ज टाकल्याचें मला सांगितलें. मला थोडें आश्चर्य वाटलें. ते पुढें म्हणाले, "आयुष्यांत मी पुष्कळ मूर्खपणानें वागलों आणि त्याचीं फळें मी सध्या भोगीत आहें. जर स्नेह्यांच्या सल्ल्यानें वागून माझें कांहीं भलें होणार असलें तर बरेंच झालें." परंतु हें सांगतांना ते अतिशय खिन्न झाले होते.

जूनमध्यें मला लागणारी कन्याशाळेंतील नोकरी लग्नानंतर चुटकीसरशी नाहींशी झाली. मला असें सांगण्यांत आलें कीं, "आतां तुम्हांला नोकरीची गरज असेल असें आम्हांला वाटलें नाहीं. म्हणून आम्हीं तुमच्या जागीं दुसऱ्या बाईंना कामावर घेतलें आहे." माधवराव मला म्हणाले, "हें खरें कारण नाहीं. खरें कारण तूं माझ्याशीं लग्न केलेंस हें होय!"

लग्नानंतर पंधरा दिवस आम्ही सकाळीं, संध्याकाळीं आणि दुपारीं सुद्धां मेजवान्या व चहा यांमध्यें गर्क होतों. माधवराव तिन्ही वेळचीं बोलावणीं घेत असत. परंतु माझी मोठी त्रेधा होई. सारखें गोड खाऊन वीट आला होता. परंतु मला विचारून बोलावणीं स्वीकारण्यांत आलींच नव्हतीं. शेवटीं एक दिवस मीं सांगितलें, "आतां अशीं बोलावणीं घेऊं नका. मला ह्यामुळें आजारी पडायची वेळ आली आहे." लगेच ते म्हणाले, "खरंच, तुझाही या बाबतींत सल्ला घ्यायला पाहिजे हें मी विसरतोंच! आजपर्यंत मला कोठेंही एकट्यानें जायची संवय, दुसऱ्या माणसाच्या सोयीगैरसोयींचा विचार करावयाची मला पाळीच आली नाहीं, त्यामुळें असें होतें." त्या दिवसापासून लोकांच्या घरचें रात्रींचें जेवण टळलें. एक मात्र अपवाद घडला. लग्नापूर्वी माधवराव ज्या माईच्या खाणावळींत जेवायला जात असत त्यांनीं आमचें लग्न झाल्यावर आम्हांला जेवायचें आमंत्रण दिलें होतें. माधवरावांनीं माईना सांगितलें. "मी तुमचा निरोप माझ्या बायकोला सांगतों. पण ती येईल कीं नाहीं हें मी आतांच सांगूं शकत नाहीं. परंतु मी मात्र खास येऊन जेवून जाईन." माधवरावांनीं माईचा निरोप मला सांगितला. खाणावळींत जेवायला जाणें मला कसेंतरीच वाटलें. माधवरावांनीं जाणें न जाणें माझ्या इच्छेवर सोंपविलें होतें. शेवटीं मीं त्यांच्या-बरोबर माईच्याकडे जेवायला जाण्याचें ठरविलें. मी जेवायला आलेली पाहून त्या म्हातारीला फार आनंद झाला. तिचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले. जेवायला आम्ही दोघेंच होतों. बाकी सर्व मंडळी जेवून गेली होती.

जेवायला पुरणाची पोळी होती. जेवण झाल्यावर माईनीं माझी खणा-नारळांनीं ओटी भरली व डोक्यांत फुलांची वेणी घातली.

लग्न झाल्यावर आठ दिवसांतच वटपौर्णिमा आली. मीं माझ्या आईबरोबर उपास केला. त्या दिवशीं माझ्या बोलण्यांत सहजच मीं उपास केल्याचा उल्लेख आला. माधवरावांनीं मला एकदम विचारलें, "का ग, हा उपास तूं कशासाठीं केलास?" प्रश्नाचा अर्थ चटकन् माझ्या ध्यानांत आला नाहीं. मीं उत्तर दिलें, "लग्न झालेल्या सर्व स्त्रिया करतात म्हणून!" त्यानंतर मला ते म्हणाले, "त्यांतल्या तत्त्वाचा तूं कधीं विचार केला आहेस का? जन्मो-जन्मीं तोच पति मिळावा म्हणून तुम्ही स्त्रिया उपास करतां. समजा, आम्हांला तुमच्याशींच आमचा जन्म बांधून घ्यायचा नसला तर मग आमच्यावर हा जुलूम कां? आणि मीच सात जन्म पति पाहिजे हें तरी तूं किती थोड्या दिवसांच्या

सहवासावर ठरविलें आहेस ? माझ्याशीं लग्न होण्यापूर्वीं तूं ज्या गोष्टीला भीत होतीस तीच गोष्ट तुला माझ्या बाबतींत आढळली तर सात जन्म तर राहोच पण एक दिवस सुद्धां माझ्याबरोबर काढणें तुला अशक्य होईल. तरी तूं हा उपास करणारच म्हणजे तूं आपल्या मनाला किती फसविते आहेस ह्याचा विचार केलास का ? आहे बुवा हिंदु पतिव्रता ! !" हें त्यांचें लांबलचक व्याख्यान मीं ऐकलें. मला तेव्हां तरी त्यांचे तें बोलणें चमत्कारिकच वाटलें. मीं त्या गोष्टी-वर पुष्कळ विचार केला. त्यांची विचारसरणी मला पटली. त्यानंतर मी वट-पौर्णिमा करण्याचें सोडून दिलें.

ह्या प्रसंगावरूनच मला आणखी एक प्रसंग आठवतो. आम्ही कोल्हा-पूरला गेल्यानंतर कांहीं दिवसांनीं आषाढी एकादशी आली. हा उपास मी लहानपणापासून करीत असल्यामुळें तो करावा कीं करूं नये हा विचार देखील माझ्या मनाला शिवला नाही. तो करायचा ह्या बेतानेच मीं माधव रावांना विचारलें, " उपास करणार का ? आज आषाढी एकादशी आहे." माधवराव मला म्हणाले, " मी कधींच करीत नाहीं. असल्या उपासातापासानें देव प्रसन्न होईल किंवा मृत्यूनंतर आपल्याला स्वर्ग मिळेल असें मला वाटत नाहीं. देव आहे असें धरून आपण चाललों तरी तो सत्कर्मानें प्रसन्न होईल. असल्या उपासातापासानें तो कधींच प्रसन्न होणार नाहीं. मला वाटतें तूं पण एकादशी करूं नयेस !" मी कांहीं बोललें नाहीं. उपासतापासानें देव प्रसन्न होतो ह्यावर माझाहि कधीं भरंवसा नव्हता. जरी मी त्यांच्या मताशीं सहमत होतें तरी एकादशी मोडण्याची कल्पना मला पटेना; तरी मीं दोघांचाही स्वयंपाक केला. आम्ही दोघेही जेवायला बसलों.

मीं वरणभात कालवला व घास तोंडाजवळ नेला. आणि मला माझें लहानपण आठवलें. आई तर मला कळत नव्हतें तेव्हांच वारली होती. परंतु बाबांची आजी जिनें मला लहानाचें मोठें केलें तिची मूर्ति मला माझ्या डोळ्यापुढें दिसूं लागली. मी तीन वर्षांची असल्या-पासून एकादशी, हरितालिकेचे उपास तिनें मला घातले होते. दोन्ही डोळ्यांनीं दिसत नव्हतें तरी नानीनें माझ्या उपासाचे हाल कधीं केले नाहींत. त्या दिवशीं चालणाऱ्या उपासाच्या पदार्थांची माझ्याकरितां घरांत रेलचेल असे. माझा उपास म्हणजे दिवसभर खाद्य वस्तूंची चंगळ. तरी मला आठवतें कीं, रात्रीं मीं मला भूक लागली म्हणून उठावें. नानीनें रात्रीं १२ च्या पुढें

मला भात करून जेवायला घालावें. परंतु तिनें उपास कधीं मोडूं दिला नाहीं. पुढें शिक्षणाच्या निमित्तानें मी बोर्डिंगांत राहिलें, कॉलेजांत गेलें. हरितालिकेचा उपास तितका कडक रीतीनें पाळला गेला नाहीं. परंतु मोठे उपास मीं तेव्हांही केलेच. त्या सर्व गतकालाची मला आठवण झाली आणि ज्या प्रेमळ पणजीनें हा उपास मला घातला तो मोडणें ही कल्पना मनाला कशी तरी वाटली. नानीची प्रेमळ मूर्ति माझ्या डोळ्यापुढून हलत नव्हती. माझे डोळे पाण्यानें भरून आले. माझें जेवण थांबलेलें पाहून माधवरावांनीं मला कारण विचारलें. मीं त्यांना सांगितलें. त्यांनीं त्यानंतर जेवणाचा मला आग्रह केला नाहीं. आपणच उठून साबूदाण्याची खीर मला करून दिली. मी साबूदाण्याची खीर घेतली. ते जेवले. पुन्हा माधवराव माझ्या उपासाच्या आड कधीं आले नाहींत. केव्हां केव्हां तेही मजबरोबर उपास करीत. परंतु सकाळीं उपास केला तर रात्रीं जेवीत.

ता. ९ जून १९२८ रोजीं कोल्हापूरच्या नौकरीवर रुजूं होण्याचा हुकूम आला. प्रथम त्यांचा मला बरोबर नेण्याचा विचार नव्हता. ते एकटेच पुढें जाणार होते. परंतु आयत्या वेळेला मींहि बरोबर जाण्याचें ठरलें.

माहेर सोडून प्रथम सासरीं जाण्यांत काय दुःख असतें त्याचा अनुभव मला आला. लहानपण ज्या घरांत गेलें होतें तें तर सोडतांना होणारें दुःख काय असतें त्याची कल्पना नुकतेंच लग्न झालेल्या प्रौढ वधूंनाच येईल.

मी माझ्या वडिलांची एकुलती एक मुलगी. माझ्या आईच्या मागें माझ्या बाबांचा माझ्यावर फार जीव होता. त्यांना आणि मला फारच वाईट वाटलें. त्या दिवशीं रात्रीच्या मेलनें आम्ही कोल्हापुरास गेलों.

# आमचा नवा संसार : : : ३

आम्हांला कोल्हापूर स्टेशनवर घ्यायला रा. मोहन शहाणे आले होते. त्या वेळीं ते विद्यापीठांत शिक्षक होते. हल्लीं ते मध्यप्रांताचे इन्फर्मेशन ऑफिसर आहेत. आमची उतरण्याची सोय विद्यापीठांत झाली होती. आम्ही रा. शहाण्यांच्या बरोबर विद्यापीठांत गेलों. आठदहा दिवसांनीं स्वतंत्र जागा भाड्यानें घेऊन आम्ही बाबुजमाल रस्त्यावर नाडगोंड्यांच्या घराच्या माडीवरच्या जागेंत राहूं लागलों. बिऱ्हाड थाटलें. त्या दिवशीं आमच्याजवळ भात शिजवायला पातेलेंही नव्हतें. आमचें सामान म्हणजे दोघांच्या दोन ट्रंका व वळकट्या. पहिल्या दिवशीं सकाळीं सगळा बाजार पालथा घालून एक पातेलें, शेगडी व तांदूळ ह्यांची खरेदी केली व त्या दिवशींचें आमचें खिचडी–भाजीचें जेवण आमच्या नव्या बिऱ्हाडीं अडीच वाजतां झालें.

कोल्हापूरला आल्या दिवसापासून माधवराव उदास दिसत. त्यांना संस्थानी नोकरी नको होती. कोल्हापूरला येऊन दोनचार दिवस झाल्यावर त्यांनीं त्यांचे बालमित्र रामभाऊ मराठे यांना पत्र लिहिलें त्यांतील मजकूर मी येथें देत आहें त्यावरून त्या वेळीं त्यांची मनस्थिति कशी होती हें कळून येईल.

" महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीनें मला तहाहयात सदस्य करून घेण्याचा विचार माझ्या हातांत कोल्हापूर जागेवर नेमणूक झाल्याचा ठराव हातीं पडेपर्यंत नक्की केला नाहीं. इतर व्यवधानामुळें तें काम राहून गेलें. नंतर तुम्ही जाण्याचा बेत रहित करा. तीनचार दिवसांत सारें कायमच करितों. तुम्ही जाऊं नका असें म्हणूं लागले. माझी मोठी केविलवाणी स्थिति झाली. ही नेमणूक झाल्याचा ठराव हातीं पडण्यापूर्वी ' माझी नेमणूक नक्की केल्यास मी इतरत्र केलेले अर्ज रद्द करीन' म्हणून मी त्यांस आश्वासन दिलें होतें आणि लीलाबाईस, श्वशुरांस व आपटे, नाईक, प्रो. गो. चि. भाटे वगैरे मित्रांस नाराज करूनही मी त्याप्रमाणें वागलों असतों. परंतु बदललेल्या परिस्थितींत मला माझा वैयक्तिक हट्ट चालवितां येणें शक्य नव्हतें. मला स्थलांतर नको होतें. संस्थानी नोकरी नको होती. परंतु माझ्या कांहीं मित्रमंडळींची मी

माझ्या पूर्वपदावर स्थापित व्हावें अशी इच्छा होती. अशा स्थितींत व्यथित अंतःकरणानें रा. मालशे यांना सोडून मला येथें यावें लागलें. एका बिकट प्रसंगीं त्यांनीं आपल्या संस्थेंत मला काम देऊन आश्रय दिला हें त्यांचें ऋण माझ्या हातून फिटणें व विसरणें शक्य नाहीं. त्याची फेड करण्याचें सामर्थ्य ईश्वरानें मला अवश्यमेव द्यावें, अशी माझी त्यास प्रार्थना आहे."

माधवरावांना संस्थानी नोकरी नको होती. त्यांत माझ्याशीं त्यांचें लग्न होणें हा त्यांच्या ध्येयाचा चक्काचूरच होता. त्यांचें ध्येय काय होतें त्यासंबंधीं अधिक स्पष्ट कल्पना यावी म्हणून त्यांनीं १९२० सालीं रामभाऊ मराठ्यांना लिहिलेलें पत्र येथें मुद्दाम देत आहें. त्यावरून त्यांचे लग्नासंबंधीं काय विचार होते त्याची चांगली कल्पना येईल.

३७९ चोळखणआळी,
बुधवार
ता १५-४-१९२०.

ज्या महत्त्वाच्या गोष्टींसंबंधीं मी तुझ्याशीं बोलणार होतों त्यांतील लग्न ही एक होय. तरुणांना व्यवहार कळत नाहीं म्हणतात. माझ्या बाबतींत तरी तें खरें ठरलें. मीं अनेक टक्के टोणपे खाऊन अखेर स्वतःच्या उमेदीवर एम्. ए. झालों. शेवटीं फर्ग्यूसन कॉलेजांत प्रोफेसरही बनलों. मीं माझी केलेली किंमत वेगळी. जगानें ठरवलेली किंमत निराळी. माझी कल्पनेंतली सृष्टि—तर जगाची व्यावहारिक दृष्टि. प्रीति आणि सौंदर्य-विद्या व सुसंस्कृति यांवर माझी नजर, तर संपत्ति, घराणें, थोर सोयरे, स्थावर इस्टेट यावर जगाचें लक्ष. विद्या सदभिरुचि वगैरे माझें धन, तर जगाच्या दृष्टीनें मी फटिंग अकिंचन! अशा विरोधी स्थितींत शक्याशक्यतेचा विचार करून मोठ्या धूर्तपणानें वागावयास पाहिजे होतें. राहणी अशी झोंकाची ठेवावयास पाहिजे होती कीं, लोकांनी हुरळून जावें. परंतु 'मी आहे तसा दिसणार हा माझा बाणा' तर दुनया म्हणते, 'अरे ये आदमी दीवाना' अशा स्थितींत मी इतक्या दीर्घकाळपर्यंत वाट पाहून आतां माझा बैल रिकामा राहील. तरी सुद्धां मी शहाणा ठरेन असें वाटू लागलें आहे. लग्नासारख्या अत्यंत महत्त्वाच्या बाबतींत कांहींच लपवायचें नाहीं, हा माझा कृतनिश्चय आहे. ह्या बाबतींत निश्चय करणें म्हणजे अत्यंत दुर्घट काम आहे. परिस्थितीशीं

गेलीं बारा वर्षें झगडण्यांत माझी बरीच शारीरिक व मानसिक शक्ति खर्च झालेली आहे आणि आज बेताचीच उमेद व बेताचाच उत्साह माझ्यांत आहे. परावलंबित्व डोकावूं लागलें आहे. कांहीं व्यक्तींच्या तरी सहानभूती-संबंधीं मी बेपर्वा राहूं शकत नाहीं. तथापि मी Idealistic असूं शकत नाहीं; तडजोडीचें तत्त्व मला फार अल्प प्रमाणांत पटूं लागलें आहे. अशा स्थितींत मी विधवाविवाहास तयार व्हावें कां? हा पहिला प्रश्न. व्यावहारिक अडचणीं-खेरीज इतर अडचणी नाहींत. मी पोरका, निराश्रित असल्यामुळें पत्नीला तरी कांहीं माणसें जिव्हाळ्याचीं असणें हें तिच्या व माझ्या दृष्टीनें श्रेयस्कर व जरूरीचें आहे. लग्न झाल्यावर कोणत्या व्यावहारिक अडचणी येत नाहींत? कधीं द्रव्याची, तर कधीं मनुष्याची, नेहमीं उणीव भासत असते. दोन्ही बाजू लंगड्या राहिल्या तर निभावणी क्वचितच होते. इतके दिवस ध्येयाच्या मागें लागून वाट पाहावी नाहींतर शेंवटीं गौणपक्ष म्हणून विधवाविवाह आहेच असें मला वाटतें. अति शहाणा त्याचा बैल रिकामा राहण्याची भीति नाहीं असें नाहीं. परंतु घाईघाईनें समुद्रांतल्या म्हाताऱ्याचें ओझें घेण्या-पेक्षां बैल रिकामा परत आला तर काय वावगें आहे?"

आमच्या नवीन संसारांत आम्हीं दोघेच होतों. आजपर्यंत एकटें राहण्याचा प्रसंग हा पहिलाच. आणि सारेंच नवीन. माधवराव दुपारीं जेवण करून कॉलेजांत जात. जेवायला आम्ही बहुतेक बरोबरच बसत असूं. परंतु केव्हां केव्हां माझा स्वयंपाक लवकर आटोपला नाहीं तर माधवराव आधीं जेवत, ते गेले कीं मी जेवायला बसत असे. परंतु मला एकटीला जेवणच जात नसे. मी कसाबसा पहिला भात खावयाची व बाकीचें अन्न झांकून ठेवून द्यायची, परंतु यामुळें मी उपाशी राहूं लागलें. पुढें हें माधवरावांच्या लक्षांत आलें. घाई झाली तर ते आधीं जेवत व कॉलेजला जाण्याची तयारी करीत. पण माझें जेवण होईतोंवर ते थांबत. स्वयंपाकाची वेळ झाली म्हणजे काय पदार्थ करावेत तें मला सुचत नसे. माधवरावांच्या आवडीनिवडीची अजून मला तितकीशी कल्पना आली नव्हती. चहाच्या वेळेलाच मी त्यांना काय स्वयंपाक करूं म्हणून विचारीत असे. परंतु ते उत्तर देत, "तें मला समजत नाहीं. तुला जें सुचेल तें तूं कर. खाणावळींत कोणी जेवणारांच्या आवडी-निवडीची पर्वा करीत नाहीं, त्यांना जें सोईचें वाटेल तेंच ते करतात. तसें तुला जें करावेंसें वाटेल तें तूं कर." मी माझ्या मनानें पदार्थ करी. परंतु

कित्येक वेळीं माधवरावांना फारसे न आवडणारे पदार्थ होत अशा वेळीं पानांत पहिल्यांदा वाढलेला पदार्थ ते खात. कारण पानांत कांहीं टाकावयाचें नाहीं हा त्यांचा नियम होता. पण पुन्हा तो ते घेत नसत. मला वाईट वाटे. मी त्या दिवसांत फार हळवी झालें होतें. वाईट वाटायाला मला थोडें कारणही पुरत असे. हळू हळू त्यांना काय आवडतें ह्याकडे मीच लक्ष देऊन त्यांना आवडणारे पदार्थ लक्षांत ठेवून ते करूं लागलें. परंतु त्यांनीं अमुक एक पदार्थ जास्त आवडतो. तो तूं कर असें क्वचितच सांगावें. सरावानें त्यांच्या आवडीनिवडी मला पुढें कळूं लागल्या. मला पोळी मनापासून आवडे, परंतु माधवरावांना पोळी आवडत नसे. त्यांना भाकरी आवडे. मी एक वेळ पोळी व एक वेळ भाकरी करीत असे. पोळी ते थोडी खात व शेवटीं मी सकाळच्या जेवणालाही भाकरी करूं लागलें. संवयीनें मलाही भाकरी आवडूं लागली. मी रोज भाकरी करूं लागलें. माधवरावांच्या हें लक्षांत आलें. मला पोळी आवडतें हें त्यांना माहीत होतें. केव्हां केव्हां ते मला मुद्दाम माझ्याकरितां पोळी करण्यास सांगत व 'तूं जर पोळी केली नाहींस तर मी जेवणार नाहीं' असें बजावीत.

खाण्यापिण्याच्या बाबतींत एकंदर ते विरक्त असत. त्यांना मांसाहार चाले. त्यांच्या ब्राह्मणेतर मित्रांकडे ते मांसाहारही करीत. परंतु तो करण्याच्या हेतूनें ते या मित्राकडे कधीं गेले नाहींत. मांसाहाराची आवड त्यांना फारशी नव्हती, परंतु सर्व गोष्टींच्या संवयी पाहिजेत, माणसाचें कोठें अडूं नये. ह्याकरितांच ते केव्हां केव्हां मांसाहार घेत. पुढें ग्रंथलेखनामध्यें जसें त्यांचें मन मग्न झालें तसें त्यांचें खाण्यापिण्याकडे दुर्लक्षच होत गेलें

माधवरावांचा नित्यक्रम अतिशय व्यवस्थित असे. ते सकाळीं बरोबर पांच वाजतां उठत व प्रातर्विधीनंतर आपला चहा आपणच करून घेत. पहांटे त्यांनीं मला चहाकरतां कधींही उठवलें नाहीं. कारण मी जरा जास्त झोंपाळू होतें. सहाच्या आंत उठावयाचें माझ्या जिवावर येई. चहानंतर नियमितपणें ते तासभर फिरावयास किंवा राजाराम क्लबवर टेनिस खेळावयाला जात. तोंवर माझें सकाळचें काम आटोपून माझ्या चहाची वेळ येई. नंतर आमच्या दोघांचाही चहा होई. बरोबर ९॥ ला ते जेवायला आंत येत. तोंवर स्वयंपाक व्हावाच लागे; नाहींतर जें झालें असेल तेंच पानावर वाढायची पाळी येई. परंतु एखादे वेळीं माझ्या हातून जर विलंब झाला तर त्याबद्दल

ते माझ्यावर कधींही रागावले नाहींत. ते जेवणाचे बाबतींत चोखंदळ नव्हतेच. रोज जरी कुणीं पिठलें भात करून त्यांना वाढला असता तरी त्यांना त्याचा कंटाळा आला नसता. त्यांचा माझ्यावर उलटा राग असे. मला वाटे यांनीं चारी ठाव जेवून जावें. म्हणून मी शक्यतों सर्व स्वयंपाक वेळेवर करण्याची धडपड करी. आणि अशी माझी धडपड धांदल पाहिली म्हणजे मात्र ते रागावत. त्यांचा माझा नेहमीं ठरलेला वाद असे. ते मला म्हणत, "तूं अशिक्षित बायकांसारखी सगळा वेळ घरकामांत व स्वयंपाकांत घालवूं नको. कांहीं तरी वाचन, लेखन करीत जा; मला दोन पदार्थ कमी वाढलेस तरी चालतील." पण हा युक्तिवाद मला कधींच पटला नाहीं.

कॉलेजच्या आधीं तासभर तरी जेवून तयार असलें म्हणजे त्यांना पोशाख चढविण्यास बरें वाटे. ते कॉलेजमध्यें गेले कीं मी घरांतलें काम आवरून जी दुपारीं बाराला झोंपत असें ती जिन्यावर ठराविक आवाजांचीं पाउलें वाजूं लागलीं कीं पलंगावरून पांघरूण झुगारून देऊन उठण्याचा प्रयत्न करी. परंतु माझे झोपेनें भारावलेले डोळे माझ्याविरुद्ध साक्ष देतच!

मी दुपारीं झोंपलेली त्यांना कधीं आवडलें नाहीं. आणि त्याबाबत मात्र मी वारंवार रागें भरून घेत असें. पुढें पुढें राजाराम कॉलेजच्या वाचनालयांतून निरनिराळीं उपयुक्त पुस्तकें मला ते आणून देत व त्यांतील कांहीं भाग ते मला वाचनाकरतां नेमून देत. झोपण्याची मात्र सक्त मनाई असे. प्रथम प्रथम मला फार जड जाऊं लागलें. थोडासा जरी निजण्याचा मोह झाला तरी वाचनाकरतां दिलेल्या भागांतील शब्द कोशांतून काढून तो वाचून ठेवायला मला सहज तीन वाजत. मग झोंप कोठली घेणार?

माधवराव कॉलेजांतून साडेतीनला येत. नंतर आमचा चहा होई. मग वाचलेल्या भागाची त्यांच्याजवळ उजळणी होई.

कित्येक वेळां माधवराव मला शिकविण्यांत इतके गुंग होत कीं, जणूं कांहीं आपण एखाद्या विद्यार्थ्यालाच शिकवीत आहोंत असें त्यांना वाटे. असेच एक दिवस ते मला शेक्सपिअरचें 'सिम्बेलाईन' शिकवीत होते. मी त्या दिवशीं एक शब्द इंग्रजी शब्दकोशांतून काढायला विसरलें होतें. शब्दांचा अर्थ मला बरोबर सांगतां येईना. माधवरावांनीं पटकन् माझा कान

पिरगळला. मला एकदम कसें तरीच झालें. डोळे पाण्यानें भरून आले. मला हा अनुभव अगदींच नवीन होता. बाबांनीं मला पुष्कळदां शिकविलें. परंतु त्यांच्या हातांचीं चार बोटें कधीं माझ्या अंगाला लागलीं नाहींत. मला तो अपमान वाटला, राग आला; पण तो अनुभव पहिला व शेवटचाच ठरला! आपण चूक केली हें माधवरावांच्या चटकन् लक्षांत आलें. नंतर ते मला शिकवीत असत तेव्हां आपल्याकडून अतिशय शांत राहण्याचा प्रयत्न करीत] केव्हां कांहीं चुकलें तर खूप रागावत; परंतु त्यांची रागीट मुद्रा पाहिली म्हणजे मात्र माझी पांचांवर धारण बसे. एक दिवस कोणीतरी त्यांना विचारलें, "तुम्ही आपल्या स्वतःच्या बायकोला कसें शिकवूं शकतां?" त्यांनीं उत्तर दिलें, "त्यांत काय आहे? मी शिकवितों तेव्हां मी तिला माझी एक विद्यार्थिनी समजतों." पुन्हा त्या गृहस्थानीं विचारलें, "पण तुम्हांला चमत्कारिक नाहीं का वाटत? आपल्या स्वतःच्या बायकोला आपण शिकविणें आपल्याला नसतें बुवा जमलें!" त्यांनीं त्यावर उत्तर दिलें, 'हाच तर तुमच्या माझ्यांत फरक आहे!'] एक दिवस आम्ही दुपारीं कोठें तरी फिरावयास गेलों होतों. त्यामुळें आमचा दुपारचा अभ्यास राहून गेला होता. रात्रीं आमचीं जेवणें ठराविकपणें साडेसातला होत असत. नंतर माधवराव आपल्या लेखनाला सुरुवात करीत व दहा वाजतां झोंपत. त्या दिवशीं ते साडेनवालाच आंत आले. मी आपला नेमून दिलेला भाग करीत होतें. ते घरांत आले म्हणून मी उठलें व त्यांना बसायला चटई घातली. माधवराव एकदम चिडले व म्हणाले, "तुला स्वतःच्या अभ्यासापेक्षां माझी बसण्याची काळजी जास्त वाटली. मी चटई घालून बसलों असतों, नाहींतर तसाही बसलों असतों. तूं अभ्यासांतून कां उठलीस?" मीं त्यावर चटकन् उत्तर दिलें. "माझी खात्री आहे कीं, तुम्ही चटई न घालतां बसला असतां. तें मला खपत नाहीं." माधवरावांनीं आपल्या भेदक नजरेनें एकदां माझ्याकडे पाहिलें आणि "चुकलें" म्हणून आपल्याच श्रीमुखांत फडाफड मारून घेतल्या. मला हें काय झालें. हें क्षणभर समजेना. मग मात्र मलाही राग आला. मी आपलीं पुस्तकें दूर भिरकावून दिलीं व तेथून चालती झालें. दिवसाच्या कांठीं मीं कांहीं तरी वाचलें लिहिलें पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. पुढें मुलें झाल्यावर मला ते नियमितपणें जमलें नाहीं. मध्यंतरीं दिनू व सुधा लहान असतांना मीं तें जवळजवळ सोडूनच दिलें होतें. ह्याचा अर्थ मला वाचायला लिहायला आवडत नसे असा नाहीं. परंतु

घरांतील सर्व कामकाज व मुलांचें संगोपन यांत मला तें जमत नसे. दिवसाचे कांठीं क्वचित् एखादे वेळीं रिकामा वेळ सांपडला तर विश्रांतीची जरुरी अधिक भासे. परंतु माझें हें म्हणणें त्यांना कधीं पटलें नाहीं. मला तें नेहमीं म्हणत, "तुझी विद्या तूं जर कायम ठेवली नाहींस तर इतक्या शिकण्याचा फायदा काय? आणि कोणीं सांगावें कोणांवर काय प्रसंग येईल? तुलाही एखाद्या अडचणीच्या प्रसंगीं नोकरी करावी लागेल." त्यांचे हे बोल शेवटीं खरे ठरले!! ते नोव्हेंबरच्या २९ ता. ला वारले आणि फेब्रुवारीत मी कामावर रुजूं झालें.) ह्या आमच्या वादविवादांतूनच माधवरावांची एक कविता निर्माण झाली. ती 'मधु लहरी'त दिली आहे.

*'तुज वादविवादें नच माझी दृष्टि ये*
*अन् श्रद्धा आतां विदुषीस न ती प्रिये;*
*तूं अबला तुजवर भार कसा लादूं मी?*
*आश्रिता लता तूं असुख तुला कासया?*

ही कविता वाचली म्हणजे अजूनही मला फार वाईट वाटतें. त्यांच्या आग्रहामुळेंच पुढें मी जी. ए. झालें आणि मी आपलें वाचनही त्यांच्यामुळेंच कायम ठेवलें.

मध्यंतरीं अकरा वर्षांचा काळ गेला तरी माझें थोडेंबहुत ज्ञान कायम राहिलें ह्याचें श्रेय सर्वस्वीं त्यांना आहे.

पहिल्या आठपंधरा दिवसांतच एक मोठा गंमतीदार प्रसंग घडून आला. माधवरावांनीं माझें नांव मालती ठेवलें होतें. परंतु तें नांव मला आवडत नव्हतें. कारण त्याचें संक्षिप्त रूप 'मालू' असें होतें आणि तेंच मला आवडत नसे.

परंतु नांव ठेवतांना माझी पसंती विचारण्यांत आली असतांही केवळ संकोचामुळें मी कांहींच बोललें नाहीं आणि मालती ह्या नांवानें मी नवीन जगांत वावरूं लागलें. पुढें कोल्हापूरला गेल्यावर या नवीन नांवाचें जें संक्षिप्त रूपांतर होऊं नये असें मला वाटत होतें तेंच नेमकें झालें. स्वतः माधवराव मला मालतीच म्हणत. एक दिवस रा. शहाणे आमच्याकडे आले

आणि त्यांनीं मला 'मालुताई' म्हणून हाक मारली. मला तें आवडलें नाहीं. पुढें मी व माधवराव, मला कोणी 'मालुताई' ह्या नांवानें हांक मारूं नये म्हणून विशेष ओळखीच्या माणसांना तसें बजावीत असूं. परंतु हा प्रसंग वारंवार येऊं नये म्हणून माधवरावांनीं माझें नांव बदलून लीला असें ठेविलें.

माधवराव एक दिवस एकदम-उदास झाले. उदास होण्याचें कारण विचारण्याचा मला धीर झाला नाहीं. ते उदास झाले कीं प्रथम प्रथम माझी मोठी चमत्कारिक परिस्थिति होई. कारण कित्येक वेळेला माझ्या हातून कांहीं चूक घडली तर ते असेच्च उदास होत. त्याबद्दल मला ते रागानें किंवा टाकून कधींच बोलले नाहींत. त्यांना एखाद्या गोष्टीचा राग आला कीं ते माझ्याशीं मुळींच बोलत नसत. मला तें अतिशय असह्य होई. त्या दिवशीं त्यांची उदास मुद्रा पाहिली आणि मला कसेंतरीच वाटलें. आपल्या हातून काय चूक झाली, ह्याचा मीं कसून माझ्या मनाशीं तपास केला. परंतु मी कोठें चुकलें ह्याचा उलगडा मला झाला नाहीं.

दुपारीं ३॥ वाजतां माधवराव कॉलेजांतून आले. मला त्यांनीं बैठकींत हांक मारली. विम्याचे कागद त्यांनीं माझ्यापुढें ठेवले. ते म्हणाले, "हे तूं वाच आणि ह्यावर तुझी सही कर." मीं त्यांना विचारलें, "आज हें काय डोक्यांत आलें आहे?" ते मला म्हणाले, "काळ कांहीं कोणाला सांगून येत नाहीं. समज मी एकदम आजारी पडलों आणि मला मृत्यु आला तर तुझें कसें होईल हा विचार आज सकाळपासून माझ्या मनांत घोळत आहे. ह्यावर तूं सही कर. हे सर्व दहा हजारांचे विमे तुझे आहेत. तुला ह्या जगांत कोणीं फसवूं नये ह्याकरतां मी हें करीत आहें. मला कसें तरीच झालें. मीं मुकाट्यानें सही केली. परंतु त्यांनीं आपल्या मृत्यूबद्दलचा काढलेला विषय मला चमत्कारिक वाटला.

आज तेरा वर्षांनंतर त्यांचेंच म्हणणें खरें झालेलें मला दिसत आहे. त्यांनीं आपल्या मागें माझे किंवा माझ्या मुलांचे हाल होतील;अशी परिस्थिति ठेवली नाहीं. कित्येक वेळीं माझ्या मनांत जेव्हां हे विचार येतात तेव्हां कृतज्ञतेनें माझें अंतःकरण भरून येतें.

मी जरी शिकलें होतें तरी मी बाळबोध घराण्यांतील होतें. घरच्या कामाचा मला कधींही कंटाळा आला नाहीं. माझ्या आईनें मला लहानपणापासूनच घरकामांत अगदीं तरबेज केलें होतें. त्यामुळें लग्न झाल्यावर संसारांतील

बारीक सारीक गोष्टींतही मला कधीं कोणाची मदत घ्यावी लागली नाहीं. परंतु माधवरावांना नुसता टापटिपीचा संसार नको होता. माझ्या स्वयंपाका-बद्दल कोणीं स्तुति केली कीं ते म्हणत, "मला माहीत आहे हो कीं, दहा माणसांच्या कुटुंबाचेंही ती कधीं कमी पडूं द्यायची नाहीं. परंतु तिनें सारा वेळ घरकामांतच काढावा हें मला पसंत नाहीं. तिनें ह्याहून कांहींतरी निराळ्या तऱ्हेनें आपल्या आयुष्याचा उपयोग केला पाहिजे." मजबद्दल त्यांचा आशावाद दांडगा होता. आपल्या जवळच्या स्नेह्यांशीं बोलतांना ते कित्येक वेळीं म्हणत असत कीं, "तिनें ज्या प्रकारचें व्हावें अशी माझी इच्छा आहे त्या प्रकारची ती खात्रीनें होईल." त्यांचे हे उद्गार ऐकले कीं मला मूठभर मांस येई.

मला संगीत, शिवण ह्या गोष्टींची आवड जास्त. लग्नापूर्वी थोडासा गाण्याचा माझा अभ्यासही झाला होता. परंतु पुढें कांहीं कारणानें मला हौस असूनही गाणें शिकतां आलें नाहीं.

संसारांत पडल्यानंतर ते मला मुळींच जमलें नाहीं. माधवरावांना तशी गाण्याची आवड फारशी नव्हती. त्याचप्रमाणें इतर शिवणकाम विणकाम मी घेऊन बसलें कीं माधवरावांनीं माझ्यापुढें इंग्रजी किंवा संस्कृत पुस्तकें आणून टाकावींत आणि म्हणावें कीं, "विणकाम, भरतकाम ह्यांत डोळे बिघडवून घेण्यापेक्षां वाचन कर. तें तुझ्या जास्त उपयोगी पडेल!"

मला घर सजवण्याचीही मोठी हौस होती. आमच्या घरांत सुंदर वस्तु नव्हत्या असें नाहीं, परंतु त्या नीटनेटक्या ठेवाव्यात असें माधवरावांना कधींच वाटलें नाहीं. मी प्रयत्न करी, पण त्याचाही फारसा उपयोग होईलसें दिसेना. शेवटीं मी आपली आवड कायमची बाजूला ठेवली.

कोणालाही जेवायला बोलावलें कीं तें त्यांना घरून सुपारी आणायला सांगत असत. एकदां प्रो. दे. द. वाडेकरांना माधवरावांनीं जेवायला बोलविलें होतें. तेव्हां ते त्यांना म्हणाले, "जेवण झाल्यावर सुपारीच खायला हवी असली तर बरोबर खिशांतून घेऊन या. ती मात्र आमच्याकडे नाहीं. ज्या गोष्टींची गरज नाहीं अशा गोष्टी माझ्या घरांत मी पाहुण्यांना देखील देत नाहीं." प्रो. वाडेकरांनीं खरोखरच आपल्या बरोबर दुसरे दिवशीं सुपारी आणली. परंत घरीं कोणी परकें जेवायला यायचें असलें म्हणजे तेवढ्यापुरती मी

सुपारी कुटून ठेवीत असें. तें माधवरावांना माहीत नसे. प्रो. वाडेकरांनीं आपल्या खिशांतून सुपारी आणली होती हें मला माहीत नव्हतें. मीं जेवण झाल्यावर सुपारी पुढें केलेली पाहून माधवरावांना आश्चर्य वाटलें; आणि त्यांच्या नियमाला बाध आला म्हणून त्यांना थोडा रागही आला.

माझा एकटीचा फोटो माधवरावांनीं एका फोटोग्राफरकडून काढून घेतला होता. तो दोनतीन दिवसांनीं फोटोग्राफरनें घरीं आणून दिला. माधवरावांनीं तो पाहिला, मला तितकासा तो आवडला नाहीं. मी त्यांना म्हटलें, "इतकं का माझं तोंड थापट आहे?" माधवराव एकदम म्हणाले, "मग काय तूं फार सुंदर आहेस असं का तुला वाटलं?"

त्यांचें हें बोलणें माझ्या जिव्हारीं लागलें. आधीं माधवरावांशीं माझें लग्न झाल्यापासून माझ्या रूपाची चिचक्षणा चाललीच होती. त्यांत आजपर्यंत माझ्या रूपावर माधवरावांनीं कधीं टीका केली नव्हती. परंतु त्यांचे हे उद्‌गार ऐकून मला फार वाईट वाटलें. मी पटकन् बोलून गेलें. "मी कुरूप आहें, त्याची जाणीव मला चांगली आहे. तुमच्याशीं लग्न झाल्यापासून तर माझ्या कुरूपपणाची जाणीव मला वारंवार लोकही देऊं लागले आहेत. देवानें माझें रूप असें केलें हा माझा गुन्हा नाहीं. परंतु कुरूप माणसांना अंतःकरण असतं हें माणसानें अगदींच विसरूं नये. किंबहुना कुरूप माणसांचें अंतः-करण सुंदर माणसांपेक्षांही सुंदर असूं शकतं हें लक्षांत ठेवा." माधवराव क्षणभर कांहीं बोलले नाहींत; पण माझ्या बोलण्याचा त्यांच्या मनावर अनुकूल परिणाम झाला. त्यांना माझें म्हणणें पटलें. पुन्हा परत त्यांनीं मला माझ्या रूपाची कधींच जाणीव करून दिली नाहीं. त्यानंतर कोणी तरी एकदां पुन्हा अशाच अर्थाची माझ्यावर टीका केली. माधवराव म्हणाले, "ती दिसायला साधारण आहे त्याची जाणीव मला आहे. मी जाणून-बुजून तिच्याशीं लग्न केलें आहे. मला तिच्याशीं संसार करायचा आहे. तेव्हां तिच्या रूपाबद्दल मला असमाधान वाटत नाहीं."

कोल्हापूरला गेल्यानंतर प्रथम प्रथम माधवरावांशीं ज्यांच्या जास्त दाट ओळखी होत त्यांना ते जेवणाचें आमंत्रणच देत आणि एकदम कोणाला तरी जेवायला आधीं न कळवतांच घेऊन येत. त्यांना आपल्या घरांत स्वयं-पाकाला पुरेशीं भांडीं नाहींत ह्याची कधींच जाणीव नव्हती. एक दिवस ते पांचसहा मित्रमंडळींना जेवणाचें आमंत्रण देऊन आले. मला काय करावें

हें सुचेना. मी त्यांतल्या त्यांत सर्व स्वयंपाक केला. परंतु भाताला पातेलें लहान पडूं लागलें. शेवटीं मला एक युक्ति सुचली. एकदां भात करून मीं पितळींत उपसून झांकून काढून ठेविला. व परत तेंच पातेलें पुन्हा भाताकरतां चुलीवर ठेवलें. व त्यांत भात केला. असा माझा क्रम कोणी पाव्हणे आले कीं जवळ जवळ सहा महिने चालला होता. एक दोनदां माधवरावांना मीं घरांत स्वयंपाकाला व ठेव साटोप्याला भांडीं अपुरीं पडतात, म्हणून सांगून पाहिलें. पण त्यांनीं त्या गोष्टींकडे दुर्लक्ष केलें. घरांतील कांहीं पदार्थ संपला म्हणजे ते तो "इतक्यांत कसा संपला?" म्हणून विचारीत अशा प्रश्नांचं मला हंसू तर येईच पण वाईटही वाटे. मनांत भीति व संकोच, ह्यामुळें मीं आपलें दुःख गिळून टाकी, परंतु या सर्व गोष्टींचा परिणाम मला नकळत माझ्या शरीरावर होऊं लागला. हळूहळू माधवरावांनीं बाह्य जगांत कीर्ति मिळविण्यास सुरवात केली होती. कॉलेजमध्यें त्यांची गणना प्रोफेसरांत होत होती. माधवरावांचे इंग्रजी पर्शियन दोन्ही विषय चांगले होते. दोन्ही विषय शिकविण्यांत माधवरावांचा हातखंडा होता. विद्यार्थीही त्यांच्यावर खूष असत. परंतु विद्यार्थी त्यांना भीत. आमच्या घरीं विद्यार्थ्यांपैकीं कोणी क्वचितच येई. त्यांच्या शिकविण्याबद्दल एका मुसलमान विद्यार्थ्यानें असें म्हटलें होते कीं, "आमच्या प्रोफेसरांचें पर्शियनचें ज्ञान एखाद्या मौलवीला लाजवील असे आहे." इंग्रजीच्या तासाला कित्येक वेळीं सांगली-पुण्याचे विद्यार्थी येत. मला एक प्रसंग आठवतो. एकदां राजाराम कॉलेजांत माधवरावांचें इंग्रजींत व्याख्यान होतें. विद्यार्थ्यांनीं मधला हॉल अगदीं फुलला होता. माधवराव बोलायला उठले. हॉलमध्यें इतकी स्तब्धता होती कीं, टांचणी पडली असती तरी आवाज झाला असता. ही स्तब्धता माधवरावांचें भाषण झाल्यावर टाळ्यांचा कडकडाटानें भंग पावली.

माधवराव राजाराम कॉलेजमध्यें जाऊं लागले. हळूहळू तेथील वातावरणांत मिसळूं लागले; परंतु कॉलेजांतील समव्यवसायी बंधूंशीं त्यांचा फारसा निकट परिचय आला नाहीं.

त्या वेळीं रा. मोहनराव शहाणे ह्यांची व माधवरावांची आमच्या लग्नापूर्वीं तोंडओळख होती. लग्नानंतर त्यांचा आमचा परिचय वाढला. ते आमच्यांत इतकें मिसळले कीं, त्यांच्याबद्दलचा परकेपणा आम्हांला वाटेनासा झाला. ते आणि मी वयानें बरोबरीची-त्यांचे माझे विचार जास्त जमत. त्यामुळें

त्यांच्या सहवासांत माझा वेळ मोठा गमतींत व आनंदांत जाई. त्यांची तडफ व हुशारी ह्या गुणांचा माधवरावांवर अनुकूल परिणाम झाला. अनेक विषयांवर त्यांचे वादविवाद चालत. आमच्यांत कांहीं मतभेद झाले तर त्यांनीं आमची समजूत घालण्याचाही प्रयत्न करावा. त्या वेळचे आमचे चमत्कारिक दिवस त्यांनीं पाहिले आहेत. पुढें त्यांचें लग्न माधवरावांच्या भगिनी यमूनाई यांच्यांशीं १९२८ सालीं झालें.

कॉलेजच्या बाहेर माधवरावांच्या ओळखी जास्त होत्या. त्याच सुमारास त्यांचा कवि सुमंत, नागेश (नवरेशास्त्री), कवि विरागी (हुपरीकर) व डॉ. श्रीखंडे यांच्याशीं जास्त परिचय झाला.

माधवरावांच्या प्रेरणेनेंच "साहित्य स्नेहमंडळाची" स्थापना झाली. वरील सर्व मंडळी व प्रो. पंगू हे त्या साहित्य स्नेहमंडळाचे सदस्य होते.

दर रविवारीं ह्या सर्व मंडळींची कोठें तरी बैठक भरे. ह्या मंडळानें माझ्या समजुतीप्रमाणें एकदोन पुस्तकांचें प्रकाशनही केलें. हें मंडळ स्थापन झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं वरील सर्व मंडळींचा माधवराव, रवीकिरणमंडळाचे एक सदस्य व माधवरावांचे स्नेही रा. द. ल. गोखले ह्यांच्यासह एक फोटोही निघाला.

दिवाळीपर्यंतचे आमचे दिवस मोठे चमत्कारिक गेले. मला मानसिक ताप असह्य होऊन बारीक ताप येऊं लागला. एकदां माझ्या मनांत असेंही आलें कीं, आतां आपण ह्यांच्यापासून कांहीं दिवस दूर राहिलें तर फार बरें होईल आणि एक दिवस मीं तशी गोष्ट त्यांच्याजवळ काढली. मला माहेरीं जाण्याची परवानगी तात्पडतोब मिळाली आणि दिवाळीच्या सुटीच्या आधींच मी पुण्याला माहेरीं आलें. ह्या सर्व अनुभवामुळें मला असें वाटूं लागलें कीं, लहानपणीं जीं लग्नें होतात तींच सुखाचीं. सासरच्या मंडळींची ओळख होऊन त्यांच्यांत पूर्णपणें एकरूप होण्याला पुष्कळ अवसर सांपडतो. परंतु मोठेपणच्या लग्नांत, त्यांतल्या त्यांत सुशिक्षित जोडप्यांच्या मनाचे कंगोरे कायमचे घडल्यानंतर जीं लग्नें होतात, तीं मात्र एक प्रकारें मोठ्या जबाबदारीचीं व जोखमीचीं! कारण स्वभाव बनून गेल्यानंतर एकानें दुसऱ्यासारखें वागण्याचा कितीही प्रयत्न केला तरी प्रत्येक वेळीं तो साधतोच असें नाहीं. त्यांत अनेक ठिकाणीं खटके उडण्याचाच संभव जास्त! त्यांत

आणखी नवराबायकोखेरीज तिसरें घरांत माणूस नसलें म्हणजे तर तें अग्निदिव्यच ! त्यांतल्या त्यांत माझें लग्न एका ध्येयवादी माणसाशीं झालें होतें.–मला स्वतःला–तेव्हां कांहीं ध्येय नव्हतेंच ! ज्याच्याशीं लग्न होईल त्याच्याशीं जुळतें घेणें हेंच माझें इतर हिंदु स्त्रियांप्रमाणें ध्येय होतें.

मी पुण्याला माहेरीं आल्यावर माधवरावांना कोल्हापूरला एकटें एकटें वाटूं लागलें. आपले वागण्यांत बरेंच चुकतें आहे असें त्यांचें त्यांनाच वाटूं लागलें. अशाच एका मनाच्या चमत्कारिक परिस्थितींत त्यांनीं मला जीं अनेक पत्रें लिहिलीं त्यांतील थोडा मजकूर पुढें देत आहें.

"काळानें व अनुभवानें मी असा कठोर बनलों आहें. आयुष्यांतील बऱ्या–वाईट अनुभवांनीं स्वभावांत एक प्रकारचा तेढेपणा आल्यावर तुझी-माझी ओळख झाली. १९१७–१८ च्या काळांत जेव्हां माझें मन अत्यंत निरामय व सुस्थित होतें, तेव्हां जर आपली ओळख होऊन विवाह झाला असता तर मला वाटतें मी संसारांत अधिक रंगलों असतों. पण अजूनही वेळ अगदींच टळली नाहीं. आपण अजूनही सुखी होऊन सहकार्य करीत राहूं. मी असा चमत्कारिक आहें. मला संभाळून घेणें हें तुझें काम आहे.

कित्येकदां जेव्हां इतर माणसें हटकून द्रवतात तेव्हां मी निर्विकार राहातों हें खरें आहे; पण माझ्या अंतःकरणांत करुणेचा व भावनेचा सांठा इतका मोठा आहे कीं, माझी मलाच भीति वाटते. हक्क सांगून कुणी कांहीं मागूं लागला कीं झरा आटतो. नाहींतर तो दुथडी भरून वाहूं लागतो. याच कारणानें मला मैत्रीचें महत्त्व विशेष वाटतें. मैत्रींत एकमेकांना एकमेकांचा आदर ठेवावाच लागतो. आणि अति-परिचयात् अवज्ञा सहसा होऊं शकत नाहीं. शिवाय भावनेचा आविष्कार हा सात्त्विक भावांनीं होण्यापेक्षां कृतींनीं व्हावा असें मला वाटतें !"

माधवरावांची प्रेमाची कल्पना शेलेप्रमाणें होती. शेलेला ज्याप्रमाणें Marriage is a prison असें वाटत असे त्याप्रमाणेंच माधवरावांचें मत होतें. ते सुद्धां आपल्या "तेथें चल राणी" ह्या प्रसिद्ध कवितेंत म्हणतात कीं, "गे लग्नविधि जेथ न जीवैक्य निशाणी–तेथें चल राणी." पत्नीपेक्षां मैत्रिणीचें नातें त्यांना जास्त आवडत होतें. ते नेहमीं म्हणत असत, "मैत्रिणीबद्दल जो

६६२४

आदरभाव व प्रेम वाटतें, तसा आदरभाव व प्रेम पत्नी सदोदित सान्निध्यांत असल्यामुळे वाटत नाहीं. म्हणून स्त्री ही पत्नी असण्यापेक्षां मैत्रीण असावी असें मला वाटतें." 'विवाह हा एक प्रकारचा मृत्यूच होय असें हिंदुस्थानांत निदान स्त्रियांविषयीं तरी म्हणावयास हरकत नाहीं' असें त्यांनीं आपल्या सुधारक काव्याच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. पतिपत्नी विवाहबंधनानें जखडलेले असतात. त्यांचे दोघांचे हितसंबंध एकमेकांत गुंतलेले असतात, म्हणून ते एकमेकांवर प्रेम करतात. मित्र–मैत्रिणींचें प्रेम त्या मानानें निस्वार्थी असतें. ते जितके एकमेकांशीं मोकळेपणाने वागूं व बोलूं शकतात तशा प्रकारचा मोकळेपणा पतिपत्नींत नसतो. म्हणून विवाहबंधनानें उत्पन्न झालेल्या प्रेमाला त्यांनीं हिणकस ठरविलें आहे. त्यांना शारीरिक तृष्णेचें महत्त्व इतकें वाटत नव्हतें. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, हे आपलें तत्त्व त्यांनीं व्यवहारांत उपयोगांत आणलें होतें. हें तत्त्व काव्यापुरतेंच राहिलें. अशा प्रकारच्या प्रेमाची दाट छाया त्यांच्या काव्यावर सर्वत्र दिसते. परंतु समाजांतील नीतीच्या कल्पना त्यांच्या तत्त्वांना जुळेशा नव्हत्या. त्या मार्गाचा अवलंब त्यांनीं कधींच केला नाहीं. ह्या बाबतींतील त्यांचीं मतें व्यवहारांत येऊं शकलीं नाहींत. तत्त्वें व व्यवहार ह्यांची माधवरावांच्या आयुष्यांत कधींच सांगड घातली गेली नाहीं. ते मैत्रिणीकडूनही वात्सल्याची अपेक्षा करीत होते. त्यांच्या दृष्टीनें शारीरिक तृष्णेपेक्षां वात्सल्याला जास्त महत्त्व होतें. प्रेमांत सत्ता व हक्क कामाचे नाहींत असें त्यांचें म्हणणें असे. जिच्यावर आपण मनापासून प्रेम करतों तिच्या सान्निध्यांत आनंद उपभोगावयाचा असेल तर मैत्रिणीनें मित्राला स्वातंत्र्य द्यावें, बंधनानें जखडून ठेवूं नये असें त्यांचें म्हणणें असे.

मला ते एका पत्रांत लिहितात—

'मजबद्दलचें' तुझें कोणत्याही प्रकारचें अज्ञान राहूं नये याकरिता मीं तुला आजपर्यंत माझे विचार व मतें प्रत्यक्ष सांगण्याचा व पत्रांत लिहिण्याचा भडिमार चालविला आहे. त्यामुळें तूं गांगरून जाणें साहजिक आहे. परंतु वेळेवरच्या कांहीं गोष्टी केल्याचा उपयोग जास्त होतो. मी ध्येयवादी आहें. आजपर्यंत मीं आपलीं ध्येयें उरापोटाशीं बाळगून ठेवलीं. कांहीं सफल झालीं. कांहीं धुळीस मिळालीं. लोक तुला अजूनही मजबद्दल परोक्ष कांहीं सांगण्याचा प्रयत्न करतील. त्यानें तुझ्या मनांत विनाकारण विकल्प येण्याचा संभव आहे. म्हणून मला जसजशा कांहीं गोष्टींच्या आठवणी येतात तसतशा त्या मी तुला

सांगतों, लिहितों. आपण आतां यापुढें एकमेकांच्या सहवासांत आयुष्य कंठणार आहोंत. कोणत्याही प्रकारचे गैरसमज तुझ्या मनांत राहूं नयेत अशी माझी इच्छा. आपल्या विवाहापूर्वी तूं माझी मैत्रीण असतीस तर तूं माझ्या मतांचा व विचारांचा जास्त सहानुभूतिपूर्वक विचार केला असतास. परंतु आतां तूं माझी पत्नी आहेस. तेव्हां कदाचित् कोणीं कांही सांगितलें तर तुझा गैरसमज होण्याचा संभव जास्त. वास्तविक माझ्या आयुष्यांत असें कांहींच नाहीं कीं, लोकांनीं त्याचा इतका बाऊ करावा! परंतु जो इतरांच्यापेक्षा थोडा निराळा वागतो तो समाजाच्या डोळ्यांत खड्याप्रमाणें सलतो. तसें माझ्या बाबतींत झालें आहे.

पतीनें उपदेशकाची भूमिका घेतली तर पत्नीला आवडत नाही. मी तुला उपदेश करणार नाहीं. तूं स्वतंत्र आहेस, विचारी आहेस. गोड गोड भाषेंत मीं तुला पत्रें लिहिलीं तर तीं तुला विशेष आवडतील. परंतु कोणत्याही बाबतींत तूं अंधारांत राहूं नयेस असें मला मनापासून वाटतें. पुढें एकमेकांना समजावून घेऊन सुखानें संसार करण्यांत जें सुख आहे त्याला मोल नाहीं.'

या सर्व पत्रांनीं माझ्या मनाचा त्या काळांत फार गोंधळ उडाला. अभ्यास करायचाही मला सुचेना. त्या वर्षी मानसिक त्रासामुळें मी जी. ए. होईन अशी मला खात्री वाटेना. परंतु त्या वर्षींच म्हणजे १९२९ सालीं मी जी. ए. झालें. त्याचें श्रेय माधवरावांनाच आहे.

---

## वेताळ : : : ४

कोल्हापूरला आल्या दिवसापासून माधवराव कांहीं दिवस अतिशय उदास असत. कोणाशीं बोलत नसत. माझ्याशींही कामापुरतेंच बोलत. आजपर्यंत कॉलेजच्या खुल्या वातावरणांत हसण्या खेळण्यांत मीं दिवस घालविले होते. कोणत्याही प्रकारची जबाबदारी मला माहीत नव्हती. परंतु मीं माधवरावांशीं लग्न केलें म्हणजे जाणून बुजून खाईतच उडी घेतली होती. त्यांतून घरांत आम्ही दोघेच. तिसरें बोलायला कोणी नाहीं. लग्न होईतोंवर आम्ही बोलतच होतों. आतां बोलायला विषयच उरला नव्हता.

माधवराव एखाद्या वेळीं जे सकाळीं बाहेर पडत ते संध्याकाळीं पांचसहा वाजेपर्यंत घरीं येतच नसत. त्यामुळें माझा केव्हां केव्हां तोल सुटे व मी मनमुराद ओक्साबोक्शी रडत बसे. परंतु येथें आपली समजूत घालायला कोणी नाहीं, व आतां आपल्याला ह्यांतूनच मार्ग काढावयाचा आहे, अशी जाणीव मनाला झाली कीं माझें रडें आपोआप थांबे. याप्रमाणें आमचे दोन महिने निघून गेले. एक दिवस नाशिकहून एका गृहस्थाचें पत्र आलें. माधवरावांचें लग्न झालेलें त्या गृहस्थांना माहीत नव्हतें. त्यांनीं माधवरावांना एक स्थळ सुचविलें होतें. मुलगी विधवा होती. तिची पुनर्विवाह करण्याची इच्छा होती. ‘कर्तव्य असल्यास एकदां येऊन भेटून जावें’ अशा अर्थाचें तें पत्र होतें. त्या दिवशीं प्रो. शंकरराव कानेटकर (कवि गिरीश) आमच्या घरीं पाहुणे होते. आमच्या नव्या बिऱ्हाडीं ते प्रथमच पाहुणे आले होते. ते व आम्ही दोघे जेवायला बसलों होतों. सकाळीं १०॥ च्या सुमाराला हें पत्र माधवरावांच्या हातीं पडलें. डाक आल्याबरोबर कितीही निकडीचें काम असो तें काम बाजूला सारून आलेलीं पत्रें वाचल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. तसेंच त्या दिवशीं झालें. त्यांनीं तें पत्र वाचलें. आणि शंकररावांना वाचायला दिलें. दोघांनींही वाचलें, परंतु मला मात्र कांहींच सांगितलें नाहीं. शंकरराव माझ्याशीं बोलत होते. माधवराव मात्र जे एकदम गप्प झाले. ते सबंध जेवण होईतों बोलले तर नाहींतच पण जेवणानंतर पलंगावर भिंतीकडे तोंड करून

जे निजले ते साडेतीनचार वाजेपर्यंत! डोक्यावरचें पांघरूणही त्यांनीं काढलें नाहीं. मीं आपलें काम आटोपलें व नंतर मी व शंकरराव इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलत बसलों होतों. पत्रामुळें झालेला बदल माझ्या व शंकररावांच्या तेव्हांच लक्षांत आला होता. परंतु काय कारण झालें होतें हें मींही मुद्दाम विचारलें नाहीं. मला तसें करणें बरें वाटलें नाहीं, व शंकररावही त्यासंबंधीं माझ्याशीं बोलले नाहींत. दुपारीं चार वाजतां चहा झाला, व माधवराव एकटेंच कोठेंतरी फिरायला निघून गेले. संध्याकाळीं पांचाच्या सुमारास राजाराम कॉलेजांत शंकररावांचें काव्यगायन झालें. त्याला माधवराव हजर होते. नंतर ते व शंकरराव फिरायला गेले. ते रात्रीं साडेआठला घरीं आले.

इकडे माझ्या मनाची स्थिति मोठी चमत्कारिक झाली. शंकररावांना आम्ही आमच्या जवळच्या स्नेह्यांतले समजतों व समजत होतों. परंतु कांहीं गोष्टींचा उल्लेख मित्रांच्या देखतही करण्याचा संकोच वाटतो. त्यामुळें मीं आपल्या मनावर दडपण ठेवलें होतें. आपल्या स्वतःच्या खिन्नतेचें प्रदर्शन करणें मला बरें वाटलें नाहीं; म्हणून मी स्वतःला झालेलें दुःख लपवण्याचा प्रयत्न करीत होतें. मीं स्वयंपाक केला. रात्रीं नवाला आमचीं जेवणें झालीं. तरी माधवराव अस्वस्थच होते. पुढें दुसरे दिवशीं ते पुन्हा पूर्वींप्रमाणें बोलूं लागले. त्यांची चुकी त्यांना कळून आली. त्यांनीं त्यांच्या उदासीनतेचें कारण मला सांगितलें व " अशा मधून मधून न बोलण्याच्या लहरी मला येतात या गोष्टींचा परिणाम तूं आपल्यावर होऊं देऊं नकोस." असें मला सांगितलें.

माधवरावांच्या आयुष्यांतील वैवाहिक ध्येय म्हणजे प्रेमविवाह. तो नच साधल्यास निदान पुनर्विवाह किंवा एखाद्या पतितेशीं लग्न करून तिचा उद्धार करावा असें होतें; परंतु ही त्यांची इच्छा पूर्ण झाली नाहीं आणि त्यांनीं प्रतिष्ठित समाजांत रूढ असलेल्या चालीप्रमाणेंच नाइलाजानें माझ्याशीं लग्न केलें, आणि लग्न करून आतां संसार करायचा निश्चय करून ते त्या मार्गाला लागले असतां ह्या पत्रानें त्यांना डिवचलें होतें.

कारण मला समजलें. मीं समजून घेण्याचा प्रयत्न केला. परतु त्यांच्या चमत्कारिक वागण्यामुळें मला जें दुःख झालें त्यानें माझी अर्धी शक्ति नाहींशी झाली. ह्याच प्रसंगाला उद्देशून, " सर्वस्वाचा यज्ञयाग " ही कविता

निर्माण झाली. ह्या कवितेची तारीख–म्हणजेच त्या प्रसंगाची तारीख २२ सप्टेंबर १९२८ ही मीं विसरणें शक्य नाहीं. ही कविता वाचली कीं माधवरावांची त्या वेळची मूर्ति माझ्या डोळ्यापुढें उभी राहते आणि अजूनही मला कसें तरी होतें.

माधवरावांना अशा प्रकारच्या लहरी आल्या म्हणजे माझी पांचावर धारण बसे. एकदां त्यांच्या डोक्यांत वेताळाचें साम्राज्य थैमान घालूं लागलें कीं ते कोणाचे नसत. मी घरांत एकटी, आणि अशा वेळीं तर मला एकलेपणाची जाणीव अधिक होई; जीवन असह्य होई. लग्न केल्याचा पश्चात्ताप होई. आतां आपलें कसें होईल, आपलें ह्यांच्याशीं कसें पटेल, अशी भीति वाटे. पूर्वी माधवरावांशीं लग्न करायला तयार नसण्याचें माझें कारण निराळेंच होतें. परंतु लग्न झाल्यावर तें बाजूलाच राहिलें आणि हा निराळाच 'वेताळ' माझ्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला. केव्हां केव्हां माधवराव जे सकाळीं घराच्या बाहेर पडत ते दुपारीं दोन तीन वाजले तरी त्यांचा घरीं पत्ता नसायचा. मी वाट पाहून थकून जात असे. सर्व स्वयंपाक करून ठेवावा आणि खिडकींत तासचे तास वाट पाहात बसून राहावे असें प्रसंग कित्येक वेळेला घडत. त्यांना आपण करतों हें गैर करतों, हें समजत असे. स्वतःची चूक ध्यानांत आली म्हणजे ते म्हणत, "आजपर्यंत मी एकटा होतों. मला आपलें लग्न झालें आहे ह्याचें स्मरण राहात नाहीं. तूं रागावूं नकोस" मी निरुत्तर होई.

त्यांना मधून मधून न बोलण्याच्या ज्या लहरी येत, त्या लहरींच्याच तालांत व नादांत ते असत. ती लहर केव्हां येईल व केव्हां जाईल ह्याचा कांहीं नियमच नसायचा. त्या लहरींत त्यांच्या मनाला येईल तसें ते वागायचे. कित्येक वेळां डोक्यावर पांघरूण घेऊन तासचेतास स्वस्थ निजून राहात. त्या वेळीं त्यांच्याशीं कोणी बोललेलें त्यांना खपत नसे. ह्या त्यांच्या लहरीला आम्ही 'वेताळ' असें नांव दिलें होतें. त्या वेताळापायीं मला भारी त्रास होई. ते ह्या वेताळासंबंधीं पत्रांत लिहितात, "गाडी गेल्यावर मात्र मला 'मूड' (तुझ्या शब्दांत वेताळ) आला, व नंतर तसाच मी टेंबलाईकडे फिरावयास गेलों. तूं त्या वेळीं नव्हतीस हें बरेंच झालें. केव्हां केव्हां एखाद्या 'मूड'मध्यें कोणीं नसावें असें वाटतें. त्यांतून आपल्या मूडनें दुसऱ्या माणसाला त्रास होईल असें वाटलें तर आपला त्रास वाढून त्याला बरें वाटेल असें कांहीं करतांच येत नाहीं. तुझा विवाह एका स्वप्नाळू मूर्खाबरोबर झालेला आहे. त्यामुळें व्यावहारिक मनुष्या-

करून कधींही होऊं शकत नाहीं, अशा तऱ्हेचा त्रास तुला सहन करावा लागतो हा विचार फार जाचक होतो."

पुढें पुढें माधवरावांनीं आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर या आपल्या वेताळावर विजय मिळवला व सन १९३० च्या पुढें हा वेताळ पार अदृश्य झाला. व माधवराव चार माणसासारखें वागूं लागले.

माधवराव शांत झाले म्हणजे त्यांना माझ्याकडे पाहून फार वाईट वाटे. ते मला म्हणत, " तूं माझ्यामुळें स्वतः दुःखी होऊं नकोस. कांहींही कारणानें मूडी होणें हा आतां माझा स्वभाव झाला आहे. त्याच्याशीं तुझ्या वर्तणुकीचा कांहींएक संबंध नसतो. मला अशा वेळीं वाटतें कीं, तूं माझी पत्नी आहेस त्यापेक्षां मैत्रीण असतीस तर फार बरें झालें असतें. तूं माझ्या ह्या स्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार केला असतास. माझ्या मूडमुळें तूं दुःखी झाली नसतीस. हा मूर्ख आहे असें म्हणून सोडून दिलें असतेस. परंतु तूं माझी पत्नी झालीस. तुझे हितसंबंध माझ्यांत गुंतले म्हणून तूं आपल्याला दुःख करून घेतेस. तुझ्याकडे पाहून माझ्या मूडमध्येंही मी तुजबद्दल विचार करतों. तुला दुःख होऊं नये म्हणून स्वतःच्या मनाला आवर घालण्याचा प्रयत्न करतों; परंतु मला तें जमत नाहीं आणि मला फार वाईट वाटतें. आपल्याभोंवतीं वावरणाऱ्या ह्या व्यक्तीला काय केलें असतां सुख होईल ह्याचा मी विचार करीत बसतों. ह्याकरतां मी तुला म्हणतों कीं, तूं दुसरे स्नेही कर, मैत्रीणी कर. तुझ्या मनाला त्यामुळें विरंगुळा वाटेल. तूं अधिक सुखी होशील." मी त्यांना म्हणे "स्नेही कर, मैत्रिणी कर म्हणून का कधीं एकदम मैत्रिणी किंवा स्नेही होत असतात. तो माझा स्वभाव नाहीं. ओळख होऊन जर कोणाशीं स्नेह वाढला तर त्या व्यक्तीशीं अवश्य मी स्नेह करीन. पण त्या हेतूनें मी बाहेर वावरूं लागलें तर तें मला जमणार नाहीं. माझें जें दुःख आहे तें ओकण्याचा प्रयत्न असलेल्या स्नेह्यांजवळ जरी केला तरी लोक तुमच्याबद्दल गैरसमज करून घेतील. तुमच्या अशा वागण्याला ते नांवें ठेवतील. त्यामुळें मला सुख होण्याच्या ऐवजीं दुःख होईल. असा हा वेताळ तुमच्या अंगांत येतो. एकटे होतात तेव्हां ठीक होतें, आतां तुमच्या जिवाची तळमळ पाहून माझ्या अंतःकरणाची कालवाकालव होते. मी म्हणतें त्याचा पत्नी म्हणून विचार करूं नका. तुमची कोणी तरी मैत्रीण तुम्हांला सांगते अशा दृष्टीनें तुम्ही मी काय म्हणतें त्याचा विचार करा. पहा

जमलें तर. नाहीं तर– मी तर तुमच्या स्वभावाशीं जुळतें घेण्याचा प्रयत्न करीत आहें. त्याकरतां मी आपल्या जिवाची आटोकाट घडपड करीत आहें. जमलें तर ठीक-नाहींतर दुर्दैव माझें!”

माधवरावांच्या मनावर माझ्या बोलण्याचा परिणाम होई. त्यांचे डोळे अश्रूंनीं डबडबून येत आणि पुन्हा ‘ मी आपल्या लहरींवर ताबा ठेवीन” असें ते मला आश्वासन देत. माधवरावांचा हा वेताळ फार जुना, बडोद्यापासूनचा होता. त्यांचे त्या वेळचे मित्र याबद्दल पुष्कळ आठवणी सांगतात. बडोद्यास काव्यगायनाचा जलसा ठरला. इंदुराहून घाटे, अहमदाबादहून खुराटे, भडोचहून मराठे आले. दीड दिवस अखंड काव्यगायन झालें. नंतर फोटो काढण्याची सूचना आली व ती मान्य झाली. जाग्रणानें व भावनात्मक वातावरणामुळें माधवरावांचा वेताळ जागा झाला. ते ताडकन् खऱ्यांच्या घरांतून निघून आपल्या घरीं आले व पांघरूण घेऊन दीड दिवस झोपून राहिले. इतर मंडळी फोटोचा बेत रद्द करून आपल्या स्थानीं निघून गेली. पुढें वेताळ गेल्यावर माधवरावांनीं सर्वांना पत्रें लिहून माफी मागितली. बडोद्यास अशी लहर आली म्हणजे माधवराव एकान्तांत बसत किंवा दूर कोठें जात कधीं उपाशी राहात, तर कधीं कच्चे पदार्थ खाऊन राहात. ह्या प्रसंगानंतर त्यांनीं त्यांच्या मित्रांना माफीचीं पत्रें लिहलीं. त्यांतील रामभाऊंना लिहिलेलें पत्र पुढें देत आहे.

रावपुरा, बडोदें

सो. ता. २३ ऑक्टोबर १९११

‘ तुला राग आला असतांहि त्यांस आवरून तूं जें शांतपणानें मला पत्र लिहिलेंस त्याबद्दल मी तुझा किती ऋणी आहें म्हणून सांगूं! पत्र वाचून मला बरेंच समाधान वाटलें. खरें सांगूं का? तूं म्हणतोस तितका मी दुराग्रही नाहीं; पण लहरी मात्र आहें. मी तुला स्टेशनावर भेटण्यास येणार होतोंच. पण त्या दिवशीं मी क्षुब्ध अंतःकरणानें व खिन्न मनानें जो निघालों तो खोलींत जाऊन वाचावयास बसलों. डोकें भडकलें, शिरांमधून उष्ण रक्त इतस्ततः वावरूं लागलें. अर्धा तास मनाल, स्थिर करून मी वाचण्याचा प्रयत्न करीत होतोंच. मागील दिवसांच्या श्रमानें उचल खाल्ली आणि माझे हातपाय गळून गेले. शेवटीं तंद्रीनें मजवर अनुग्रह केला. ती झोंप नव्हेच. पण मी सुमारें तास सव्वा तास

अचेतन पडून राहिलों होतों. त्या काळांत जर कोणीं मला उचलून दूर फेकून दिलें असतें तरी देखील मला समजलें नसतें. यावरून तुला खरी हकीगत कळली असेलच. रामभाऊ, तुला मी ज्या कारणांसाठीं येथें बोलाविलें, ती माझी इच्छा विफल झाली. सर्वांशानें तुम्हांला खूष करण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं नव्हतें, यासाठीं मी दिलगीर आहें. वेळोवेळीं माझ्या तोंडून निघालेल्या उद्गारांनीं सर्वांचीं मनें दुखावलीं आहेत. आणि कांहींच्या रागाला आणि उपहासाला बोलाविणें पाठविलें हें पाहून मला राहून राहून खेद होत आहे. माझ्या मनांत कोणताहि वाईट हेतु नसतांना, माझ्या भाषणानें असल्या गोष्टी घडवून आणाव्या ही विधीची इच्छा नाहीं तर माझी घोडचूक आहे. फक्त निष्काळजीपणामुळें ही गोष्ट या थराला यावी. आणि असल्या श्रेष्ठ संमेलनाचें पर्यवसान गैरसमजुतीनें विभक्ततेंत व्हावें आणि अंतीं आनंदाचा उद्वेगांत विनिमय व्हावा याहून मला दुसरी लांछनास्पद अशी गोष्ट कोणती? माझा तर्क खोटा नाहीं आणि माझे हेतु कुजके नाहींत. मग माझीं कर्मेंच कां चुकावींत? मला जगांत राहावयाचें आहे. माझें जगाशीं व जगाचें माझ्याशीं कर्तव्य आहे. मग जर मी माझ्या लहरीला अनियंत्रित सत्ता देऊं लागलों तर प्रेमाचे दोन गोड घांस कुणीं व कसे खावे? बरें, आतां नाटकास जाण्याविषयीं तुला दोन गोष्टी लिहितों. समज आपण नाटकास गेलों असतों आणि नाटक चांगलें झालें असतें तर माझी इकडे स्थिति काय झाली असती याची कल्पना तुला होती काय? ते हृदयद्रावक अगर हृदयचुंबक देखावे, ते वेष, तीं स्वरूपें, तें हावभाव या सर्वांनीं कट करून मला एक दिवस नाहींतर एक आठवडाभर माझ्या मनास बांधून टाकिलें असतें व तें इतकें गच्च कीं, त्यास इकडे तिकडे यत्किंचितही हलतां येऊं नये. जोंपर्यंत असलें प्रसंग टाळण्याची ताकद आपल्यांत आली नाहीं, तोंपर्यंत त्यापासून अलिप्त राहूं नये असा या विश्वांतील कोणता तत्त्वज्ञ सांगूं शकेल? तुम्हां सर्वांस सुख झालें असतें. कबूल. पण तुमच्या सुखाच्या आड येण्याची माझी इच्छा नव्हती. बिलकूल इच्छा नव्हती. उलटपक्षीं कालव्यय फार न होतां सुखवर्धनासाठीं तर आपण हा एवढा खटाटोप केला. असो.

आतां ह्याविषयीं वाद कशाला? गतगोष्टी (ज्या वाईट असतील त्याच) विसरणें हाच शहाणपणाचा मार्ग होय.

फोटोसंबंधानें इतकें वाईट वाटून घ्यावयास नको. आपणा सर्वांची तशी इच्छा असलीच तर फोटो काढावयास वेळ लागेल काय? येईल, तींही वेळ येईल.

रा. घाटे, तूं गेलास त्याच्या दुसऱ्याच दिवशीं गेले. पत्ता अजून दिला नाहीं. देईन म्हणाले आहेत. आला म्हणजे ताबडतोब पाठवून देण्यांत येईल. रा. खराटे अजून येथेंच आहेत. उद्यां जातील. मला व खरे यांस पत्रें एकाच पाकिटांत आतां पाठवीत जा."

त्या काळांत वेताळाचें साम्राज्य केव्हां सुरू होईल त्याचा नियमच नसायचा. माधवरावांचा वेताळ जागृत झाला नाहीं तर आमचा वेळ मोठ्या आनंदांत जाई. परंतु कोणत्याही कारणानें वेताळ जागृत झाला तर मला असह्य होई. त्या स्थितींत माधवरावांशीं साधें बोलणेंसुद्धां अशक्य असे. त्यांची ती स्थिति पाहिली कीं कित्येक वेळां हंसावें कीं रडावें कीं कोठें पळून जावें अशी कांहीं चमत्कारिक परिस्थिति माझी होई. माझें काम दिवसभर यंत्राप्रमाणें चाललेलें असे. माधवराव आपले व्यवहार व्यवस्थित आटोपीत. कोणत्याही तऱ्हेचा खोळंबा त्यांनीं त्याही स्थितींत कधीं केला नाहीं. परंतु त्यांचें चित्त ठिकाणावर नसे. घरांत दुसरें कोणी नसल्यामुळें मला कोणाशीं बोलून दुःख हलकें करण्याला वावच नसे. मनाच्या अशा चमत्कारिक परिस्थितींत मी आपला तो काळाप्रमाणें वाटणारा वेळ जिवाच्या तळमळींत घालवावा.

पुण्याला आल्यावर कांहीं काल आनंदांत गेला. तेव्हां वेताळही गेला. पण सोसायटीच्या प्रकरणानंतर जो आला तो १९३० पर्यंत त्यांच्या व माझ्या मानेवर बसला.

या वेताळाच्या साम्राज्यांतच फारसीच्या उमरखय्यामाचें मराठी भाषांतर झालें. व हें पुस्तक माझ्या वाढदिवशीं म्हणजे १५ ऑ. १९२९ रोजीं प्रसिद्ध झालें.

## कांहीं गमतीदार अनुभव : : : ५

लग्न झाल्यानंतर, माधवराव पटवर्धनांची बायको म्हणून मजबद्दल अनेक पुणेकरांना कुतुहल होतें. कोणी मला मी कशी दिसतें हें पाहण्याकरतां चहाच्या निमित्तानें आपल्या घरीं बोलावीत. कोणी माझ्या देखत आपापसांत, "अहो ते फर्ग्यूसन कॉलेजमध्यें होते ना ? नुकतेंच नाहीं का तेथून निघाले, त्याच पटवर्धनांची ही बायको !" अशी एकमेकांना माहिती देत. कोणी आमच्या कानांवर येईल अशा उद्देशानें पण अपरोक्ष म्हणत, "त्या मुलीनें असल्या ह्या गृहस्थाशीं कसें लग्न केलें? भोळी बिचारी! हिला त्यानें फसविलें असावें !' कोणी मजबद्दल बोलतांना म्हणत कीं, "अहो हिलाच लग्नाची घाई झाली असेल." कोणी म्हणत, "अहो, तिच्या मनांत कोठें होतें त्या माणसाशीं लग्न करायचें? बापानें जुलमानें बांधली हिला त्याच्या गळ्यांत! मागून पस्तावेल बिचारी !" ज्यांना माधवरावांच्याबद्दल आपलेपणा वाटत होता असे लोक म्हणत, "शेवटीं माधवरावांनीं आपणाला शोभेल अशी बायको केली नाहीं !"

एकदां तर मी एका ठिकाणीं बसायला गेलें होतें. त्यांचा माझा पूर्वींचा परिचय होता. माझा आवाज बरा आहे हें त्यांना माहीत होतें. मला सल्ला दिला गेला कीं, "अहो आतां हें एक बरें झालें. माधवरावांनीं कविता कराव्या व त्या तुम्हीं म्हणून दाखवाव्यात" जणूं काहीं माधवरावांनीं आपल्या कविता लोकांना म्हणून दाखवण्याची उत्तम सोय म्हणूनच माझ्याशीं लग्न केलें होतें!! एकदां कुणीं तरी मला विचारलें, "अहो, आम्हांला वाटलें माधवराव तुमचें नांव 'इंदू' नाहीं तर 'शारदा' किंवा 'श्यामा' ठेवतील ! लीला नांव ऐकून आम्हाला आश्चर्यच वाटलें ! हें असें कसें झालें ?" त्यावर एकानें उत्तर दिलें "अहो हें असें कसें झालें म्हणून काय विचारतां ? लीला नांव ठेवण्यांत माधवरावांचा हेतु आहे ! 'लीला माधव' ह्यांचें साम्य 'लैला मजनूं' ह्यांच्याशीं नाहीं का?" अर्थात् हें सर्व थट्टेंत असें, परंतु त्यांतील गर्भितार्थ माझ्या ध्यानांत येत नव्हता असें नाहीं.

एकदां एका बाईनें मला विचारलें, "तुम्हांला पर्शियन चांगलें येत असेल नाहीं ? तुम्ही पण कवयित्री असाल." कुणी म्हणत, 'अहो, हिचा सांवळा रंग माधवरावांना पसंत पडला असावा, कारण माधवरावांच्या सर्व नायिका सांवळ्या आहेत.' कोणी म्हणत "अहो, हिचे डोळे चांगले आहेत म्हणूनच माधवरावांनीं हिला पसंत केली असावी." ह्या सर्व विचित्र उद्गारांनीं माझ्या मनाचा मोठा गोंधळ उडे. कांहीं प्रश्न ऐकून मोठी गंमत वाटे. पुढें असल्या प्रश्नांची सवय झाल्यावर मला वाईट वाटण्यापेक्षां हसूंच येई. माधवरावांच्या कानांपर्यंत ह्या गोष्टी गेल्या म्हणजे तेही आपल्यावरच विनोद करून हंसत.

एकदां कांहीं कामाकरितां मी एका ठिकाणीं गेलें होतें. त्या वेळीं तेथें कोणी एक गृहस्थ आले होते. आमच्या लग्नाचा विषय हाही त्या वेळीं अनेक पुणेकरांचा चर्चेचा विषय झाला होता. मी आंत पाऊल ठेवतें न ठेवतें तों मला पुढील ओळी म्हटलेल्या ऐकूं आल्या:

उमेदी धावत्या माझ्या

*तुझ्या प्रीतीविना पंगू — अगे गंगू.*

माझें माहेरचें नांव गंगू. संभाषण कोणावर चाललें आहे हें माझ्या ध्यानांत यायला फारसा वेळ लागला नाहीं. मी आंत गेलें. सुरू असलेल्या संभाषणाला एकदम कलाटणी दिली गेली. दोन्हीही गोष्टी माझ्या ध्यानांत आल्या. मी आपलें काम केलें व बाहेर आलें. माझ्या मनांत चटकन् विचार आला, "बिचारे माधवराव ! लग्न करून संसाराला लागले तरी टीकेंतून सुटले नाहींत !"

आमच्या बडोद्यांच्या मामंजींना (माधवरावांच्या मामांना) वाटलें कीं, आपल्या भाच्यानें केलें एका मराठ्याच्या पोरीशीं लग्न !! देशस्थ ब्राह्मणांत 'गरुड' हे आडनांव त्यांनीं कधींच ऐकलें नव्हतें. त्यांनीं रागाच्या भरांत माधवरावांना एक भलें मोठें पत्र पाठविलें. त्यांत त्यांनीं माधवरावांना लिहिलें, "अब्राह्मणांशीं संबंध आणून आपल्या कुळाचा उद्धार केलात ! आम्ही धन्य झालों!" माधवरावांनीं कांहींच उत्तर पाठविलें नाहीं. पुढें त्यांचें दुसरें पत्र आलें यांत त्यांनीं देशस्थाची तर देशस्थाची, पण मुलगी ब्राह्मणाची आहे हें ऐकून

समाधान व्यक्त केलें होतें. तरी माधवरावांनीं त्याही पत्राला उत्तर पाठविलें नाहीं. पुढें प्रत्यक्ष मला पाहिल्यावर त्यांचा राग पार निवळला. तरी मुलगी दिसायला चांगली नाहीं अशी सासरकडच्या सर्व नातेवाईक मंडळींची तक्रार होतीच. पण त्या गोष्टीचा माधवरावांच्या मनावर कोणत्याच तऱ्हेचा परिणाम झाला नाहीं.

कोल्हापूरला असतांना आम्हीं कांहीं घरीं जास्त- मोकळेपणानें वागण्याचा प्रयत्न केला. मनुष्याला कोठें तरी मनमोकळें वागावेंसें व बोलावेंसें वाटतें. आम्ही दोघेही सुधारकी मताचे व आचाराचे. आमच्या मोकळेपणानें वागण्याचा कांहींच्याकडून विपर्यास करण्यांत आला. त्या काळांत आम्हीं कोठें कांहीं बोलावें, जास्त मोकळेपणानें वागण्याचा प्रयत्न करावा आणि त्याचा नेमका विपर्यास व्हावा हें ठरलेलेंच असे. शेवटीं ह्या चमत्कारिक अनुभवानें आम्ही शहाणे झालों आणि शक्य तितकें कोणाच्या घरीं जायचेंच नाहीं असा मनाशीं निश्चय केला.

एकांतवासाची आवड माधवरावांनाही होती. मलाही त्यांतच आनंद वाटूं लागला. त्या दिवसांत आमचा कार्यक्रम म्हणजे रोज न चुकतां फिरायला जाणें. आमचें बरोबर फिरायला जाणें, मीं पायांत स्लीपर घालणें, पावसाळ्यांत रेनकोट घालणें हें सर्व त्या काळांत कोल्हापूरच्या लोकांना नवीनच होतें. पावसाळ्यांतही आमचें फिरणें कधीं चुकलें नाहीं. मी रेनकोट घालून व पायांत स्लीपर घालून घराच्या बाहेर पडलें कीं शेजारपाजारच्या घरांतील स्त्री–पुरुष आमच्याकडे मोठ्या कुतूहलानें पहात व लहानमोठीं मुलें हा कोण विचित्र पुरुष चालला आहे हे पाहण्याकरितां माझ्या मागें येत. मला कसें तरीच वाटे. त्यामुळें कित्येक वेळीं मी रेनकोट घालण्याचें टाळी. माधवराव मला म्हणत, "फिरणें अवश्य आहे. भर पावसांत ओलें होण्यापेक्षां आणि वहाणांनीं अंगावर चिखल उडवून घेण्यापेक्षां रेनकोट घालणें व स्लीपर घालणें कांहीं वाईट नाहीं. लोक हंसतात, हंसूं दे. त्यांची पर्वा आपण कां करावी ?"

त्या काळीं मूक चित्रपट होते. कोल्हापुरांत स्त्रिया सिनेमाला गेल्या तरी पडद्यात बसत. चिकाचे पडदे लावून स्त्रियांच्याकरितां मुद्दाम निराळी सोय चित्रपटगृहांत केलेली असे. स्त्रियांनीं पुरुषांच्याबरोबर सिनेमाला जाण्यचा प्रघात तेव्हां

नव्हता. त्या गेल्याच तर लहान भाऊ किंवा नवऱ्याशिवाय जे कोणी इतर नातेवाईक असतील त्यांच्याबरोबर जात. एका टांग्यांत स्त्री-पुरुषांनीं बसणें म्हणजे कोण अब्रम्हण्य! त्याला लोक नांवें ठेवीत. अशा काळांत आम्ही दोघें केंव्हां तरी चांगला चित्रपट असला तर, त्यांतल्या त्यांत एखाद्या प्रसिद्ध इंग्रजी चित्रपटाला जात असूं. अशा वेळीं चित्रपटगृहांत स्त्रिया फारशा नसतच. किंबहुना एकही स्त्री नसे असें म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. मी कधींही पडद्यांत बसलें नाहीं. माधवरावांना तसें बसणें कधीं आवडलें नाहीं. स्टॉलचीं तिकिटें काढून दोघेंही एकाच ठिकाणीं बसत असूं. चित्रपट पाहायला आलेल्या लोकांना मोठें आश्चर्य वाटे. बहुतेक आमच्यापासून चार खुर्च्या दूर टाकून लोक बसत. सिनेमा सुरू होण्याच्या आधीं व मध्यंतरांत सर्वांच्या दृष्टि आमच्याकडे असत. पुढला पडद्यावरील सिनेमा संपला म्हणजे मागला सिनेमा सुरू होई!!

कोल्हापुरांत स्त्री-पुरुषांनीं एकत्र फिरायला जाणें, सिनेमाला जाणें, सभेला जाणें ह्या गोष्टी प्रथम आम्हीं सुरू केल्या असें म्हटलें तर फारसें वावगें होणार नाहीं.

लग्नानंतर मी सहा महिन्यांनीं एरंडवण्याला कॉलेजच्या वसतिगृहांत राहायला गेलें. आमचा पत्रव्यवहारावरही कांहीं मंडळींचा डोळा असे. विशेषतः एकमेकांना पाठविल्या जाणाऱ्या पत्रांच्या पाकिटाच्या रंगावर कांहीं जाणतीं माणसें टीका करीत. अशी टीका ऐकली कीं मी मोठ्या बुचकळ्यांत पडत असे. नोटपेपर व पाकिटांचा रंग आवडीप्रमाणें असे ह्यांत शंकाच नाहीं. परंतु त्याच नोटपेपर्सवर मी किंवा माधवराव इतरांना पत्रें लिहीत असूं. आमच्या दोघांच्या पत्रव्यवहाराकरितां आम्ही निराळे नोटपेपर्स किंवा पाकिटें कधींच वापरलीं नाहींत. पुणेरी समाजानें तळूनभाजून काढलेल्या बिचाऱ्या माधवरावांची तेव्हांचीं मनःस्थिति तरी त्या प्रकारची नव्हती हें निःसंशय. ते माझ्याशीं समरस होण्याचा प्रयत्न करीत होते. मीही त्यांचे विचार समजून घेण्यांत गढून गेलें होतें. पत्रांच्या पाकिटांच्या किंवा नोटपेपर्सच्या रंगसंगतीचा विचार त्या वेळीं तरी आम्हांला दोघांनाही सुचला नाहीं. माझ्या एका मैत्रिणीनें एक दिवस माझी थट्टा केली. माझ्या टेबलावर फिकट जांभळ्या रंगाचीं पाकिटें पडलीं होतीं. ती एकदम मला म्हणाली, "गंगू, तूं एका रोमॅंटिक कवीची पत्नी कविकल्पनेप्रमाणें प्रेमाचा रंग गुलाबी असतो.

म्हणून तूं गुलाबी नोटपेपर्स व पाकिटें वापरायला पाहिजेत." माझ्या डोळ्यांत न कळत पाणी उभें राहिलें. मीं तिला एवढेंच म्हटलें, "माझी असली थट्टा तूं पुन्हा करूं नकोस." तिला बिचारीला काय कल्पना माझ्या मनाची! माझें बोलणें ऐकून व मला वाईट वाटल्याचें पाहून तिला आश्चर्यच वाटलें.

त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्यांतील गोष्ट. आम्हीं आमची नाताळची सुटी मुंबईला घालवायची असें ठरविलें होतें. मुंबईला गेल्यावर त्या सुटींत आम्हीं एक बोलपट पाहण्याचें ठरविलें. त्या वेळीं बोलपटांचा प्रसार सर्वत्र झाला नव्हता. फक्त मुंबईसच एका ठराविक चित्रपटगृहांत तो दाखविण्यांत येई; आणि इंग्रजी बोलपटच तेव्हां फक्त सुरू झाले होते. आम्ही कोणत्या बोलपटाला गेलों होतों हें आतां मला आठवत नाहीं.

त्या दिवशीं मीं पांढरा पोषाख केला होता. आणि माझ्या पायांत कॅनव्हसचे पांढरे टेनिस शूज होते. आम्ही रात्रीं नवाच्या 'शो'ला गेलों होतों. आमच्याबरोबर कोणीच नव्हतें. फक्त आम्ही दोघेंच होतों. मधल्या विश्रांतीपर्यंत आमचें समोरच्या चित्रपटाखेरीज कोठेंच लक्ष नव्हतें. माधवराव मधून मधून मला बोलपटाचें कथानक समजावून देत होते. त्या बोलपटाबद्दल मला इतकेंच आठवतें कीं, त्यांतील पात्रांचीं बोलण्याकरितां उघडलेलीं तोंडें मिटल्यावर शब्द ऐकूं येत.

मधली विश्रांतीची वेळ झाली. माधवरावांच्या मागें एक गृहस्थ बसले होते ते आमच्याकडे सारखे पाहात असल्याचा भास प्रथम मला झाला. माधवरावांचें लक्ष तिकडे नव्हतेंच! ते बोलपट पाहण्यांत तल्लीन झाले होते. परंतु मला मात्र त्या गृहस्थाचें पाहणें चमत्कारिक वाटूं लागलें. तो इतक्या कुतूहलानें व मिस्किलपणानें आमच्याकडे पाहत होता कीं, मला त्याची तीव्र जाणीव झाली व मीं माधवरावांना ही गोष्ट सांगितली. त्यांनीं एकदांच मागें वळून पाहिलें आणि पुन्हा ते बोलपट पाहूं लागले. मी मात्र बेचैन झालें; माझें लक्ष बोलपटावरून पार उडालें. बोलपट संपेपर्यंत कसाबसा वेळ काढला. बोलपट संपल्यावर आम्ही उठलों. आमच्या मागून तोही गृहस्थ निघाला व आमच्या मागें चालूं लागला. आतां मात्र माधवरावांना-

ही, हा कांहीं तरी हेतूनें आपल्या मागें येतो आहे असें कळून आलें. आम्ही मॅजेस्टिक सिनेमासमोर कुडाळ देशस्थ ब्राम्हण निवासांत शिरलों. तो गृहस्थ आम्ही त्याला दिसेनासे होईतोंवर सारखा आमच्याकडे पहात होता. हा प्रकार काय आहे हें मुंबईस असेतोंवर आम्हांला समजलेंच नाहीं.

पुण्याला परत आल्यावर आमच्या ओळखीच्या एका दुकानांत आम्ही कापड घेण्यास शिरलों व दुकानाच्या मालकांनीं माधवरावांना प्रश्नोत्तर रूपानें माहिती विचारण्यास सुरवात केली. तो संवाद असा:—

प्रश्न— दोनचार दिवसांपूर्वीं तुम्ही मुंबईला होतां काय? तुम्ही दोघें गेलां होतां कीं माधवराव, तुम्ही एकटेच गेलां होतां?

उत्तर— आम्ही दोघेंही गेलों होतों.

प्रश्न— तुम्ही दोघें कुठला तरी बोलपट पाहायला गेला होतां काय?

उत्तर— होय.

ते गृहस्थ म्हणाले, " हां आतां मला त्याचा उलगडा झाला. अहो, कालच माझ्याकडे एक गृहस्थ आले होते आणि ते मला सांगत होते कीं, " माधवरावांनीं अगदींच ताळ सोडला हो! ते तर परवां मला मुंबईला एका नर्सबरोबर आढळले!" लगेच माझ्या लक्षांत आलें कीं, हा आपल्या शुभ्र वेषानें केलेला अनर्थ दिसतो आहे.

लग्न झाल्यावर सहा महिन्यांनंतरची गोष्ट. एक दिवस टिपूर चांदणें पडलें होतें. आम्हाला फिरायला जायची लहर आली. आम्ही दोघेंही फर्ग्यूसन कॉलेजच्या मागच्या बाजूच्या एका टेकडीवर जाऊन बसलों. ह्या जागेबद्दल विशेष सांगायचें म्हणजे ह्या जागेला रविकिरण मंडळांतील सभासदांनीं 'कवि कातळ' असें नांव दिलें होतें. या कातळावर सर्व रविकिरण मंडळाचे सदस्य एकत्र जमून वादविवाद करीत. त्याच जागेवर आम्ही दोघें जाऊन बसलों.

सर्व्हंट्स ऑफ इंडियाच्या बाजूला टेकडींत एक लहानशी घळ होती. तेथें वर आकाशाकडे पाहात स्वस्थ पडून राहतां येईल अशी अरुंद व लांबट पट्टी होती. माधवराव त्या लांबट जागेंत निजले व पडल्या पडल्याच कांहीं नक्षत्रांची

माहिती मला ते सांगूं लागले. कांहीं वेळानें ते गप्प झाले व एकदम घोरूं लागले. रात्रीचे ११॥ झाले होते. मीं त्यांना १५ मिनिटांनीं उठवलें व आम्ही दोघेंही टेकडी उतरूं लागलों. ते थंडीचे दिवस होते. माझ्या अंगांत कांपरें भरलें. माधवरावांनीं आपला कोट मला घालायला दिला व मी तो घातला. त्या वेळेला डेक्कन जिमखान्यावर वस्ती इतकी वाढली नव्हती. आजूबाजूला किर्र झाडी होती. आम्ही खालीं उतरलों व सर्व्हंट्स् ऑफ इंडियाजवळ आलों. आतां रस्ता चालूं लागणार इतक्यांत आम्हांला दोन गस्त घालणाऱ्या शिपायांनीं अडवलें. त्यांनीं आम्हांला खोदखोदून आमची माहिती विचारण्यास सुरुवात केली. डेक्कन जिमखान्यावरील गरुडांच्या बंगल्यापर्यंत ते आमच्याबरोबर आले. माधवराव अगदीं शांत होते. त्यांनीं आमचें राहाण्याचें ठिकाण दाखविलें व कोल्हापूरचा पत्ताही लिहून दिला. इतकें सर्व झाल्यावर त्या शिपायांना आमच्याबद्दल आलेला संशय दूर झाला. त्या दोघांपैकीं एक म्हणाला, " साहेब, माफ करा, आम्हांला वाटलें, आपण ह्या बाईंना घेऊन पळून जात आहांत. म्हणून आम्ही इतकी चौकशी केली. आपल्याला राग येऊं देऊं नका. कारण अशा गोष्टी ह्या टेकडीच्या बाजूला पुष्कळ होतात म्हणून आम्ही आपल्याला अडवलं." ते शिपाई गेल्यावर माधवराव एक लांब सुस्कारा सोडून म्हणाले, " हें माझ्या आयुष्यांत नसतं घडलं तरच नवल होतं!"

मी जरा स्वभावानें भित्रीच. एकदां माधवरावांनीं मला धीट करायचा निश्चय केला. परंतु त्यांचा निश्चय सिद्धीस गेला नाहीं.

एकदां राजाराम कॉलेजांत अबदुल करीमखांचें गाणें होतें. त्या गाण्याला माधवराव एकटेच कॉलेजांत गेले. मला त्याचें गाणें फारसें आवडत नसल्यामुळें मी गेलें नाहीं. ते दिवस प्लेगचे होते. आमच्या आजूबाजूचे लोक कोल्हापूर सोडून बाहेरगांवीं राहावयास गेले होते. आमच्या खालीं राहाणारी देवरे मंडळीही नुकतीच परगांवीं गेली होती. राजाराम कॉलेजला दोन दिवसांनीं उन्हाळ्याची सुट्टी होणार होती. माधवरावांना " मी येत नाहीं " असें तर सांगितलें, परंतु जों जों माधवरावांची गाण्याच्या बैठकीसाठीं कॉलेजांत जाण्याची वेळ जवळ येत चालली तों तों मला भीतीनें पछाडण्यास सुरवात केली. परंतु मला एकटीला घरांत भीति वाटते असें सांगण्यांत मला कमीपणा वाटूं लागला.

माधवराव रात्रीं ९ वाजतां गाण्याला गेले. परत यायला रात्र होईल व माझी झोंपमोड होईल म्हणून त्यांनीं जातांना दाराला बाहेरून कुलूप लावून घेतलें व ते बाहेर गेले. रात्रीं मला लवकर झोंप येत नसे. मी टेबलाशीं कांहीं तरी वाचीत बसलें. दहा वाजले व अंथरुणावर येऊन निजलें. परंतु झोंप कांहीं केल्या येईना. मनांत नाना तऱ्हेची भीति वाटत होती. चोरां-पेक्षां भुतांची भीति जास्त वाटूं लागली. मी दिवा बारीक करून तोंडावरून पांघरूण घेऊन निजलें होतें. ते दिवस उन्हाळ्याचे असल्यामुळें आधींच उकडत होतें. त्यांत मी गुरफटून निजलेली. मला दरदरून घाम सुटला. व हातापायांना मुंग्या येऊं लागल्या. इतक्यांत जिन्यांत पावलें वाजूं लागलीं. खात्रीनें आतां कोणी तरी भूत आलें असावें असें मला वाटूं लागलें. दार उघडलें गेलें व टॉर्चचा उजेड माझ्या अंगावर पडला. मी घाबरलें व एकदम किंकाळी फोडून बेशुद्ध झालें. परंतु तें भूत नसून माधवरावच होते. मी एकटी होते म्हणून ते घरीं जरा लवकर आले होते. मी इतकी भ्यालें होतें कीं, ह्या वेळेस कुलूप उघडून माधवरावांच्या खेरीज कोणी येणें शक्य नाहीं इतका विचार करण्याची शक्तिही माझ्या डोक्यांत उरली नव्हती. माधवरावांना हा माझा अनुभव नवीन होता. तेही घाबरले. काय करावें हें त्यांना सुचेना. तरी त्यांनीं गार पाणी आणून माझ्या तोंडावर हबके मारण्यास सुरवात केली. मी जरा वेळानें शुद्धीवर आलें. परंतु डोळे उघडण्याचें धैर्य मला होईना. शेवटीं चांगली शुद्धीवर आल्यावर माझी मलाच अत्यंत लाज वाटूं लागली. त्यानंतर माधवराव रात्रीचे कोठें जाई-नासे झाले.

माधवरावांच्या एका चाहत्यांच्या बाबतींत एका संस्थेनें कांहीं अन्याय केला होता. त्यासंबंधीं ते प्रत्येकाजवळ सात्त्विक संतापानें बोलत. त्यापैकीं प्रत्येक श्रोत्याला त्यांची अन्यायाची चीड आकलन होत असेलच असें नाहीं. एक दिवस एका नवीन श्रोत्याला ते आपलें म्हणणें पटवीत होते. ते निघून गेल्यावर मी माधवरावांना म्हटलें, "आतां हा विषय ह्या गृहस्थांच्या जवळ काढण्याची काय आवश्यकता होती?" ते एकदम रागावले व मला म्हणाले, "दुसऱ्याला अन्याय झाल्याची जाणीव स्वतःला अन्याय झाल्याशिवाय येत नाहीं. तुला काय त्याचें? पण हें बघ, मी ह्या बाबतींत तुझें ऐकणार नाहीं. एक वेळ त्यांच्याबरोबर नरकांत

जाईन पण तुझ्याबरोबर स्वर्गांत येणार नाहीं." ह्या बोलण्यानें मलाही राग आला व मींही रागानेंच म्हटलें, "तुम्ही आजपर्यंत जे शत्रु निर्माण करून ठेवले ते ह्यामुळेंच! मी काय म्हणतें ह्याचा पश्चात्ताप तुम्हांला झाल्याशिवाय राहणार नाहीं. तुमच्या नशिबीं नरकांतच जाणें असेल तर मी तुम्हाला स्वर्ग मिळवून देण्याचा पुष्कळ प्रयत्न करूनही माझा हेतु तुमच्या गुणामुळें साध्य होणार नसेल तर कोण काय करणार? जा खुशाल नरकांत!" माधवराव वरमले व कांहींच बोलले नाहींत.

---

# व्यक्तिदर्शन : : : ६

माधवरावांना जेव्हां मीं अगदीं पहिल्यांदा पाहिलें तेव्हां ते अगदीं साध्या पोशाखांत होते. मला विशेष ठळक गोष्टी आठवतात त्या म्हणजे त्यांची काळी फरची पर्शियन कॅप व रिमलेस फ्रेमचा चष्मा. पोशाखाच्या बाबतींत सोय कशांत आहे ह्याकडे त्यांची दृष्टि विशेष असे. ते भावेस्कूलमध्यें जेव्हां शिक्षकाचें काम करीत होते तेव्हां साधें धोतर, कोट–टोपी ह्या पोशाखांतच शाळेला जात. ह्या पोशाखांत मीं त्याना सारे पंधरा दिवसच पाहिलें होतें. आमचें लग्न झाल्यावर ते सारें पंधरा दिवस डेक्कन जिमखान्यावरील भावेस्कूलमध्यें गेले. अशी साधी राहाणी ठेवण्यांतही त्यांचें एक तत्त्व होतें. ते म्हणत, "शिक्षकाची नोकरी करून सारे ८०, ९० रुपये मिळवायचे व थाट प्रोफेसराचा करायचा हें माझ्या मनाला पटत नाहीं." आम्ही कोल्हापूरला गेल्यावर माधवरावांनीं पोशाख बदलला. १९३६,३७ सालपर्यंत माधवराव फेल्ट हॅट घालीत असत. पुढें उपयुक्ततेच्या व खर्चाच्या दृष्टीनें त्यांना ती योग्य वाटली नाहीं. त्यांनीं ती वापरणें सोडून दिलें. रिमलेस फ्रेमचा चष्माही वारंवार फुटतो म्हणून त्यांनीं तो वापरणें सोडून दिलें. पुढें ते सिलेलाइडच्या फ्रेमचा चष्मा वापरूं लागले. बुटाच्या बाबतींतही तसेंच. टेनिस शू, पंप शू, फुल बूट अशा तीनचार प्रकारच्या बुटांच्या जोड्या ते प्रसंगानुसार वापरीत. परंतु नेहमीं फुल बूटच घालीत. त्यांचा तपकिरी रंगही नेहमीं ठरलेला असे. फुल बूट घालण्याचें कारण मोजे वारंवार फाटतात ते दिसूं नयेत व ते वरचेवर बदलावे लागूं नयेत हें होतें. त्यांच्या आत्याबाईंनीं त्यांना एक चांदीचें हातांतील घड्याळ दिलें होतें. तें मनगटावर नेहमीं बांधत. पुढे तें बिघडलें. मला माझ्या वडिलांनीं एक सोन्याचें घड्याळ बक्षीस दिलें होतें, तें पुढें मी जी. ए. झाल्यावर त्यांना दिलें. कारण मला आतां त्या घड्याळाचा फारसा उपयोग नव्हता. माझें घड्याळ अगदीं स्त्रियांनींच वापरण्याजोगें असतें तितकें लहान नव्हतें, साधारण मध्यम होतें. माधवराव पुढें तें घड्याळ वापरूं लागले, परंतु चांबड्याचा पट्टा फार महाग, घामानें तो वारंवार खराब होतो म्हणून ते सोन्याच्या घड्याळाला चांदीची साखळी वापरीत. मला तें आवडत नसे. ह्या बाबतींत त्यांचा माझा नेहमीं वाद होई. शेवटीं

मलाच तें बघवेना. मी एकदां घड्याळाच्या दुकानांतून चांगला मजबूत चांबड्याचा पट्टा आणला व त्यांना दिला. दरबारी पोषाखांत त्यांना दोन प्रकारचा पोषाखें निरनिराळ्या ठराविक प्रसंगाला घालावा लागे. त्यांत त्यांना तंग विजार, अचकन, साफा व पंप शू हा पोशाख फार आवडे. साफा जरी ते रोज बांधीत नसत तरी त्यांना तो सफाईनें बांधतां येत असे. अलीकडे म्हणजे सन १९३४ पासून धोतराऐवजीं ते पांढरे चोळणे वापरूं लागले होते. त्यांना ते सुटसुटीत व सोइस्कर वाटत. त्यांनीं उंची कापड मात्र आपल्या सुटांना कधीं विकत घेतलें नाहीं. ते वर्षांतून एकदां कपडे शिवीत, पण पुष्कळ शिवीत. डोळ्यांना सुंदर फ्रेमचा चष्मा लावीत पण त्यावरची धूळ किंवा डाग मात्र कित्येक वेळां तसेच राहात. कॉलेजांत जातांना बूट घालीत परंतु बुटावरची धूळ पुसण्याची आठवण त्यांना सहसा होत नसे. फेल्ट हॅट, टोपी किंवा कोट ब्रशनें साफ करणें तर त्यांना कधीं माहीतच नव्हतें.

त्यांच्या खोलींत त्यांना कोणी गेलेलें आवडत नसे. मोलकरीण सकाळीं एकदं झाडून जाई; परंतु कोणतीही वस्तु न हलवतां केर काढायचा अशी तिला सक्त ताकीद असे. तिच्या तें पथ्यावरचें होतें. वर जाळ्यांचें झुंबर झालें तरी खोलींतलें तें जाळें त्यांच्या परवानगीशिवाय निघत नसे. फोटो, तसबिरी, फ्लॉवर पॉट्स, बैठकीला शोभा आणणारें सर्व प्रकारचें सामान बैठकींत असे. परंतु तें व्यवस्थितपणें मांडलेलें नसे. मला असल्या अव्यवस्थितपणाची अतिशय चीड. पण मला जरी कितीही चीड आली तरी माझें मन मला आवरावेंच लागे. मला तें पाहाणें अगदीं असह्य झालें म्हणजे मी ते नसतांना बैठकींत जाऊन सर्व खोली झाडून ती लावावी. ते घरीं आले कीं त्यांना तेथील सर्व व्यवस्थित लावलेलें दिसलें म्हणजे ते रागानें म्हणत, " आज गृहलक्ष्मीचा फेरा माझ्या खोलींत येऊन गेलेला दिसतो आहे."

आमच्या घरीं आम्हीं फारसे नौकरचाकर कधीं ठेवले नाहींत. कोल्हापूरला असतांना फक्त वरलें सर्व काम करायला एखादी मोलकरीण असावयाची. बाकी बाजारहाट स्वतः माधवराव करीत.

त्यांना घरांतलें करण्यांत कधीं कमीपणा वाटला नाहीं. कॉलेजमधून येतांना घरचा कांहीं बाजार करावयाचा असला तर ते स्वतः जात व खरेदी केलेलें सामान स्वतः घेऊन येत.

एक दिवस कॉलेजमधून येतांना त्यांनीं मोरी धुण्याचा खराटा विकत घेतला व तो हातांत घेऊन आले. परीटघडीचा स्वच्छ सूट घातलेला, पायांत काळंभोर पंपशू, डोक्यावर फेल्ट हॅट, बगलेंत पुस्तकें व उजव्या हातांत खराटा पाहून मीं म्हटलें, "एखाद्या हमालाला हें काम सांगायचें होतें." ते हंसले व म्हणाले, "मला घरचें काम करायला अशा पोशाखांतही लाज वाटत नाहीं."

वास्तविक आम्हीं एकदोन गडी माणसें ठेवलीं असतीं तर आम्हाला ऐपत नव्हती असें नाहीं. माधवरावांची अवांतर मिळकत पगाराइतकीच होती. परंतु जरुरीपेक्षां जास्त खर्च आम्हीं कधीं केला नाहीं. ह्या आमच्या राहाणीला कोल्हापुरांत हंसणारीं माणसें कांहीं थोडीं नव्हतीं ! बऱ्याच जणांनीं आमची गणना चिक्कू माणसांत केली होती.

माधवराव जरी काटकसरी होते तरी ज्या गोष्टींची आवश्यकता असे त्या वस्तु घेण्यांत त्यांनीं कधीं काटकसर केली नाहीं. औषधपाणी, खाणेंपिणें व व्यवस्थित कपडेलत्ते ह्या बाबतींत त्यांनीं आम्हाला कधीं कमी केलें नाहीं. परंतु सिनेमा-नाटकें आम्हीं क्वचित पाहात असूं. प्रसिद्ध चित्रपट व नाटकें मात्र आम्हीं पाहिलीं. मी बरोबर असलें म्हणजे त्यांनीं कधींच खालचें तिकीट काढलें नाहीं. पण वायफळ खर्चही कधीं केला नाहीं. ते मला ह्या बाबतींत नेहमीं प्रो. वा. ब. पटवर्धनांचें उदाहरण देत असत. ते म्हणत "वासुदेवरावांची विटकी पगडी पाहून लोक त्यांना हंसत, परंतु त्यांनीं आपल्या मागें आपल्या कुटुंबांतील मंडळींची उत्तम सोय केली होती."

माधवरावांना आंग्ल पद्धतीच्या पोशाखाची फार आवड; तो अत्यंत व्यवस्थित असे, परंतु तो फारसा उंची कापडाचा कधींच नसे. लोकरीचा सूट तर त्यांनीं आपल्या ४५ वर्षांच्या आयुष्यांत एकदांच व तोही माझी इच्छा म्हणून अलीकडे जळगांव संमेलनापूर्वीं शिवला.

खर्चाच्या बाबतींत त्यांचा माझा नेहमीं खटका उडे. वास्तविक मी सुद्धा फाजील खर्च असा करीत नसे. केव्हां तरी त्यांना न पटणारा असा कांहीं खर्च करायला सांगितला तर ते माझ्याकरितां करीत. त्या वेळीं ते कांहीं बोलत नसत, परंतु मागाहून मला एखादें तरी व्याख्यान ऐकावें लागे.

अशाच एका प्रसंगीं त्यांनीं मला कोल्हापूरहून एक पत्र लिहिलें. त्यांतील उतारा खालीं देत आहें—

" तुझें पत्र आलें नि ताबडतोब दहा रुपयांची मनिऑर्डर केली. त्यांतच मीं थोडा मजकूर लिहिलेला आहे, पण संक्षेपामुळें तुला कदाचित् नीट समजणार नाहीं आणि वाईट वाटेल म्हणून विस्तारानें पत्र लिहीत आहें. तुला वाटतें कीं, पैसे थोडे खर्च कर म्हणून मी तुझ्या मागें निकड लावतों आणि मग हें कसें करावें याची तुला समजूत झाली नाहीं कीं "तें तुमचें तुम्हीच पाहा" म्हणून तूं माझ्यावर टोलवूं बघतेस म्हणजे काय, मीं आज्ञा केली कीं, तूं त्याप्रमाणें वागायला सिद्ध आहेस, पण आपण होऊन त्यांतील युक्तता पाहून त्याप्रमाणें वागणें तुला साधत नाहीं. तुला वाटतें कीं, बरे दिवस आले आहेत तेव्हां थोडी चैन करावी. मुलें नसतीं आणि आपल्याही पडत्या काळांत कोणाच्या तोंडाकडे न पाहातां मीठ–भाकरी अविच्छिन्नपणें मिळण्याइतकी आपली स्थिति असती तर तुझें म्हणणें मला पटलें असतें. तशी स्थिति नाहीं, अशी माझी मनोदेवता मला स्पष्ट सांगते. भविष्य काळाविषयीं निश्चिंत राहतां आलें असतें तर बरें झालें असतें; परंतु आपली खरी स्थिति काय आहे याची तुला जाणीव होऊं नये याचें मला आश्चर्य वाटतें. भविष्य काळ उज्ज्वलच आहे अशी आज निश्चिती कोण देईल? तो वाईट आहे असें धरून चालल्यास आणि त्याची काळजी आज वाहिल्यास पुढें निश्चिंत राहातां येईल. हा लाभ कांहीं थोडा नाहीं हें विसरूं नकोस. मला माहीत आहे कीं, हें पत्र वाचून तुला अत्यंत वाईट वाटेल, आणि म्हणूनच तुला कांहीं बाबतींत उपदेश करणें माझ्या अत्यंत जिवावर येतें; परंतु कांहीं गोष्टींत तो करणें मला भाग पडतें.

वर्षांचे १०० रु. यायला दोन सहस्र रुपये नीट गुंतवले पाहिजेत. व्याजाचा योग्य दर म्हणजे ज्यांत भाण्डवलाला मुळींच धोका नाहीं असा ३॥% ४% आहे. त्याप्रमाणें वर्षाला १०० रुपयाला अडीच सहस्र रुपये पाहिजेत. ते जेव्हां ५००० होतील तेव्हां वर्षाला २०० रु. येतील म्हणजे दरमहा ३०–३५ रुपये अविच्छिन्न उत्पन्न यायला भाण्डवल १०,००० रुपये पाहिजे. तर भाण्डवल न खातां व्याजांत कसे बसे दिवस काढतां येतील. इतकी सुस्थिति सध्याच्या घटकेला आहे असें मला वाटत नाहीं. अशा स्थितींत आपण कसें राहायला पाहिजे ह्याचा तूंच विचार कर. निराशही

होतां कामा नये आणि मद्यप्याप्रमाणें निश्चिंतही होतां कामा नये. दूरवर पुढें पाहून पाऊल टाकण्यांतच मनुष्याचें शहाणपण आहे. तुला स्वतःला विचार करायला शिकलें पाहिजे."

आज हें पत्र वाचलें कीं मला असें वाटतें कीं, भविष्यकाळ मला कसा घालवावा लागेल हा धडाच मीं आपल्या सुखाच्या काळांत गिरवला;

कित्येक वेळीं मुलांना कापड किंवा मला स्वतःला लुगडीं घ्यायचीं असलीं कीं मीच दुकानांत जात असें. जातांना साधारण किती पैसे खर्च केले असतां चालतील हें विचारून जाण्याचा माझा परिपाठ असे. ते मला म्हणत, " पगार आला कीं मी तुझ्या स्वाधीन करतों. मग त्यांत बाकीचा खर्च बसव व तुला जशीं आणावीशीं वाटतील तशीं आण." परंतु मीं स्वतः लुगडीं विकत घ्यायला गेलें कीं त्यांत फारसे पैसे खर्च करीत नसे. आमचें दुकान ठराविक होतें. माधवरावांना मीं आणलेलें कापड किंवा लुगडीं पसंत पडलीं नाहींत तर ते स्वतः जात आणि मीं आणलीं असतील त्याच्या-पेक्षां कितीतरी जास्त पैसे खर्च करून ते स्वतः आपल्या पसंतीनें लुगडीं किंवा कापड घेत.

शेवटीं ते सहा महिने आजारी होते. त्यांनीं तीन महिन्यांची रजा घेतली, परंतु आम्हांला पैशाची काळजी कधीं करावी लागली नाहीं. या आजारांतच पुढें ते वारले. त्यांच्या मागें त्यांच्या दहा दिवसांत हल-ण्याचीही शक्ति माझ्यांत उरली नव्हती; मी स्वस्थ अंथरुणावर पडून होतें. परंतु मला आतां माझें पुढें कसें होईल अशी चिंता कधींच वाटली नाहीं. त्यांच्या मागें आम्हाला पैचेंही कर्ज नव्हतें. दुसऱ्याच्या जबा-बदारीवरचें सुखाचें आयुष्य आतां आपलें संपलें, ह्याची मला पूर्ण जाणीव होती. कोठेंतरी नौकरी करावी लागणार हें तर मला स्पष्टच दिसत होतें. परंतु एखादें वर्षभर मी नौकरी केली नसती तरी माझे दिवस पूर्वीप्रमाणेंच निश्चिंत-पणें गेले असते ह्याची मला खात्री होती.

ते हिशेबांत इतके चोख असत कीं, महिन्याच्या आंत कोणतीही गोष्ट पुन्हा विकत आणावयास सांगणें त्यांना आवडत नसे. यासंबंधीं मला एक प्रसंग आठवतो. आमची सुधा महिन्याची असेल. महिना संपत आला होता. तेव्हां आमच्या घरांत स्वयंपाकीण होती. तिनें मला तूप संपल्याचें सांगितलें.

त्याच सुमारास अंगाला लावण्याचा साबणही संपला होता. सुधाला न्हायला घालायला सुईण येत असे. परंतु सुधाला पाणी मीच घालीत असे. तेव्हा साबण संपल्याची गोष्ट माझ्या ध्यानांत चांगली राहिली. परंतु तूप संपल्याची गोष्ट मात्र मी विसरून गेलें. तेव्हां साहजिकच साबण संपल्याची गोष्ट मीं माधवरावांच्या कानावर आधीं घातली, पण तूप संपल्याची गोष्ट सांगायची राहून गेली. ती मीं पुन्हा दुसरे दिवशीं सांगितली. माधवराव माझ्यावर रागावले, साबण तर मला त्यांनीं त्याच दिवशीं आणून दिला, पण तूप मात्र घरांत आलें नाहीं. ते मला म्हणाले, "असा कसा तुला विसर पडला? तुला ज्या गोष्टीची अधिक आवश्यकता आहे ती गोष्ट तूं पार विसरलीस कशी? आणि साबणाची आठवण तुला चांगली राहिली. आतां ह्याला एकच उपाय, मी आठ दिवस तूप खाणार नाहीं. त्या तुपाची सध्यांच्या परिस्थितींत तुला जास्त गरज आहे. जें शिल्लक तूप राहिलें आहे तें तूं एकटीनेंच खाल्लें पाहिजे; आणि हीच तुला शिक्षा." मी निरुत्तर झालें.

जेवायला आम्ही नेहमीं बरोबर बसत असूं. ह्या गोष्टीनंतर मामींना-स्वयंपाकीणबाईंना-माझ्याच पानांत तूप वाढण्याचा हुकूम सुटला. नाहीं म्हणण्याचें धैर्य त्या वेळीं तरी मला झालें नाहीं. मला तूप कालवलेला भात गिळत नसे. मी वरचें तूप खाऊन टाकीत असे आणि मग जेवायला सुरुवात करीत असे. पुढें पुढें त्या आठ दिवसांत हेंही करणें मला असह्य झालें. जेवायला बसलें कीं माझ्या डोळ्यांत पाणी उभें राही. तशी मीही अभिमानी होतें. मला हें सर्व स्वयंपाकीणबाईंच्या पुढें झालेलें आवडलें नाहीं. डोळ्यांतलें पाणीही आवरणें शक्य नसे. मी हट्टानें जेवायचें सोडलें. शेवटीं माधवरावांना आपला नियम मोडणें भाग पडलें.

माधवरावांनीं घर बांधायचें ठरवलें; नव्हे ती त्यांची एक महत्त्वाकांक्षा होती. त्या वेळीं आमच्याजवळ घर बांधण्याइतके पैसे शिल्लक नव्हते. लोकांना असें वाटे कीं, ह्यांच्याजवळ पुष्कळ पैसा आहे; म्हणूनच हे बंगला बांधीत आहेत; परंतु ज्या दिवशीं बंगला बांधायचा निश्चय माधवरावांनीं केला त्या दिवशींच त्यांनीं आपल्या मिळकतींतले निम्मे पैसे घरावर खर्च करायचे ठरवलें; व तो निश्चय त्यांनीं शेवटास नेला. बंगल्याला १२००० रु. खर्च आला, परंतु माधवरावांनीं तितकाही खर्च केला. परंतु आम्हाला एका पैचेंही कर्ज झालें नाहीं.

तेव्हां मला घरखर्चाला १०० रु. मिळत व तेवढ्यांत सर्व खर्च बसलाच पाहिजे अशी मला आज्ञा होती.

माधवराव घरगुती खर्चाच्या बाबतींत जसे व्यवस्थित व काटकसरी होते तसे ते इतर बाबतींत उदारही होते. त्यांनीं अनेक संस्थांना देणग्या दिल्या होत्या गरिबांची दया त्यांना फार येई. अनेक गरीब विद्यार्थ्यांनाही त्यांनीं प्रसंगीं मदत केली आहे. पुण्याला किंवा कोल्हापूरला असतांना कोणी गरीब विद्यार्थी आमचेकडे आला तर तो विन्मुख कधीं गेला नाहीं.

राजाराम कॉलेजमध्यें असतांना एक गरीब विद्यार्थी आमच्या घराचा शोध काढीत आमच्या घरीं आला. एक-दोन दिवस त्याला जेवायला मिळालें नव्हतें. त्याच्या अंगावर धड कपडे नव्हते. अशा स्थितींत त्याला पाहिल्यावर माधवरावांना त्याची दया आली. त्यांनीं त्याला एक दिवस ठेवून घेतलें. पुढें त्याची व्यवस्था कोठें परगांवीं लावून दिली. जातांना त्याला आपले कपडे दिले. वाटखर्चाला पैसे दिले. गरीब विद्यार्थ्यांना ते नेहमीं मदत करीत. परंतु दारावर आलेल्या भिकाऱ्यांना मात्र कधींही दिडकी मिळाली नाहीं; परंतु एखादा भिकारी जर पंगू असला तर त्याच्या वाडग्यांत वेळीं आठ आणे, रुपाया सुद्धां ते टाकीत असत.

एकदां आमच्या नित्याच्या परिपाठाप्रमाणें आम्ही फिरायला जात होतों. त्या दिवशीं आम्ही आयर्विन म्यूझियमकडे जाण्याचें ठरवलें होतें. वाटेंत शिवाजी पुलावर एक आंधळी भिकारीण बसली होती. तिला दिसत नसल्यामुळें चांचपडत, खुरडत ती पलीकडच्या बाजूला चालली होती. इतक्यांत समोरून एक भरधांव मोटार निघून गेली. माधवरावांनीं तें पाहिलें व ते लगेच थांबले. म्हातारीच्या जवळ एक काठी होती. त्या काठीचें एक टोंक तिला धरायला सांगून दुसरें त्यांनीं आपण धरलें व अशा रीतीनें त्यांनीं तिला पलीकडल्या बाजूला नेऊन बसविलें व तिच्या वाडग्यांत आठ आणे टाकले. मी दूर उभी राहून हें सर्व पाहात होतें. मागें निराळ्या संदर्भानें उल्लेख केलेल्या सुनीतांत माधवरावांचेंच व्यक्तित्व प्रगट झालें आहे. तें सर्व सुनीत येथें देत आहें.

*हा रस्त्यांत दिसे न तों पटपटां सम्भाषणें थांबती*
*दृष्टी यावर रोखिली प्रकटवी साशङ्क कौतूहल,*

याची पाठ फिरे न तोंच उसळे हेटाळणीचें हंसें,
मागूनी विषदिग्ध शब्द सुटती काळीज भेदावया
" याच्या निर्भय चारुगौर वदनीं शोभे विषादच्छटा
" जाई सिन्धुतटीं दुरी कधिं बसे निवृक्ष मोकावरी
आशुक्रास्त पहात उन्च गगनीं नक्षत्र दीपोत्सव
किंवा नागरदीप हे विखुरले झाडींतुनी काजवे "
याला मीपण एकदां बघितलें, रस्ता पुसे आन्धळा,
पैसा देउनि त्यास हात धरुनी वाटेवरी लाविलें
" बाळाचें वहुवेड यास, तिकडे वाडींतलीं त्या मुलें
याला फारच चाहतात, गमते दे नित्य खाऊ तयां "
" वाटे पण्डित वा कुणास भटक्या वा प्रेम मानी, कवी ! "
हा श्रीमंत नसे, कशी अधनता ही जीवनीं वीखवी !

हें सुनीत वाचलें कीं माधवरावांची मूर्ति डोळ्यापुढें उभी राहते. ह्या सुनीतांतील सर्व वर्णन माधवरावांना स्वतःलाच लागू आहे, म्हणून मी मुद्दाम सर्वच्या सर्वच ते येथें उद्धृत केलें आहे. अधोरेखित ओळी मात्र वरील प्रसंगाला उद्देशून आहेत.

त्या भिकारणीला पलीकडे नेऊन त्यांनीं बसविलें तेव्हां मला जरा चमत्कारिक वाटलें. मीं त्यांना म्हटलें, " विचित्र आहांत, लोक हें पाहून काय म्हणतील ?

त्यावर ते म्हणाले कीं, " मला एखाद्याबद्दल अंतःकरणापासून दया आली म्हणजे लोक मला काय म्हणतील ह्याचा विचार मी कधीं करीत नाहीं."

माधवरावांना कोल्हापूरच्या नौकरींत कधीं समाधान वाटलें नाहीं. मनःस्वास्थ्य त्यांनां तेथें अनेक कारणांनीं लाभलें नाहीं. त्याकरितां व स्वतःच्या लेखनाला वेळ मिळावा म्हणून पैशाचें नुकसान पत्करूनही दुसरीकडे कोठें नौकरी मिळल्यास बरें असें त्यांना सारखें वाटे. १९३५ सालीं सौ. इरावतीबाई

कर्वे त्यांना प्रत्यक्ष भेटल्या व त्यांनीं त्यांच्याजवळ अशी इच्छा प्रगट केली कीं, "तुम्ही S. N. D. T. विद्यापीठांत पुण्याला मराठीचे प्राध्यापक म्हणून यावें असें आमच्यांतील कांहीं मंडळींना वाटतें." अनेक दृष्टींनीं विचार करतां कोल्हापूर सोडून पुण्याला जावें असें आम्हांलाही वाटलें. ना. दा. ठाकरसी विद्यापीठाच्या सिंडिकेटनें माधवरावांना मराठीचे प्राध्यापक म्हणून घ्यावयाचें ठरवलें. त्याप्रमाणें नौकरीवर रुजू होण्याचा हुकूमही आला. परंतु कांहीं कारणामुळें माधवरावांनीं तेथें जाण्याचा बेत ऐन वेळीं रहित केला. स्वतः डॉ. बाळकृष्ण त्यांना सोडायला तयार नव्हते. माधवरावांनीं आपला जाण्याचा बेत रहित केला हें ऐकून डॉ. बाळकृष्णांना बरें वाटलें व आम्हालाही आम्ही कोल्हापूर सोडलें नाहीं हें एक प्रकारें बरें झालें असें वाटलें.

माधवरावांना कधींही कोणाची खुशामत करणें आवडलें नाहीं. कोल्हापूरला असतांना जवळजवळ तीनचार वर्षें ते फारसीचे लेक्चरर होते; ही गोष्ट त्यांना अत्यंत मानहानीकारक वाटत होती. त्यांनीं जर दि. ब. लठ्ठे यांच्याजवळ शब्द टाकला असता तरी त्यांना बढती मिळाली असती व ते तत्काळ प्रोफेसरही झाले असते. परंतु ते नहमीं म्हणत कीं, "माझी व लठ्ठे यांची जरी ओळख असली तरी त्याचा असा फायदा मी कधींही घेणार नाहीं. ज्या दिवशीं प्रि. डॉ. बाळकृष्णांना वाटेल त्या दिवशीं कदाचित् मी प्रोफेसर होईनही आणि समजा नाहींच झालों तरी आतां मी त्या बाबतींत उदासीन झालों आहें."

आम्ही अकरा वर्षें कोल्हापूरला होतों, परंतु आम्ही कधींही चुकून राजवाड्यावर गेलों नाहीं. सध्यांचे देवासचे महाराज (थोरली पाती) विक्रमसिंह राजे तेव्हां कोल्हापूरला राजाराम कॉलेजमध्यें शिकत होते; माधवरावांच्याविषयीं त्यांच्या मनांत फार आदर होता. आम्ही फिरायला जात असूं तेव्हां देवासमहाराजांची गांठ पुष्कळ वेळां पडत असे. महाराज घोड्यावर असले किंवा मोटारींत असले तरी ते हटकून खालीं उतरून माधवरावांना नमस्कार करीत. स. १९३५ सालीं इंदूर साहित्य-संमेलनाला आम्ही गेलों होतों. देवास महाराजांनीं देवासहून मोटार पाठवून माधवरावांना देवासला नेलें तेथें त्यांनीं माधवरावांना मोठ्या थाटाची मेजवानी दिली.

ह्याही ओळखीचा फायदा करून घेऊन वाड्यावर शिरकाव करून घ्यायचा माधवरावांनीं प्रयत्न केला असता तर ही गोष्ट सहज झाली असती. परंतु माधवराव अभिमानी होते. त्यांना असें करणें अत्यंत कमीपणाचें वाटे. इतकेंच नव्हे तर एकदां वाड्यावरून बोलावणें आलें असतां वाड्यावर जाण्याचें त्यांनीं टाळलें.

श्रीमंत क्षात्रजगद्गुरु त्यांना आपले गुरु म्हणून मान देत असत. माधवराव फर्ग्युसन कॉलेजमध्यें प्रोफेसर असतांना श्रीमंत क्षात्रजगद्गुरु बहुधा माधवरावांचे विद्यार्थी असावेत. त्यांनीं स्वतः माधवरावांना आपल्या बंगल्यावर पुष्कळ वेळां बोलावलें होतें. त्यांचे अनेक विषयांवर वादविवादही होत. परंतु ह्याही ओळखीचा फायदा कै. श्रीमंत राजाराममहाराजांची ओळख करून घेण्यांत त्यांनीं घेतला नाहीं.

सन १९३७ सालीं बडोद्याहून त्यांचे मित्र श्री. रा. शिंदे यांची एक दिवस तार आली कीं, "श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज तुम्हांला तातडीनें भेटूं इच्छितात." माधवरावांनीं बडोद्याला जाण्याची तयारी केली; लगेच दुसरी तार आली कीं, "आपण बडोद्याला न येतां मुंबईला यावें. माधवराव मुंबईला महाराजांना भेटायला गेले. महाराजांची व माधवरावांची एक तासभर मुलाखत झाली. त्या दिवशीं जेवायलाही त्यांना निमंत्रण होतें. महाराजांची माधवरावांनीं खाजगी कारभारी ( Household Officer ) म्हणून बडोद्याला यावें अशी फार इच्छा होती. परंतु माधवराव त्या गोष्टीला कबूल झाले नाहींत. त्यांच्यासारख्या स्वभावाच्या माणसाला अशा पेशाची नोकरी मानवली नसती. केवळ मोठ्या पगाराचा व मानाचा मोह त्यांनीं स्वतःला होऊं दिला नाहीं.

त्याच मुलाखतींत महाराजांनीं विचारलें, "तुमची व राजाराम महाराजांची ओळख आहे का?" माधवरावांनीं नाहीं म्हणून सांगितलें. महाराजांना आश्चर्य वाटलें. पुढें ते म्हणाले, "तसा जर प्रसंग आला तर मी स्वतःच तुमची व महाराजांची ओळख करून देईन."

पण हें संभाषण जेथल्या तेथेंच राहिलें. थोडेच दिवसांनीं महाराज आजारी झाले व ती भेट शेवटचीच ठरली.

श्रीमंत राजेसाहेब व राणीसाहेब फलटण यांचा व माधवरावांचा पुष्कळ परिचय होता.

औंधचे राजेसाहेब हेहि माधवरावांना फार मानीत असत.

एकदां मराठी भाषेच्या शुद्धीकरणावर औंधला माधवरावांचें व्याख्यान झालें होतें. त्याचा परिणाम श्रीमंतांच्यावरही झाला. तेव्हांपासून कागदोपत्रीं ते इंग्रजींत सही न करतां मराठींत करूं लागले. श्रीमंत विशाळगडकरांचीही त्यांच्याशीं तितकीच ओळख होती. ह्या सर्व मोठ्या लोकांनीं माधवरावांना सन्मानानें वागवलें. बडोदेसरकार कै. श्रीमंत सयाजीरावमहाराजांनीं ज्या पांच विद्वान् पंडितांचा बहुमान मुद्दाम बडोद्याला केला त्यांत माधवराव हे एक होते. श्रीमंत राजेसाहेब फलटण ह्यांनींही माधवरावांना डॉक्टरेटची पदवी मिळाली तेव्हां त्यांचा बहुमान केला.

माधवराव अत्यंत अभिमानी होते ह्यासंबंधाची एक गोष्ट मला आठवते.

एकदां कॉलेजच्या सूचनाफलकावर एक सूचना लावली होती. त्यांत माधवरावांच्या मागचीं 'प्रो.' हीं अक्षरें मुद्दाम खोडून तेथें 'मिस्टर' लिहिलें होतें. तें माधवरावांनीं पाहिलें. त्यांना अत्यंत वाईट वाटलें. तेव्हांच त्यांनीं निश्चय केला कीं, ज्यांनीं 'प्रो.' खोडून 'मिस्टर' केलें त्यांनाच मी डी. लिट्.ची पदवी मिळवून नाइलाजानें का होईना परंतु 'डॉक्टर पटवर्धन' असें लिहायला भाग पाडीन.

पण ह्या प्रसंगानंतर ते लवकरच प्रोफेसर झाले.

माधवराव सेकंड क्लास ऑफिसर समजले जात. तेव्हां त्यांना नाइलाजानें एखाद्या तरी दरबारला हजर राहावें लागे. दरबारला जाणें त्यांच्या अत्यंत जिवावर येई. कित्येकदां तो प्रसंग टाळण्याकरतां दरबारच्या आदल्या दिवशींच माधवराव सांगलीला निघून जात. परंतु वर्षांतून एखाद्या तरी दरबारला हजर राहाणें अवश्य असे. असा प्रसंग ज्या दिवशीं येई, त्या दिवशीं दरबारचा ठराविक पोशाख करण्याच्या अगोदर दाराशीं टांगा येऊन उभा राही; कारण दरबारचा मराठेशाही पोशाख त्यांना कधीं आवडत नसे. तो एकदां चढवला कीं, ते कोणाकडेही न बघतां भरभर जिना

उतरून टांग्यांत जाऊन बसत, व घरीं आल्यावर तडक खोलींत जाऊन जेव्हां तो सर्व पोशाख ते उतरीत तेव्हां त्यांना हायसें होई. पुढें जेव्हां त्यांना ह्या गोष्टीची संवय झाली तेव्हां ते त्या पोषाखांत कांहीं समारंभांस मुद्दाम राहूं लागले त्याला कारणही असे. एकदां पंतअमात्य बावडेकरांना अधिकार देण्याचा दरबार जुन्या राजवाड्याच्या चौकांत होता. त्या प्रसंगीं केवळ मुखत्यारीचा समारंभ पाहाण्याकरतां ते मुद्दाम गेले होते. कारण त्यांना जुन्या ऐतिहासिक खानदानीपणाची आवडही तितकीच असे; आणि म्हणूनच असे प्रसंग त्यांना पाहावेसें पुढें पुढें वाटूं लागलें.

मला असें आठवतें कीं, एकदां राजाराममहाराजांच्या वाढदिवसानिमित्त 'संशय कल्लोळ' व 'मानापमान' हीं नाटकें झालीं होतीं. त्याकरितां ते मुद्दाम गेले होते. कारण नटवर्य माधवराव जोशी हे 'आश्विनशेट'च्या व धैर्यधराच्या भूमिकेंत काम करणार होते. त्या दिवशीं ते खेळ खास ऑफिसर्स व महाराज यांच्याकारितां होते. म्हणून माधवराव दुसऱ्या नंबरचा पोशाख म्हणज अलवारी कोट व फेटा घालून त्या नाटकांना हजर राहिल होते. आणि विशेषतः हीं दोन्हीं नाटकें व त्यांबरोबर 'स्थानिक स्वराज्य' हें नाटक त्यांना फार आवडत. वरील तिन्ही नाटकें त्यांनीं तीनचार वेळां तरी पाहिलीं होतीं.

माधवराव जसें बरोबरच्या मंडळींत मिसळत तसे ते आपल्याहून वयानें पुष्कळ वडील असलेल्या मंडळींतही मिसळूं शकत. त्यांतील प्रमुख, सांगलीचे दिवाणसाहेब कै. रा. ब. गो. रा. बर्वे व दादासाहेब करंदीकर. १९२८ सालीं माधवराव कोल्हापूरला असतांना त्यांची व दादासाहेब करंदीकरांची ओळख झाली. त्याच्या आधीं म्हणजे १९२८ च्या फेब्रुवारी महिन्यांत माधवरावांचें 'सुधारक' काव्य प्रसिद्ध झालें होतें. तें प्रो. व्हो. जी. परांजपे यांनीं दादासाहेबांच्याकडे पाठविलें होतें. सुधारक काव्य दादासाहेबांना फार आवडलें. त्याच सालीं डॉ. बाळकृष्ण यांच्याबरोबर माधवराव सातारला गेले होते. तेव्हां पुस्तकामुळें झालेला परिचय अधिक वाढला. त्याच मुक्कामांत माधवराव थोडे आजारी झाले. दादासाहेबांनीं स्वतः जातीनें माधवरावांची शुश्रूषा केली. स्वतः डॉ. बाळकृष्ण मराठ्यांच्या इतिहासासंबंधीं कांहीं चौकशी करण्याकरितां साताराला गेले होते; त्याच कामाकरितां माधवराव डॉ. बाळकृष्णांच्या बरोबर गेले होते.

त्या मुक्कामांत माधवरावांनीं, मराठयांचा इतिहास ह्या विषयावरील चर्चेंतही डॉ. बाळकृष्ण व दादासाहेब यांच्या समवेत भाग घेतला होता. माधवरावांचा त्या विषयांतील व्यासंग व ज्ञान पाहून दादासाहेबांना आश्चर्य वाटलें आणि साहजिकच त्यांचा माधवरावांच्या विषयींचा आदरही वाढला. त्यानंतर माधवरावांची व त्यांची १९३५ सालीं राजाराम कॉलेजमध्यें भेट झाली. त्या दिवशीं राजाराम कॉलेज म्यूझिक सर्कलतर्फे वझेबुवांचें गाणें होतें. त्या गाण्याला माधवरावही गेले होते. निरनिराळ्या रागांवरून गोष्टी निघतां निघतां दादासाहेबांच्या बरोबर माधवरावांनीं तालबद्ध छंदावरही चर्चा केली.

हळूहळू माधवराव व दादासाहेब यांची ओळख ह्या व इतर अनेक कारणांनीं वाढत गेली. माधवरावांची करंदीकर यांच्या घरांतील स्त्री व पुरुष मंडळींशीं तितकीच ओळख झाली; दादासाहेब वारल्यावरही, माधवराव त्या घरांत आपलेपणानें वावरूं लागले. बॅ. विठ्ठलराव करंदीकर व माधवराव यांच्या ओळखीचें स्नेहांत रूपांतर झालें.

दादासाहेबांनीं माधवरावांच्या सुधारकांतील वृत्तबद्ध रचनेप्रमाणें खालील ओळी रचल्या.

*पारखूनि घ्या मिलर तुकोजी।*
*कुर्तकोटिचा प्रसन्न हो, जी॥*
*अरुंडेल अन् भाटे शिक्षक।*
*खान पाणंदीकर संरक्षक॥*

*लंदनवासी विद्यार्थी जन।*
*आंग्ल युवतिचें करोत रंजन॥*
*भ्रष्ट धर्म अपवाद कशाला।*
*शुद्धिकरण जरि असें उशाला॥*

*श्री. कोहनचा व्रात्य स्तोमही ।*
*अडकाठी कां ज्ञाती वामही ।*

*ग्रंथ दिसे बंधना पलिकडे ।*
*भासवि संस्कृतिचे हें तुकडे—।*

दादासाहेबांना साहित्यक्षेत्रांतील अनेक व्यक्तींप्रमाणें आणखी दोन व्यक्तींबद्दल मोठा आदर व कौतुक होतें. एक डॉ. केतकर व दुसरे माधवराव पटवर्धन.

माधवरावांना अलीकडे असें वाटूं लागलें होतें कीं, आपण कांहीं कामांत दुसऱ्यावर फार अवलंबून राहातों; हें असें होतां कामा नये. म्हणून मी पुण्याला किंवा कोठें दुसऱ्या गांवाला असलें म्हणजे त्यांचें काम ते स्वतःच करण्याचा प्रयत्न करीत. कित्येक वेळीं ते हातानेंच स्वयंपाक करीत, परंतु त्या स्वयपाकाकडे त्यांचें कधीं लक्ष नसे. त्यांना खाण्याच्या बाबतींत आवडनिवड फारशी नसल्यामुळें मी नसलें कीं ते ठराविक दोन पदार्थ करीत. ते म्हणजे खिचडी व भाजी. हा स्वयंपाक फक्त ते रोज सकाळीं करीत; खिचडीचे दोन रंग ठरलेले असत. खिचडींत किंवा भाजींत हळद घातल्यावर ती ढवळण्याची आठवण त्यांना राहात नसे आणि मग वरची खिचडी पिवळी जर्द व खालची पांढरी शुभ्र व्हायची. तरी ती ते मुकाट्यानें खात. मी असतांना असा प्रकार झाला म्हणजे मी म्हणत असें, "हें काय! अशी काय ही खिचडी केलीत?" म्हणजे ते म्हणत, "मला उगीच बोलूं नकोस. मीं पुलावा केला आहे!"

एकदां असेंच त्यांचें लक्ष नसल्यामुळें कसा विचित्र प्रकार घडला होता ह्याचें तेच स्वतः मोठें रसभरीत वर्णन करीत.

फर्ग्यूसन कॉलेजमध्यें असतांना कांहीं दिवस ते चितळेवाडींत राहात असत. तेथेंही ते एकटेच असल्यामुळें कित्येक दिवस हातानें स्वयंपाक करीत. स्वयंपाक ठरलेलाच असे. एक दिवस नित्यक्रमाप्रमाणें सर्व भोंवतालची तयारी करून पानांत खिचडी वाढून घेण्याकरितां पातेल्यांतल्या खिचडींत

उलथनें घालून तें वर काढलें तर त्या उलथन्याला मोठा थोरला शिजून फुगलेला विंचू अडकलेला !!

अशाच आपल्या स्वतःच्या नित्यक्रमाचें वर्णन त्यांनीं मला एका पत्रांत लिहिलें आहे.

" आतां माझा सारा बस येथें बसला आहे. मी सकाळीं निजून उटल्या-वर चहा घेतों. नंतर ९ वाजतां लिंबाचा रस घेतों. कागदी लिंबें मिळतील तितके दिवस घेईन म्हणतों. नंतर वाफेनें भात, भाजी वा खिचडी (तुरीच्या डाळीची) शिजायला लावून देतों. एक उभट डबा मीं विकत आणला आहे. आणि तसाच एक दोन भांडयांचा फराळाचा डबाही विकत आणला आहे. आणि एक कामचलाऊ कुकर बनवून दिला आहे. अन्न शिजलें कीं भाजीला तूप-जिऱ्याची फोडणी घालतों. तेल मी आणणारच नाहीं आणि घरांत जिरें आहे तें सम्पलें कीं मोहऱ्या सम्पवून टाकीन. शेगडी पेटलेली असतेच. तिच्यावर एक जाडीशी भाकरी भाजून घेतों, आणि तिला तूप लावून ती ठेवून देतों. सकाळीं १०–१०॥ वाजतां मी भात–भाजी वा खिचडी–भाजीच खातों. दुपारीं कॉलेजांत चहा होतोच. मग मी घरीं चहा करीतच नाहीं. पांच वाजतां ती भाकरी आणि उरलेली भाजी खाऊन क्वेकर ओट्सची एक कप-भर दाट खीर खातों. रात्रीं निजायला जाण्यापूर्वी भूक असेल त्या मानानें नुसतें दूध व दुधांतून ओव्हल्टीन घेतों. व्यवस्था उत्तम लागली आहे. तूं माझी काळजी करशील व स्वतःला उत्तम वाऱ्या पाण्याचें सुख लावून घेणार नाहींस म्हणून हें सर्व तुला सविस्तर लिहीत आहें.

आतां मी माझ्या काव्यावरील भाग लिहायला घेतला आहे. टांचण लिहून झालेंही आहे; पण आतां त्या विषयावरील एकूण एक इंग्रजी ग्रंथ वाचून त्याला परिपूर्णता आणण्याचें, व भर घालीत राहावयाचें हेंच काम किचकट आहे.

टॉड् वाचतेस का ? त्यानें जें लिहिलें आहे त्याचें मनन कर. माझ्या साऱ्या यशाचें श्रेय टॉडला आहे. लीला, तुला कल्पना नाहीं, पूर्वी मी कसा विचित्र होतों त्याची. टॉड जर वेळेवर न भेटता, आणि माझी विचारशक्ति जागृत होऊन त्याचें म्हणणें मला न पटतें म्हणजे कृतींत न उतरतें तर मी आज एक हताश कारकुण्डा होऊन कोठें तरी कोपऱ्यांत खितपत पडलों असतों. "

माधवराव एकदां पुण्याला आमच्या नवीन बांधलेल्या 'निवान्त' बंगल्यांत एकटेच राहात होते. मी व मुलें, रा. घाटयांच्याकडे बोर्डीला गेलों होतों. तेव्हां त्यांचें मला एक पत्र आलें होतें. त्यांतील उतारा.

"माझा वस बसला आहे खरा, पण भाजीची व्यवस्था कांहीं नीट होत नाहीं आणि आमटी तर मी करीतच नाहीं. तरी जवळजवळ एक मास होईल, आलें इतकें स्वावलंबन काय थोडें आहे? भाकरी करण्याचा अभ्यास आतां चांगला झाला पण पोळी करण्याचा झाला नाहीं. तेवढा अभ्यास मला येथें तुझ्याबरोबर केलाच पाहिजे."

त्यांच्या भाकरीला चार पुडें सुटत असत असें त्यांनीं मी घरीं आल्यावर मला सांगितलें. मला आश्चर्य वाटलें. मीं एक दिवस त्यांना म्हटलें "मला एकदां भाकरी करून दाखवा." त्यांनीं एक दिवस भाकरी केली. पीठ इतकें घट्ट भिजवलें होतें कीं, भाकरी भाजल्यावर देखील आंत पोटांत ती कोरडी राहिली. मला हसूं आलें. मी म्हटलें, "अशी चार पुडें सुटलीं तर उद्यां गह-जच होईल. मी नसतांना अशी भाकरी केलीत आणि रोज खाल्लीत तर अनर्थ ओढवेल. मी जेथें असेन तेथून मला तुमची शुश्रूषा करायला धांवत यावें लागेल."

आणखी एका पत्रांतील उतारा—

"जेवायला मी बाचांच्याकडेच जातों. ती. सौ. मांई ऐकतच नाहींत. तथापि पोळ्या करण्याची संवय व्हावी म्हणून ४–५ पोळ्या घरीं डब्यांत घालून घेऊन जातों. माई माझें किती कौतुक करतात!. पोळ्या मऊ होतात तथापि चांगल्या फुगत नाहींत. तेल–चुलीवर अभ्यास चालू आहे."

स्वतःचीं सर्व कामें स्वतःच करण्याबद्दल त्यांचा मोठा कटाक्ष असे. इतर पुष्कळ गृहिणींना करावीं लागतात. तीं कामें मला करावीं लागलीं नाहींत. स्वतःचें कपडे स्वतःच पाहून घेण्यापासून तों बुटाला पॉलिश करण्यापर्यंत सर्व ते स्वतःच करीत असत. एखादा कपडा फाटला तरी तो त्यांनीं कधीं मला शिवायला दिला नाहीं. मीच कित्येक वेळां कपडे फाटके–धड पाहण्याचा प्रयत्न करीत असें. पण तें त्यांना कधीं आवडलें नाहीं. स्नानाला चंबांतून पाणी काढ-ण्याचें कामही त्यांनीं मला सांगितलें नाहीं. प्रवासाला निघाले तरी ते स्वतः

आपली ट्रंक भरीत. पुरुषांनीं स्त्रियांना आपल्या दासी बनवूं नयेत असें त्यांचें स्पष्ट मत होतें. आणि तें मत आचरणांत आणण्याची ते फार दक्षता घेत. शेवटच्या दुखण्यांत, मृत्यूपूर्वीं आठ दिवस आधीं ते आपलें आपण स्वतः तोंड धूत असत. स्वतः पायानें जाऊन बाकीचे विधि उरकीत असत. शेवटीं त्यांचा जेव्हां अगदींच नाइलाज झाला तेव्हांच ते कांहीं बाबतींत दुसऱ्याची मदत घेऊं लागले; लोकांच्याकडून सेवा करून घेण्याची त्यांना कधीं संवय नसल्यामुळें कोणी त्यांची सेवा करूं लागलें कीं त्यांना मरणप्राय दुःख होई !

———

## प्रवास : : : ८

माधवरावांना पायीं प्रवासाचा फार नाद असे. त्यांनीं पायीं प्रवास पुष्कळ केला होता. त्याकरितां त्यांनीं मुद्दाम खाकी कपडे शिवले होते. असे प्रवास करतांना सोयीचें जावें म्हणून मुद्दाम खाकी हॅवरसॅक सामानाकरितां करवून घेतलें होतें.

त्यांना ऐतिहासिक स्थळें पाहण्याची आवड विलक्षण होती. कोल्हापूरला गेल्यावर पहिल्या वर्षांत आम्हीं तेथील अनेक प्रेक्षणीय स्थळें पायीं हिंडून पाहिलीं. त्यांतील एक प्रवास मोठा गमतीदार झाला.

एक दिवस आम्हीं पन्हाळा किल्ला पाहण्यास जायचें ठरवलें. सकाळीं निघून गडावर मोटारीनें जायचें असल्यामुळें गंगावेशींतील मोटार स्टँड-जवळ सुमारें आठ वाजतां गेलों. पन्हाळ्याला जाणाऱ्या एका मोटर-ड्रायव्हरजवळ गडावर जाण्याकरितां मोटर केव्हां निघेल वगैरे चौकशी करून तिकिटें काढून आम्ही मोटारींत बसलों. ड्रायव्हरनें पांच मिनिटांत मोटार निघेल असें सांगितलें. परंतु चांगला तास झाला तरी मोटर जागची हलेना. माधवराव चिडले व खालीं उतरले. मग आम्ही मलकापूरला जाणाऱ्या मोटरींत बसलों. मलकापूरवाल्यानें गडाच्या पायथ्याशींच मोटार उभी राहते अशी थाप झोकून दिली. आम्ही एका तासांत पन्हाळ्यापासून सात मैलांवर आलों. तेथेंच ड्रायव्हरनें आम्हांला उतरायला सांगितलें; आम्ही उतरलों. तेव्हां आम्हांला पन्हाळा तेथून किती दूर असेल याची कल्पना नव्हती. आम्ही तेथून पुढें पायीं निघालों. तरी मला चालण्याचे श्रम यत्किंचितही वाटत नव्हते. भर बाराची वेळ होती, ऊन मी म्हणत होतें. दोन तास झाले तरी गडाचा मागमूसही नव्हता. मला एकाएकीं मळमळूं लागलें. जीव कासावीस झाला. आणि जोराची उलटी झाली, माधवराव घाबरले. पाणी शोधण्याकरितां ते धांवत सुटले, परंतु पाणी कोठेंच मिळेना. कांहीं वेळानें मला बरें वाटलें. तोंड तसेंच रुमालानें पुसलें व आम्ही पुढें निघालों. सुमारें अडीच तीन वाजतां आम्ही गडावर पोहोंचलों व आमच्या एका ओळखीच्या घरीं उत-

रलों. मीं चहा घेतला व जी झोंपलें ती संध्याकाळीं सात वाजतां उठलें. डोळे उघडले तों तिन्हीसांजा झाल्या होत्या. मला वाटलें मी खोलींत एकटीच आहें. बाजूला पाहिलें तो माधवराव माझ्या उशाशीं सचिंत बसले होते. दुसरे दिवशीं आम्ही गडावर हिंडलों. माधवरावांनीं गडाच्या कानाकोपरा हिंडून मला सर्व पन्हाळा दाखवला. त्याच दिवशीं आम्ही कोल्हापूरला परत जाण्यास निघालों. परंतु इकडे पन्हाळ्याच्या मोटरवाल्यांनीं आमच्याविरुद्ध कट करून " आज गडावर आलेल्या पाहुण्यांना परत म्हणून कोल्हापूरला न्यायचें नाहीं " असें ठरवलें होतें. ज्या ज्या मोटर–ड्रायव्हरला विचारावें त्यानें आम्हांला गाडींत जागा नाहीं असें सांगण्यास सुरवात केली. आतां काय करावें हा प्रश्न पुढें उभा राहिला. दुसरे दिवशीं कॉलेजला तर वेळेवर हजर असायला पाहिजे. शेवटीं आम्ही उतरलों होतों त्या गृहस्थांची सायकल घेऊन माधवराव सकाळीं पन्हाळ्याहून निघून अकराला कॉलेजला पोहोचले. मला माल स्पेशल ट्रूरिंगनें कोल्हापूरला जावें लागलें.

लग्न झाल्यावर पहिल्याच मे महिन्यांत आम्ही बडोद्याला गेलों होतों. माधवरावांचा जन्मच बडोद्याला झाला होता. ते बडोद्याला गेले म्हणजे त्यांचें लहानपण व तरुणपण त्यांना आठवें. ह्या वेळींही ते त्याच सुखस्वप्नांत निमग्न होते. आम्ही बापूराव शिंद्यांच्याकडे उतरलों होतों; परंतु दोन्ही वेळच्या जेवणापुरतें व नाइलाज म्हणून दुपारीं १२ ते ३ वाजेपर्यंत घरांत जेमतेम राहात होतों. बडोदा कॉलेज, विश्वामित्रीचा झुलता पूल, इंदिरा अव्हेन्यू, देवांची चाळ, शास्त्र्यांच्या पोळांतील सहस्रबुद्धयांचे घर (त्यांच्या मामांचें घर), जेथें जेथें त्यांचें लहानपण व पुढें कॉलेजमधले दिवस गेले तीं तीं सर्व स्थळें त्यांनीं दिवस दिवस हिंडून मला दाखविलीं, आणि त्या वेळच्या जसजशा आठवणी होत गेल्या तसतशा त्या रसभरीत वर्णन करून मला त्यांनीं सांगितल्या. त्याच सफरींत आम्ही चंद्रशेखरांच्याकडे गेलों होतों. माधवरावांना पाहून चंद्रशेखरांना फार आनंद झाला. ते जागेवरून धांवतच माधवरावांच्या जवळ आले व त्यांचे दोन्ही हात धरून त्यांनीं त्यांना आपल्याजवळ मोठ्या प्रेमानें बसवून घेतलें. माधवरावांनीं माझी ओळख करून दिली व " लीलाबाईंना तुमचा ' गोदा–गौरव ' ऐकण्याकरितां मी येथें घेऊन आलों आहे " असें सांगितलें. चंद्रशेखरांनीं ' गोदा–गौरवां 'तील कांहीं भाग मोठ्या आनंदानें आम्हांला म्हणून दाखवला. चंद्रशेखर म्हणत असतां इतके तन्मय

झाले होते कीं, त्यांच्या डोळ्यांतून एकसारखा अश्रुप्रवाह चालला होता. चंद्रशेखर माधवरावांना म्हणाले, "माधवराव, तुम्ही आणि घाटे गेलां आणि तेव्हांपासून बडोद्यांतली खरी मजा गेली." माधवराव व रा. विठ्ठलराव घाटे चंद्रशेखरांना गुरुसमान मानीत.

चंद्रशेखरांचा 'गोदागौरव' तर त्यांना सबंध पाठ होता. १९३० सालीं चंद्रशेखरांच्या कवितेचें पुस्तक प्रसिद्ध झालें. चंद्रशेखरांनां 'गोदागौरवां' तील कांहीं ओळी आठवत नव्हत्या. माधवरावांना त्या तोंडपाठ होत्या. माधवरावांनीं आपल्याला पाठ असलेल्या जवळजवळ दोनशें ओळी प्रकाशनापूर्वीं लिहून दिल्या.

१९३२ सालीं हैद्राबाद–संमेलनाला आम्ही गेलों होतों. तेथील मुक्कामांत आम्ही व घाटे मंडळी गोंवळकोंड्याचा प्रसिद्ध किल्ला पाहण्यास मुद्दाम गेलों होतों. बरोबर रावसाहेब र. लु. जोशी व त्यांचीं मुलें होतीं.

आमच्या अनेक प्रवासांत १९३८ सालच्या अजिंठा–वेरूळचा प्रवास फार गमतीदार झाला. सन १९३७ सालीं माधवराव जळगांव साहित्य–संमेलनाचे अध्यक्ष झाले. त्याच वेळीं सौ. आनंदीबाई शिर्के व रा. शिर्के यांनीं आम्हांला अजिंठा व वेरुळच्या लेण्यांना न्यावयाचें ठरविलें होतें, परंतु त्या वेळीं त्या बाजूला फार पाऊस असल्यामुळें तेव्हां आम्हांला तो बेत रहित करावा लागला. पुढें–मुंबई–साहित्य–संमेलनानंतर मे महिन्याच्या सुट्टींत आमचें तिकडे जाण्याचें ठरलें. ऐन उन्हाळ्याच्या दिवसांतील आमच्या ह्या प्रवासाला निघण्याच्या बेताला रा. घाटे व सौ. वहिनी हंसल्या. ते म्हणाले देखील, "माधवराव, हें सर्व तुम्हांला शोभण्यासारखेंच आहे. परंतु लीलाबाईंना संभाळा." मलाही प्रवासाची आवड पहिल्यापासूनच असल्यामुळें मी मुलांना माहेरीं ठेवलें. आम्ही चाळीसगांवला गेलों. तेथूनच आमच्या प्रवासाला सुरुवात झाली. सौ. आनंदीबाई कांहीं घरगुती अडचणीमुळें येऊं शकल्या नाहींत. परंतु रा. शिर्के स्वतः जातीनें सर्व प्रवासभर बरोबर होते. त्यांनीं आमच्या पाहुणचारांत व व्यवस्थेंत यत्किंचित्‌हि कमी पडूं दिलें नाहीं. मुलांना आम्ही बरोबर आणणार म्हणून त्यांनीं आपल्या धाकट्या मुलीला–ताईला बरोबर घेतलें होतें. ठिकठिकाणीं उतरण्याची सोय तर घरच्यासारखीच केली होती. आम्हीं मुलांना नेलें नाहीं त्यामुळें त्यांची फार निराशा झाली. हतनूरच्या

बंगल्यांत आम्ही उतरलों होतों व तेथून रोज निरनिराळ्या ठिकाणीं जाण्याचा कार्यक्रम आम्ही पार पाडीत होतों. वेरूळ, अजिंठा दौलताबाद, औरंगाबाद, कन्नड वगैरे सर्व ठिकाणचा प्रवास मोठा गमतीचा झाला.

वेरूळ, अजिंठा पाहून झाल्यावर केशवसुतांचे भडगांव हें गांव पाहायला गेलों. केशवसुत ज्या घरीं रहात होते तें घर व गिरणा नदी पाहिली. माधवराव गंभीर झाले. त्यांना केशवसुतांच्या अनेक कवितांची आठवण झाली. गिरणा नदीवर आम्ही संध्याकाळीं फिरायला गेलें होतों. तेथें वाळूंत बसलों. माधवरावांनीं केशवसुतांच्या कवितांतील कांहीं भाग भराभर म्हणायला सुरुवात केली. त्यांची पठणशक्ति फार दांडगी होती.

त्या सर्व प्रवासांत माधवरावांच्या विनोदाला नुसता ऊत आला होता. ते आम्हांला पांच पांच मिनिटांला कांहीं तरी विनोद करून पोट धरधरून हंसायला लावीत होते. ते ज्यांना कांहींच अर्थ नाहीं अशा अनेक निरर्थक शब्दांवर अनुस्वार देऊन मध्येंच फारसी, मराठी किंवा संस्कृत शब्द घालून संस्कृत कवितेप्रमाणें भासणाऱ्या ओळीं गंभीरपणानें रचून म्हणत आणि क्षणभर त्या विचित्र रचनेनें आम्हीही फसत असूं. थोडा विचार केल्यावर त्यांतील फोलपणा लक्षांत आला म्हणजे आम्ही खूप हंसत असूं. त्यापैकीं एक ओळ अजून मला आठवते ती अशी :– वन्दामि पादनकुषं मनसां रजेष्णम् !'

त्याच वेळीं त्यांनीं माझा कवि तिवारी यांच्याशीं परिचय करून दिला. त्यांच्या घरीं आम्ही मुद्दाम गेलों होतों. त्यांनीं आपला 'मर्दानी झांशीवाली' हा पोवाडा साभिनय म्हणून दाखविला. त्याचप्रमाणें कांहीं बंगाली कविताही त्यांनीं साभिनय म्हणून दाखविल्या. त्या बंगाली गीतांची माधवराव हुबेहुब नक्कल करीत असत. आम्ही रा. तिवारींच्याकडे जाण्यापूर्वी माधवरावांनीं मला ती त्यांच्याप्रमाणें म्हणून दाखविली होती. तेव्हांच मला हंसूं आवरेना. मीं त्यांना म्हटलें कीं, "तुम्ही त्यांना ही कविता म्हणायला सांगाल आणि मला हसूं आवरणार नाहीं. मग माझ्यावर रागावाल. तेव्हां त्यापेक्षां असें कांहीं करूंच नका." ते मला म्हणाले, "तुला हसूं दाबलेंच पाहिजे व मजबरोबर आलेंही पाहिजे. एखाद्या मोठ्या माणसाची ओळख करून घेण्याची जिज्ञासा तुला कशी नाहीं?" शेवटीं आम्ही त्यांच्या घरीं गेलों. त्यांनीं आमचें उत्तम स्वागत

केलें. तें विशिष्ट गीत त्यांनीं माधवरावांनीं म्हटल्याप्रमाणेंच म्हटलें. मला पराकाष्ठेचें हंसू येत होतें. माधवराव माझ्याकडे मधून मधून पाहात व न हसण्याबद्दल खूण करीत. मीं मनावर विलक्षण ताबा ठेवून ती ऐकली. नंतर तिवारींनीं मला विचारलें, "माधवरावांनीं तुम्हाला माझ्या आधींच माझ्यासारखी ही कविता हुबेहूब म्हणून दाखविली असेल?" मीं कबूल केलें व मग मात्र आम्ही सर्वच मोकळेपणानें हसलों.

आम्ही बडोद्याप्रमाणें मुंबईलाही एका सुटींत गेलों. तेव्हां आम्ही जवळ जवळ सर्व मुंबई पायीं हिंडलों होतों. कोणतेंही प्रेक्षणीय स्थळ पाहावयाचें आम्हीं ठेवलें नाहीं. परंतु ट्रॅम, बस, व्हिक्टोरिया ह्याकरतां एक पैही खर्च केली नाहीं. ज्याप्रमाणें माधवरावांना बडोदें प्रिय होतें त्याप्रमाणें त्यांचें एम्. ए. चें एक वर्ष मुंबईला गेलें म्हणून मुंबईतील कांहीं ठिकाणें त्यांना इतकींच प्रिय होतीं. त्यांपैकीं चर्नीरोड गार्डन होय. ते मला नेहमीं सांगत कीं, "मुंबईला असतांना मला एकटें फिरण्याची लहर आली कीं चर्नीरोड गार्डनमध्यें तासचे तास मी घालवीत असें." केवळ कांहीं वृत्तप्रकारांकरितांच ज्या कविता माधवरावांनीं लिहिल्या त्यांपैकीं त्यांची प्रसिद्ध 'काहूर' कविता उद्विग्न मनःस्थितींत चर्नीरोड गार्डनमध्यें त्यांनीं लिहिली आहे. अशाच एका पायचाकीवरून केलेल्या प्रवासाचें वर्णन मी पुण्याला कॉलेजांत असतांना त्यांनीं पत्रानें लिहून कळविलें होतें. तें जसेंच्या तसेंच पुढें देत आहें.

रा. भुयेकरांच्या बरोबर भुयेवाडीस जाण्यास सकाळीं निघालों.

सर्व जमून बाहेर पडावयाला ८॥–९ वाजले. गांव सहा मैलांवर पण आडरस्त्याला आहे. पण बैलगाडीच्या चाकोऱ्या म्हणजेच रस्ता अशी स्थिति असल्याकारणानें पायचाकीवर व्यवस्थित बसण्याचा उत्तम अभ्यास झाला. तेथें दिवसभर दूध, भाजलेल्या शेंगा, बरोबर नेलेल्या चपात्या व खिचडी, रा. भागवत यांनीं तेथेंच झाडावर चढून पाडलेले नारळ वगैरेंसह दिवसभर चरून विहिरींत यथेच्छ पोहून, इतस्ततः विचरून संध्याकाळीं ६॥–७ला घरीं येऊन पोहोंचलों. मोकळी हवा व मोकळी परिस्थिति यांनीं मन फारच उल्हासित झालें. परत येतांना मावळत्या प्रकाशांत आम्ही खूप वेगानें आलों. घरीं आल्यावर अर्धा पेलाच चहा घेतला व खाणावळींत ८ वाजतां जेवायला गेलों; बरोबर ९ला झोपलों."

माधवरावांना चहाशिवाय दुसरें व्यसन नव्हतें. परंतु दिवसांतून ते पांच-सात वेळां सहज चहा घेत असत. माझें लग्न झाल्यावर हें त्यांचें चहा पिणें मीं कमी करण्याचा प्रयत्न केला; त्याला बरेंचसें यश आलें. मीं बाजारांत जाऊन लहानशी कपबशी विकत आणली होती. त्यांना चहाची लहर आली म्हणजे त्याच कपांत मी त्यांना चहा देत असें. सकाळीं व दुपारीं दोनदां मोठ्या कपांतून व इतर वेळीं चहा घ्यावासा वाटल्यास लहान कपांतून त्यांनीं घ्यावा असा निर्बंध मीं घातला होता. पुढें तो कप फुटला; परंतु माधवरावांनीं तो नियम सोडला नाहीं. ते मोठ्या कपांतून पण अर्धा कपच चहा घेऊं लागले. म्हणून त्यांनीं तेवढेच शब्द माझ्या वरील पत्रांत अधोरेखित केले आहेत.

माधवराव रविकिरण मंडळाच्या सभासदांबरोबर भाटघर—बनेश्वराला गेले होते. त्याचें वर्णन त्यांच्याच शब्दांत पुढें देत आहें.

बनेश्वरची सफर पुणें २० जाने. १९२३

'गेल्या रविवारीं आम्ही शारदामंडळाची ६–७ मंडळी मिळून बनेश्वरची फेरी करून आलों. मी, कवि यशवन्त व य. म. गद्रे हे तिघे रविवारीं रात्रीं छकड्यांत बसून निघालों तो रडत खडत त्रस्त व पेङ्गत असे सकाळीं ७ वाजतां पुण्यापासून १६ व्या मैलापर्यंत आलों. पहाटे ५–६ वाजतां निघालेले रा. रानडे रा. द. ल. गोखले व रा. टोळे हे सायकलस्वार आम्हांला तेथें भेटले. रा. गद्रे यांना गाडींत झोंप यावी म्हणून व रस्त्याच्या बाजूनें शिवगंगेची खोरेवजा सुपीक हिरवीगार रमणीय दरी दृग्गोचर होऊं लागल्यामुळें मी व यशवंतराव अगोदरच पायीं उतरून चालूं लागलों होतों. रा. गोखले व रानडे पुढची व्यवस्था करण्याकरतां पुढें गेले व आम्ही तिघे गोष्टी बोलत चालूं लागलों. २२ व्या मैलापाशीं नसरापुरास जाण्याकरितां उजवीकडे रस्ता फुटतो. भोरच्या मुख्य सडकेपासून नसरापूर १ मैल आहे. तेथून पुढें पेशव्यांनीं बांधलेलें बनेश्वरचें देऊळ एका जिवन्त ओढ्याच्या कांठीं उंचावर झाडांच्या गर्दींत आहे. नसरापुरला पोंचलों तो शारदामंदिराचे उपाध्यक्ष भोरचे रा. ना. म. भिडे हे आधींच येऊन पोहोंचले होते. प्रातर्विधि आटोपून मंडळींनीं चहा व मीं कोको घेतला. देवळाच्या आवारांत तीन हौद असून लांबून बांधून आणलेलें पाणी त्यांत खेळविलें आहे. आंत मासे मुबलक आहेत. मधल्या हौदांत स्नानाची परवानगी असल्यामुळें आम्ही

त्या गळाभर पाण्यांत यथेच्छ डुंबलों. रा. रानडे यांनीं फोटो घेतला. पुढें मंडळींबरोबर मी पाटलोण नेसून परंतु सद्रा काढून ( धोतर बरोबर नव्हतेंच ) देवळांत दर्शनास गेलों. देऊळ अर्थातच प्रेक्षणीय नाहीं. नाशिकच्या काळ्यारामाचें देऊळ मात्र मराठ्यांच्या भिकार शिल्पकलेला अपवादभूत आहे. दर्शनी पिण्डी उचलली म्हणजे आंत तीन सारखीं भोंकें लागतात. त्यांत हात घातला म्हणजे १॥–१ फुटावर एकाच दगडावर कोरलेल्या पांच ( स्वयंभूच म्हणावयाच्या ) पिंड्या लागतात. भोंकांत सभोंवतीं हौदाचें पाणी खेळविलें आहे. त्यामुळें बहुधा पिंडी पाण्यांत बुडून शंकर संकटांत असतो. फराळ आटोपल्यावर आम्ही देवळाच्या पिछाडीस असलेल्या गर्द वनांत शिरलों. तिथें एक फोटो घेण्यांत आला. नंतर उगमाकडे २–२॥ मैलांवर ओढ्यावर खळाळ धबधबा आहे तेथें गेलों. दृश्य मोठें रमणीय आहे. पाणी अदमासें १५ फुटांवरून पडतें. ओढा फारसा रुंद नाहीं. उघड्या दगडांवरून उड्या मारून आम्ही पलीकडे गेलों. फाटलेले, पांगलेले ३।४ ओघ एकत्र होऊन एका चिंचोळ्या खबदाडींत पडतात. कातळावर हिरवा थर बसलेला होता. शेवाळामुळें ते निसरडे झाले असतील म्हणून आम्ही फार जपून चालत होतों. परंतु वस्तुस्थिति तशी नव्हती. मग आम्हीं कपडे काढले. एक-दोन डुबक्यांत डुम्बलों. अखेर धबधब्यांत पाणी पडतें त्याच्यावर तीनचार फूट बसलों. इथें २–३ फोटो घेण्यांत आले. नंतर नसरापुराच्या खालीं असणाऱ्या दुसऱ्या प्रपाताकडे गेलों. संध्याकाळ झाली होती. इथला खळाळ फोटोंत विशेष रमणीय दिसेल. पाणी थोड्या थोड्या अंतरावरून तीनचार पायऱ्यावरून खालीं पडतें. काळोख पडतां पडतां पेशव्यांच्या चैनमहालाचे अव-शेष व सभोंवतीं मजबुती येण्याकरितां पिंपळानें विणलेलें मुळांचें जाळें पाहून आम्ही परतलों. सायकलस्वार ८। वाजतां परतले. आमचा छकडा सुमारें ८॥ ला निघाला. नसरापुराच्या बाजारांत डोंगराच्या गाड्यांची ही झुंबड व ठेलाठेली ! आमची गाडी बाहेर पडण्याचीच मुश्किली. पुढें आम्हीं एका ठिकाणीं भरलेलीं पोतीं उचलून बाजूला केलीं. एक सोडलेली गाडी ओढून दूर केली व अदमासें ९। ला नसरापुराच्या बाहेर पडलों. रा. गद्रे छकड्यांत निजले. मी व यशवंतराव पायीं चालूं लागलों. गाडींत स्वस्थ झोंप घेण्याची सोय फक्त दोघांचीच होती. पुढें मध्येंच थांबून गाडी मागून येत आहे कीं नाहीं हें पाहाण्याचा आम्हांला कंटाळा आला व आम्ही

नीट चालूं लागलों. थोडें चांदणें होतें. परंतु रस्त्यानें रानडुकरांची व सापांची भीति नाहीं असें नाहीं, असें आम्हांस सांगण्यांत आलें होतें. त्यामुळें जीव धाकधूक करीत होता. ३ मैल जमीन चाललों. चंद्रकोर एका उमाळ्या-वर (डोंगराचा माथा) टेकडीमागें लपली. डाव्या हातच्या शिवगंगेच्या चिंचोळ्या खोऱ्यांतल्या शेतावरचे रक्षक पक्षी उडविण्याकरितां हांका देत, त्या ऐकूं येत असत. खोऱ्याच्या पलीकडील डोंगराच्या पायथ्याशीं २–३ मैल अंतरा-वर वसलेल्या गांवाचें अस्तित्व म्युनिसिपालिटीच्या दिव्यांप्रमाणें दिसणाऱ्या आगट्या दर्शवीत होत्या. मधून मधून गप्पा मारीत, परंतु बहुधा स्तब्धतेंतच प्रत्येक जण आपापल्या नादांत असे आम्ही चाललों होतों. ६–७ मैलांत रात्रीं तारकाप्रकाशांत प्रवास करीत असतां आम्हांला २ च गाड्या भेटल्या व एके ठिकाणीं ३–४ गडी आगटीभोंवतीं शेकत बसले होते. त्या वेळच्या निर्जन प्रदेशांत, निस्तब्ध शांततेंत गाडीला जोडलेल्या बैलांच्या गळ्यांतल्या घण्टिकांचा आवाज किती उत्तेजक व श्रुतिमनोहर असतो! असें चालतां चालतां शिवापूरच्या अड्ड्यावर पुण्यापासून १५ मैलांवर आम्ही आलों. चहाचीं दोन दुकानें उघडींच होतीं. शेगड्यांवर आधण उकळतच होतें. 'चाय कढत हाये, पाहिजे?' म्हणून विचारणा झाली. तेव्हां आम्हीं कप-कप दूध झोकलें व ताऱ्यांची मजा पाहात अन्धारांतून कात्रजच्या घाटाकडे चाललों. घाटांत तीन चार गाड्या भेटल्या. 'मैलाचा दगड आला कीं काडी ओढून त्यावरील आंकडे वाचावयाचे असा आमचा क्रम चालला होता. शेवटीं बोगद्याजवळ आलों व अकरावा मैल लागला. पुणें आटोक्यांत आलें म्हणून यशवन्तराव आनंदले. किती वाजले हें कळायला मार्ग नव्हता. सप्तर्षींचें शेपूट ३–४ अंगुळें वर उचललें गेलें होतें. बोगदा ३३० कदम भरला आणि आम्ही उतारास लागलों. दिवाळीची रोषणाई धुक्यांतून अंधुक दिसावी तसें पुणें तळाशीं दिसूं लागलें. घाटाचा उतार मोठा फसव्या. आतां आलों सपाटीला असें वाटावें तों नवीनच वळण घेऊन पुढें उतार दिसूं लागे. अखेर ८ व्या मैलाजवळ दस्तुरी आहे तिथें तीन गाड्या उभ्या होत्या. घड्याळांत २ ला २० मिनिटें कमी असें पाहून पुढें सटकलों. येथून देखावा अतिशय कंटाळवाणा वाटला. ७ व्या मैलाजवळ शुक्र क्षितिजावर आला. आवाज फक्त आमच्या चालण्याचा ऐकूं येई. नाहीं म्हणायला ६ व्या मैलांत घुबडाचा घूत्कार मीं प्रथमतःच दोनदां ऐकिला.

अखेर स्वाराच्या गेटाजवळ आलों. म्युनिसिपालिटीचे दिवे दिसूं लागले. "आज जिंकली" असें यशवंतराव म्हणाले. पुण्यपुरीची दूषित हवा आमच्या तेज घ्राणेंद्रियांना जाणवूं लागली. मंडईपाशीं आलों तों घड्याळांत बरोबर ३॥ वाजले होते.

आम्ही १९२९ सालीं प्रथमच महाडजवळच्या गोरेगांवीं गेलों होतों. हेंच कै० वामन मल्हार जोश्याचें गांव. त्यांचें घर केशवराव गोखले (माधवरावांचे दत्तक दिलेले बंधु) ह्यांच्या घरासमोर होतें. वामनरावांचे सगळयांत थोरले बंधु हे गोखल्यांचे उपाध्याय होते.

तेथें माधवरावांना रायगड पाहून येण्याची इच्छा झाली. भाओजींनीं दोन गडी बरोबर दिले. पाचाडच्या बाजूनें माधवरावांनीं रायगडचा सबंध प्रवास पायीं केला. दोन दिवसांनीं माधवराव सबंध रायगड व रायगडच्या भोंवताल-लचा प्रदेश हिंडून परत आले.

आमच्या लग्नाच्या आधीं 'रविकिरण मंडळा'चे असे पायीं प्रवास अनेक झाले. परंतु माझ्या आठवणींत आमच्या लग्नाच्या पंधरा दिवस आधीं माधव-राव व शंकरराव कानेटकर लोहगड व विसापूरचे किल्ले पायीं पाहून आले होते. परत येतांना अगदीं संध्याकाळ झाली होती. वाघोबाची स्वारी अगदीं एका हांके-वरून गेली. पण माधवराव व शंकरराव यांना ह्या गोष्टींचा थांगपत्ताही नव्हता. खालून गडावर पत्रें घेऊन जाणाऱ्या मजुरांनीं "साहेब, तो पाहा वाघ चालला आहे. आपण सावधगिरीनें गड उतरा" असें सांगितल्यावर मात्र दोघे भराभर गड उतरले. परंतु गांव गांठेपर्यंत त्यांच्या जिवांत जीव नव्हता.

त्यांचा सर्वांत महत्त्वाचा प्रवास म्हणजे माथेरान ते महाबळेश्वर. त्यांनीं व श्री. द. ल. गोखले यांनीं केलेली सहल. पाठीवर हॅवरसॅक व खांद्याला पाण्याची पिशवी लटकलेली व हातांत सोटा, डोकीवर हॅट, हाफ पॅंट अशा वेषांत दोघांनीं हा कित्येक मैलांचा प्रवास केला. रात्र पडली म्हणजे दोघे धर्मशाळेंत नाहीं तर देवळांत मुक्काम करीत. खेडयांत जें मिळेल तें खाऊन पहांटे उठून मार्गाला लागत. या सहलींतले मजेदार अनुभव ते नेहमीं सांगत. याच सहलींत महाबळेश्वराजवळ त्यांची 'भिल्लीण न तूं' ही कविता झाली.

पावसाळ्यांत छत्र्या न घेतां पावसाळी कोट घालून बोरघाटांत दरसाल रविकिरण मंडळाच्या सफरी होत. सकाळच्या गाडीनें खंडाळ्यास जाऊन बोर-

घाटांत खूप पावसांत भटकत. तेथील एका विशिष्ट धबधब्याखालीं मनसोक्त स्नान करून ही मंडळी संध्याकाळच्या गाडीनें पुण्यास परत येत.

माथेरान–महाबळेश्वरचा त्यांनीं जो पायीं प्रवास केला त्याचा आगाऊ ठरविलेला कार्यक्रम त्यांनीं रामभाऊंना लिहून कळविला होता तो तसाच पुढें देत आहे.

गद्रेवाडा, न्यू इं. स्कूल,
होस्टेल, पुणें.
२७ मार्च १९२३

नंतर एका मोहिमेवर जाण्याचा आमचा विचार आहे. ही स्वारी होणार नसून पायपीट दौड होणार आहे. त्या सुमारास तुला रजा घेतां आली तर तूं सामील व्हावें अशी आमची इच्छा आहे. कार्यक्रम असा आहे:— पुणें–खंडाळा रेल्वेनें ता. १५ सकाळीं खंडाळा–खोपवली. चौकला ता. १५ पायीं. एक दिवस मुक्काम. पुढें माथेरान २ दिवस मुक्काम. चौकचे गोडबोले बरोबर येणार आहेत. माथेरान ते गोरेगांव पायीं व पुढें मुंबईपर्यंत बोटीनें. मुंबईस एक दिवस मुक्काम. नंतर धरमतरवरून तुझ्याकडे १ रात्र मुक्काम. (रामभाऊ तेव्हां पेणला होते.) पुढें पायीं नागोठण्यावरून रात्रीं नागोठाण्याला मुक्काम. तेथून तळें व मुक्काम. दुसरे दिवशीं पालीवरून नागोठण्यावरून मधल्या रस्त्यानें रोह्यास. तेथें मुक्काम. तेथून गोरेगांव व तेथें मुक्काम. तेथून रायगड; मग महाड, प्रतापगडास मुक्काम. नंतर महाबळेश्वर येथें चार दिवस मुक्काम. नंतर पांचगणीस एक दिवस मुक्काम व वाईस एक दिवस मुक्काम. नंतर साताऱ्यावरून कऱ्हाड-कृष्णा-कोयना-संगम व तेथून पुण्यास.

नेरळ १९–४–२३

त्यानंतर लगेच रामभाऊंना लिहिलेलें दुसरें पत्र पुढीलप्रमाणें—

ता. १६ ला मी इतर सोबत्यांसह पुरंदरारोहण केलें; आणि दुरूनच राजगड, तोरणा व सिंहगडचें पुण्यदर्शन घेतलें. येतांना सासवडवरून दिव्याच्या घाटानें परत आलों. आज संध्याकाळीं माथेरान चढून जाऊं. मीं व रां. गोखले दोघेजण पेणेस ता. २२ ला अगर २३ ला बोटीनें येऊं. धक्क्यावर जरूर यावें.

आमच्या ह्या पायपिटींतला एक प्रसंग माझ्या डोळ्यांपुढून कधींही हालत नाहीं.

इ. स. १९३२ सालची गोष्ट. आम्ही आमच्या नित्यक्रमाप्रमाणें संध्याकाळीं फिरायला म्हणून बाहेर पडलों, तेव्हां आमचा मुलगा दिनू हा वर्षाचा असेल नसेल. त्याला गड्याजवळ देऊन आम्ही दोघेच बाहेर पडलों. आमचा रस्ता कधींही ठराविक नसे. त्या दिवशीं आम्हीं जुन्या रेसकोर्सला एक फेरी देऊन येण्याचें ठरविलें. आम्ही रेसकोर्सजवळ पोहोंचलों. तेथील लहानशा उतरंडीवरून उतरत असतांना मागून बरींचशीं गुरें धांवत येत असतांना दिसलीं. त्यांतलाच एक रेडा माझ्यापासून थोड्या अंतरावर धांवत आला. माधवरावांनीं आपल्या हातांतील कांठी त्याच्या नाकाडावर मारली. रेड्यानें माझ्या मागें येण्याचें सोडलें व तो माधवरावांचा पाठलाग करूं लागला. परंतु ही गोष्ट माधवरावांच्या लक्षांत आली नाहीं. ते आपले बोलण्याच्या नादांत सावकाश चालले होते. माझें मात्र लक्ष त्यांच्या बोलण्याकडे लागेना. मी वारंवार मागें वळून पाहूं लागलें. माझ्या वारंवार बघण्यानें माधवरावांच्या लक्षांत रेडा आपल्या मागें असल्याची गोष्ट आली. त्यांनीं मला शांतपणें सांगितलें, " हा रेडा साधा दिसत नाहीं. दारू पिऊन मस्त झालेला आहे. तूं आतां माझ्याबरोबर येऊं नकोस व ह्या जागची हलूं नकोस; मी माझें पाहून घेईन."

तो रेडा मागें व माधवराव पुढें असें विलक्षण व भयंकर दृश्य मी आपल्या डोळ्यांनीं पाहात होतें. माधवराव सावकाश चालत होते. माधवरावांच्या चालण्याच्या गतीच्या वेगाप्रमाणेंच रेड्याचा वेग होता. माधवराव व तो रेडा दृष्टीआड होईपर्यंत मी वेड्यासारखी पाहात होतें. जवळच आर्यसमाजाची एक शाळा होती. त्या शाळेच्या पटांगणांत मुलें फूटबॉल खेळत होतीं. परंतु आमच्याकडे कोणाचेंच लक्ष नव्हतें, माधवराव समोरच्या टेकड्यांच्या बाजूनें दृष्टीआड झाले. मी त्या मुलांना ओरडून हांका मारल्या. परंतु माझ्या हांकेला कोणीच ओ देईना. काय झालें असेल ह्या कल्पनेनें जागची हालण्याचीही शक्ति माझ्यांत उरली नाहीं. मी मटकन् खाली बसलें. दोन्ही पायांना हात घट्ट आवळून गुडघ्यांत मान घालून जवळजवळ अर्धा तास मी बसलें असेन. तरी माधवरावांचा पत्ता नाहीं. इतक्यांत अंगांतले सगळे कपडे फाटून गेलेले, घामाघूम झालेले माधवराव मला दुरून दिसले. त्यांनीं चार तारांच्या कांटेरी

कुंपणावरून तेथें जवळच असलेल्या शाळेच्या पटांगणांत उडी टाकली. त्यांनीं उडी टाकायला व रेडयानें आपलीं शिंगें तारांतून जोरानें आंत खुपसायला एकच गांठ पडली. परंतु उडीच्या जोरांत माधवराव दूर फेकले गेले, त्यामुळें ह्या भयंकर संकटांतून ते वांचले. रेडयाचा कांहीं उपाय चालेना. तो पुढें निघून गेला. प्रसंगावधान राखून जर माधवरावांनीं उडी मारण्याचें धाडस केलें नसतें तर त्यांची घटका तेव्हांच पूर्ण भरली होती. परंतु तेव्हां जरी काळ आला होता तरी वेळ आली नव्हती. पुढें चवकशी करतां असें कळलें कीं, तो रेडा तेथील टेंबलाबाईला सोडलेला होता.

ह्या त्यांच्या फिरण्याच्या वेळांत कधीं कधीं ते एकटेच तर कधीं प्रो. पंगूंना बरोबर घेऊन सकाळीं फिरायला म्हणून बाहेर पडत ते सहज कागलला जाऊन येत. कोल्हापूर ते कागल दहा मैलांचें अंतर आहे.

एक दिवस सुट्टीच्या दिवशीं ते व प्रो. पंगू सकाळीं सात वाजतां फिरायला म्हणून बाहेर पडले. मला माधवरावांनीं सांगितलें, "मी बरोबर दहा वाजतां फिरून येतों, तूं आज गुळाची पोळी कर"—त्यांना गुळाची पोळी फार आवडे. मला आतां संवयीमुळें इतकें माहीत झालें होतें कीं, ह्यांनीं जरी दहाला येतों म्हणून सांगितलें तरी एकदां बाहेर मंडळी भेटली कीं त्यांना बारा वाजणारच. त्या दिवशीं अडीच वाजेपर्यंत त्यांची जेवणाकरतां मीं वाट पाहिली तरी ते आले नाहींत. अनेक शंकांनीं मला घेरलें; काळजी वाटूं लागली. घरांत मी एकटीच होतें. शेवटीं घराला कुलूप लावलें व प्रो. पंगूंच्या घरीं गेलें. तों तेथें कळलें, तेही अजून आले नाहींत. घरीं परत आलें, दाराचें कुलूप काढून आंत आलें तोंच पंगू प्रथम घरांत आले व मला सांगूं लागले, "आम्ही फिरायला कागलला गेलों होतों. माधवराव तेथेंच मंडळींच्या आग्रहावरून राहिले." मला तें खरें वाटलें. इतका वेळ अन्न पोटाशीं घेऊन मी वाट पाहात बसलें होतें. हें कळल्यावर माझे डोळे पाण्यानें भरून आले. मी कांहींच बोललें नाहीं. जेवण तर मला जाणेंच शक्य नव्हतें. मी स्वयंपाकघराच्या दाराला कडी घातली व बाहेर आलें तों माधवराव दाराआड लपलेले दिसले.

परंतु अशा प्रकारचा अनियमितपणा लग्नानंतर फारसा टिकला नाहीं. कित्येक वेळां गप्पांच्या भरांत माधवराव आले म्हणजे त्यांना वेळेचें भान राहात नसे आणि मी कांहीं तरी म्हणालें म्हणजे ते मला उत्तर देत, " मी कित्येक वेळां आतां एकटा नाहीं हें विसरतों ग, तूं रागावूं नकोस, हळूहळू ही माझी संवय जाईल."

आगगाडीच्या प्रवासांत त्यांना बरोबर फराळाचें दिलें तर ते कधीं एकटे खात नसत. इतर ओळखीच्या मंडळीबरोबर त्याचा तेव्हांच निकाल लागे. त्यांना अशा प्रवासांत घरगुती फराळाचें जिन्नस खाणें आवडत नसे. पुढें पुढें मी देईनाशी झालें. स्टेशन आलें कीं चहा मात्र त्यांना अवश्य लागे. मला वाटेल त्या कपबशींतून घाणेरडा चहा घेतलेला आवडत नसे. मी बरोबर असलें म्हणजे मुंबईला जातांना किंवा तेथून परत येतांना स्पेशल चहा ते मागवीत. कोल्हपूरला जात असतांनासुद्धां जातां-येतां जोंपर्यंत वाठार स्टेशनवर चहा मिळत असे तोंवर आमचा स्पेशल चहा चुकला नाहीं. त्यांच्यामुळेंच चहाची संवय मला लागली. चहाप्रमाणेंच स्टेशनवर जो पदार्थ—मिठाई व फराळाचें सोडून मिळत असेल तो पदार्थ खाणें त्यांना जास्त पसंत असे. पुणें ते कोल्हापूरच्या प्रवासांत राजेवाडी स्टेशनवरचे अंजीर, वाल्ह्याला केळी, हातकणंगलें, रुकडी यांच्या दरम्यान कणसें, भाजलेल्या शेंगा थोड्या का होईना पण त्या विकत घेऊन खायच्या हा त्यांचा नियम असे.

शेवटच्या दुखण्यांतही ते वारंवार म्हणत कीं, " मी व रामभाऊ एकदां पावागडला पायीं जाऊन येणार आहोंत. बरेच दिवसांत पायीं प्रवास केला नाहीं. मी बरा झाल्यावर ही माझी राहिलेली इच्छा मी पूर्ण करणार आहें." माधवराव ज्या ज्या प्रदेशांतून हिंडले त्या त्या प्रदेशांतील सर्व माहिती मिळवीत. भाषा, देश, वेष, हवामान ह्यांची माहिती तर ते मिळवीतच, परंतु आगगाडींतून किंवा मोटारींतून जातांना कोणत्या दिशेला, कोणत्या डोंगराच्या आड, कोणत्या झाडाजवळ एखादें स्थळ आहे हें ते नेमकें सांगत. मुंबई ते पुणें प्रवास करतांना अशा अनेक रम्य ठिकाणांची व स्थळांची माहिती त्यांनीं मला दिली होती. आम्ही दोघें ज्या ज्या ठिकाणीं हिंडलों, दोघें मिळून जे जे प्रदेश

पाहिले त्या त्या प्रदेशांतून आतां जेव्हां मी एकटी प्रवास करतें तेव्हां मला अशा अनेक आठवणी येतात आणि मनाला कसें तरीच होतें. आतां हे केलेले अनेक प्रवास, त्यांतील प्रसंग माझ्या डोळ्यांपुढून हालत नाहींत. माझ्या स्मृतींत ते चित्रपटाप्रमाणें एका मागून एक दिसूं लागतात. त्याच जगांत, त्याच प्रदेशांत, त्याच सहवासांत मला वावरावेंसें वाटतें.

## रा. रामभाऊ मराठे

आमच्या लग्नाच्या दुसरे दिवशीं माधवरावांनीं माझी आपल्या एका स्नेह्याशीं ओळख करून दिली. हेच रामभाऊ मराठे. ओळख झाल्यानंतर रामभाऊ मला म्हणाले, "ह्यापुढें तुम्ही माझी बहीण, मी तुम्हाला वहिनी न म्हणतां ताई म्हणेन." आणि रामभाऊ अजूनही तें नातें विसरले नाहींत.

ते सध्यां मुंबईला असून पी. डब्ल्यू. डी. त डेप्युटी इंजिनियर आहेत. आमचें लग्न झालें तेव्हां ते डहाणूला राहात असत. माधवरावांनीं त्यांना लग्नाकरितां मुद्दाम बोलाविलें होतें.

माधवरावांची त्यांची ओळख भडोचला १९०६ सालीं झाली. तेव्हां माधवरावांचा बडोद्याला कुस्तींत हात मोडला होता म्हणून ते आपल्या आत्याबाईकडे भडोचला आले होते. माधवरावांच्या आत्याबाई–आऊताई–च्या घराजवळच रामभाऊंचे आईवडील राहात असत. परंतु पुढें माधवरावांनीं भडोच सोडलें व ते आपल्या आईसमवेत बडोद्याला पुढील शिक्षणाकरितां गेले. परंतु माधवराव व रामभाऊ यांचा स्नेह कायम राहिला.

पुढें माधवरावांनीं घर सोडलें तेव्हां सर्व प्रकारची म्हणजे पैशाची देखील मदत रामभाऊंनीं माधवरावांना केली.

रामभाऊचें मोल माधवराव जाणून होते. वास्तविक माधवरावांच्या पुढील आयुष्यांत रामभाऊंचा साहित्यांशीं संबंध फार थोडा आला. परंतु माधवराव-रामभाऊंच्या मैत्रींत यत्किंचितही फरक पडला नाहीं.

एका पत्रांत माधवरावांनीं रामभाऊंना लिहिलें होतें, "रामभाऊ, तुझें मोल मी जाणतों. तुझ्या गुणाला मी परका नाहीं. तुझ्याविषयीं माझ्या मनांत अनादर उत्पन्न कधींच झाला नाहीं, होणार नाहीं माझ्या पुरुष-मित्रांमध्यें तुझ्यासारखा मला कधीं कुणी दिसला नाहीं व ह्यापुढें दिसेल किंवा नाहीं याविषयीं शंकाच आहे. वास्तविक तुझ्या माझ्या स्वभावांत किती

६६२४

अंतर! तूं पडलास शांत, मी हा असा गरम, लहरी; परंतु राम ह्यामुळें तुझ्या-माझ्या मैत्रींत अंतर पडेल असें मला वाटत नाहीं."

आणि खरोखर रामभाऊ–माधवरावांचें मित्रप्रेम अगाधच राहिलें. ह्या-करितांच माधवरावांनीं रामभाऊंना 'विरहतरंग' अर्पण केलें.

'विरहतरङ्गा'ची पहिली आवृत्ति १९२६ सालीं प्रसिद्ध झाली. प्रस्ताव-नेच्या शेवटीं त्यांनीं रामभाऊंच्याबद्दल म्हटलें आहे, "ज्यांच्याशीं माझा परिचय झाल्याला आज वीस वर्षें झालीं आहेत अशा माझ्या मित्राला हें काव्य समर्पण केलेलें आहे. परंतु जनतेला त्याचें काय कौतुक? तो सार्वजनिक थोर गृहस्थ असता तर गोष्ट वेगळी होती. तेव्हां त्यांच्या गुणाचें वर्णन करण्यापेक्षां कृतज्ञतापूर्वक स्मरण करणें बरें. म्हणून त्यांच्या नांवाचीं (रा. वि. म.) हीं आद्याक्षरेंच फक्त जाहीर करतों."

रामभाऊंच्या घरीं माधवराव एखाद्या लहान मुलासारखे वागत. रामभाऊ फार व्यवस्थित तर माधवराव अतिशय अव्यवस्थित. टापटीप त्यांना माहीतच नव्हती. त्या दोघांच्या स्वभावांत महदंतर, परंतु माधवरावांच्यावर रामभाऊंचें सख्ख्या भावासारखें प्रेम होतें. रामभाऊंना स्वच्छतेची व व्यवस्थितपणाची आवड जास्त. त्यांना अंथरुणावर एक वळीही खपत नसे. माधवरावाना त्यांचें इतकें स्वच्छ अंथरूण दिसलें कीं ते विसकटण्याचा विलक्षण चेव येई. राम-भाऊंचें अंथरूण एकदां पायानें यथेच्छ तुडविल्याशिवाय त्यांना बरेंच वाटत नसे.

मराठे कुटुंबांत माधवराव अगदीं घरच्यासारखे वागत आणि त्याही मंड-ळींनीं माधवरावांशीं दुजाभाव कधीं बाळगला नाहीं. रामभाऊंच्या थोरल्या बंधूंच्या पत्नी अनसूयाबाई व रामभाऊंच्या पत्नी सौ. सीताबाई ह्यांना 'माधवराव भावोजी' फार पसंत!

कांहीं दिवसांनीं रामभाऊंची बदली ठाण्यास झाली. माधवराव ठाण्याला गेले कीं घरांत आनंदी आनंद असे. कारण थोरल्या वहिनींचें किंवा सीतावहिनींचें कांहीं चुकलें कीं तें गाऱ्हाणें काकूंना, भगवंतरावांना किंवा रामभाऊंना रसभरीत तिखटमीठ लावून माधवराव सांगत. आणि म्हणून या दोघींनीं विनोदानें माधवरावांचें नांव 'भीमा वन्सं' असें ठेवलें होतें. माधवराव सौ. सीताबाईंना–ताईंना केव्हां केव्हां कामांत मदतही करीत.

एकदां माधवरावांच्याच स्नेही मंडळींना रामभाऊंच्या घरीं मेजवानी होती. माधवरावांनीं ताईच्या जवळ जवळ सगळ्या पुऱ्या तळून दिल्या आणि रामभाऊ मात्र बाहेर बैठकींत माधवरावांच्या मित्रांचें आदरातिथ्य करण्यांत गर्क होते.

रामभाऊंच्या आई— काकू माधवरावांच्यावर मुलासारखें प्रेम करीत. माधवराव ठाण्याला त्यांच्या घरीं गेले कीं काकूंच्या सोंवळ्यांत जाऊन कोठें तरी शिवून त्यांचा स्वयंपाक ओवळा करून ठेवीत, परंतु काकू कधींही त्यांच्यावर रागावल्या नाहींत. उलट केव्हां तरी म्हणत, "अरे माधव, आतां संसार मांडला आहेस; अजून लहान अल्लड मुलासारखें काय वागतोस?" तरी माधवराव स्वयंपाकघरांतील फळीवरच्या डब्यांतला गुळाचा खडा खाल्ल्याशिवाय स्वयंपाकघरांतून बाहेर पडतच नसत.

अगदीं प्रथम माधवराव मला ठाण्याला घेऊन गेले. माधवरावांनीं काकूंना बाहेर हांक मारली. काकू सोंवळ्यांत होत्या. माधवरावांनीं मला नमस्कार करण्याबद्दल डोळ्यानें खूण केली. मीं त्यांना खालीं लवून नमस्कार केला. काकू माझ्याकडे नखशिखान्त पाहूं लागल्या. मला त्यांच्या पाहाण्याचा अर्थ समजेना.

दुपारीं जेवणें झाल्यावर मला घरांत कोणीच बोलवीना. मी आपली बैठकींत बसून राहिलें. परंतु घरांत बायका असतांना मला पुरुषांत बसायचें कसें तरी वाटूं लागलें. दोन दिवस मीं कसे तरी काढले; आणि आम्ही पुण्याला परत आलों.

पुढें कांहीं दिवसांनीं कॉलेजला उन्हाळ्याची सुटी झाल्यावर माधवराव मला म्हणाले, "आपण कांहीं दिवस रामभाऊंच्याकडे राहूं." मीं त्यांना म्हटलें, "मी नाहीं तुमच्या रामभाऊंकडे येत. रामभाऊ चांगले असले तरी घरांतल्या बायका मोठ्या चमत्कारिक दिसतात. माझ्याशीं कोणीच बोलत नाहीं." ते मला म्हणाले, "तूं माझ्याबरोबर चल. मी तें पाहून घेईन." परंतु मी मुंबईला गेल्यावर माझ्या मैत्रिणीकडे उतरलें. आणि शिष्टाचार म्हणून दुपारीं ठाण्याला भेटायला गेलें. लगेच काकूंनीं मला आंत नेलें. चहा वगैरे झाल्यावर त्यांनीं माझ्याशीं बोलायला सुरवात केली. आमचें संभाषण खालीलप्रमाणें झालें—

काकू— तुला स्वयंपाक करायला येतो का ?

मी— हो येतो.

काकू— मग तूं रोज कां नाहीं घरीं स्वयंपाक करीत ? जन्मभर त्याच्या नशिबाला खाणावळ होतीच; मग आतां कशाला खाणावळीचे डबे आणावे ? घरीं स्वयंपाक करावा !

मी— आम्ही कधीं खाणावळीचे डबे आणतों ? मी घरींच करतें.

काकू— हें खरं का अगदीं ? आणि काय काय काम मोलकरणीकडून करून घेतेस ?

मी— धुणें, भांडीं, दळण ह्याखेरीज सर्व मीच घरांत करतें.

काकू— टेनिस का काय म्हणतात तें, तें जातेस का नवऱ्याबरोबर खेळायला ?

मी—मला टेनिस खेळायला येत नाहीं.

काकू— संध्याकाळीं काय करतां ग ?

मी— आम्ही फिरायला जातों.

काकू— थांब हो, माधवलाच तुझ्या समक्ष बोलावतें एकदां. त्यालाच विचारूं दे खरं काय तें.

मी गोंधळलें. मला कांहींच सुचेना इतक्यांत काकूंनीं हांक मारल्यावरून माधवराव घरांत आले व म्हणाले, “ काय हो काकू ? ”

काकू— ही बघ तुझी बायको काय सांगते. ती सांगते कीं, तिला सर्व स्वयंपाकघरांतलें काम येतें म्हणून; आणि तूं मला सांगितलेंस कीं, माझ्या बायकोला कांहीं घरांतलें वळण नाहीं, तिला कांहीं येत नाहीं. मी पूर्वीप्रमाणें खाणावळीचे डबे आणतों, संध्याकाळीं आम्ही दोघेंही टेनिस खेळावयाला जातों, पायांत बूट–मोजे घालणारी ती ! ती कसली घरांत काम करते ! माधवराव उभे होते ते काकूंच्यासमोर बसले व त्यांना म्हणाले, काकू, खरं सांगा तुम्ही. मी बायको कशी करीन त्याचे तर्क-वितर्क आधींच लढवीत होतां त्याप्रमाणें मी तुमच्याजवळ तिचें वर्णन केलें. आपला तर्क बरोबर ठरला म्हणून तुम्हाला मागल्या खेपेला किती आनंद झाला होता ! म्हणून तुमच्या मनांतलें चित्र मी तुमच्या डोळ्यांसमोर उभें केलें ! म्हणून

तुम्हीं तिला गेल्या खेपेला घरांत हांक मारली नाहीं ? होय. आतां आलं माझ्या ध्यानांत !

काकू—चावट आहेस तूं. मुलगी मला चांगली दिसते. बरं झालं तसलं कांहीं भलतं केलं नाहींस. अरे, किती सुधारक झालांत तरी आपली संस्कृति सोडूं नये. देशस्थाची असली तरी वागणुकींत बरी दिसते हो. तुझ्या बायकोला पाहून मला आनंद झाला.

त्यानंतर माधवरावांच्यासारखीच मीही त्यांच्या घरांत त्यांच्याइतकीच मिसळून गेलें. ह्यावरून आणखी एका गोष्टीची मला आठवण झाली. माझें सासूबाईंशीं म्हणजे माधवरावांच्या आईशीं कधीं भांडण झालें नाहीं किंवा पटलें नाहीं असेंही झालें नाहीं. त्या जरी निराळ्या राहात तरी मधून मधून कोल्हापूरला येत. त्यांचें सोवळें कडक. त्या जोंपर्यंत कोल्हापूरला असत तोंवर त्यांना ज्या प्रकारचें सोवळें हवें असे त्या प्रकारचें मी माझ्याकडून राखण्याचा प्रयत्न करीत असें. सासूबाईही माझ्याशीं चांगल्या वागत व अजूनही वागतात. आई–लेकाचें बोलणें क्वचितच होई, परंतु आम्ही मात्र मोकळेपणानें हंसत बोलत असूं. त्यावरून माधवराव मला विनोदानें म्हणत, “ सासूबाईंशीं मेतकूट आणि माझ्याशीं मात्र काथ्याकूट.” माधवराव आजारी झाले. आम्ही पुण्याला आलों. रामभाऊंना माधवरावांच्या आजाराबद्दल काळजी वाटूं लागली. रामभाऊ माधवरावांच्याकरितां दर आठ दिवसांनीं पुण्याला येऊं लागले.

माधवराव वारल्यावर रामभाऊ ५०० रु. बरोबर घेऊन आले. त्यांना वाटलें मी पैशाच्या अडचणींत असेन. माधवरावांच्या अस्थींचें विसर्जन रामभाऊंनींच भडोचच्या नर्मदेंत केलें. अस्थी तेथेंच विसर्जन कराव्या असें मीच ठरवलें. त्याला कारण त्यांचें ज्यांच्यावर अतिशय प्रेम होतें त्या आत्याबाई नर्मदाकांठीं वारल्या; पुढें माधवरावांनीं त्यांच्या वडिलांच्या अस्थींचें विसर्जन मुद्दाम भडोचला जाऊन नर्मदेंतच केलें आणि म्हणून माधवरावांच्या अस्थींचें विसर्जन तेथेंच करावें असें मला वाटलें. रामभाऊंनीं तें काम केलें. ज्या ठिकाणीं प्रथम ह्या जिवलग स्नेह्यांचा परिचय झाला तेथेंच ते दोघे पुन्हा विलग झाले. एक परी रामभाऊंनीं शेवटपर्यंत आपल्या जिवलग मित्राला सोबत केली. मला त्यांत अत्यंत समाधान वाटलें.

अनुक्रम ........ दि: ........



वसलेल्या :— माधवरावांच्या आत्याबाई आऊताई सोहोनी.

उभे :— रा. रामभाऊ मराठे. माधवराव पटवर्धन.

काकूंना माधवराव वारल्याची बातमी रामभाऊंनीं मुद्दाम उशिरां सांगितली. कारण काकू तेव्हां आजारी होत्या. परंतु ती बातमी एकदोन दिवसांत कळविणें रामभाऊंना भागच पडलें. कारण काकू माधवरावांना घरगुती वैद्यकीय औषधोपचार करायला पुण्याला येणार होत्या. त्यांनीं रामभाऊंना विचारलें, "आपण माधवकडे पुण्याला कधीं जायचें?" शेवटीं नाइलाजानें रामभाऊंना ती दुःखद बातमी काकूंना सांगावी लागली. काकू हंबरडा फोडून रडल्या.

आतां काकूंचा माझ्यावर माधवरावांच्याप्रमाणेंच जीव आहे. मीही दर सुटींत मुंबईला त्यांच्याकडेच जातें. रामभाऊंच्याकडील सर्व मंडळी माझ्याशीं प्रेमानें वागतात. माधवराव वारल्यानंतर एक दिवस काकू सीताबाईंना म्हणाल्या, "मी पुण्याला लीलाजवळ जाऊन राहातें. ती दुःखांत आहे. तिला निदान शिजवून तरी घालीन." अगदीं प्रथम मला पाहिल्यावर त्या माझ्याशीं चमत्कारिक वागल्या व नंतर मी त्यांच्या घरांत घरच्यासारखी मिसळून गेलें. माधवरावांच्यापेक्षां मी चांगली ठरलें. माधवरावांचे स्नेही माझी बाजू घेऊन बोलले कीं, माधवराव केव्हां तरी मला थट्टेनें म्हणत, "काय माझें नशीब पहा, मी मात्र वाईट आणि तूं तेवढी चांगली!" ज्याप्रमाणें रामभाऊंचें घर माधवरावांचें विश्रांतिस्थान होतें त्याप्रमाणें तें आतां माझें विश्रांतिस्थान झालें आहे.

## रा. नामदेव भाटे (रघुनाथ सदाशिव भाटे)

नामदेवांची व माधवरावांची ओळख बडोद्याची. नामदेव व माधवराव एका वर्गांत होते. माधवराव फर्ग्यूसनमध्यें असतांना ते जर्मनीला गेले होते. त्यामुळें माधवरावांच्या पडत्या काळांत ते हिंदुस्थानांत नव्हते. पुढें आमच्या लग्नानंतर ते वर्षानें जर्मनीहून आले. माधवराव सुधारक. त्यांना सुधारकी विचारांचीं माणसें जास्त आवडत; म्हणून शाळेंत एका वर्गांत असतांना माधवराव व नामदेवांची दाट मैत्री झाली. जसजसें माधवरावांचें जाणेंयेणें नामदेवांच्याकडे जास्त वाढूं लागलें तसतसें माधवराव व नामदेवांच्या कुटुंबांतील मंडळी यांचेही संबंध दृढ होऊं लागले. वास्तविक नामदेवांचे बंधु रा. गणेश सदाशिव भाटे—यांची व माधवरावांची त्या वेळीं कोणत्याच दृष्टीनें बरोबरी नव्हती. ते बडोद्याला रेव्हिन्यू ऑफिसर होते. पैशानें, मानानें, वयानें सर्वच

गोष्टींत दादा मोठे. परंतु पटवर्धन हे नामदेवांचे स्नेही म्हणून त्यांचें कौतुक सर्वच भाटे मंडळी करीत. दादांनीं पुनर्विवाह केलेला. त्या वेळच्या सुधारकांत दादांची गणना होत: असे म्हणून माधवरावांना त्यांच्याबद्दल व वहिनी–लीलाबाई भाटे म्हणजे दादांच्या पत्नी यांच्याबद्दल आदर वाटत असे. नामदेवांच्या भगिनी सौ. वेणूताई आजरेकर, सौ. अनसूयाबाई काळे–मध्य-प्रांत लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या डेप्युटी स्पीकर, यमूताई हिर्लेकर ह्यांना माधवराव कधीं परके वाटले नाहींत; इतके ते भाटे–कुटुंबांत मिसळून गेले होते. ते दोघे बडोद्याला असतांना अभ्यास, प्रवास, खेळणें, सर्व कांहीं त्यांचें एकत्र असे. भाटेमंडळी नामदेवांना सांगत, "बघ नामदेव, पटवर्धन कसा हुशार आहे. त्याची संगत तूं सोडूं नकोस." माधवराव मला सांगत, "आम्ही बडोद्यास असतांना भाट्यांच्याकडे मला रात्र झाली कीं नामदेव मला पोहोंचवायला देवांच्या चाळीपर्यंत येई व तो एकटा जाईल म्हणून मी त्याच्या घरापर्यंत पोहोंचवायला जाई. हा आमचा क्रम कोणी तरी एकजण दमेपर्यंत चाले."

नामदेव पुण्याला किंवा कोल्हापूरला आले कीं माधवराव दिवस दिवस घरीं नसत व रात्रींही त्यांचे कांहीं तरी कार्यक्रम असत. नामदेव फार आनंदी, सदोदित हसतमुख, अगदीं नवीन विचाराचे, नखशिखांत इंग्रजी वळणाचे. एके काळीं माधवरावांना अशा माणसांच्याबद्दलची ओढ जास्त असे. तेही त्याच विचाराचे असल्यामुळें त्या दोघांचें फार जमे.

शेवटच्या दुखण्यांत नामदेव त्यांना भेटूं शकले नाहींत. त्यांची आठवण त्यांनीं वारंवार काढली, परंतु दुर्दैवानें त्यांची भेट झाली नाहीं.

माधवरावांच्या मृत्यूच्या दिवशीं श्री. लीलाबाई भाटे मजजवळ बसून होत्या. माझी समजूत घालीत होत्या. कै० दादांच्या मागें लीलाबाईनीं पटवर्धन, नामदेवांचे मित्र म्हणून तोच घरोबा कायम ठेवला. वास्तविक नामदेव व माधवराव यांचा आयुष्यक्रम शिक्षणामुळें व पुढें धंद्यामुळें बदलला. दोघांच्याही दिशा भिन्न झाल्या. परंतु लीलाबाई माधवरावांना विसरल्या नाहींत. वडीलकीच्या नात्यानें त्या व सौ. वेणूताई आजरेकर यांनीं माधवरावांच्या प्रत्येक कृतीचें कौतुक केलें. माधवरावांच्या मृत्यूनें त्यांना अत्यंत वाईट वाटलें. आजही त्यांचे आमचे संबंध पूर्वीचेच आहेत.

# रा. विठ्ठलराव घाटे

त्यांचे तिसरे बालमित्र म्हणजे एज्युकेशनल इन्स्पेक्टर रा. विठ्ठलराव घाटे. घाटे लहानपणीं बडोद्यास रावपुऱ्यांत राहात असतांना त्यांची व माधवरावांची ओळख झाली. त्या वेळीं माधवराव इंग्रजी पहिली—दुसरींत व विठ्ठलराव मराठी चौथींत होते. गल्लींतील मुलांत भांडणें झालीं व मारामारी करण्यास दुसऱ्या गल्लींतील विठ्ठलरावांच्या पक्षानें माधवरावांना बोलाविलें. अशा लढाऊ वातावरणांत दोघांची ओळख झाली. पुढें १९०६ मध्यें घाटे इंदुरास गेले व दोघे एकमेकांना विसरून गेले. चारपांच वर्षांनीं घाटे बडोद्यास सुटींत आले तेव्हां कै. कुमारी लक्ष्मीबाई चौधरी यांच्या मार्फत त्यांचा पुन्हा नव्यानें माधवरावांशीं परिचय झाला. त्या वेळीं घाट्यांनीं बऱ्याच कविता लिहिल्या होत्या व ते स्वतःच्या आणि दत्त, टिळक बालकवि वगैरेंच्या कविता सुरेल आवाजांत म्हणत असत. यामुळें भर उन्हाळ्यांत जेव्हां घाटे बडोद्यास येत तेव्हा काव्यगायनाचा अखंड जलसा चाले. घाट्यांचा व चंद्रशेखर कवींचा फार घरोबा. घाट्यांनीं चंद्रशेखरांची व माधवरावांची ओळख करून दिली. हे मित्र चंद्रशेखरांकडे संध्याकाळीं जात. कचेरींतून आल्यावर त्यांच्या माडींत या दोघां तरुणांना आपल्या व आपल्या समकालीन लेंभे, मोगरे, कीर्तिकर, महाजनी, कानिटकर, टिळक, दत्त यांच्या व संस्कृत कवींच्या कविता म्हणून दाखवीत. चंद्रशेखरांकडे जाण्याचा दिवस नसेल तेव्हां रघुनाथराव खऱ्यांच्या माडीवर घाट्यांचें काव्यगायन होई. या तरुण मंडळींच्या तेव्हांच्या आवडत्या कविता म्हणजे मनोरंजनांत तेव्हां प्रसिद्ध झालेल्या गोविंदाग्रजांची मुरली, राजहंस, घुंगुरवाळा, टिळकांचें 'वनवासी फूल' 'पहा उघडिलें हृदयाला' Bee च्या एकदोन निवडक कविता, बालकवींची "सुखशयनीं मी निजलें होतें बाई" माधवानुजांची "या क्रूर माझिया हातीं," दत्तांची "निज-नीज माझ्या बाळा," 'विश्वामित्रीचें कांठी' वगैरे होत. या सर्व मंडळींनीं त्या वेळीं नवीन नांवें घेतलीं. घाटे 'मधुकर' झाले. रामभाऊ 'शरद' रघुनाथराव खरे 'वसंत' पण माधवराव 'माधव'च राहिले.

पुढें त्यांनीं आपल्याला 'माधव जूलियन' असें टोपण नांव घेतलें. माधव जूलियन या नांवाची कथा पुढीलप्रमाणें आहे 'God's Good Man' ही कादंबरी वाचतांना त्यांतील 'जूलियन अॅडलें' ह्या कवि व नाटककार

असणाऱ्या व्यक्तीचें नांव त्यांच्या पूर्वपरिचित मित्रानें त्यांना दिलें. ही व्यक्ति कवि व नाटककार होती. त्यामुळें त्यांतील जूलियन हें नांव आपल्या माधव या नांवापुढें जोडून 'अेम. जूलियन' या नांवानें एक कविता माधवरावांनीं १९१६ सालीं जळगांवच्या काव्यरत्नावलींत प्रसिद्ध केली. 'दिल्जू' या सहीनेंही फर्ग्यूसन कॉलेज त्रैमासिकांत कांहीं कविता प्रसिद्ध केल्या. परंतु पुढें 'माधव जूलियन' हें टोपण नांव कायमचें धारण केल्यावर त्यांनीं 'सिसीलियाना' नांवाचें एक लहानसें इंग्रजी काव्य लिहिलें.

घाटे व माधवराव यांचा पत्रव्यवहार होता. दोघे नवीन कविता लिहिली कीं एकमेकांना पाठवीत व पत्रोत्तरीं आलेल्या कवितांचें परीक्षण करीत. घाटे ग्वाल्हेरीची नोकरी सोडून दक्षिणेंत आल्यावर माधवराव सुट्टींत त्यांच्याकडे जात असत. तेही पुण्याला माधवरावांकडे येत. माधवरावांच्या आग्रहामुळें घाटे रविकिरण मंडळांत आले. १९२४ ऑक्टोबरमध्यें त्या दोघां कवि मित्रांनीं आपल्या निवडक कविता 'मधुमाधव' या नांवानें विठ्ठलराव–वत्सलाबाईंच्या लग्न दिवशीं म्हणजे १८ ऑक्टोबर १९२४ रोजीं प्रसिद्ध केल्या. फर्ग्यूसन कॉलेज सोडल्यावर अमळनेरहून परत आल्यावर माधवराव घाट्यांच्याकडेच राहात होते. आणि पुण्याची जनता माधवरावांकडे बहिष्कृतासारखी पाहात असतां धैर्यानें विठ्ठलराव व वत्सलाबाई दर संध्याकाळीं माधवरावांबरोबर फिरावयास जात. पुण्यास १९२५–२६ मध्यें घाटयांचें घर हें माधवरावांचें विश्रांतिस्थान व रविकिरण मंडळाचें केंद्र असे. आमचें लग्न झाल्यावर आम्ही घाट्यांकडे नगरास व पुढें मुंबईस जात असूं. माधवरावांनीं आपली 'गज्जलांजली' घाटयांना अर्पण केली. राजकारणांत व वाङ्मय क्षेत्रांत या दोघां मित्रांचीं मतें जुळतीं असत. घाटयांच्या कवितांचें संपादन करण्याची माधवरावांची फार इच्छा होती. पण त्यांच्या अकालीं मृत्यूमुळें ती तशीच राहिली! माधवरावांच्या मृत्यूनंतर मीं तार करून विठ्ठलरावांना बोलाविलें. ते तावडतोब आले. मला पहातांक्षणींच त्यांना रडूं कोसळलें.

माधवरावांच्या मृत्यूनंतर वहिवाटीप्रमाणें स्मारक–समिति निवडली गेली. पण विठ्ठलराव त्या समितीवर येईपर्यंत कांहींच काम झालें नाहीं. विठ्ठलरावांनीं व रावसाहेब र. लु. जोशी यांनीं दोन वर्षांत परिश्रम करून वीस हजारांच्यावर वर्गणी जमविली. मुख्यतः त्या दोघांच्या धडाडीमुळें 'डॉ. माधवराव पटवर्धन साहित्यमंदिर' माधवरावांचें स्मारक झालें.

तसेंच ते विठ्ठलरावांच्या निर्व्याज मित्रप्रेमाचेंहि स्मारक आहे. दरसाल माधवरावांचा स्मृति-दिन साजरा करून त्यांची स्मृति जागृत ठेवण्यांत विठ्ठलरावांचेंच मुख्य अंग असतें.

विठ्ठलराव व वत्सलाबाई यांचें घर मला व माझ्या मुलांना अजूनही पूर्वीप्रमाणेंच विश्रांतिस्थान आहे. व माधवराव विठ्ठलरावांची परंपरा आमच्या दोन्ही कुटुंबांनीं व नव्या पिढीनें चालू ठेविली आहे.

माधवराव-विठ्ठलराव दोघेही विनोदी, ते एकत्र आले म्हणजे विनोदाला भरती येई.

एका उन्हाळ्यांत आम्ही नगरला गेलों होतों. तेथें असतांना एक गमतीदार प्रसंग पडला. तो मला अजून आठवतो.

एक दिवस रात्रीं आम्ही सर्व बैठकींत बसलों होतों. बोलतां बोलतां माधवरावांना झोंप आली म्हणून ते तेथेंच आडवे झाले व घोरूं लागले. विठ्ठलराव मला म्हणाले, "वहिनी, आतां मी तुम्हाला गंमत दाखवतों. माधवरावांना आतां खरी झोंप लागली आहे. परंतु ह्यांना जागं आल्यावर जर सांगितलं ना, कीं माधवराव, तुम्हाला गाढ झोंप लागली होती, तर ते निक्षून म्हणतील कीं, "कधीं? मी जागाच होतों. तुम्ही काय बोलत होतां तें मी चांगलें ऐकत होतों." परंतु काय काय बोललों हें मात्र त्यांना सांगतां येणार नाहीं. इतक्यांत माधवराव कुशीला वळले व पुन्हा घोरूं लागले. जरा वेळानें त्यांना काय वाटलें कोणाला ठाऊक ते उठून बसले. इतक्यांत विठ्ठलराव त्यांना म्हणाले "काय माधवराव, तुम्हांला गाढ झोंप लागली होती!" माधवराव म्हणाले, "छे, मी चांगला जागा होतो." आम्ही सर्वच हंसलों.

त्याच्या दुसरे दिवशीं संध्याकाळीं आम्ही सर्व फिरायला निघालों. विठ्ठलराव त्या दिवशीं नवीन धोतर नेसले होते. माधवराव व विठ्ठलराव पुढें व मी व वहिनी मागें असे आम्ही चाललों होतों. इतक्यांत माझें लक्ष सहज विठ्ठलरावांच्याकडे गेलें.—चालतांना त्यांच्या धोतराचा कडकड आवाज होत होता.— मला हसूं आवरेना; माझी त्यांच्याशीं नुकतीच ओळख झाली होती त्यामुळें मोकळेपणानें मला हंसतां येईना व कारणही सांगतां येईना. परंतु शेवटीं माझ्या मनावर माझा ताबा राहिला नाहीं. मी मोठ्यानें हंसलें. सर्वच माझ्या-

कडे पाहूं लागले. शेवटीं मी वहिनींना सांगितलें कीं, "अहो, तें पाहा विठ्ठलरावांच्या धोतरावर कसलें चित्र!! तें पाहून वहिनीही हसूं लागल्या. माधवराव रस्त्यांतच विठ्ठलरावांच्या मागें येऊन उभे राहिले व तेही हसूं लागले. शेवटीं विठ्ठलरावांनीं मागें वळून पाहिलें तो त्यांच्या पोटरीवर चाईचें एक मोठें रंगीत चित्र! माधवरावांनीं एकदां विठ्ठलरावांच्याकडे पाहिलें व म्हटलें, "रविकिरण मंडळाच्या नांवलौकिकाला साजेसेंच झालें हें!"

## रा. श्रीधर रामजी म्हणजे बापूराव शिंदे

सन १९२८ च्या जानेवारी महिन्याच्या २१ तारखेस सुधारकाची पहिली आवृत्ति प्रसिद्ध झाली. तें पुस्तक त्यांनीं त्यांचे स्नेही रा. श्री. रा. शिंदे म्हणजे बापूराव शिंद्यांना अर्पण केलें आहे. त्या अर्पणपत्रिकेंतील उतारा मी जसाच्या तसा खालीं देतें. त्यावरून माधवरावांना बापूरावांच्या बद्दल किती प्रेम व आदर होता हें दिसून येईल.

'तेव्हां अशा अनेक सुखस्मृति आहेत कीं, एकान्तांतच त्यांचें चिंतन करण्यांत मौज वाटते. जाहीर करायची झाल्यास एकच गोष्ट करितां येईल. कवीशीं परिचय झाल्यानें वेळीं अवेळीं त्याच्या गरमागरम कविता वाचून त्याच्यावर न्याय्य पण प्रोत्साहक अभिप्राय देण्याची नाजूक कामगिरी आपण किती चतुराईनें पार पाडीत होतां, याची आठवण होऊन मनाला अजून कौतुक वाटतें. परन्तु तो काळ बदलूनही बारा वर्षें झालीं. प्रस्तुत काव्यच पाहा. आपण आतां मुद्रित-स्वरूपांतच प्रथम (व लहरीप्रमाणें) वाचाल. आपली स्नेहाळ कृपा अधिकृत राहिली असली तरी माझ्या प्रकृतींत अन्तर पडलें आहे. हट्ट चालवून घेण्यांतच स्नेहाची प्रतीति पाहणारी मधुवयाची नव्हाळी आतां राहिलेली नाहीं. हट्टच करायचा तर बापूराव, हें काव्य आपणांस सादर समर्पण करून माझाच मी सन्मान करून घेणें मला रुचेल. बाकी यांत औचित्यही आहे. सुधारक काव्यच एखाद्या केवळ आश्रयदाता म्हणून सर्वगुणसंपन्न अशा धनिकाला किंवा राजमान्य तऱ्हेदार व्याख्यानबाज सुधारकब्रुवाला अर्पण करण्यापेक्षां एखाद्या अज्ञात पण तत्त्वनिष्ठ व हृदयानें उदार, सहिष्णु, प्रेमळ व गैरसमज करून घेणार नाहीं अशा सुधारकास अर्पण केलें तर—

बापूराव–माधवरावांची ओळख १९१२ सालीं सौ. शांताबाई कशाळ-करांनीं करून दिली. तेव्हां माधवराव देवांच्या चाळींत राहात होते. वास्तविक बापूरावांच्या व त्यांच्या वयांत बरेंच अंतर. रा. शिंदे माधवरावांच्याहून वडील. परंतु त्यांच्या स्नेहांत वय आडवें आलें नाहीं. त्यांच्या घरची सर्व मंडळी माधवरावरांना आपल्यांतलेच समजत.

माधवरावांची व बापूरावांची ओळख झाली तेव्हां बापूराव नुकतेच बी. ए., एलएल. बी. होऊन बडोदें संस्थानांत नोकरीसाठीं खटपट करीत होते. पुढें त्यांची बडोद्याला डिस्ट्रिक्ट जज् म्हणून नेमणूक झाली. आतां त्यांनीं पेन्शन घेतलें आहे व ते बडोदें मुक्कामीं राहातात.

शिंद्यांच्या आईचें रामभाऊंच्या आईप्रमाणेंच माधवरावांवर प्रेम होतें. माधवराव त्यांच्या घरीं चहा घेत. वेळप्रसंगीं जेवीतही. आईना मोठें नवल वाटे. माधवराव ब्राह्मण. त्यांना आपण कसा चहा द्यावा, कसें जेवायला घालावें, असा संकोच आईना वाटे. किंबहुना त्यांचें हें करणें आईना आवडतही नसे. परंतु पुढें सरावानें त्यांना त्याचें कांहीं वाटेनासें झालें. त्या माधवरावांवर आपल्या मुलाप्रमाणें प्रेम करूं लागल्या. बडोद्यास माधवराव गेले कीं आईशीं तासभर बोलल्याशिवाय दुसऱ्या व्यवसायाला लागत नसत.

बापूरावांच्या मुलांना माधवरावांचा फार लळा होता. माधवरावांची 'चिमुकली शांता' ही कविता बापूरावांची वडील मुलगी 'शांताबाई'वर केलेली आहे. बापूराव बहुश्रुत व कवीही आहेत. १९४० जूनच्या 'सह्याद्री' मासिकांतील 'टू. एम. टी. पी.' ही कविता दुसऱ्या कुणीं लिहिली नसून ती बापूरावांचीच आहे. माधरावांची प्रत्येक कविता वाचून त्यावर ते फार मार्मिक टीका करीत. ज्या वेळीं माधवरावांशीं बापूरावांची ओळख झाली त्या सुमारास लगेच बडोद्याला ते मोठे सरकारी अधिकारी झाले. परंतु माधवराव–बापूराव आपापसांत त्या वेळीं व त्यानंतरही बरोबरीच्या नात्यानें वागत. माधवरावांना शिंदे यांच्याविषयीं फार आदर होता. सौ. कमलाबाई शिंदे म्हणजे शिंद्यांच्या पत्नी माधवराव बडोद्याला येणार असें कळलें कीं त्यांची व्यवस्था करण्यांत गढलेल्या असत. आमच्या लग्नापूर्वीं माधवरावांची दिवाळीची व उन्हाळ्याची सुटी घाटे, मराठे, शिंदे यांच्यांत वांटलेली असे. त्यांचीं घरें म्हणजे माधवरांचें स्वतःचें घर होतें.

## राजाभाऊ कर्वे-( नीलकंठ श्रीधर कर्वे )
व
## शाहूराव कानिटकर

राजाभाऊ कर्वे हे माधवरावांचे बालमित्रच होत. माधवराव बडोद्याला कॉलेजांत असतांना राजाभाऊ व माधवराव देवांच्या चाळींत एका खोलींत राहात असत. राजाभाऊ मॅट्रिक झाले व ते धंद्याला लागले. परन्तु माधवराव या बालमित्राला केव्हांही विसरले नाहींत. राजाभाऊ व सौ. कमळाबाई वहिनी यांचें घर म्हणजे आमची पुण्यांतील विसाव्याची जागा.

माधवराव १९१८ सालीं फर्ग्यूसन कॉलेजांत आले व ते तेथें प्रोफेसर झाले. तेव्हां त्यांनीं नातूंच्या चाळींत बिऱ्हाड केलें. त्याच सुमारास धंद्याच्या निमित्तानें राजाभाऊही पुण्याला येऊन राहिले. ते माधवरावांच्यांकडे झोंपायला जाऊं लागले. पुढें १९१८ च्या सुमारास राजाभाऊंचें लग्न झालें व हा परिचय दृढ होत गेला. राजाभाऊंच्या पत्नी कमळाबाई यांनीं आपल्या थोरल्या दिराप्रमाणें माधवरावांना मान दिला. जुनी ओळख नव्यानें पुन्हा कमळाबाईंच्या आगमनानें दाट झाली. आमच्या लग्नानें ती अधिक वाढली. माधवरावांच्यानंतर कमळाबाई-राजाभाऊंचें घर म्हणजे माझी विसाव्याची जागा बनली.

राजाभाऊंच्या भगिनी ताई यांना माधवराव आपली धाकटी बहीण समजत. ते बडोद्याला होतें तोंवर व पुढें भडोचला मधून मधून जात तेव्हांही माधवराव भाऊ म्हणून दिवाळींत भाऊबिजेच्या दिवशीं ताईंना भाऊबीज घालीत. हें नातें पुढें तीं मंडळी पुण्याला आल्यानंतरही कायमच होतें.

## शाहूराव कानिटकर

बापूसाहेबांनीं आपल्या कन्येचें लग्न लहानपणींच केलें होतें. पुढें बापूसाहेब उदवाड्याला मामलेदार असतांना त्यांची व ताईंचे पति शाहूराव कानिटकर हे सासुरवाडी आले असतां त्यांची ओळख झाली. ओळख जसजशी वाढत चालली तसतसे माधवराव त्यांच्याशींही बापूसाहेबांच्याप्रमाणें वागूं लागले. शाहूरावांच्या घरीं पुण्याला जेव्हां जेव्हां माधवराव जात तेव्हां तेथें माधवराव आपल्या कविता शाहूरावांना वाचून दाखवीत व काव्यचर्चा करीत.

शाहूराव पुष्कळ श्रीमंत. परंतु मार्मिक, हुशार व प्रेमळ होते. त्यामुळें शाहूरावांशीं माधवरावांचा संबंध दृढ होत चालला.

१९१८ सालीं माधवराव पुण्याला आले. शाहूराव पुण्याचेच रहिवासी. त्यामुळें माधवरावांचें त्यांच्याकडे जाणेंयेणें पूर्वीप्रमाणेंच राहिलें. १९२१ च्या सुमारास शाहूराव धंद्यांत बुडाले, त्यांच्या घरादाराचें दिवाळें निघालें. त्यांतच माधवरावांचे ४००० रु. बुडाले. पैसे गेले तेव्हां माधवरावांना वाईट वाटणें व त्यांच्या मनाला धक्का बसणें साहजिक होतें. परंतु शाहूरावांना गरिबी आली., माधवराव आपलें कर्जाचें दुःख विसरून गेले. माधवराव व शाहूराव शेवटपर्यंत स्नेहीच राहिले. कर्जानें त्यांच्या स्नेहांत अंतर पडलें नाहीं.

शेवटच्या दुखण्यांत शाहूराव सकाळसंध्याकाळ येत. माधवरावांची झोंप शेवटीं पार उडाली होती; माधवरावांच्या रात्रीच्या रात्री जागून जात; शाहूराव त्यांच्या डोक्याला तेल चोळीत. त्यांच्या पायांवर सूज आली होती. पाय अवजड झाले होते, ते दाबले म्हणजे त्यांना बरें वाटे; शाहूरावांनीं तासचेतास पाय चोळीत व दाबीत बसावें.

शाहूराव गेले म्हणजे कित्येक वेळीं माधवरावांच्या डोळ्यांत पाणी उभें राही. ते म्हणत, "शाहूरावांच्या प्रेमळपणापुढें माझे पैसे बुडाल्याच्या दुःखाचा मला विसर पडतो. त्यांच्या प्रेमळ अंतःकरणापुढें पैशाची मातब्बरी मला वाटत नाहीं."

## प्रा. शं. के. कानेटकर

प्रा. शं. के. कानेटकर—कवि गिरीश ह्यांची ओळख माधवरावांशीं १९१८ सालीं कवि अनंततनय यांच्या घरीं झाली. रविकिरण मंडळामुळें पुढें त्या ओळखीचें दाट परिचयांत रूपांतर झालें. माधवराव जेव्हां फर्ग्यूसन कॉलेजमध्यें होते तेव्हां शंकरराव न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक होते. माधवराव जेव्हां फर्ग्यूसन कॉलेजमधून निघाले तेव्हां शंकररावांनीं त्यांना बरीच मदत केली. ज्या पुण्यानें माधवरावांना वाळींत टाकलें होतें त्या पुण्यांत त्यांना अगदीं थोड्या घरांत प्रवेश मिळत होता. त्यांत शंकररावांचें घर प्रामुख्यानें येतें. सौ. माई म्हणजे शंकररावांच्या पत्नी सौ. उमाबाई कानेटकर या दोघांही पतिपत्नींनीं माधवरावांच्या पडत्या काळांत त्यांना पुष्कळ मदत केली.

आमच्या लग्नाच्या वाटाघाटी ज्या वेळीं चालल्या होत्या त्या वेळचे शंकरराव अजून मला डोळ्यांपुढें दिसतात. तेव्हां शंकरराव न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाचें काम करीत होते. एक दिवस भर दुपारीं दोन वाजतां शंकरराव अचानक बाबांच्याकडे आलेले मीं पाहिले. ते कशाकरतां आले होते त्याची कल्पना मला तेव्हां नव्हती. नंतर मला समजलें कीं, ते लग्नासंबंधानेंच कांहीं तरी बोलणें करण्याकरतां बाबांच्याकडे आले होते. आमचें लग्न ठरविण्यांत शंकररावांचेंही अंग होतें. शंकरराव अत्यंत प्रेमळ व त्यांना माणसाचें अगत्य फार अशीच शंकररावांची ओळख माधवरावांनीं मला करून दिली. पुढें लग्नानंतर मी कॉलेजांत होतें तेव्हां माझें जाणें–येणें शंकररावांच्याकडेच जास्त असे.

माधवराव आजारी असतांनाची गोष्ट. आम्ही जेव्हां कोल्हापूरहून पुण्याला आलों तेव्हां वाटेंत सातारला माधवरावांचे स्नेही म्हणजे वेस्टर्न इंडियाचे इन्स्पेक्टर रा. काशीकर यांच्याकडे उतरलों होतों. माधवराव माडीवरील दिवाणखान्याच्या दारांत दाराला टेंकून उभे होते. शंकररावांच्यासंबंधींच आमचें बोलणें चाललें होतें. माधवरावांच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें व ते आवेशानें म्हणाले, "काशीकर, त्यांच्यांत जरी कांहीं थोडे दोष असले आणि दोषांशिवाय मनुष्य विरळा. म्हणून त्यांच्यांतील प्रेमळपणा मी विसरणें शक्य नाहीं. त्यांच्या स्नेहमय अंतःकरणाची जाणीव मला पूर्ण आहे."

## प्रा. श्री. बा. रानडे

माधवराव ज्या वेळीं फर्ग्यूसन कॉलेजांत होते तेव्हांच प्रा. रानडयांची म्हणजे नानांची माधवरावांशीं ओळख झाली. ती कशी झाली ह्याबद्दल त्यांनीं १९३९च्या डिसेंबरमध्यें जो 'पूर्णिमे' चा अंक प्रसिद्ध झाला होता त्या अंकांत 'पिवळी जुनी कविता वही' अशा मथळ्याखालीं जो लेख लिहिला आहे त्यांत त्याचा उल्लेख आहे. त्याच अंकांतून उद्धृत केलेली माहिती मी येथें देतेंः—

'सन १९१८–१९१९ सालीं सदाशिव पेठेंतील परांजपे बोर्डिंग हाऊसमध्यें माधवराव राहात. ते फर्ग्यूसन कॉलेजांतील बडे विद्वान् प्रोफेसर म्हणून मी त्यांच्याशीं बोलण्यास धजलों नाहीं. आणखी एक वर्ष निघून गेलें. नाट्यछटाका

दिवाकरांनीं माझी त्यांच्याशीं ओळख करून दिली. कवि अनंततनय यांच्या घरीं रविवारीं सकाळीं पुण्यांतील कवि भेट देऊन जात. तेथें त्यांची एकदोनदां गांठ पडली. महाराष्ट्र शारदा मंदिराच्या बैठकीस हजर राहून रा. द. ल. गोखले यांच्या बरोबर माधवराव निमूटपणें बसून राहात. तरीही विशेष परिचयाचा प्रसंग आला नाहीं व माधवराव कविता लिहीत असतील त्याची पुसट कल्पनाही माझ्या मनाला नव्हती. एक दिवस माधवरावांनीं आपल्या राहात्या खोलींत मला चहाला बोलाविलें. त्या फर्ग्यूसन कॉलेजजवळच्या राहतेकरांच्या बैठ्या चाळींतल्या खोलींत मी सकाळीं सातच्या सुमारास थंडींत कुडकुडत गेलों. त्या खोलींत आवश्यक तेवढ्या वस्तु टापटिपीनें मांडलेल्या दिसत होत्या. चहा झाल्यावर माधवरावांनीं टेबलाच्या खणांतून हलकेंच ही 'कविता–वही' काढली व माझ्या हातांत साशंक मनानें दिली. ह्या चिमुकल्या वहींतील पंधरावीस कवितांत माधवरावांची तत्कालीन व भावी सर्व वैशिष्ट्यें बीजरूपानें होतीं. कवितांबद्दल मी आवेशानें अनुकूल अभिप्राय देऊन 'कांहीं प्रसिद्ध केल्या कीं नाहीं' असें विचारतांच माधवरावांनीं 'बडोदा मिसेलेनी' त्रैमासिकांतील कवितेचें एक ( कटिंग ) कात्रण दाखविलें.

माधवराव त्या वेळीं अत्यंत हळुवार झाले होते. "माझ्या त्या एकाच कवितेच्या प्रसिद्धीकरणानें मला अत्यंत मनस्ताप मात्र झाला; कविता प्रसिद्ध करायच्या नाहींत, कोणाला दाखवावयाच्या नाहींत, पण तुम्हांला आवडतात कीं नाहीं याची मला उत्कंठा होती." असें ते म्हणाले. मी ती वही त्यांच्याकडून मागून घरीं नेली व आम्हीं दोघांनीं पुनः पुनः वाचून एक बेत कायम केला आणि त्याप्रमाणें पुढील रविवारच्या शारदा-मंदिराच्या बैठकींत माधवरावांना त्यांतील कांही कविता वाचण्यास आग्रह केला. मध्यभागीं तक्क्याशीं अनंततनय अध्यक्षस्थानीं बसले होते व त्या माडींत बिछायतीवर दोन्ही बाजूंना भिंतीशीं रेलून पुढें कवितांच्या वह्या ठेवून कवि बसले होते. नवीन कवींच्या ओळखी, आठवड्यांतील ताज्या गरम कवितांचें वाचन व ठराविक वादविवाद संपत आल्यावर मीं माझ्याजवळ बसलेल्या माधवरावांच्यापुढें वही टाकून कविता वाचण्याचा आग्रह केला. माधवरावांनीं तीनचार कविता वाचल्या तें गज्जल वृत्त, ते साधे शब्द, मध्येच झिंचकवणारे पर्शियन शब्द, ती जोरदार पण रांगडी भाषा, ती निर्भीड पण मन हलवणारी विचारसरणी, तरुण मनाच्या गूढ, पवित्र व मनांतल्या मनांतच राहणाऱ्या भावना, 'कौमार्य-

स्मित,' 'एक घाव,' 'चिमकुली शांता,' 'श्यामा रजनी,' 'प्रेमाची परीक्षा नको,' 'पिरोजा कोला' (कुमारी पिरोजा) अशा प्रकारच्या कविता ऐकत मी इकडे तिकडे आशेनें पाहात होतों.

गिरीश, यशवंत, मनोरमाबाई यांच्याशिवाय इतर कोणालाही त्या कवितांचें कौतुक वाटलें नाहीं. माधवरावांनीं वही मिटली. इतर कवितांचें वाचन सुरू झालें. माझी निराशा झाली.'

पुण्यास फर्ग्यूसन कॉलेजांत प्रोफेसर असतांना माधवरावांच्या विचारावर व राहांणीवर जर कुणाचा विशेष परिणाम घडला असेल तर तो नानांचा. वास्तविक माधवराव लहरी, एकांतप्रिय. त्याच्या उलट नाना निदान त्या वेळीं तरी उत्सवमूर्ति. नानांनीं मनोरमाबाईशीं प्रेमविवाह केला असल्यानें ते त्या वेळीं तरुणांचे हीरो होते. तसे माधवरावांचेंही होतें. तरुण-तरुणींनीं एकत्र यावें, चहापान करावें, मोकळेपणानें संभाषण करावें, सहलीस जावें अशी नानांची नेहमीं खटपट असे. त्यांच्या घरीं दिवाणखान्यांत व स्वयंपाकघरांत हळुहळू जी मंडळी जमली त्यांत माधवराव प्रमुख होते. नानांनीं नित्य नव्या कल्पना काढाव्या व बेत करावे व माधवराव वगैरे मंडळींनीं त्यांत हिरीरीनें भाग घ्यावा, असें नेहमीं चालें. रविकिरणमंडळाचें प्राथमिक स्वरूप जो "सन्‌टी क्लब" म्हणजे रविवारीं दुपारीं मित्र-मंडळींनीं एकत्र येऊन चहा घ्यावयाचा, कविता म्हणायच्या, चर्चा करायची ही कल्पनाही नानांचीच. डोंगरावर सकाळींच फिरायला जावयाचें, पावसाळ्यांत छत्र्या न घेतां बोरघाटांत सहली करावयाच्या, ही कल्पना व तपशील सुद्धां नानांच्याच डोक्यांतील. नानांच्या या संप्रदायांत छचोरपणा किंवा थिल्लरपणा कधींच नव्हता; उलट एकंदर वातावरण इतकें बौद्धिक व संयत असे कीं, उथळपणानें या मंडळांत शिरूं पाहाणारे कांहींजण फार दिवस टिकले नाहींत. या खुल्या रोमँटिकपण, बौद्धिक वातावरणांतच माधवरावांच्या सुधारकी मतांची व प्रेम-काव्याच्या बीजांची वाढ झाली. माधवरावांच्या आयुष्यांतील हीं चारपांच वर्षें निर्भेळ आनंदाचीं, उमेदीचीं व महत्त्वाकांक्षेचीं होतीं. नाना रानड्यांना त्याबद्दल बरेंच श्रेय दिलें पाहिजे.

रा० द. ल. गोखले व नाना रानडे यांच्याबद्दल बोलतांना माधवराव नेहमीं म्हणत, "मी त्यांच्याइतका हुशार नाहीं. आमच्या मंडळांत हुशार म्हणजे गोखले आणि नानाच आहेत."

नानांच्या दोन मुली सुधा व कुन्दा यांवर माधवरावांचें फार प्रेम ! 'नाना बाहुली माझी' हें बालगीत कुन्दाकरितांच माधवरावांनीं लिहिलें. नानांच्या प्रथम पत्नी सौ. मनोरमाबाई यांच्याबद्दल माधवरावांना एक प्रकारचा आदर वाटे. कै० मनोरमाबाई माहेरच्या देशस्थ, शिवाय बी. ए. झालेल्या. नानांनीं देशस्थ मुलीशीं लग्न केलें. त्या काळांत ही केवढी मोठी सुधारणा ! ह्या कारणानेंही माधवरावांना नाना व जिजी–मनोरमाबाई यांबद्दल आदर वाटे. माझ्या लग्नाच्या आधीं १९२५ सालीं त्या वारल्या. त्यामुळें त्यांचें वर्णन फक्त मी माधवरावांच्या तोंडून अनेक वेळां ऐकलें होतें.

१९२९ सालीं नानांचें लग्न कु. गीताबाई-पिल्लूताई हेर्लेकर, बी.ए. यांच्याशीं म्हणजे कै० काशीबाई हेर्लेकरांच्या कन्येशीं झालें. आमची जुनी ओळख नव्यानें कायम झाली.

## रा. गं. दे. खानोलकर

माधवरावांची व खानोलकरांची ओळख कशी झाली याबद्दल स्वतः खानोलकरांनीं मला लिहिलेल्या पत्रावरून समजून येईल.

'माधवरावांची-माझी भेट अमळनेरास १९२४ च्या जुलैमध्यें झाली. डे. ए. सोसायटीनें त्यांस सक्तीनें एक वर्षपर्यंत सेवानिवृत्त व्हावयास लावलें होतें. ज्या कारणांसाठीं ही निवृत्ति पत्करावी लागत होती, त्या कारणाची बरीवाईट चर्चा माधवराव अमळनेरास येऊन पोहोंचण्याआधींच प्रताप हायस्कूलच्या शिक्षकमंडळींत व त्यांच्याच शेजारीं असलेले 'तत्त्वज्ञान मंदिरांतील विद्यार्थी व फेलोज्' यांमध्यें चालू होती, याचें बरेंचसें कारण पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजामधील कांहीं विद्यार्थी 'मंदिरांत' होते. आणि त्यांतून माधवरावांच्या विरोधी पक्षाच्या भोंवतीं घोटाळणाऱ्यांपैकीं ते असल्यामुळें 'पटवर्धन पुराण' विशेष रवरंग करून सांगण्यांत त्यांस विशेष धन्यता वाटे. या पुराणश्रवणाचा व त्याच सुमारास रविकिरण मंडळाच्या प्रसिद्ध झालेल्या 'किरण' पुस्तकावर टीकाकारांनीं — वा. अ. भिडे विशेषतः— जी झोड उठविली, त्यामुळें माझें 'माधवरावां'बद्दल अतिशय प्रतिकूल मत झालें होतें.

छांदिष्ट व स्वैरवृत्तीचा हा कवि आहे अशीच माझी समजूत झाली होती. जवळजवळ दोन महिनेपर्यंत ते ज्या रेल्वेलाईनवरून गांवाबाहेर फिरावयास जात, त्याच लाईनवरून त्याच वेळेस मी व माझे स्नेही कोल्हापूरचे भाऊराव आपटे फिरावयास जात असूं; पण एका शब्दानेंहि त्यांच्याशीं आम्ही बोली भाषण केलें नाहीं. उलट त्यांची व त्यांच्या कवितांची टवाळीच आम्ही करीत असूं. माधवराव या वेळेस अत्यंत एकाकी जीवन चालवीत असत. यंत्राप्रमाणें ते चालले होते. अमळनेरच्या मंडळींनीं त्यांना शिक्षक म्हणून पत्करलें. तें रँ. परांजपे यांच्या उत्कृष्ट प्रशस्तिपत्रामुळें, मनांतून माधवरावांबद्दल त्यांना प्रारंभीं फारसा आदर वाटत नसे. सगळीच मंडळी जेवढ्यास तेव्हढा त्यांच्याशीं संबंध ठेवीत. माधवरावांनाहि त्याबद्दल तितकेंसें कांहीं वाटत नसे. ते आपल्या लेखनांत गढून गेलेले असत. अध्यापनाचें काम आटोपलें कीं सरळ आपल्या खोलींत येऊन कामास लागावें, कंटाळा आला कीं तालिमखान्यांत जाऊन मल्लखांब करावा; तासभर फिरावयास जावें, फिरून आलें कीं पुन्हा लेखनास सुरुवात. मनाला दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींत वृथा गुंतूं द्यावयाचें नाहीं असाच जवळ-जवळ निश्चय केलेला. 'फार्सी–मराठी कोश' या वेळेस छापला जात होता. त्याचीं मुद्रितें तपासणें चालू होतें आणि त्याबरोबरच जुनें ऐतिहासिक व काव्यवाङ्मय यांचेंहि वाचन चालू होतें. कोशांत अपुरेपणा राहूं नये यासाठीं धडपड चालली होती. मनाला कामांत इतकें जुंपल्यानंतर इतरत्र भटकायला किंवा चार महिन्यांपूर्वीं घडलेल्या घटनांचा उगाच विचार करा-वयाला सवडच कुठून मिळणार ! त्यांच्या या वृत्तीनेंच मला त्यांजकडे ओढलें. आपण समजतों त्याहून निराळ्या जातीची ही व्यक्ति आहे, असें वाटूं लागलें आणि मी होऊनच एके संध्याकाळीं ज्या रेल्वेलाईनवरून ते एकटेंच फिरावयाला जात त्याच रेल्वेलाईनवर माझी त्यांना ओळख करून दिली व मीं त्यांची करून घेतली.

अमळनेरांतील त्यांच्या त्या एकाकी जीवनांत मीं प्रवेश केला. आणि मग स्नेहासाठीं, सहवासासाठीं, सहविचारासाठीं आसावलेलें त्यांचें अंतःकरण जें फुललें त्याचें वर्णन काय करावें ? अमळनेरास असेपर्यंत ते आणि मी एकत्र नाहीं असा एकहि दिवस गेला नाहीं. मीं त्यांना तेथील मंडळींत ओढलें. मंडळींत उठणें बसणें सुरू झाल्यावर बऱ्याच जणांच्या मनांतल्या आढी दूर झाल्या. 'कोशाच्या' कामाबरोबर थारेपालट व मनाला विरंगुळा म्हणून

'अपुऱ्या' स्थितींत बरींच वर्षे पडलेलें 'विरहतरंग' त्यांनीं लिहावयास घेतलें. त्यांचें मन यांत इतकें रंगून गेलें होतें कीं, आपल्या बदललेल्या परिस्थितीचीही त्यांना आठवण राहात नसे. वास्तविक या वेळचा त्यांचा काळ मानसिक दृष्टया अत्यंत तापदायक व आर्थिक दृष्टया हलाखीचा होता. स्नेहाखातर एका व्यक्तीला कर्ज दिल्यामुळें चार हजारांचें कर्ज फेडण्याचें नशिबीं आलें होतें. स्वतःचा खर्च चालवायचा. कर्जाचे हप्ते भरावयाचे. प्रोफेसरी मिळाली म्हणून मोठा विमा उतरला होता, त्याचें हप्ते भरायचे हें सारें शंभर रुपये मासिक वेतनांत करायचें. या सर्वांचे पायीं वैयक्तिक सुखें कित्येक वर्षेंपर्यंत त्यांना दूर लोटावीं लागलीं. पण त्याचा इतिहास वेगळाच आहे. अमळनेरला माझा जडलेला स्नेह आमरण राहिला. माझ्या वडील बंधूप्रमाणें मी त्यांना मानी. तेही मला धाकट्या बंधूप्रमाणे वागवीत. किंबहुना आपल्या बंधूकडे कधीं मायेनें पाहिलें नसेल, पण त्यांनीं अखेरपर्यंत मजकडे पाहिलें. एका कुटुंबांतील मायेच्या माणसांप्रमाणें आम्हीं वागलों. परस्परांच्या आयुष्यांतील कोणतीही बाब परस्परांनीं परस्परांच्यापासून लपविली नाहीं इतकी एकात्मता आम्हांत होती.'

खानोलकर आम्हाला घरच्यासारखें वाटत. आम्हा दोघांत कांहीं मतभेद झाला म्हणजे त्यांनीं आमचा समेट पुष्कळ वेळीं करावा. ते माधवरावांची समजूत घालीत. माझीही चूक असल्यास मला समजावून सांगत.

माझ्या लग्नाच्या आधीं व नंतरही ते पुण्याला आमच्याकडे वारंवार येत. माधवरावांचें अव्यवस्थित पडलेलें सामान नीटनेटकें लावून ठेवण्याचें काम तात्या खानोलकर मनापासून करीत. त्यांच्या टेबलावरचा दिवा पुसणें, सायकल स्वच्छ करणें कित्येक वेळीं खोलीत केर सांचला असला तर तो देखील काढून टेबल व फर्निचर पुसण्याचें कामही ते करीत—भक्तिभावानें व मोठ्या प्रेमानें करीत. माधवरावांचें कोणतेंही काम करण्यांत तात्यांना कमीपणा वाटला नाहीं. असें तात्यांचें निःसीम प्रेम माधवरावांच्यावर होतें.

## प्रो. द. ल. गोखले

प्रो. द. ल. गोखले यांचा माधवरावांशीं परिचय १९२१ चे सुमारास स्थापन झालेल्या शारदा मंदिरांत झाला. त्या वेळीं गोखले हे फर्ग्युसन कॉलेजांत इंग्लिशचे लेक्चरर होते. व माधवराव फर्ग्यूसनचे लाईफमेंबर आणि

फारसीचे व इंग्रजीचे प्रोफेसर होते. ही ओळख वाढण्याला आणखी कारण म्हणजे रविकिरण मंडळ. त्यामुळें ह्या दोघांच्या भेटी गिरीश, यशवंत ह्यांच्या घरीं वारंवार होऊं लागल्या. बुद्धिमत्ता व इंग्रजी वाङ्मयाचा खोल अभ्यास ह्याबाबतींत दोघांचें गोत्र एक त्यामुळें रविकिरण मंडळांतील इतर सभासदांपेक्षां त्या कॉलेजमधील समव्यवसायी मित्रांचें जास्त जमे. पुढें माधवराव न्यू इंग्लिश स्कूल बोर्डिंगचे सुपरिंटेंडेंट झाल्यावर गोखल्यांचा बराच काळ माधवरावांच्याकडेच जाई.

माधवरावांच्यावर फर्ग्यूसन कॉलेजमध्यें काहूर उठलें, त्या वेळीं माधवरावांनीं कोणतें धोरण स्वीकारावें याबद्दल त्यांच्या मित्रमंडळींत दुमत झालें. गोखले त्या वेळीं माधवरावांच्या विरुद्ध बाजूचे म्हणजे माधवरावांनीं लोकमताकरितां कित्येक गोष्टी स्वतःच्या मनोदेवतेविरुद्ध कराव्या अशा मताचे होते. परंतु ही सर्वांच्या मनाची कसोटी पाहाणारी बाब सोडल्यास गोखले यांस माधवरावांसंबंधीं व माधवराव यांस गोखल्यांसंबंधीं नितांत आदर आणि जिव्हाळा होता. माधवरावांना जीवनाचा कटु अनुभव आल्यानंतर पुढें गोखल्यांनाही मनुष्यस्वभावाचा कटु अनुभव आला. माधवरावांनीं त्याबद्दल अत्यंत सहानुभूति दाखविली. सुधारक काव्यांतील कांहीं भागास गोखले यांचे कटु अनुभव आधारभूत झाले आहेत. आम्ही कोल्हापूरला गेल्यानंतर माधवराव आवर्जून सांगलीस जाऊन गोखले व त्यांच्या पत्नी सौ. सुमतीबाई यांची भेट घेत होते. किंबहुना आम्हांला कोल्हापूरला कंटाळा आला कीं आम्ही सांगलीला गोखल्याच्याकडे जात होतों. सुटीचे दिवस गप्पा-विनोदांत घालविले कीं, माधवराव ताजेतवानें होऊन कोल्हापूरला येत. गोखल्यांनीं जीवनांतील कटु अनुभवानंतर काव्याकडे कायमची पाठ फिरविली; परंतु माधवराव-गोखल्यांची भेट झाली कीं दोघेंही पहिल्या वृत्तीनेंच वागत.

माधवराव आजारी झाल्यानंतर शेवटच्या दिवसांत गोखले दोनदां भेटायला आले. त्यांची शुश्रूषा करण्यांत त्यांनीं मला मदत केली. मला धीर दिला. माधवरावांच्या निधनसमयीं कित्येक वर्षें स्तब्ध असलेली गोखल्यांची लेखणी फिरून बोलली. त्यांचा लेख घाट्यांच्या खालोखाल हृदयस्पर्शी आणि मार्मिक झाला होता.

## प्रा. श्री. के. क्षीरसागर

प्रा. क्षीरसागर हे माधवरावांचे वाङ्मयीन स्नेही होत. त्यांची व माधवरावांची प्रथम भेट त्या दोघांचे स्नेही प्रो. द. ल. गोखले यांच्यामुळें झाली. त्या वेळीं क्षीरसागर फर्ग्यूसन कॉलेजांत शिकत होते व माधवराव तेथेंच प्रोफेसर होते. विद्यार्थी असतांना क्षीरसागरांना काव्याची फारशी गोडी नव्हती, किंबहुना काव्याचे ते द्वेष्टे होते असें म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. क्षीरसागर फर्ग्यूसनमध्यें असतांनाच रविकिरण मंडळाचा "ग्रुप" शारदा मंदिरांतून डोकें वर काढीत होता. १९२४ च्या सुमारास रा. गोखले यांनीं 'किरण,' 'उषा' 'काव्यविचार' हीं रविकिरण मंडळाचीं पुस्तकें क्षीरसागरांना 'सप्रेम भेट' म्हणून दिलीं आणि त्या पुस्तकांमुळें आधुनिक मराठी काव्यासंबंधीं क्षीरसागरांना आस्था वाटूं लागली. परंतु त्यांतल्या त्यांत माधवरावांच्या काव्याचा परिणाम त्यांच्या मनावर फार झाला. त्यांना त्या काव्यांतून कांहीं अपूर्व ओढ वाटूं लागली. विशेषतः त्यांची 'मिलीण न तूं सुंदरी' 'आगोट लागून ही तर्र जाहली धरणी' वगैरे कवितांनीं तर ते अक्षरशः वेडे झाले होते. त्यांना आजपर्यंत माधवरावांची जी माहिती झाली नव्हती ती ह्या त्यांच्या काव्यरूप आत्म्याच्या दर्शनानें झाली आणि माधवरावांची ओळख परत नव्यानें करून घ्यावी असें त्यांना फार फार वाटूं लागलें. त्याच सुमारास माधवरावांना फर्ग्यूसन कॉलेज सोडावें लागलें होतें. त्यामुळें ओळख करून घेण्याची जिज्ञासा जरी तृप्त झाली नाहीं तरी माधवरावांच्या काव्याचें वाचन व आपल्या मित्रमंडळांत प्रसार रा. क्षीरसागर यांनीं चालूच ठेवला.

माधवराव अमळनेरला गेल्यावर मधूनमधून पुण्यास येत. अशाच एका खेपेस माधवराव आले होते. त्यांनीं आपल्याबरोबर 'विरहतरंग' व 'सुधारक' काव्याचीं हस्तलिखितें आणलीं होतीं. गिरीशांच्या घरीं त्यांचें वाचन झालें. त्या वेळीं क्षीरसागर त्या बैठकीला हजर होते. त्यामुळें माधवरावांची व त्यांची जास्त ओळख झाली. माधवरावांना क्षीरसागर हुशार दिसले. त्यांच्याविषयीं त्यांचा ग्रह अनुकूल झाला व त्यांचा क्षीरसागरांशीं वागण्यांत एक प्रकारचा जिव्हाळा उत्पन्न झाला. पुढें १९२७ च्या सप्टेंबरमध्यें 'प्रभा' पुस्तकाचा प्रकाशनसमारंभ मोठ्या थाटानें झाला. त्यांत माधवरावांनीं ह्या आपल्या नवीन

काव्यभक्ताची ओळख आपल्या अनेक मित्रमंडळींना करून दिली. ओळख करून देतांना, हे " एक छुपे रुस्तुम " ( अप्रसिद्ध महारथी ) आहेत असा केला. बिचारे क्षीरसागर एवढ्या मोठ्या कवीनें आपला असा उल्लेख केलेला पाहून लज्जित झाले व इतरही चकित झाले.

हळूहळू त्या ओळखीचें रूपांतर दाट परिचयांत झालें. १९२९ च्या २९ मेला उमरखय्याम प्रसिद्ध झालें. उमरखय्यामची रचना १९२१ पासून चालू होती, परंतु उमरखय्याम माधवरावांनीं पूर्ण केलें तें क्षीरसागरांच्या प्रोत्साहनानें. त्यामुळें व क्षीरसागर हे एक बुद्धिमान् लेखक व टीकाकार म्हणून माधव-रावांना त्यांच्याबद्दल अत्यंत आदर वाटत होता म्हणून उमरखय्याम त्यांनीं क्षीरसागर यांस अर्पण केलें. अर्पणपत्रिकेंत क्षीरसागरांचें प्रत्यक्ष नांव नाहीं, पण एक टूम म्हणून अर्पणपत्रिकेच्या डोक्यावर त्यांनीं एक मोठें प्रश्नचिन्ह करून ? ' स ' अशा अक्षरांत त्यांनीं तें त्यांना अर्पण केलें.

माधवरावांशीं क्षीरसागरांची ओळख झाल्यानंतर त्यांची कांहीं कारणानें एका संस्थेतील नौकरी सुटली. माधवरावांनीं लगेच खटपट करून त्यांना भावे स्कूलमध्यें नौकरी देवविली. रा. क्षीरसागर त्याबद्दल माधवरावांचे कायमचे ऋणी झाले. कोणत्याही प्रकारचा नवीन लेख तयार होवो तो क्षीरसागरांना वाचून दाखविल्याशिवाय माधवरावांना कधीं चैन पडलें नाहीं. क्षीरसागर जेव्हां आपली पसंती दर्शवितील तेव्हांच माधवरावांना समाधान वाटे. ह्यावरून मी त्यांची नेहमीं थट्टा करीत असें. क्षीरसागरांच्या विद्वत्तेबद्दल मलाही आदर आहे. परंतु एखाद्या माणसाचा पक्ष उचलून धरल्यानंतर किंवा एखाद्याबद्दल जिव्हाळा, आदर उत्पन्न झाल्यानंतर माधवराव त्याचें वाजवीपेक्षां जास्त कौतुक करीत त्यामुळें आम्ही सर्व " Ksirsagar is his weakness " असें थट्टेनें म्हणत असूं.

क्षीरसागर व माधवराव ह्यांच्यांतील भाषाशुद्धीवरील वाद तर प्रसिद्धच आहे. ह्या दोघां मित्रांनीं भाषाशुद्धीच्या मोहिमेत एकमेकांवर झोड उठवली होती, परंतु ते त्यानंतर प्रत्यक्ष एकमेकांना भेटले तेव्हां त्यांनीं एकमेकांनीं एकमेकांना प्रेमानें हस्तांदोलन केलें. १९३९च्या मे महिन्यांत क्षीरसागरच स्फूर्नें फार आजारी होते. त्यांचें दुखणें बरेंच विकोपाला गेलें होतें. माधवरा-वांना त्यांची काळजी वाटूं लागली. त्यांनीं त्यांना आपल्या घरीं ठेवून

घेतलें. त्यांची मोठ्या प्रेमानें शुश्रूषा केली. क्षीरसागर बरे होण्याच्या सुमाराला माधवराव वारले. क्षीरसागरांना फार वाईट वाटलें. त्यांच्या वाङ्मयीन भक्तांत क्षीरसागरांच्याप्रमाणें रा. गोपीनाथ तळवलकर, प्रा. गं. भा. निरंतर, प्रा. वि. वा. आंबेकर रा. भैय्यासाहेब उमराणी ह्यांचीही गणना होते. ह्या सर्व भक्तगणांबद्दल माधवरावांना एक प्रकारचा अभिमान व प्रेम वाटे. त्या सर्वांचा मोठ्या आपुलकीनें ते माझ्याजवळ उल्लेख करीत.

क्षीरसागरांचे माधवरावांशीं दाट संबंध कसे आले ह्याबद्दल क्षीरसागरांनी मला जी पत्ररूपानें माहिती लिहून कळविली त्यांतील कांहीं त्यांच्या शब्दांतच पुढें देत आहें.

'या सुमारास पुण्याच्या भावे स्कूलमध्यें माधवराव काम करूं लागले होते. माझ्या त्यांच्या गांठी त्यांच्या डेक्कन जिमखान्यावरील खोलींत, माझ्या खोलींत अगर गिरीशांचे घरीं पडत. माधवरावांचे इतका बुद्धिमान् व उत्कट मनुष्य तत्पूर्वी तरी माझ्या सहवासांत आलेला नव्हता. त्याप्रमाणें एक एक रसिक व प्रायः मूक श्रोता। या दृष्टीनें माधवराव यांस माझ्या सहवासाचें महत्त्व वाटत असावें. नौकरी, साहित्यप्रेम आणि पुण्यपत्तननिवास यांना मी नुकतीच सुरुवात करीत होतों तर माधवरावांच्या जीवनांत या तिहींची टळटळीत (आणि खरखरीतही) माध्यान्ह आलेली होती! माधवरावांचे कटु आणि निराश असे अनुभव ऐकून मला थोडें नवल वाटे. पण पुण्यांतील एक एक संस्था आणि व्यक्ति यांचें अंतरंग पाहिल्यावर माधवराव हळवे व भाबडे तर खरेच पण अतिशयोक्ति किंवा असत्यवर्णन तरी खास करीत नाहींत हें मला चांगलेंच पटलें.

सुधारक काव्याचा एक एक फर्मा छापून होत असतां तो त्यांनीं शनवारांतील एका भिकार खाणावळींत जेवतांना मला उत्साहानें वाचून दाखविल्याचें अद्याप मला आठवतें. त्या वेळच्या वाङ्मयचर्चा, त्या वेळच्या समाजटीका आणि त्या वेळचें माधवरावांचें हालाचें जीवन यांतच माझ्या व माधवरावांच्या भावी स्नेहाचें बीज दृढपणें रुजलें. याच सुमारास मलाही पुण्याच्या वातावरणांत कांहीं कटु अनुभव आले व माधवराव यांच्या करारी पण उदार अशा मनाची महती कळली. कोल्हापूरला माधवराव गेल्यानंतर मधून मधून जेव्हां पुण्यास येत तेव्हां दिवसांतील त्यांचा बराचसा काळ माझ्याकडे जाई. माझ्याकडे माझे मित्र व त्यांचे शिष्य श्री. गोपीनाथ तळवलकर व

भैय्यासाहेब उमराणी (सांप्रत सरदार रास्ते यांचे कारभारी) यांच्या भेटी होत. आणखीही माझ्या परिवारांतील कित्येक तरुण स्त्री–पुरुषांना माझ्याकडे येण्यांत माधवरावांच्या सहवासाचेंही आमिष असे. खरें सांगावयाचें तर माझ्या सहवासांत माधवरावांना पाहाणें आणि माधवरावांशीं बोलतांना आम्हा मंडळींना पाहणें ही एक आगळी मौज असे. मुद्दाम भरणाऱ्या साहित्यमंडळांत ती मौज कधींच येणें शक्य नाहीं. आम्हा मंडळींना माधवरावांबद्दल नितान्त आदर असे. माझ्याकडे येणारे स्त्री–पुरुष तर त्यांच्या शिष्यांत वा परात्पर शिष्यांत मोडत, आणि तरी त्यांच्या सरळ स्वभावाची आत्यंतिक तार्किकतेची आणि सुधारकी बाण्याची मी कित्येकदां थट्टा करीत असे व माधवरावही ती सर्व मोठ्या प्रेमानें व मजेनें सहन करीत. इतर मंडळींना हा अधिकार (privilage) प्रत्यक्ष शिष्यसंबंधामुळें उपभोगतां येत नसे व म्हणूनच त्यांस ज्येष्ठ व कनिष्ठ यांतील मी एक दुवा वाटे.

यापुढें त्यांचें प्रत्येक लिखाण लिहिलें जातांच मला वाचावयास मिळे. त्यांच्या तोंडून त्यांचें लिखाण ऐकण्यांत अपूर्वता असे. ती इतकी कीं, मी त्यांच्या भाषाशुद्धीच्या मोहिमेवर केलेल्या हल्ल्याला त्यांनीं दिलेलें जलाल उत्तर देखील त्यांच्या तोंडून ऐकतांना मला अत्यंत आनंद वाटला. काव्यविचारांत त्यांनीं फारशी वृत्ताचीं उदाहरणें म्हणून रचून जे चार चार ओळीचे तुकडे १९२३ मध्येंच प्रसिद्ध केले होते त्यांचा पूर्ण गझल करण्याचा लकडा मीं कित्येक दिवस त्यांच्या मागें लावला होता. यांतूनच त्यांच्या गज्जलांजलीचा जन्म झाला. कारण या गज्जलांना ऊर्दू चाली लावून म्हणण्याचा मला नाद होता. त्यांतील बहुतेकांना मीं चाली लविल्या होत्या. अशा कवितांतून निघालेल्या ‘गज्जलांजलि’, विविध भावगीतांचा संग्रह करून तयार झालेलें ‘स्वप्नरंजन मी त्यांच्या मागें लागून पूर्ण करावयास लावलेलें उमरखय्यामकृत रुबायत वगैरे पुस्तकें व त्यांच्या जन्मकाळीं झालेल्या रम्य चर्चा आजही डोळ्यांसमोर उभ्या राहतात,

अलीकडे अलीकडे महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं माधवरावांच्या ओळखी झाल्या होत्या. ती सर्वच मंडळी माधवरावांशीं व माझ्याशीं मोठ्या प्रेमळपणानें वागत. मी फक्त ज्यांचा त्यांच्याशीं फार जुना घरोबा होता व ज्यांच्या सहवासाचा त्यांच्या जीवनावर परिणाम झाला त्यांचाच वर उल्लेख केला आहे. ह्या सर्व प्रेमळ मित्रांच्या सहवासांत माधवरावांच्यावर अनेक प्रकारचीं संकटें आलीं तरी

माधवराव तीं क्षणभर विसरून जात. परंतु स्नेही म्हणवणाऱ्या कांहीं व्यक्तींनीं त्यांच्या भाबडेपणाचाही फायदा घेतला. वरवर गोड बोलायचें व त्यांच्याकडून एखादी गोष्ट काढून घ्यायची आणि त्याचा विपर्यास करायचा असे प्रसंग माधवरावांच्या आयुष्यांत कांहीं थोडे आले नाहींत. अशा मित्रांच्याबद्दल बोलतांना ते म्हणत कीं, "जे उघडपणें माझे शत्रु झाले व शेवटपर्यंत राहिले त्यांच्याबद्दल मला जास्त आदर वाटतो. परंतु ज्यांनीं वर गोड बोलून आंतून माझा गळा कापला त्यांचे अपराध मी कधींच विसरणें शक्य नाहीं."

ह्या बाबतींत त्यांचें–माझें एकदां बोलणें झालें होतें. त्यावर त्यांनीं एका पत्रांत मला पुढील मजकूर लिहिला होता :

"आगगाडींत तुझें–माझें जें बोलणें झालें त्याचा माझ्या मनावर फारच खोल परिणाम झाला. येथें आल्यावर मी त्यासंबंधीं बोलणें काढलेंच; माझ्यानें राहावेना. ×× माझें फार मोकळेपणाचें बोलणें झालें. नातलगांसंबंधीं मला कधींच हुरळणूक झाली नाहीं आणि स्नेह्यांसंबंधींही......

त्यावर त्यांनीं एक चुटका लिहिला आहे तो असा—

*तुजवरी कितीही करो कुणी अन्याय,*
*तन्निंदा मित्राजवळहि समुचित काय ?*
*हितसम्बन्धें ते कधीं व्हायचे स्नेही,*
*अन् हें भाषण मग करील मात्र अपाय,*

आणि अशाच एका चमत्कारिक अनुभवानंतर ते मला लिहितात :

"मी चमत्कारिक आहें, दैवानें मला आपलें खळणें करून माझी दुर्दशा करून टाकली आहे. माझी जीवितयात्रा म्हणजे एक कधींही न थांबणारी अशी धडपड आहे. तूं तरी खऱ्या मित्राप्रमाणें माझी स्थिति समजावून घे, आणि मला सहाय हो. आत्मसुधारणा करण्याची माझी इच्छा व माझा प्रयत्न हीं नष्ट झालेलीं नाहींत. व्यावहारिक शहाणपण मला नाहीं आणि म्हणूनच लीला, माझें भयंकर नुकसान झालें आहे. तें अजून मला शिकायचेंच आहे; व तें मी अनेक अनुभवांच्या द्वारें शिकत आहें. तुझ्या तें प्रत्ययास आल्यावांचून राहाणार नाहीं.

लहानपणापासून जीं सुनीति तत्त्वें मनांत रुजवलीं गेलीं त्याचें कटुफळ मी व्यवहारांत चाखीत आहें."

अलीकडे अनेक कटु अनुभवांमुळें माधवराव थोडेसे एकलकोंडे बनत चालले होते. आपल्या भाबडेपणाचा परिणाम भलताच होतो हें आतां त्यांच्या लक्षांत आलें होतें. त्यामुळें प्रत्येक मनुष्याशीं बोलतांना व वागतांना पूर्वीचा मोकळेपणा त्यांच्यांत राहिला नव्हता.

आमचें लग्न झाल्यावर कोणा एका व्यक्तीला मी माधवरावांची बायको, तेव्हां मी दिसायला कशी असेन हें पाहाण्याची इच्छा झाली. तेव्हां त्या व्यक्तीनें मला मुद्दाम बोलावणें पाठवलें. मीही गेलें. मलाही आपल्याला हें बोलावणें कां आलें आहे यांची पूर्ण जाणीव होती. ह्या गोष्टीचा उल्लेख मीं आपल्या एका पत्रांत केला होता. माधवरावांचें त्याला खालीलप्रमाणें उत्तर आलें—

"असे प्रसंग तुला अनेक येतील. त्यांचा हेतु दुष्ट नसेल. परंतु ×× मूर्ख कुतूहलाचा परिणाम दोन जीवितांचा नाश करण्यांत झाला! असें कांहीं क्षण येतात कीं तेव्हां ईश्वर प्रेमस्वरूप आहे. याचा विसर पडून त्याच्या हातून शत्रूंचा विशेषतः ज्यांनीं स्वार्थ साधण्याकरतां दोन निरपराध प्राण्यांचा बळी घेतला– त्यांचाच सर्वनाश होऊन तो पाहायला ते जिवन्त असावेत अशी क्रूर इच्छा अन्तःकरणांत बळावते. आणि ईश्वराच्या घरीं न्यायच नाहीं असें पाखण्ड मनांत उद्भवतें. या दुःखमय जगांत किती तरी दुःख आपण सङ्कुचित स्वार्थानें व गैरसमजानें वाढवितों–खरेंच साङ्गतों मला मूर्खपणाची जितकी भीति वाटते तितकी लबाडीची वाटत नाहीं. कांहीं स्वार्थसाधू मित्रांनीं माझें अत्यंत नुकसान केलें."

आणि म्हणून अलीकडे माझा स्वभाव असा झाला आहे कीं, केव्हां केव्हां परिस्थिति वा मनःस्थिति अशी नाजूक असते कीं, सुईची बोचसुद्धां असह्य होते, तर कित्येकदां आकाशींची कुऱ्हाड सोसवते. ह्या माझ्या स्वभावामुळेंच माझेवरील गंभीर प्रसंग मीं सहज सहन केले. पण कित्येकदां अगदीं क्षुल्लक गोष्टही मला असह्य होते.

आणखी एका पत्रांतील उतारा—

लोक कित्येकदां मला धैर्याचा पुतळा समजतात, पण तें निराशेंतील धैर्य होय. मी जात्या कचदिल—मातीचें ढेकूळ आहें. आज इतकीं वर्षें

एकाकी स्थितींत काढलीं, त्यामुळें मन खम्बीर व्हायला हवें होतें, पण तें तसें झालें नाहीं. संसारांत जें धैर्य पाहिजे त्याची माझ्यांत उणीव आहे. ही गोष्ट मला जाणवूं लागली आहे. मी ते गुण माझ्यांत खात्रीनें आणीन."

आपल्या स्वभावांत फरक करण्याची आवश्यकता जेव्हां त्यांना तीव्रतेनें वाटूं लागली तेव्हां त्यांचें मला मी नागपूरला असतांना एक पत्र आलें तें पुढीलप्रमाणें :

" मनुष्याला कटु अनुभव आल्याशिवाय तो शहाणा होणार नाहीं हें अगदीं खरें आहे, परंतु मनुष्यजातीच्या सौजन्यावरील विश्वास पार उडाल्यावर सहवासांत गम्य व रम्य असें कांहींच राहाणार नाहीं आणि एकंदर जीवित नीरस नकोसेंच होऊन जाईल, एवढीच मला भीति वाटते; पण दैव हात धुवून मागें लागल्यासारखें हाच अनुभव गळीं उतरवूं लागलें तर इलाज नाहीं. मन घट्ट करून तो प्याला खालीं लोटलाच पाहिजे. माझ्या आयुष्यांतील वैशिष्ट्य हेंच आहे.

" माझ्यांत १९२८ सालापेक्षां पाहा बरं किती बदल झाला आहे तो. कित्येक गोष्टींकडे पाहाण्याचा माझा दृष्टिकोन आतां पार बदलला आहे. मी तरी मैत्रीला पात्र नाहीं, अथवा लोक तरी पात्र नाहींत असें मला वाटूं लागलें आहे. कांहीं लोकांना वरवर गंमत पाहिजे असते. इतरांनीं स्वार्थत्याग करायला हवा असतो आणि स्वतःला भरसमयीं हवें तसें वागायला हवें असतें. त्यांना जिव्हाळ्याची देवघेव नको असते. अशा लोकांविषयीं मला आतां उदासीनताच वाटूं लागली आहे."

" व्यावहारिक शहाणपण मला अजून शिकायचें आहे व तें मी शिकत आहें. तुझ्या तें प्रत्ययास आल्यावांचून राहाणार नाहीं. तसा मी अतिशय भोळा आहें ग, कित्येक वेळीं माझ्या सहवासांत स्नेही म्हणून वावरणाऱ्या कांहीं लोकांचे छक्केपंजे मी ओळखूंच शकत नाहीं. गोष्ट होऊन गेल्यावर मागाहून सर्व प्रकार ध्यानांत येतो. परंतु ' बून्द से गई सो हौद से नहीं आती' अशी माझी स्थिति आहे. माझ्या अव्यवहारीपणानें, फटकळपणानें, भाबडे-पणानें माझें साऱ्या आयुष्याचें नुकसान झालें आहे. झालें तें झालें. आतां मी एकटा नाहीं. माझ्या मूर्खपणाचें फळ मला आतां एकट्याला भोगायचें नाहीं; त्याची वाटेकरीण तूं आहेस हें मी जाणून आहें. तेव्हां खरोखरच आतां मी वचन देतों कीं, मी आतां शहाणा होणार आहें. तुला दुःख देणार नाहीं. घे

आपल्या बाळाला माण्डीवर; विसरून जा गृहबाह्य जगाला आणि लाव त्याच्या ओंठाला बोट आणि साङ्ग त्याला कीं, " बेटा, बापासारखा अव्यवहारी व भोळा होऊंस नकोस."

वरील सर्व उतारे निरनिराळ्या वेळीं धाडलेल्या पत्रांतील आहेत. परंतु ते सर्वच एका ठिकाणीं देण्याचें कारण कांहीं मित्रांच्या सहवासालादेखील ते किती विटले होते व त्यामुळेंच त्यांच्यांत हळूहळू कसकसा बदल होत गेला हें वरील अनेक उताऱ्यांवरून दिसून येईल.

तरी सहवासांत असलेल्या मित्रांतील व हितशत्रूंतील चांगुलपणा ते विसरले नव्हते. त्याबद्दल ते कायमचे ऋणी होते.

महाराष्ट्र कवि-सम्मेलन, नासिक

१९३३



क्रमांक २२३४ ... वि: ४K३ ... ग्रं० दि० २१८१

# माधवरावांच्या कांहीं कवितांचा जन्म : १०

लग्न झाल्यानंतरचे आमचे कांहीं दिवस फार चमत्कारिक गेले. फार दिवस एकटे राहिलेले माधवराव माणसाळायला फार प्रयास पडले. प्रत्येक वेळीं पडतें आपणच घ्यावें व ते म्हणतील तसें मनाला पटत नसूनही वागावें असे प्रसंग वारंवार येऊं लागले. संसारांत गम्य व रम्य कांहीं आहे असें मला वाटेना. पुढें पुढें त्यांचें त्यांनाच आपण कोठें तरी चुकतों आहोंत असें वाटूं लागलें व माधवरावांनीं आपल्या स्वभावांत आमूलाग्र बदल केला. त्यांना आपल्या चमत्कारिक वागण्याचा पश्चात्ताप होऊं लागला. कित्येक वेळेला त्यांना आपल्या निष्ठुरपणानें वागण्याचें अत्यंत वाईट वाटे आणि त्या गोष्टीचा ते विचार करू लागले कीं, त्यांच्या डोळ्यांत पाणी उभें राही. अशाच एका प्रसंगीं माधव-रावांनीं खालीं दिलेल्या दिण्डी वृत्तांत चार ओळी रचल्या.

त्या ओळींचा इतिहास असा : आमच्या लग्नाच्या पंक्तींत भर्तृहरीच्य नीतिशतकांतला 'मौनान्मूकः प्रवचन पटुर्वाचको जल्पकोवा' हा श्लोक मीं म्हटला होता. त्याची शेवटची ओळ 'सेवाधर्मः परम गहनो योगिनामप्यगम्यः, अशी आहे. त्या शेवटच्या ओळीचा परिणाम माधवरावांच्या मनावर फार झाला. त्यांनीं त्याच प्रसंगाला उद्देशून व पुढें माझें वागणें त्यांना अत्यंत पसंत पडल्यावरून पुढील श्लोक रचला—

*श्लोक म्हटला जो भीत तूं विवाहीं*
*आज होई तत्स्मरण अश्रुवाही;*
*सखे योग्यांसहि गहन अन् अगम्य*
*धर्म केला तो तुवां सिद्ध रम्य*

त्या दिण्डी वृत्तांतल्या चार ओळी पुढें त्यांनीं ज्या वेळेला आपल्या अनेक कविता सुधारल्या तेव्हां स्वप्नरंजन छापतांना 'कीर्ति आणि कान्ता' स्वप्नरंजन पा. १०४ ह्या कवितेंत घातल्या. ही सबंध कविता त्यांनीं त्याच वेळीं सुधारली. वास्तविक त्यांनीं ही कविता आमच्या लग्नाच्या जवळजवळ एक वर्ष आधीं लिहिलेली आहे. परंतु त्यांतील बऱ्याचशा कल्पना नंतर सुधारून घातल्या आहेत.

कोल्हापूरला असतांना आम्ही संध्याकाळीं सहा वाजले कीं नियमितपणें फिरावयाला जात असूं. पाऊस बाहेर पडत असला तरी त्याची पर्वा आम्हीं कधीं केली नाहीं. त्यामुळें अनेक ठिकाणचें मनोरम सृष्टिसौंदर्य आमच्या दृष्टीस पडे. बाहेर जोराचा पाऊस पडत असला तरी आम्ही तशाही पावसांत संध्याकाळीं फिरायला बाहेर पडत असूं. 'वरुणतीर्थ वेस, ओलांडून रंकाळ्यावर आलों म्हणजे भोंवतालचा प्रदेश मोठा सुंदर दिसे. दिशा धुंद झालेल्या, उजव्या हातचे पन्हाळा, पावनगड, ज्योतिबाचे डोंगर धूसर झालेले. रंकाळ्याच्या कांठानें रस्त्यानें दुतर्फा लावलेले गुलमोहोराचे वृक्ष भिजून चिंब झालेले. समोर दूरवर दृष्टि फेकली असतां दिसणारें विद्यापीठाचें मैदान व त्यावरील झोंपडी म्हणजेच जलाशय 'तपोवन' आणि रस्त्याच्या डाव्या हाताला दिसणारा तो रंकाळ्याचा विस्तीर्ण व अथांग भरलेला व त्यांतील तो पुरातन कालपासून प्रसिद्ध असलेला 'संध्यामठ' ह्या सर्व मनोहर दृश्याचा परिणाम माधवरावांच्या मनावर होई व ते त्या सुंदर दृश्याशीं तन्मय होऊन जात. अशा वेळीं माधरावांची प्रतिभा जागी होई. "पहा सृष्टीचें ध्यान" ह्या कवितेंत ह्या रंकाळ्याभोंवतालच्या प्रदेशाचेंच वर्णन आहे. स्वप्नरंजन पा. १२४. तशा प्रकारचें अलौकिक सृष्टिसौंदर्य पाहिलें कीं त्यांना वाटे परमेश्वर फक्त एकाच ठिकाणीं नाहीं. तो सर्वत्र ह्या सुंदर सृष्टींत भरला आहे. अशाच अर्थाची त्यांची 'प्रार्थना' ही कविता—अभंग—स्वप्नरंजन पान १२४ वर आहे. भर पावसाच्या झडींत रंकाळ्याभोंवतीं प्रदक्षिणा घेत असतां त्यांना त्यांतील पुढील ओळी स्फुरल्या

*अनंत गोचरी भरली ही सृष्टी*

*प्रत्येकांत दृष्टि तुज बघों . २*

*लाटांच्या नर्तनीं पाऊस झडींत*

*ऐकूं दे संगीत प्रभो तुझें ३*

अशा कवितेच्या ओळी तयार झाल्या किंवा कोणत्याही कवितेंतील कल्पना सुचली कीं ते तेवढीच लिहून ठेवीत व मागाहून केव्हां तरी त्यांची कविता पूर्ण होई. कवितेची तारीख व महिना ज्या दिवशीं त्यांना मूळ कल्पना सुचे त्या दिवशींची असे.

माधवराव कोल्हापूरला असतांना एकदां ते रेंदाळकरांचें रेंदाळ हें गांव पाहण्यास गेले होते. तेथें रेंदाळकरांच्या दोन मुली 'लिली' व 'माली' ह्या त्यांना भेटल्या. माधवरावांचें आदरातिथ्य तेथें योग्य तऱ्हेनें झालें. परंतु त्या पोरक्या मुलींना पाहून त्यांचें अंतःकरण भरून आलें. घरीं आल्यावर त्यांनीं सर्व हकीगत मला सांगितली व ते म्हणाले 'उद्यां माझीं मुलें जर अशीं पोरकीं झालीं तर न जाणों त्यांचे काय हाल होतील! ह्याकरता मी म्हणत असतों कीं, मनुष्याचें आयुष्य स्वाधीन नाहीं. परंतु जाणून बुजून संसारांत पडल्यावर व मुलें झाल्यावर जरूर तर पोटाला चिमटा घेऊन पण आपल्या हयातींत मुलांची तरतूद आपल्या शक्त्यनुसार केली पाहिजे. जे आईबाप हें करीत नाहींत त्यांनीं आपलें कर्तव्य केलें असें म्हणायला मी तयार नाहीं. माझ्या मुलांना व बायकोला माझ्या मागें माझ्या मूर्खपणामुळें दारोदार हिंडावें लागलें तर माझ्या आत्म्याला कधींही शांति मिळणार नाहीं." माधवराव आपली जबाबदारी खरोखरच विसरले नाहींत.

रेंदाळकर रेंदाळलाच वारले. त्या प्रसंगाला उद्देशून त्यांनीं हे कवे, 'विश्रांतिस्थळ अखेर हेंच हाय होतें' म्हणजेच 'सर्वां खल्विदं माया' ही कविता रेंदाळहून आल्यावर लिहिली. स्वप्न–रंजन–पान १४०.

माझ्या-त्यांच्या वयांत दहा वर्षांचें अंतर होतें. ते-मी जरी बरोबरीच्या नात्यानें वागत होतों तरी ते माझ्याहून वयानें, अनुभवानें मोठे आहेत, हें मी विसरूं शकत नव्हतें आणि त्यांतून लहानपणापासूनच फारशी स्वेच्छेनें वागण्याची मला संवयच नव्हती. सदोदित धाकांत वागत आल्यामुळें पुढें लग्न झाल्यावरही कोणतीही गोष्ट मी माधवरावांना विचारल्याशिवाय करीत नसें. तें मला म्हणत, "प्रत्येक गोष्ट तूं मला विचारण्याचें कारण नाहीं. तुला मी इतकी स्वतंत्रता देतों तरी तूं निष्कारण संकोचानें वागतेस. जरा तरी धीट हो." ह्याच चर्चेतून 'जा स्वतंत्रेची मौज चाख' ही कविता जन्माला आली. स्वप्नरंजन पान १४०.

माधवराव अभिमानी होते. त्यांना अपमान सहन होत नसे. पोटाकरतां दुसऱ्याची नौकरी प्रामाणिकपणें करीत असतांनाही जर कोणीं त्यांचा अपमान केला तर अशी गोष्ट त्यांच्या काळजाला घरें पाडीत असे. ह्यापेक्षां दारिद्र्यांत राहणें पत्करलें इतकें त्याचें त्यांना दुःख होई. अशाच एका प्रसंगावर 'सेवाधर्म' ही कविता लिहिली गेली आहे.—स्वप्नरंजन, पान १४६.

एक दिवस आमच्या लग्नांतल्या कांहीं हकीकतीबद्दल आम्ही बोलत बसलों होतों. तेव्हां मी माधवरावांना सहज सांगितलें कीं, "मंगलाष्टकें सुरू झालीं आणि बाबा मंडपांतून निघून गेले. त्यांना फार वाईट वाटलें. कन्यादान करतांना त्यांनीं आपल्या मनावर ताबा ठेवला होता. तरीसुद्धां शेवटीं त्यांना अश्रु आवरेनात. जरा वेळानें बाबांचे स्नेही— रा. न. शं. रहाळकर— यांनीं मला हांक मारून सांगितलें, "बाबांच्याजवळ जरा जाऊन बस. त्यांना दूध वगैरे कांहीं दे." ही हकीगत मीं माधवरावांना सांगितली आणि तो प्रसंग त्यांच्या डोळ्यांपुढें उभा राहिला. त्याच प्रसंगावर माधवरावांनीं गज्जलाञ्जलि पा. ३९ 'अर्थो हि कन्या परकीय एव' ही कविता लिहिली.

ता. ६ सप्टेंबर १९३१ रोजीं ही कविता माधवरावांनीं लिहिली. त्या वेळीं मी नागपूरला दिनूच्या खेपेला बाळंतपणाला गेलें होतें. माधवरावांनीं त्या कवितेबद्दल मला लिहिलेल्या माझ्या स्वतःच्या पत्रांतील हकीकत पुढें दिली आहे.

"गेल्या बुधवारीं संध्याकाळीं मी बाजारांतून घरीं येत होतों आणि बोळाच्या तोंडाशीं म्हैस पुढून धांवत आली म्हणून तूं जेथें थांबलीस तेथें आपल्या लग्नांतील तूं सांगितलेला प्रसंग आठवला आणि लगेच त्या विषयावर एक गज्जल स्फुरली, ती सोबत पाठवीत आहें. तो प्रसंग मीं स्वतः पाहिला नसल्यामुळें फोटोचा फोटो घ्यावा त्याप्रमाणें जरा अस्पष्ट वठला असेल, तथापि तो कसा वठला आहे हें तूंच सांगूं शकशील. तुझ्या आयुष्यांतील एक संस्मरणीय प्रसंगाचें शब्दचित्र म्हणून ही कविता तुला संङ्ग्रहणीय वाटेल."

माधवरावांना त्यांच्या संडेतोड व फटकळपणाच्या वागण्यानें अनेक शत्रु निर्माण झाले होते. १९३०–३१च्या मे महिन्यांतली गोष्ट. एक दिवस रात्रीं आठ वाजतां माधवराव घरीं आले ते अतिशय खिन्न होऊन आले. मला चार दिवस कारण कळलें नाहीं. कोणा तरी एका पूर्वपरिचित गृहस्थानें त्यांना कांहीं प्रश्न विचारून शब्दांत पकडलें. माधवरावांनीं आपल्याकडून आपली बाजू स्पष्ट मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु शेवटीं त्यांनीं माधवरावांनाच दोष दिला. तेव्हां माधवरावांनीं फाडकन् आपल्याच थोबाडांत मारून घेतली. मला कारण कळल्यावर वाईट वाटलें. मी त्यांना म्हणाले,

" आतां तुम्ही कांहीं बाबतींतला फटकळपणा व स्पष्टवक्तेपणा सोडा. ह्या तुमच्या स्वभावामुळें लोक तुमचे शत्रु बनतात व तुम्हांला पाण्यांत पाहतात. इतके वाईट अनुभव तुम्हाला आले. ह्या तुमच्या स्वभावामुळेंच तुम्ही आपली नौकरी गमावून बसलां. अजून तुमचे डोळे उघडत नाहींत. त्यांत तुमचें कल्याण होणार नाहीं. मी तुम्हाला ही गोष्ट पुन्हा पुन्हा सांगतें. तुम्हीं आतां पुन्हा असें वागणार नाहीं म्हणतां आणि पुन्हा मूळ स्वभावावर जातां! काय म्हणावें तुम्हांला! मी तुमच्याकरतां इतकी जीव टाकतें तरी तुम्हांला माझ्या तळमळीची जाणीव होत नाहीं. माधवरावांच्यां मनांवर माझ्या बोलण्याचा फार परिणाम झाला. त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले. दोन दिवसांनीं त्यांनीं 'जीव तूझा लोभला' ही कविता लिहिली. त्या कवितेचें नांव 'प्रेमाची दक्षिणा' गज्जलांञ्जलि पान ३७. त्यांनीं ही कविता लिहिली तेव्हां त्या कवितेचा मथळा 'प्रेमाचा तगादा' असा होता. माझें त्यांच्यावरचें प्रेम म्हणजे त्यांना ते उपकार वाटत. त्यांचें असें एक मत होतें कीं "जो प्रेमविवाह झाला नाहीं त्या विवाहामुळें एकदम प्रेम उत्पन्न व्हावें कसें? सहवासानें प्रेम उत्पन्न होईल आणि तें खात्रीनें होईल. तूं वाट पाहा" असें तें मला सांगत. त्या विचारांचे पडसाद त्या कवितेंत उठलें आहेत.

१९३४–३५ सालच्या सुमारास फर्ग्यूसन कॉलेजचा सुवर्ण–महोत्सव झाला असावा. तेव्हां प्रि. महाजनींच्या खास आमंत्रणावरून माधवराव त्या समारंभाला गेले होते. परंतु त्यांना तेथें पाहून कित्येकांना आश्चर्य वाटलें. कोणीं तरी त्यांना " तुम्ही येथें कसे?" असा प्रश्न विचारला. त्याबरोबर त्यांना वाईट वाटलें व त्यांनीं 'अतर्क्य प्रेम' कविता लिहिली. मधुलहरी–पा० ५५.

त्याचप्रमाणें त्याच संस्थेवर त्यांनीं 'प्रेम होईना तुझ्यानें' ही गज्जल लिहिली. गज्जलाञ्जलि पा. ४०.

ज्या संस्थेतून ते अत्यंत अपमानकारक रीतीनें बाहेर पडले त्याच संस्थेवर त्यांचें अगाध प्रेम शेवटपर्यंत राहिलें आणि ह्या त्यांच्या प्रेमामुळेंच शेवटीं मीं त्यांचीं सर्व पुस्तकें त्यांच्या इच्छेप्रमाणें फर्ग्यूसन कॉलेज, वाडिया वाचनालयाला देऊन टाकलीं. त्यांनीं आपल्याच स्वभावाचें वर्णन तुटलेल्या दुव्यांतलि अनेक सुनीतांत केलें आहे. अशा सुनीतांचे आंकडे खालीं देत आहे.

सुनीत १४ तुटलेले दुवे, पा. १४. पा. १८. सुनीत १८. पा. ५० सुनीत ५०.

तुटलेल्या दुव्यांतील पहिलें सुनीत लिहून अनेक वर्षें होऊन गेलीं. त्या वेळीं त्यांना स्त्रीजातीबद्दल आदर वाटत असे. परंतु त्यांच्या आयुष्यांत ज्या स्त्रिया आल्या त्यांच्या सहवासामुळें त्यांनीं आपल्या सुनीतांत वर्णन केल्यापेक्षां निराळे अनुभव आले. अलीकडे 'तुटलेले दुवे' छापतांना 'देवा स्त्रीहृदयीं' मनोरमपणा केव्हां कुणीं निर्मिला,' हें सुनीत ते काढून टाकण्याच्या विचारांत होते. परंतु पूर्वायुष्यांतील आपल्या स्त्रीजातीबद्दलच्या काय कल्पना होत्या त्या संग्रहीं असाव्या म्हणून तें सुनीत त्यांनीं तसेंच ठेवलें.

माधवरावांना आपल्या आयुष्यांत अनेक विचित्र अनुभव आले. अशा अनुभवांनींच माधवरावांना पुष्कळ शहाणें केलें. अशाच कांहीं चमत्कारिक अनुभवांनंतर त्यांनीं आपल्या स्वतःच्या मनःस्थितीचें व त्यामुळें झालेल्या बदलाचें वर्णन केलें आहे. तें असें—

*मनीं होती असूया ती पळाली,*
*बढाई पात्रतेची फोल झाली.*
*रगीच्या त्या उमेदी आज कोठें?*
*अतां ही हाव सत्तेची गळाली.*

गज्जलाञ्जलि पा. १६ हेमन्त.

ध्येयपूर्तता न झाल्याचें असमाधान माधवरावांना त्या काळांत (१९२८ ते ३०) वारंवार अस्वस्थ करीत असे ह्यांत शंका नाहीं. ते मला तसें बोलूनही दाखवीत. केव्हां केव्हां मलाही असें वाटे कीं, हे इतके ध्येयवादी आहेत याची थोडी जरी जाणीव मला लग्नाच्या आधीं झाली असती तर मी लग्नाला तयारहि झालें नसतें. परंतु ह्याचा अर्थ त्यांचें कोणावर प्रेम होतें व तें प्रेम त्यांना वारंवार अस्वस्थ करीत असें असें मुळींच नाहीं.

त्यांचें जर एखाद्या मुलीवर प्रेम असतें तर त्यांनीं जगाची पर्वा न करतां तिच्याशीं लग्न केलें असतें. एकदां कॉलेजांत ते शिकत असतांना त्यांना एका मुलीबद्दल मोह वाटत होता. परंतु पुढें ते बोलतांना नेहमीं म्हणत असत कीं,

“ तिच्याशीं माझें लग्न झालें नाहीं हें फार बरें झालें. तिच्या सहवासांत मी कधींच सुखी झालों नसतों आणि शिवाय आमचें चार दिवसही पटलें नसतें.” ह्यासंबंधीं माधवरावांचे विचार वाचावयाचे असतील तर स्वप्नरंजनमधील ‘प्रश्नोत्तर’ (तो म्हणाला व ती म्हणाली) ही कविता अवश्य वाचावी. हा त्यांचा मोह फार थोडया दिवसांचा होता आणि तो मोह झाला हें ते जरी विसरूं शकले नाहींत तरी त्यांचें मन त्यांना वारंवार ग्वाही देत होतें कीं, जें झालें तें फार चांगलें झालें. आमच्या सहवासावर किंवा माझ्याशीं वागण्यांत त्याचें अस्तित्वही कधीं प्रगट झालें नाहीं आणि म्हणून त्यांच्या सहवासांत मी सुखी झालें.

ह्या कवितेबद्दलची हकीगत येथें लिहीत असतांना मला एक आठवण झाली. ती मला येथें दिल्याशिवाय राहवत नाहीं. लग्न झाल्यानंतर आपल्या आयुष्यांतील अनेक आठवणी व विचित्र अनुभव मला माधवरावांनीं सांगितले. कित्येक वेळीं तर त्या आठवणी सांगतांना ते इतके तन्मय होत कीं, एका मागून एक अशा आठवणी होऊं लागल्या कीं आम्हांला सबंध रात्र एखाद्‌वेळीं जागरण होई. माधवराव कित्येकदां अत्यंत अस्वस्थ होत. मला वाटतें आमचें अशाच प्रकारचें बोलणें, आमच्या बोलण्यावर रात्रीं पाळत ठेवून कोणा एका व्यक्तीनें ऐकलें व त्याचा बोभाटा आपल्या मित्रांत केला. ज्यांना हें सांगण्यांत आलें ती व्यक्ति अजूनही माधवरावांच्या मित्रांना असें सांगत असते कीं, “ अहो, पूर्वायुष्यांत माधवरावांनीं केलेल्या कांहीं अपराधांची कबुली ते स्वतः लीलाबाईंना देत असतां प्रत्यक्ष अमुक एका व्यक्तीनें ऐकलें आहे. ” हें जेव्हां आमच्या दोघांच्या कानांवर आलें तेव्हां आम्ही दोघेंही आश्चर्यानें मूढ झालों. माधवरावांनीं एक सुस्कारा सोडला व ते उद्गारले, “ अत्यंत खाजगी आयुष्यही माझें स्वतःचें नाहीं. त्यांवरही मजबद्दल कुतूहल असणाऱ्यांचा पहारा आहेच. ” भिंतीला कान असतात, हें आजपर्यंत मी ऐकत आलें होतें. परंतु वरील हकीकती वरून “ छतालाही, कान असूं शकतात हें आम्हांला तेव्हां समजलें.

माधवरावांचेकडून कोणतेंही अनीतीचें वर्तन घडलें असतें तर विवाहानंतर ज्या मनमोकळेपणानें त्यांनी मला गतायुष्यांतील अनेक हकीकती सांगितल्या त्यांत आपल्या अनैतिक वर्तनाचीही कबुली स्पष्टपणें दिली असती ह्याबद्दल

मला यत्किंचितही शंका वाटत नाही. कारण अशा तऱ्हेच्या वर्तनाबद्दल कबुली देण्यास जें मनोधैर्य लागतें तें त्यांचे अंगीं पूर्णपणें होतें हें त्यांच्या निकट सहवासांतील मित्रही जाणत होते.

आपल्या मुलांच्यावर माधवरावांचें फार प्रेम होतें. मुलांच्या बाबतींत ते अत्यंत हळवे होते. त्यांना जरा कांहीं होऊं लागलें कीं माधवरावांच्या हृदयाची कालवाकालव होई.

अशाच एका प्रसंगीं आमचा दिनू तापानें आजारी होता, तातांच्या शिवाय तो क्षणभरही अंथरुणावर निजत नसे. मी स्वयंपाकघरांत कांहीं काम करीत होते. दिनू निजला ह्या समजुतीनें बराच वेळ मी माजघरांत गेलें नाहीं. परंतु दिनू जागाच होता. तो उठला आणि बैठकींत जाऊन माधवरावांना त्रास देऊं लागला. माधवराव कांहीं तरी लिहिण्यांत गर्क होते. त्यांचें लक्ष नाहीं असें पाहून दिनूनें त्यांना हांक मारण्याचा सपाटा लावला. ते त्याच्यावर रागावले. दिनू रडवें तोंड करून धांवत धांवत माझ्याकडे येऊन माझ्या गळ्याला मिठी घालून मोठ्यानें रडूं लागला. माधवरावांनीं रडण्याचा सूर ऐकला आणि धांवतच ते स्वयंपाकघरांत आले. त्यांनीं त्याला जवळ घेतलें आणि त्यांच्या डोळ्यांत पाणी आलें. ह्या प्रसंगावर माधवरावांचे ‘ताता, लाडिक हांक ऐकूनी तुझी......हें सुनीत आहे–त्या सुनीताचें नांव ‘साशीर्वाद निरोप’ मधुलहरी–पा. ४७.

दिनूपेक्षांही सुधाला तातांचें वेड अधिक होतें. तिला एक क्षणभरही त्यांच्याशिवाय करमत नसे. माधवराव गेल्यानंतरही आमची सुधा आजार-पणांत रात्रीं “ताता ताता” करून झोपेंतून उठून बसे.

रा. भास्कररावांचा ‘तांबे समग्र ग्रंथ’ छापण्याच्या आधीं कांहीं कवितांच्या संबंधीं अधिक माहिती मिळवण्याकरतां ते ग्वाल्हेरला गेले होते, मला मुलांच्या व घरच्या कामांत बरेच दिवस पत्र लिहायला वेळ झाला नाहीं. एक दिवस माधवरावांचे मला एक पत्र आलें. त्यांतच त्यांनीं “सुखरूप आहे ना ग?” ही कविता लिहून पाठवली होती. मधुलहरी – पान ५९.

मला वाटतें ते दिवस पावसाळ्याचे होते. माधवराव कॉलेजांतून परत येत होते. मुलांच्या शाळा सुटल्या होत्या. रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्यांची गर्दी. एकाएकीं एका गृहस्थाच्या सायकलीच्या धक्का लागून एक मुलगी खालीं

पडली. माधवरावांना स्वतःचींच मुलें आवडत असत असें नाहीं, त्यांना कोणाचींही मुलें तितकींच प्रिय असत. त्यांनीं त्या मुलीला उचललें. तिला फारसें लागलें नव्हतें, परंतु कोठें तरी थोडें खरचटलें होतें. जवळच्या एका दवाखान्यांत स्वतः ते तिला घेऊन गेले. औषध वगैरे लावून झाल्यावर तिला घरीं पोहोंचवण्याची व्यवस्था करून ते घरीं आले. आमची सुधा तिला संभाळायला ठेवलेल्या बाईजवळ स्वतः भोंवतींच फेऱ्या घालीत बसली होती. तिला त्यांनीं चटकन् उचलून घेतलें. तिलाही त्यांना पाहून तितकाच आनंद झाला होता. ती त्यांना जी घट्ट बिलगली ती खालीं उतरायलाही तयार होईना. "श्रावणांतले ऊन" ही कविता त्याच वेळची आहे.— मधुलहरी—पान ४५.

माझें शेवटचें बाळंतपण अत्यंत जिवावरचें झालें. डॉ. रा. ज. पाध्यांनीं ह्याबद्दलची कल्पना माधवरावांना अगोदरच दिली होती. परंतु माझ्या कानांवर ही गोष्ट न जाण्याची माधवरावांनीं अत्यंत काळजी घेतली. १९३६ सालच्या मे-जूनचे दिवस होते ते. कोल्हापूरला पाण्याचा दुष्काळ होता. शिवाय पाण्याच्या अभावीं गांवांत पटकीची सांथ जोरांत सुरू होती. रोज ३० ते ४० रोगी ह्या सांथींत दगावत होते. माधवराव ह्या सुमारास पुण्यालाच होते. ते जूनच्या आरंभीं कोल्हापूरला आले. तोंवर मी दिनू व सुधा यांसह जीव मुठींत घेऊन दिवस काढीत होतें. माधवराव आले व माझा जीव खालीं पडला. माझी प्रकृति असावी तितकी चांगली नव्हती; बाहेरचें वातावरणही चिंताजनक होतें, परंतु माधवराव घरीं आले व तशाही परिस्थितींत माझ्या मनाची काळजी चुटकीसरशी नाहींशी झाली. माधवराव आल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं त्यांच्या आजी माझ्या बाळंतपणासाठीं कोल्हापूरला आल्या. माझ्या प्रकृतीच्या विचारानें माधवराव अत्यंत अस्वस्थ होते. परंतु ते अस्वस्थ होते ह्याचा यत्किंचितही सुगावा मला लागला नाहीं. त्या दिवसांत ते लेखनाचें काम जोरांत करीत होते. आपलें स्वतःचें मन त्यांनीं यत्किंचितही विचल होऊं दिलें नाहीं. त्या दिवसांत मुलें माझ्याजवळ नसत. रात्रीच्या रात्री अस्वस्थ प्रकृतीमुळें माझ्या जागून जात. माधवरावांना मी जागी आहें असा नुसता संशय जरी आला तरी ते जागत व माझ्याशीं बोलत बसत. परंतु मजबद्दलची चिंतेची रेषा त्यांच्या कपाळावर मला कधीं दिसली नाहीं.

मी जून २७ ला बाळंत झालें. परंतु बाळंतपण अत्यंत कष्टाचें झालें. माधवरावांची कर्तव्यतत्परता अत्यंत दांडगी होती. आदले दिवशीं रात्रीं दहा वाजतांच मी दवाखान्यांत गेलें होतें. माधवराव रात्रीं दहा वाजल्यापासून दुसरे दिवशींच्या दुपारच्या तीन वाजेपर्यंत तोंडांत पाण्याचा थेंब न घालतां, माझ्या पलंगाशेजारीं सारखे उभे होते. मुलगी झाली, परंतु ती जिवंत नव्हती. आमची ती मुलगी दिसायला चांगली होती असें म्हणतात. माधवरावांनीं तिचा गोजिरवाणा मृत देह आपल्या हातावर घेतला. त्यांचें अंतःकरण भरून आलें व 'दुखान्तीं दुख' ह्या कवितेचा जन्म झाला. मधुलहरी पा. ४२.

दिनू माझ्या आईचा फार लाडका. त्याच्यावर त्यांचा जीव जास्त. १९३५ च्या ऑगस्ट महिन्यांत त्या कोल्हापूरला आल्या होत्या. जातांना त्या दिनूला घेऊन गेल्या. जातांना आपल्याला भप् भप् गाडींत बसायला मिळणार ह्या आनंदांत तो मला पार विसरला होता. तो टांग्यांत बसला, पण माझ्या डोळ्यांत पाणी आलें. मीं त्याला म्हटलें, "दिनू मला करमणार नाहीं रे." त्यानें मला आपल्या बोबड्या बोलांत सांगितलें, "आई, तूं रडूं नकोस, तुला मी परत येईन तेव्हां खाऊ घेऊन येईन." माधवरावही हंसले, परंतु त्या दृष्याचा त्यांच्या मनावर परिणाम झाला आणि त्यांनीं 'बाळाचें आजोळीं जाणें' ही कविता ह्या प्रसंगावर लिहिली. मधुलहरी पा. ३३.

'निर्झरास' स्वप्नरंजन पा. १४८ 'पापशङ्की' पा. १४९ 'चल उडुनि पाखरा' पा. १५१ 'गोड बाल्य' पा. १५३ 'डोला बाई डोला!' पा. १५५ 'माझी सानुली' मधुलहरी पा. ४४. या सर्व कविता त्यांनीं आपल्या मुलांवरच लिहिल्या आहेत.

माधवरावांच्या आयुष्यांत त्यांना जर मोठी उणीव भासत असली तर आई-बद्दलची. दुर्दैवानें त्यांनीं ज्या प्रकारच्या मातृप्रेमाची अपेक्षा आपल्या आयुष्यांत केली होती त्या प्रकारच्या मातृप्रेमाला ते पारखे होते. तेव्हां त्यांच्या अनेक कवितांतून ह्या विचारांचे पडसाद उठलेले आहेत.

त्यांनीं १९२१ सालीं रामभाऊंना एक पत्र लिहिलें. त्या पत्रांत "प्रेमस्वरूप आई" ह्या कवितेबद्दल ते लिहितात :

"ज्याची आई लहानपणीं वारली आहे अशा एका पोरक्या पोराला मध्यम वयांत झुरणी लागून मनांत येणाऱ्या विचारांचें प्रतिबिंब त्या कवितेंत पडलें आहे. चाल मात्र फारसी घेतली आहे. काव्यांत व्यक्त केलेल्या भावना

आज ५-६ वर्षें माझ्या हृदयांत तुफान करीत असल्यामुळें स्वानुभवाचा जोर साहजिकपणेंच तींत उतरला आहे.

' प्रेमस्वरूप आई ! चित्सौख्यशांतिदायी !
बोलावुं तुजशीं आतां मी कोणत्या उपायी ?

असा आरंभ करून

घे जन्म तूं पुन्हा, ये, येईन मीहि पोटीं
देवा कधीं न होवो ही आस माझि खोटी.

असा शेवट केलेला आहे. ही आत्मफुशारकीची गोष्ट नाहीं. परंतु—मराठी सारस्वतांत इतक्या जोराची गिरसप्पाच्या धबधब्याप्रमाणें वाहणारी पुत्रप्रेमानें तुडुंबलेली कविता विरळच सांपडेल. माझ्या मनांत दंगल माजविणाऱ्या भावना अखेर मला कवितेंत प्रदर्शित करितां आल्या याबद्दल मी ईश्वराचे आभार मानतों."

अशा त्यांच्या आईवरील कविता आणखी प्रसिद्ध झाल्या आहेत. तुटलेल्या दुव्यांतील पान ७ वर ७ वें सुनीत ' प्रातःकालिं अतां तुझें नच घडो सुस्निग्ध तें दर्शन ' हें सुनीतही प्रसिद्ध आहे त्याप्रमाणें रामभाऊंच्या पत्रांत खालील कांहीं कविता सांपडल्या.

*मी आणि माझी आई १६-६-१४*

बहुत हट्ट करूनि पदोपदीं
किति जरी रुसलों दिवसांतुनी;
परी कुशींत तुझ्या शिरल्याविना
खचित झोंप निशीं मज येइना !

उठुनि दूर जरी तुजपासुनी
कधिं कुठें लपलों तर ये मनी.
मम मटामट गोड मुके कधीं
जननि घेशिल ? होइ अधीर मी !

आहे शांत नितांत सुंदर उषा; आकाशपंथीं निळ्या
शिस्ती वांचुनि मेघ मध्यमगती काळे, भुरे कापशी.
नैॠत्येकडुनि चढूनि ठरती जाती पुन्हा खालती
एका मागुन एक मानव पिढ्या या कालपृष्ठीं जशा
छाया आणि रविप्रभा विहरती भूमीवरी चंचला
विश्वाच्या हृदयांतल्या गमति त्या आशा निराशा मला
आहे खेळत ग्यालरींत बसलों मी पुस्तकां संगतीं
केव्हांचें परि सर्व लक्ष्य अपुलें वाटेकडे लागलें
आई ठेवुनि एकला.मज घरीं बाहेर गेली असे,
पातेली मधिं दूध भाकर—मला आहे क्षुधा लागली,
आधीं येउनि हासुनी मम मुके घेईल ती साखरी
पोटाशीं धरल्यावरी मज तिनें मी भाकरी खाइन
जें ती दे—मग मीठभाकर असो—सर्वांहुनी गोड ती
जें पाणीं नयनांमधूनि तिचिया माझ्यावरी लोटतें
गंगास्नानहि तुच्छ त्या पुढति, कीं आचार साधे तिचे
प्रीती गाढ, विचार उन्नत खरे, त्यांचें असें मूळ मी

## To My Mother

रवितापानें बदलुन जाउन, अपुली आई धरणी,
इजला सोडुन थेंब जलाचा सवायु विहरे गगनीं,
मातृप्रेम तयाचें परित्या वरती राहुनि देई
विव्हल होऊन तो विरहानें झेंप खालती घेई,
अमर हृदय आईचें उघडुन त्याला घेई आंत
सदा सारखें कुठें असो तें सुखांत वा दुःखांत

*तसाच आई मी रागावुन, तुजवर झालों दूर,*
*राग परी तो प्रेम–जन्य, मज वाटे मग हुरहूर*
*उत्कंठेनें धांवत आलों पुनरपि तुझिया पाशीं,*
*कारण जें तुजपाशीं तें नच इथें न वा आकाशीं*
*तर घे आई उचलुन मजला, मीलन हें किती गोड !*
*तुझ्या मुलांचें कोण तुजाविण तुजसम पुरविल कोड ?*

त्यांची आईवरील शेवटची कविता ओघा-ओघानेंच पुढें येईलच.

उमरखय्यामच्या फारसी रुबायाचें भाषांतर करण्याचें त्यांच्या मनांत बरेंच दिवसापासून घोळत होतें. ता. १९–९–१९२१ च्या पत्रांत त्याबद्दल रामभाऊंना लिहितात—

परवांच उमरखय्यामच्या 'फारसी' रुबाया मला मिळाल्या. त्या बहुतेक चार्वाक नीतिपर आहेत. हळूहळू मी त्याचें समवृत्त भाषान्तर करूं लागलों आहे.

परंतु फारसी वृत्तांत भाषांतर करणें कितपत इष्ट आहे याविषयीं मी साशंक आहें. एकदां वाटतें कीं, उमरखय्यामचे विचार महाराष्ट्राला कळावे, त्या बरोबर त्याच्या कवितेचें संगीतही जर एकाद्याला मिळालें तर ' अधिकस्याधिकं फलं ' असें नाहीं का होणार ? तें संगीत अपरिचित परदेशी वाटेल, पण म्हणणारा परदेशी आहे हें श्रोता जाणून आहेच.

*गुत्त्यांतुनि आवाज सकाळीं आला*
*बेहोष कुठें ख्यालि खुशाली वाला ?*
*आयुष्याचें माप न भरलें पूर्ण,*
*तों माप भरी, घे मदिरेचा प्याला !*
*मेल्यास मला घाला मद्य स्नान,*
*अन् मंत्र जपा ' शराब प्याला छान, '*

*भेटेन तुम्हा न्याय दिनीं मी कोठें ?*
*धूळींत पिठ्याच्या दारीं मत्स्थान '*

मी नागपूरला असतांना त्यांनीं मला एक सुनीत लिहून पाठविलें होतें. त्या सुनीताची जन्मकथा त्यांच्या शब्दांतच खालीं देत आहें.

कोल्हापूर, ता. १५-१२-३०

" दोनतीन दिवसांमागें ××× चौकाच्या पलीकडे बिऱ्हाड राहतें. त्यांत नवऱ्यानें बायकोला अंगावर काठी फुटेपर्यंत मारली. नवरा आहे बाहेरख्याली, आणि बायकोनें ' कर्ज काढून तिला साड्या-चोळकी कशाला केलीत ' म्हणून म्हटलें मात्र तों हिंदुपातित्व खवळलें. दिवसभर मला कांहीं बरें वाटलें नाहीं. मनुष्यानें दुसऱ्यास सहवासमुक्त करावें, पण त्याला मारण्याचा हक्क आहे असें मला वाटत नाहीं. त्या दिवशीं लिहिलेलें सुनीत मी तुला सोबत पाठवीत आहें. "

## सुनीत

*दावावे अबलेस तूं बळ तुझें मुर्दाड मर्दा ? पहा—*
*घायाचा निज हात तो उलट तूं भार्येवरी टाकिशी ?*
*केलें दान तिचें तुला म्हणून का लाभे असा हक्क हा ?*
*पूजा स्तोम कशास हें ? प्रभुदया निर्लज्ज तूं भाकिशी*
*होईना वर हात भग्न करितां मूर्ती कुणी देवळीं*
*होईना वर हात इज्जत कुणी घेतां सतीची पथीं*
*देतां लाथ कुणी वरिष्ठ न हृदयीं तें रक्त तापे मुळीं,*
*सुल्तानी सगळी घरीं परि तुझीं तूं आर्य पत्नी पती*
*देशी प्रीति तिला, स्वतंत्र वश हो पैक्यास जी चेटकी*
*देशी काढुनि कर्ज हौस म्हणुनी शालू तिला पारवा.*
*देशी हीस विवाह बद्ध म्हणुनी सौभाग्य लत्तेंत कीं !*
*देशी केरसुणी परी स्थळ घरीं—वा आर्य संसार वा '*

दासी होउन व्हा न दास जननी ! हे मर्द मर्दायला
कालीचण्ड बना अहो युवतिनो त्या रुण्डमाला गळा.

ता. १२ डिसेंबर १९३० दुपार, कोल्हापूर.

सन १९३८ सालीं कॉंग्रेसनें कांहीं तरी ठपका ठेवून डॉ. खऱ्यांना अधिकार-पदाचा त्याग करण्यास भाग पाडलें. तें कॉंग्रेसचें करणें माधवरावांना आवडलें नाहीं. त्यांच्या मनाला त्याची राहून राहून टोंचणी लागली. त्यानंतर त्यांनीं एक सुनीत रचलें. बाबांना पत्र लिहिलें त्यांत त्यांनीं तें सुनीत लिहून पाठविलें. त्याविषयीं बाबांना ते लिहितात—

"नागपुरीं शोकान्त नाटक तुम्हीं वाचलेंच असेल. मीं एक सुनीत त्या प्रकारावर लिहिलें आहे. तें मागील कडेस लिहून देतों. वाचून मत कळवावें. लिहिल्यावांचून मनास बरेंच वाटेना म्हणून मीं तें लिहिलें आहे—

नीचांना रुचणार काय चढतां तूं स्वीय सिंहासनीं
छे, हा योग्य न धर्मराज ! म्हणुनी, हो एक कोल्हे कुई ।
अन् भोळे मग काळजींत पडती, माजेल येणें दुही ।
होती मूढ महानुभाव असल्या मायेचिया भाषणीं,
अन् येती शकुनी तुला उलथुनी पाडावयाला झणीं,
—ये कोणासहि पङ्क तो उडवितां निष्पाप पङ्के रुही,
सूर्याला, मिळतांच संधि, न चुके ग्रासूं शके राहु ही
हे आश्चर्य न बन्धनीं गवसतां तूं अन्ध होता धणी,
झाली क्रान्ति पहा विलक्षण कशी हिंसा न होतां मुळी
अत्याचार कुणा दिसेल तरी का सत्यप्रयोगांत या ?
तों कोणी सुचवी ! उठा लिहुनियां, झाली स्वधर्मच्युति
अन् माहात्म्य तुझें खरेंच उसळे—साङ्गे, 'सुखें द्या सुळीं !'

*नाहीं मी त्यजिला स्वधर्म, न कधीं सोडीन जातां लयां—*
*मारा शम्भुपरी, तुळापुरकरा—आत्म्यास नाहीं मृती !*

हें सुनीत ता. २८ जुलै १९३८ मध्यें लिहिलेलें आहे.

एकदां एका संस्थेमध्यें दिसायला सुंदर अशी परदेशी विधवा मुलगी आली होती. ती एका फार मोठ्या जमीनदाराची सून. तिचा नवरा एकाएकीं वारला. तिला दोनतीन मुलें होतीं. घरंदाज घराण्यांतील ती सुंदर तरुण मुलगी, दैवानें तिच्यावर घाला घातल्यावर कांहीं दिवस तिनें घरांत सासऱ्याजवळ काढले. पुढें तिच्यावर कोणा एका घरांत येणाऱ्या जाणाऱ्या मुसलमानाची दृष्टि वळली. तो योग्य संधीची वाट पाहत होता. पुढें ती एका जत्रेला जाण्याकरतां निघाली. घरांत कडक पडदा. पडद्याच्या गाडींतून ती जत्रेला चालली होती. परंतु वरील गृहस्थानें पाळत राखून तिला फूस लावून आडरस्त्याला नेली व जत्रेला न जातां तिला तो एका लांबच्या खेड्यांत घेऊन गेला. पुढें त्यानें तिला बिघडविली. एका घरांत कोंडून ठेवली. तिच्या शुश्रूषेला त्यानें एक म्हातारी बाई ठेवली होती. त्या तरुण स्त्रीला एक दिवस सद्बुद्धि सुचली. तिनें सर्व हकीकत एका पत्रांत लिहून त्या म्हाताऱ्या बाईकरवीं तेथील हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांना कळविली. लगेच ती सर्व मंडळी तेथें आली. त्यांनीं कुलूप तोडून त्या तरुणीला सोडवून नेली. पुढें ह्याच मंडळींनीं तिला वरील संस्थेंत आणून ठेवली.

वरील हकीकत माधवरावांना कळली. त्यांच्या मनावर ह्या गोष्टीचा फार परिणाम झाला व त्यांनीं त्यावर 'क्रूर कोण ?' ही कविता लिहिली. परंतु पुढें त्यांनीं त्या कवितेचा मथळा बदलला व 'भ्रष्टा' ह्या नांवानें छापली. 'स्वप्नरंजन' पा. १४० कविता ९८.

स्वप्नरंजन प्रसिद्ध झाल्यावर ते त्यांनीं आपल्या बडोदें नगरींतील संस्मरणीय व्यक्तींना आणि घटनांना अर्पण केलें. पुस्तक १९३४ सालीं प्रसिद्ध झाल्यावर तें त्यांनीं एका व्यक्तीला दिलें. त्या व्यक्तीनें मला पृच्छा केली, 'का हो, माधवराव असें काय करतात? आतां हें वरील पुस्तकच पहाना? ह्याची अर्पणपत्रिका अशी काय? चमत्कारिक वाटतें बुवा! तुम्हांला कां नाहीं माधवराव एखादें पुस्तक अर्पण करीत?'

मी त्या वेळीं एवढेंच म्हटलें कीं, 'अहो, अजून माधवरावांचें लेखन संपलें नाहीं.' पुढें 'तुटलेले दुवे' हा सुनीतसंग्रह त्यांनीं मला अर्पण केला. त्या वेळीं ह्या गोष्टीची मला आठवण झाली व वरील हकीकत त्यांना मीं सांगितली, तेव्हां ते म्हणाले, "मनांत कोणत्याही प्रकारचा गैरसमज नसतांना तो उत्पन्न करून देण्याचें काम लोक कसें करतात हें आतां तुला समजेल."

सुनीताञ्जलींतील बऱ्याच सुनीतांत त्यांनीं आपल्या स्वभावाचें वर्णन केलें आहे. नायकांच्या किंकराच्या–इच्छा-आकांक्षाही माधवरावांच्या इच्छा-आकांक्षांशीं बऱ्याचशा जुळणाऱ्या आहेत. मलाहि त्यांतील बरींचशीं सुनीतें केवळ त्यामुळेंच आवडतात. तेव्हां पुस्तक प्रसिद्ध होण्याच्या आधींच तें प्रसिद्ध झाल्यावर मला अर्पण करावयाचें असें त्यांनीं ठरविलें होतें. माधवरावांच्य आयुष्यांतील आणखी मोठी महत्त्वाकांक्षा म्हणजे पुण्यांत स्वतःचें असें घर बांधणें. त्या महत्त्वाकांक्षेप्रमाणेंच किंकराची महत्त्वाकांक्षा आहे. 'तुटलेल्या दुव्या' वरील मुखपृष्ठावरचें चित्र हें त्यांचें द्योतक आहे. नायक-नायिकेलाःलांब बोट करून सांगतो आहे कीं, "त्या ओढ्याकांठीं आपण लहानसें घर बांधूं या."

"बांधूं चिमणें खोपट कीं ऊब जयाची, दैवी प्रणयाची"

हाच ह्या लांबवर बोट करून दाखविण्याचा उद्देश आहे. तुटलेल्या दुव्याची अर्पणपत्रिका ते कांहीं मोघम शब्दांत करणार होते. परंतु त्यांनीं तसें मुद्दाम केलें नाहीं. पहिल्यांदा अर्पणपत्रिकेंतील मजकूर 'जिच्या साहचर्यानें माझें जीवन सुखी झालें त्या माझ्या सहचरीस' असा होता. पुन्हा त्यांनीं हा मजकूर मुद्दाम बदलला. त्यांना असें वाटलें कीं, कांहीं लोक याचाही विपर्यास करण्यास कमी करणार नाहींत. लोकांना पुन्हा प्रश्न पडेल, ही सहचरी कोण? गत-कालांत माधवरावांनीं जिच्यावर प्रेम केलें अशी कोणी व्यक्ति आहे काय? हा प्रश्न येऊंच नये म्हणून त्यांनीं माझ्या नांवाचा व माझ्या पदवीचा स्पष्ट उल्लेख केला आहे. तुटलेले दुवे त्यांनीं आपल्या वाढदिवशीं म्हणजे ता. २१ जानेवारी १९३८ सालीं प्रसिद्ध केलें.

मला अनेक कवितांच्या जन्मकथा माहीत आहेत, परंतु ज्या प्रत्यक्ष माझ्या-समोर झाल्या व ज्यांचा माझ्या सांसारिक जीवनाशीं संबंध आहे अशाच कवितांच्या जन्मकथेचा वृत्तांत मीं येथें दिला आहे.

त्यांच्या गतकालांतील कांहीं कवितांत अनुभवाचे अनेक पडसाद आले आहेत ह्यांत शंकाच नाहीं. परंतु त्यावरून कोणतीही कविता वैय्याक्तिक आहे असें समजूं नये. आजपर्यंत त्यांच्या अनेक काव्यांतील व्यक्ति हुडकून काढ ण्याचे प्रयत्न अनेकांनीं केले. कांहीं कवितांतील कांहीं प्रसंग खरे असले तरी त्यांना जे प्रसंग संस्मरणीय वाटलें ते त्यांनीं चित्रित केले. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे कीं, अमुक एका व्यक्तीशीच त्या कवितांचा संबंध आहे. त्याच-प्रमाणें आयुष्यांतील कठोर प्रसंगांचें चित्रण करतांना कांहींचें त्यांनीं रूपांतर-ही केलेलें आहे. उदाहरणार्थ, स्वप्नरंजनमधील 'प्रेम होईना तुझ्यानें प्रेम माझें राहुं दे' ही कविता स्वतः कवींनेंच त्या कवितेला कारण झालेल्या एका संस्थेचा उल्लेख केला नसता तर मी मागाहून कितीही घसाफोड करून सांगितलें असतें तरी कोणालाही वरील कविता फर्ग्यूसन कॉलेजवर आहे हें खरें वाटलें नसतें. 'विरहतरंग' 'सुधारक'. 'नकुलालंकार' 'तुटलेले दुवे' ह्या सर्व काव्यांत त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेले, अनुभविलेले, कित्येक लोकांच्याकडून ऐकलेले असे अनेक प्रसंग आलेले आहेत. परंतु कोणत्याही ठराविक व्यक्तीला उद्देशून त्यांत कोणताही प्रसंग नाहीं.

रा. खानोलकरांना माधवरावांनीं लिहिलेलें एक पत्र माधवरात्र वारल्यावर स्वतः रा. खानोलकरांनीं—'पटवर्धन स्मृत्यंक सह्याद्रि' जाने. १९४० मेमध्यें नांवाचें मूळ वँ कवितांचें मूळ ह्यांत प्रसिद्ध केलेल्या खालील मजकुराकडे मी वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितें. एकदां रा. खानोलकरांनाच विरहतरंगांतील 'इंदू' व तुटलेल्या दुव्यांतील 'शारदा' यांच्या चेहेऱ्यांत अमुक व्यक्तीचे चेहरे दिसतात, असा संशय आला होता, नव्हे त्यांची खात्री झाली होती. खानोलकरांनीं त्यांना तसें लिहून विचारलें होतें. परंतु माधवरावांनीं रा. खानो-लकरांना खालीलप्रमाणें उत्तर लिहिलें, "तुम्ही लिहितां का, 'इंदू व शारदा' ह्या idealised × × संबंधीच्या उसळलेल्या भावनोर्मींतून निघालेल्या खास आहेत अशी माझी खात्री झाली." असें कां म्हणूं नये कीं, इंदू व शारदा हीं पात्रें निर्माण करतांना कवीनें ××× विषयक कांहीं गोष्टींचा केवळ उपयोग करून घेतला. पण तुम्ही म्हणतां कीं 'ही खात्री चुकीची आहे, असें मला वाटत नाहीं.' तुमची आत्मश्रद्धा इतकी दांडगी असल्यावर अजून सुदैवानें जिवंत असलेल्या कवीनें जीव तोडून इन्कार केला तरी त्याचा काय उपयोग? विरहतरंग वाचण्यापूर्वी 'इंदू' कोण हें मी

सांगेन असें घाटे म्हणाले होते, पण वाचून पाहतांच त्यांचा ग्रह बदलून त्यांनीं आपली चूक कबूल केली. यासाठींच मला केव्हां केव्हां असें वाटतें कीं, माझें आत्मचरित्र माझ्या हातून एकदां लिहिलें जावें. मग इतर कांहींही लिहोत. कवीवर विश्वास ठेवणाऱ्या कवीचें तरी म्हणणें काय आहे तें वाचायला मिळालें पाहिजे."

कवि आपल्या काव्यांत स्वतःच्या अनुभवाचा उपयोग करून घेतोच, नाहीं असें नाहीं. परंतु आत्मचरित्र किती व कोणतें हें फक्त कवीच सांगू शकेल. कांहीं तरी सांगून लोकांना भलत्याच दिशेनें झुलवीत न्यायची कला मला अवगत नसल्यामुळें मी मौनाचा स्वीकार श्रेयस्कर मानतों. तथापि आयुष्यांतील कांहीं प्रसंग कोणत्या ना कोणत्या कारणानें प्रसिद्ध होत असल्यानें लोकांचेंच काय पण मित्रांचेंही तर्कवितर्क चालू होतात; आणि आपापल्या माहितीच्या जोरावर ते तर्क खरेच आहेत अशी त्यांची दृढ समजूत होते. मित्र काय म्हणतात हें सुद्धां माझ्या कानांवर उशीरा येतें. तोंपर्यंत कमीअधिक व्हायचा अनर्थ होऊन गेलेला असतो. × ×नें 'श्यामले' संबंधींचें अनर्थावह विधान × × ×त प्रसिद्ध केलेंच कीं नाहीं. आतां ही कविता त्या व्यक्तीची ओळख होण्यापूर्वी लिहिली गेली होती. इतकेंच नव्हे तर सुदैवानें 'महाराष्ट्र साहित्य' मासिकांतील 'गज्जलांजलि' या लेखमालेंत प्रसिद्धही झालेली आहे. ही गोष्ट मीं लोकांच्या नजरेला आणिली तरी किती लोक सरळपणानें आपला ग्रह बदलण्यास तयार होतील? हाच गैरसमज ओळखीपूर्वींच लिहून प्रसिद्ध झालेल्या 'भिल्लीण न तूं भामिनी' या कवितेविषयीं! मागाहून लिहिलेल्या कवितेविषयीं तर बोलायलाच नको!

स्वतः माधवरावांनीं आपल्या कवितांसंबंधीं लिहून ठेवलें आहे तें मीं येथें मुद्दाम उद्धृत केलें आहे. ह्याहून अधिक लिहिण्याची गरज नाहीं. माधवरावांच्या मृत्यूनंतर माझ्या कानावर कांहीं कविता अमुक एक व्यक्तीवरच आहेत असे उद्‌गार आले. त्यांचें समाधान स्वतः माधवराव जिवंत असते तरच करूं शकले असते आणि तरीही तें समाधान झालें असतें कीं नसतें ही शंकाच आहे. मग आतां त्यांच्या मृत्यूनंतर तर विचारायलाच नको!

# सार्वजनिक जीवनांतील माधवराव : : ११

माधवरावांच्या सार्वजनिक आयुष्याशीं माझा फारसा संबंध आला नाहीं. आमचें लग्न झाल्यावर माझ्या कानावर बरेंच वेळ असें आलें होतें कीं, आतां माधवराव कविता करतील आणि त्यांच्या कविता 'गंगू' म्हणेल ! परंतु ही गोष्ट माझ्या अगदीं स्वभावाविरुद्ध होती. त्यांनीं कविता करावी व मीं गावीं असें कधींच झालें नाहीं. इतर कवींच्या कविता मीं दोन तीन सम्मेलनांतून म्हटल्या होत्या. परंतु माधवरावांची कविता एखाद्याच खाजगी बैठकींत मीं म्हटली असेन. मी तसें करण्याचें मुद्दाम टाळीत असें. माझा आवाज जरी बरा असला तरी माधवरावांची म्हणण्याची धाटणी मला कधींच साधली नसती अशी माझी खात्री होती.

मला एकदांचा असा प्रसंग आठवतो कीं, आम्ही अलिबागला गेलों असतां माधवरावांचें काव्य गायन झालें. तसें ते चार लोकांत कविता क्वचितच म्हणत. माधवरावांनीं दोनतीन कविता चालीवर म्हटल्या व नंतर "मुंबईमध्यें पहाल तो आपल्याच गर्दींत" ही तशीच साधी म्हटली. तरी ती त्यांनीं इतकी सुंदर म्हटली कीं, श्रोतृवृंद अगदीं तल्लीन झाला होता.

कोल्हापूरच्या १०-११ वर्षांच्या काळांत माधवरावांनीं बहुतेक दक्षिण महाराष्ट्र पालथा घातला. सन १९२८ नंतर ते हळूहळू जास्त प्रसिद्धीस येऊं लागले व मधून मधून कोणत्याना कोणत्या तरी निमित्तानें ते निरनिराळ्या ठिकाणीं जाऊं लागले. ह्या काळांत अनेक प्रसंगीं सभांचे अध्यक्ष, वक्ते, सन्मान्य पाहुणे म्हणून महिन्यांतून त्यांची एखादी तरी फेरी तिकडच्या मुलुखांत होऊं लागली. माधवराव जितके एकलकोंडे होते तितके ते मनमिळाऊ व विनोदी होते. कांहीं कांहीं जुन्या कुटुंबांतील स्त्रियाही त्यांच्याशीं अगदीं मोकळेपणानें वागत व बोलत व माधवरावही अशा ठिकाणीं घरच्यासारखे वागत.

माधवरावांच्या आयुष्यांतील त्यांच्या प्रतिकूल काळांत मित्र म्हणवणाऱ्या कांहीं मंडळींनीं "आतां आपण आमच्या घरीं न आलांत तर बरें" असें त्यांना स्पष्ट सांगितलें होतें. माधवराव पुन्हा प्रोफेसर झाल्यावर अशाच एका जुन्या ओळखीच्या त्यांच्या मित्रांनीं त्यांच्याशीं पुन्हा पूर्ववत् संबंध ठेवण्याचा प्रयत्न

केला. असे गमतीदार प्रसंग अलीकडे अलीकडे वारंवार येऊं लागले होते. सन १९२४ सालच्या फर्ग्यूसन कॉलेज–प्रकरणामुळें दुशील ठरलेले माधवराव आतां लोकांच्या दृष्टीनें सुशील ठरूं लागले होते. असे कांहीं प्रसंग घडले म्हणजे ते विनोदानें म्हणत, 'पत्नी ढालच कीं अब्रूची.' कित्येक वेळीं ते बेचैनही होत. व म्हणत, " हा मान मला नाहीं. हा माझ्या प्रोफेसरीला व डी. लिट्. पदवीला आहे. मी ह्यानें हुरळून जाणार नाहीं. ज्यांनीं न-कळत मला वाईट वागवलें त्यांचा मला राग येत नाहीं. परंतु अंतःकरणांतील त्यांच्याबद्दल असलेला ओलावा व ओढा आतां माल नाहींसा झाला आहे !"

१९३३ सालीं नाशिक कवि–सम्मेलन झालें. माधवराव अध्यक्ष होते, व स्वागताध्यक्ष श्रीमती लक्ष्मीबाई टिळक होत्या. १९३६ सालीं जळगांव साहित्य-सम्मेलन झालें. अध्यक्ष माधवराव व स्वागताध्यक्ष सौ. आनंदी-बाई शिर्के होत्या. ह्यावरून माधवराव विनोदानें म्हणत कीं, " मी शक्य तों स्त्रियांना टाळीत असतों. परंतु स्त्रिया माल माझ्या हात धुऊन पाठीस लागल्या आहेत."

माधवराव नाशिक कवि संमेलनाचें अध्यक्ष झाले त्या वर्षींच आमच्या सुधाचा जन्म झाला. मी दवाखान्यांतून घरीं आलें व माधवराव संमेलनाला नाशिकला गेले. त्या सम्मेलनप्रसंगीं व्हावयाचें अध्यक्षीय भाषण माधवरावांनीं मी दवाखान्यांत असतांना रोज दुपारीं कॉलेज सुटल्यावर नियमितपणें येऊन वाचून दाखवावें. दवाखान्यांत माझ्यासारख्या ज्या आणखी एक दोन बाळंतिणी होत्या त्या व नर्स आमच्याकडे मोठ्या कुतूहलानें बघत.

साधारण दिवसाचें आठ दहा तास तरी त्यांचें लेखन चाले. लेखन थोडेंबहुत झालें कीं तें त्यांना कोणाला तरी वाचून दाखविल्याशिवाय चैन पडत नसे. मला तर वाचून दाखवीतच, पण कोणी आमच्या घरीं जर त्या वेळेस आलें तर त्यालाही ही शिक्षा सहन करावी लागे. समजा, जर कोणी आलेंच नाहीं तर ते कोणाला तरी बरोबर घेऊन येत व आपला लिहिलेला भाग वाचून दाखवीत.

त्यांना आणखी एक मोठी गमतीदार संवय होती. त्यांनीं एखादी कविता केली कीं तीच कविता पंधरा दिवसांनीं बहुतेक आमूलाग्र बदललेली असावयाचीच. ह्या त्यांच्या संवयीमुळेंच त्यांच्या कांहीं चांगल्या कविताही क्लिष्ट झाल्या आहेत.

प्रसिद्ध झालेल्या कवितांत फेरफार करण्याचा मध्यंतरी त्यांनीं सपाटाच लावला होता. हें त्यांचें करणें मलाही फारसें आवडत नसे.

मी त्यांना एका पत्रांत लिहिलें, "आतां सध्यां तुमचा लेखनव्यवसाय बंद पडलेला दिसतो आहे. नवीन लेखाकरतां कांहीं विषय सांपडत नाहीं असें वाटतें! पण तुमची आणखी एक त्यामुळें मला भीति वाटूं लागली आहे. तुम्हांला कांहीं उद्योग नसला म्हणजे तुम्ही जुन्या कविता चांगल्या असतांही सुधारत बसतां. कृपा करून हा डागडुजीचा रिकामा धंदा करूं नका.

एकदां 'अज्ञातनाथास' ही कविता सुधारून ती त्यांनीं मला पत्रांतून पाठविली. ती नवीन सुधारलेली कविता मला तितकीशी आवडली नाहीं. ते मला लिहितात—

"मला ती कविता निर्दोष व अर्थपूर्ण करावयाची आहे. Better is the enemy of good ' असें ह्या कवितेच्या बाबतींत मी होऊं देणार नाहीं. तुला ती भीति कां वाटते? मीं सध्यां डागडुजीचा धंदा आरंभला आहे, असें कां म्हणतेस? असें म्हणण्यापेक्षां साफसुफीचे व रङ्गरोगणाचें काम करीत आहे असें म्हणणें अधिक युक्त होईल, आणि घराची काळजी असली तर शाश्वतीसाठीं तीही केलीच पाहिजे."

स. १९३५ सालीं इंदूरला साहित्य-सम्मेलन झालें. तेव्हां औंधचे राजे सम्मेलनाचे अध्यक्ष होते. त्याच सम्मेलनांत पुढील सम्मेलन जळगांवला व्हायचें ठरलें. तेव्हांच रा. शिर्के बोलून गेले कीं, "जळगांवच्या सम्मेलनाचे अध्यक्ष आम्ही माधवरावांनाच करणार." आणि ते बोलल्याप्रमाणें खरोखरच त्या सम्मेलनाचे अध्यक्ष माधवरावच झाले. माधवराव साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष झाले त्या सुमारास माझी प्रकृति बरी नव्हती. मी सम्मेलनाला जाऊं शकेन असें मला वाटलें नाहीं. परंतु माधवरावांचा हा बहुमान होता. तो दृष्टीनें पाहावा अशी इच्छा मला सहाजिकपणेंच होती; माधवराव जळगांवला गेल्यानंतर दोन दिवसांनीं मी मुलें माहेरीं ठेवून संम्मेलनाला गेलें. मुलांना दूर ठेवून कोणत्याही सभेला किंवा सम्मेलनाला मी कधीं गेलें नव्हतें. मुलांची व संसाराची आबाळ करून असल्या गोष्टी करणें मला व विशेषतः माधवरावांना मुळींच पसंत नव्हतें. एकदां जाणून बुजून संसारांत पडल्यावर तो नीटनेटका मन लावून करणें हें स्त्रीनें आपलें आद्य कर्तव्य समजावें असें त्यांचें मत

होतें. परंतु ह्या प्रसंगीं मीं यावें अशी माधवरावांचीही इच्छा दिसली. म्हणूनच मुलें लहान होतीं तरी त्यांना दूर ठेवून मी सम्मेलनाला गेलें. गाडींत माझ्याबरोबर प्रो. शं. के. कानेटकर व डॉ. श्री. व्यं. केतकर होते; माधवरावांची जेथें उतरायची सोय केली होती तेथें मात्र मी उतरलें नाहीं. मी प्रतिनिधी-निवासांत उतरलें होतें. त्याही वेळेस माधवराव इतके गडबडींत होते तरी माझी विचारपूस करायचें कधीं ते विसरले नाहींत. जेवायला आम्ही सोनाळकर वकिलांच्या घरीं जात असूं. माधवराव कितीही कामांत असले तरी जेवायची वेळ दुपारीं ११ ला झाली कीं माझ्याकडे येत. आम्ही दोघें मिळून जेवायला जात असूं; परंतु ह्या व्यतिरिक्त त्यांची—माझी कधीं गांठ पडत नसे. त्याच दिवसांत एकदां असें झालें कीं, माधवराव इतर पाहुण्यांच्या बरोबर प्रतिनिधी—निवासांत जेवले. मी मात्र जेवलें नाहीं. मी निवासांतच त्यांची वाट पाहत बसलें. कांहीं वेळानें माधवराव मला तेथेंच जेवल्याचें समजलें. मी कांहीं बोलले नाहीं. माझा स्वभाव मूळचा संकोची. ‘ मला जेवायचें आहे ’ असें मीं कांहीं तेथील व्यवस्थापकांना सांगितलें नाहीं व तशीच अंथरूण घालून झोंपलें. माझ्याबरोबर माझ्या खोलींत श्री. सौ. शालिनीबाई रानडे उतरल्या होत्या; त्यांनाही मी उपाशी असल्याचें सांगितलें नाहीं. रात्रीचे दहा वाजले. माधवरावांना एकाएकीं आठवण झाली व ते तावडतोब आपल्या निवासांतून रात्रीं १०॥ ला आले व माझ्या जेवणाची विचारपूस करूं लागले. माझ्या संकोची स्वभावाबद्दल मी थोडें रागें भरून तर घेतलेंच, परंतु इतक्या रात्रीं जेवणाकरितां कोणाला त्रास देणें मलाही बरोबर वाटलें नाहीं. मी तशीच झोंपलें.

ते जेथें उतरले होतें तेथें त्यांची राहण्याची व्यवस्था असावी तशी नव्हती. सम्मेलनाचे अध्यक्ष—माधवराव बाटलीनेंच पाणी पीत होते. परंतु माधवरावांनीं स्वतः मात्र ह्या गोष्टीची तक्रार कधीं केली नाहीं. हें जेव्हां इतरांच्या ध्यानांत आलें तेव्हां शेवटल्या दिवशीं तेथें तांब्या भांडें ठेवण्यांत आलें.

माधवराव एकदां कोणत्या कामांत गढले कीं त्यांना स्वतःच्या देहाची सुद्धां शुद्ध नसे. सम्मेलन संपलें व मी सहज त्यांच्या खोलींत गेलें. खोलीचा अवतार पाहण्यासारखा होता. एका कोपऱ्यांत हारांचा खच पडला होता; होल्ड-ऑल्‌मधले अंथरूण होल्ड-ऑल्‌मधेच, परंतु अस्ताव्यस्त पडलें होतें. दोन

चार दिवसांचे न धुतलेले कपडे खुंट्यावर लोंबत होते. खोली दोन दिवसांत झाडलेली दिसत निव्हती. माधवराव बाहेरच्या बाजूला बैठकींत दहाबारा मडळींशीं गप्पा करण्यांत निमग्न झाले होते. शेवटीं मीं व मोहनराव शहाण्यांनीं खोली आवरली.

त्यानंतर त्याच दिवशीं आम्ही सौ. आनंदीबाई शिर्क्यांच्याकडे राहावयास गेलों. घाटेमंडळीही तेथेंच उतरली होती. गप्पांना रंग चढला होता. माधवरावांच्या अंगांत विनोदानें संचार केला होता. मंडळी माधवरावांच्या बोलण्यावर पोट धरधरून हंसत होती. आम्ही त्याच रात्रीं अकराच्या गाडीनें पुण्यास येण्यास निघालों.

१९३८ सालीं नगर साहित्य-सम्मेलन झालें. माधवराव त्या सम्मेलनाला गेले होते. तेथें ते तीन दिवस होते. तिसरे दिवशीं रात्रीं ८-९ च्या सुमाराला ते घरीं आले. मीं स्नानाकरतां पाणी तापवलें व धुतलेले कपडे काढण्याकरितां त्यांची प्रवासांतली वळकटी सोडली. आंत पाहतें तों एकही धुतलेला कपडा सांपडला नाहीं. मीं भराभर सर्व मळलेल्या कपड्यांचे बोळे बाहेर काढले आणि माधवरावांना आठवण झाली कीं, आपण नगरला होतों तोंवर आंघोळच केली नाहीं. आंघोळीचा विधिनिषेध त्यांना फारसा नव्हताच. एखाद वेळीं त्यांना त्याबद्दल म्हटलें तर ते म्हणत, “ आमची आंघोळ जुम्माके जुम्मां ! ”

ते एकदा मंडळींत बसले किंवा कोठें बाहेरगांवीं गेले कीं त्यांना स्वतःला खाजगी व्यवहार उरकण्याची कधीं आठवण राहात नसे. घरीं सुद्धा कोणाला जेवायला बोलावलें तर बोलण्याच्या नादांत माधवरावांना आपण काय जेवतों व किती जेवतों ह्याची शुद्धच नसायची ! त्यांना एक माहीत होतें कीं, पानांत टाकायचें नाहीं; मग कोणी कितीहि वाढत गेलें तर पुरे म्हणायची आठवण त्यांना क्वचितच राही. ते घरीं असले म्हणजे मला त्यांच्या जेवणांतली ही खोड माहीत होती. मी आपोआपच त्यांचें पुरेसें जेवण झालें कीं वाढायचें बंद करीं. परंतु बाहेरगांवीं जाऊन आले कीं अजीर्ण झाल्याची तक्रार त्यांची ठरलेली असे. बरेच पदार्थ पानांत वाढले कीं ते म्हणत. “ मी भरलेलें पान पाहून गोंधळून जातों. अशा वेळीं कोणता पदार्थ खावा हें मला समजतच नाहीं. कांहीं वेळेस इंग्रजी पद्धत मला आवडते. एकच डिश् पुढें आली म्हणजे तेवढाच पदार्थ खातां येतो.”

स. १९३७ च्या जानेवारीच्या २३ तारखेस 'छंदोरचनेची' दुसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली. जमल्यास त्यांना ह्याच छंदोरचनेवर मुंबई विद्यापीठाकडून डी. लिट्. पदवी घ्यावयाची होती. हें छंदोरचनेचें काम जवळजवळ दोन वर्षें चाललें होतें. छंदोरचना प्रसिद्ध झाल्यावर त्यांनीं तो प्रबंध म्हणून मुंबई विद्यापीठाकडे डी. लिट्. करितां पाठविला. ह्याच सुमारास त्यांना छंदोरचना ग्रंथाला तर्खडकर पारितोषिक मिळालें.

परंतु माधवरावांचें दैव त्यांना इतकें अनुकूल कधींच नव्हतें. मुंबई विद्यापीठाच्या मराठी बोर्डांत हा ग्रंथ डी. लिट् पदवी देण्याच्या योग्यतेचा नाहीं असा ठराव झाल्याचें बरेच दिवसांनीं त्यांना कळलें. त्यांना त्या वेळीं अत्यंत वाईट वाटलें. त्या दिवशीं १० च्या डाकेला प्रो. एम्. आर. परांजप्यांचें पत्र आलें. तें पत्र घेऊन माधवराव आंत आले. मी जेवणाची तयारी करीत होतें. माधवराव अत्यंत खिन्न दिसले. त्यांनीं तें पत्र माझ्या हातांत दिलें. मी तें वाचलें. बराच वेळ माधवराव विचार करीत बसले व नंतर एकदां उसासा टाकून म्हणाले, "बस् आतां तूं शिरा कर." मीं म्हटलें कां? 'त्यांनीं उत्तर दिलें, "अत्यंत उद्विग्नतेच्या वेळीं कांहीं बाह्योपचारानें मला माझें मन रमवावेंसें वाटतें. तो एक मनाचा विरंगुळा आहे. एवढ्यानें मी निराश होणार नाहीं, मला पदवी मिळाली, पाहिजे आणि ती मला खात्रीनें मिळेल."

फर्ग्यूसन कॉलेजांतून ज्या वेळीं माधवराव निघाले त्या दिवशीं त्यांनीं अशाच मनाच्या चमत्कारिक परिस्थितींत आपल्या मित्रांना श्रीखंड–पुरीचें जेवण दिलें होतें. अशा वेळीं माधवराव अत्यंत शांत असत. मनांतून अत्यंत बेचैन झालेले माधवराव अशा वेळीं संभाषणांत विनोदही करीत.

माधवरावांना पदवी सुखासुखीं मिळाली नाहीं. त्यांच्या शितशत्रूंनीं ती त्यांना मिळूं नये म्हणून अनेक खटपटी लटपटी केल्या व महत्प्रयासानें माधवराव शेवटीं स. १९३९च्या फेब्रुवारी महिन्यांत ता. १५ ह्या दिवशीं डी. लिट. झाले. म्हणजे छंदोरचनेची सुधारून वाढविलेली आवृत्ति जानेवारी १९३७ सालीं प्रसिद्ध झाली. त्यानंतर हा ग्रंथ त्यांनीं लगेच डी. लिट्. पदवीकरतां युनिव्हर्सिटींत पाठवला. व जवळजवळ दोन वर्षांनीं त्यांना अनेक भानगडी व उलाढाल्यानंतर ही पदवी मिळाली.

त्यांना ती बातमी कळली तेव्हां ते कोल्हापूरला व मी पुण्याला होतें. मला माधवरावांनीं डी. लिट्. झाल्याची आनंदाची बातमी तारेनें कळ-

वली. डी. लिट्.चा निकाल लागे तोंवर माधवरावांचें चित्त स्थिर नव्हतें. त्या संबंधीं माधवराव मला एका पत्रांत लिहितात, "हा आठवडाही माझा काळजींतच गेला. प्रत्यहीं कॉलेजांतून आल्यावर टपाल पाहावें आणि प्रतीक्षित कांहीं नाहीं म्हणून चुटपुटावें असें चाललें होतें. २० वर्षांपूर्वीच्या एम्. ए. च्या परिणामाची मी अशीच वाट पहात होतों. त्याची मला फार आठवण होते. कसा मीं आपल्या पूर्वीच्या चुका ओळखून पुढील अभ्यासाला निकरानें आरंभ केला होता, मी परिणामाच्या दिवशीं सकाळीं प्रो. शेख यांच्याकडे गेलों असतां त्यांनीं 'उत्तरपत्रिका कशा काय लिहिल्या गेल्या आहेत म्हणून विचारलें आणि मी दुसऱ्या वर्गांत येईन. कदाचित् नापास होईन असें उत्तर देतांच, त्यांनीं 'नापास होण्याचा प्रश्नच नाहीं; १ ला वर्ग मिळतो किंवा काय येवढाच प्रश्न आहे.' असे उद्गार काढले व मला कसें झायसें झालें हें मला चांगलें स्मरतें."

ही वेळ टळून गेल्यावर कांहींही होवो. त्यांतलें स्वारस्य गेलें. माझें दुर्दैव आड आलें तर त्याही वेळेस माझे शत्रूच माझ्यावर विजय मिळवतील, पण माझे प्रयत्न विराम पावणार नाहींत. माझ्या पुस्तकावरून एक पुस्तक इंग्रजींत लिहून तें प्रकाशित करून हिंदुस्थानांतील आणि हिंदुस्तानाबाहेरील विविध भाषाकोविदांच्यापुढें ठेवावयाचें हा मीं निश्चय केला आहे. माधवराव डी. लिट. झाले, परंतु त्याचें बरेंचसें श्रेय प्रो. एम. आर. परांजप्यांना आहे. ते त्या ठिकाणीं होतें म्हणूनच इतरांच्या लटपटी चालल्या नाहींत; नाहींतर एकट्या माधवरावांच्या श्रमाला यश येणें कठीण होतें.

ते डी. लिट. झाले तेव्हां त्यांच्या अनेक चहात्यांना अत्यंत आनंद झाला; परंतु ज्यांनीं त्यांना ही पदवी मिळूं नये म्हणून अतिशय खटपट केली त्यांचीं तोंडें मात्र हिरमुसलीं झालीं. त्यांचा पहिला सन्मान राजाराम कॉलेजांत प्रि. डॉ. बाळकृष्णांनीं दरबारी थाटाचा केला; आणि त्याच सुमारास डॉ. बाळकृष्णांची खटपट माधवरावांना वरची ग्रेड मिळावी म्हणून चालू झाली होती. त्यांनीं तसें आपण होऊन माधवरावांना सांगितलेंही होतें, परंतु त्या खटपटील यश येण्याच्या आंतच माधवराव वारले.

त्यांचा अनेक ठिकाणीं सन्मान झाला, परंतु विशेष उल्लेख करण्यासारखा सन्मान म्हणजे ते ज्या खानावळींत मी नसतांना जेवत होतें त्या खाणावळीच्या मालकानें आपण होऊन केलेला होय. आणि सगळ्यांत आनंद जर त्यांना झाला असेल तर ह्या सन्मानामुळेंच झाला.

पुण्यालाही त्यांचा बऱ्याच ठिकाणीं सन्मान झाला. त्याकरतां ते पुण्याला आले होते. आमचा 'निवान्त' बंगला तेव्हां नुकताच बांधून झाला होता. माधवराव एक दिवस मला न कळवतांच पुण्याला आले. दुपारीं त्यांना कोठें तरी मोठी मेजवानी होती. धांदरटपणा त्यांच्या पांचवीला पूजलेला असे. दुपारीं चार वाजतांचें आमंत्रण होतें. माधवरावांनीं सर्व कपडे चढवले व ते बुटांकरता सूटकेस हुडकूं लागले. पण ते त्यांना सांपडले नाहींत. ते त्यांनीं आणलेच नव्हते, मग सांपडणार कोठून ? शेवटीं नुसतेच मोजे घालून भाड्याचा टांगा करून ते मेजवानीला गेले. आणि ते मला समजूं नये म्हणून त्यांनीं टांगा मुद्दाम बाचांच्या बंगल्याच्या बाजूला उभा करायला सांगितला व परस्पर तिकडूनच ते गेले. हें त्यांनीं सर्व कां केलें तर ह्या त्यांच्या धांदरटपणाबद्दल मी कांहीं तरी बोलेन असें त्यांना वाटलें म्हणून.

सन १९३८ सालापासून माधवराव आत्मलक्षी झाले होते. त्यांना जगाचे बरेवाईट अनेक अनुभव आले. त्यामुळें ते अलीकडे समाजांत वावरत, परंतु संकोच वृत्तीनें व सांशंकपणानें वावरत. त्यांचा अलीकडे स्वभाव कसा बदलत चालला होता हें मीं खालीं दिलेल्या त्यांच्या पत्रांतील एका भागावरून स्पष्ट होईल.

"खरें म्हणशील तर जिवास जीव देणाऱ्या व्यक्तींच्या सहवासांतच शान्तपणानें आपलें कर्तव्य करीत काळ कंठावा असें मला अलीकडे वाटूं लागलें आहे नात्याचीं माणसें बहुधा स्वार्थी व अविश्वसनीय असें माझें पहिल्यापासूनचें मत अनुभवानें दृढच झालें आहे, आणि सारेच मित्र हे केवळ निःस्वार्थी व विश्वासनीय असतात हें मत मात्र अनुभवानें पार ढासळून गेलें आहे. त्यामुळें माझी स्थिति लाटांवर तरङ्गत वाहणाऱ्या लाकडाच्या ओण्डक्यासारखी झालेली आहे. त्यामुळें अनेक लोक त्यांच्याकडे येत जात असत, परंतु पूर्वींप्रमाणें एकदम मोकळेपणानें ते कोणाशींच वागत नसत. त्यांना ह्या बाबतींत एक प्रकारची विरक्ति आली होती. तसें पाहिलें तर पूर्वींपेक्षांही समाजांत त्यांना अधिक महत्त्वाचें व मानाचें स्थान मिळालें होतें. त्यांचा अनुयायीवर्ग वाढत चालला होता व मित्रपरिवारहि वाढत चालला होता.

अलीकडे बहुतेक महिन्यांतून एखाद्या तरी समारंभाला परगांवीं ते जात परंतु त्यांची पूर्वींची मोकळेपणाची वागणूक हल्लीं राहिली नव्हती. त्यांच्या मूळच्या एकलकोंड्या स्वभावाला इतकी लोकप्रियता व उद्योग मानवला

नाहीं हेंच खरें. ते शेवटच्या पांचसात वर्षे धडाडीनें कामें करीत, सभा-संमेलनांत भाग घेत, आपल्या आवडत्या प्रश्नांविषयीं अविश्रांत प्रचार करीत, अनेक प्रकारच्या लोकांना भेटत. प्रवास करीत; परंतु या सर्व उद्योगांत ते कधींच रंगून गेले नाहींत. त्यांत केवळ कर्तव्यबुद्धि होती. अनेक लोकांशीं ते बोलत, पत्रव्यवहार करीत. परंतु त्यांत खराखुरा जिव्हाळा नव्हता. त्यांनीं या काळांत एकही नवीन मित्र केला नाहीं हें लक्ष्यांत घेण्या-सारखें आहे.

माधवरावांना पहिल्यापासून असें वाटे कीं, मीं स्वावलंबी व्हावें. नवऱ्याच्या कीर्तीवर बायकोचा मोठेपणा म्हणजे कांहीं तो खरा मोठेपणा नव्हे. एखादे वेळीं नवऱ्याचें कांहीं झालें तर बायकोचा मोठेपणा एकदम नाहींसा होतो. तसें माझ्या मोठेपणावर तूं जगूं नयेस; तुझें स्वतःचें असें तुझ्यांत कांहीं तरी असलें पाहिजे असें ते मला नेहमी म्हणत. मुली शिकतात; किंबहुना आईबाप त्यांना शिकवितात ते केवळ लग्नाच्या बाजारांत त्यांना भाव यावा म्हणून आणि स्त्रियांनाही आपण आपल्या शिक्षणाचा कांहीं उपयोग करावा असें वाटत नाहीं. म्हणून सुशिक्षित स्त्रियांच्या बाबतींतील त्यांचीं मतें आतां अनुभवानें बदललीं होतीं. शिक्षणानें ज्या प्रकारचें मन सुसंस्कृत व्हायला पाहिजे त्या प्रकारचें होत नाहीं, असें त्यांना वाटत असे. पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या स्त्रियांना घरकामाचा कंटाळा असतो, त्यांत त्यांना कमीपणा वाटतो. नुसती पोशाखी वृत्ति दिवसेंदिवस जास्त बळावत चालली आहे. दिवसेंदिवस काळ कठीण येत चालला आहे, सुशिक्षित स्त्रियांची जबाबदारी त्या मानानें वाढली आहे. परंतु त्याची जाणीव फार थोड्या सुशिक्षित स्त्रियांना असते असें ते म्हणत. पाश्चात्य स्त्रियांच्या फुलपाखरूं व पोषाखी वृत्तीचें अनुकरण अलीकडील सुशिक्षित स्त्रिया करीत आहेत, पण त्यांचा कणखरपणा, धीटपणा, वाटेल तें काम करण्याची त्यांची धडाडी आमच्या स्त्रियांत नाहीं.

त्यासंबंधीं ते मला एका पत्रांत लिहितात—

‘ येथील वेषभूषेच्या तऱ्हा पाहून मात्र मन बुचकळ्यांत पडतें. जसजसें पदवी परीक्षोत्तरचें भवितव्य चिन्त्य आणि कठीण होत आहे तसतसें विद्यार्थी व विद्यार्थिनींची वृत्ति पोषाखी आणि निश्चिन्त होत चालली आहे; डोळ्यांची समाराधना होत आहे.

पण पुढें काय ? मुख्य रस्त्यावर डॉ......च्या दवाखान्यासमोर एका बहाअी अिराणी व्यापाऱ्यानें ××× रेस्तोरां काढलें आहे. तेथें जाऊन

विद्यार्थी विद्यार्थिनींनीं सामिष भोजन करावयाचें आणि तम्बाकूच्या परदेशी धुरांत बाहेर पडावयाचें ही म्हणे अगदीं अलीकडील टूम आहे. मी काल आंत जाऊन पाहिलें मला विशेष असें कांहींच वाटलें नाहीं. विलायती शिळ्या कल्पना आम्ही घेतों. तसें पुण्याचे नवतरुण मुंबईच्या शिळ्या टुमी उचलतात.

ज्यांच्या अंगांत कोणतेंच कर्तृत्व नाहीं अशा सुशिक्षित स्त्रियांपेक्षां मला अशिक्षित पण कर्तृत्ववान बाणेदार करारी स्त्रियांच्या बद्दल जास्त आदर वाटतो.

पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या मुलांना देखील आईबापांच्या परिस्थितीची कल्पना नसते. ज्या गांवीं शिक्षणाकरितां मुलगा राहिला असेल त्या ठिकाणीं बाप मुलाला पोटाला चिमटा घेऊन पैसे पाठवतो. मुलगा खुशाल ते चैनींत उडवतो. चैन अवश्य करावी, परंतु स्वतःच्या पैशावर ती करावी.'

बापानें हाडाचीं काडें करून पैसे मिळवावे, आणि मुलानें ते बेजबाबदारपणें उडवावे ह्याबद्दल त्यांना अत्यंत तिटकारा वाटत असे. ते विद्यार्थ्यांना उपदेश करतांना नेहमीं म्हणत, 'आधीं मिळवा व मग मिरवा' बापाच्या जिवावर मिरवण्याचा मुलाला अधिकार नाहीं. बापानें श्रम करून पैसा मिळवलेला असतो, मुलगा त्या पैशाच्या धुरानें आळशी व आयदी बनतो. त्याला कष्ट करावेसे वाटत नाहींत. बापानें रगड पैसा ठेवला तर बापाच्या मागें पैसा मिळविण्यास काय श्रम करावे लागतात ह्याची कल्पना मुलांना साहजिकच येत नाहीं. एक प्रकारें पैसा मागें ठेवून बाप मुलांचें नुकसान करतात. मुलें जर बापाच्या पैशावर आयदी व चैनी बनणार असलीं तर बापानें मुलाला एक पैहि ठेवूं नये. खुशाल घरादारावर नांगर फिरवावा असें ते म्हणत. सुशिक्षित पदवीधर मुलें काय किंवा मुली काय, ह्यांच्या बाबतींत आईबापांचें पहिलें कर्तव्य म्हणजे त्यांना समजूं लागल्यावर त्यांच्या परिस्थितीची त्यांना जाणीव करून देणें. दुर्दैवेंकरून त्यांना ती नच झाली तर शहाणपणा शिकण्याकरितां खुशाल त्यांना एक पैहि न देतां घराबाहेर घालवून द्यावें असें त्यांचें मत होतें.

केव्हां केव्हां ते म्हणत, अलीकडील बहुतेक सुशिक्षित मुलींच्या लग्नाच्या अपेक्षा वाढलेल्या असतात. त्यांची वृत्ति सुखासीन व चैनी बनलेली असते.

लग्न करून पतीबरोबर पतीच्या परिस्थितीप्रमाणें कष्ट करण्याची तयारी फार थोड्यांची असते. त्यांना त्याकरितां पति सुस्थितींतला मोठ्या हुद्याचा असा हवा असतो. परंतु नवऱ्याच्या जिवावर चैन करणें, त्याच्या श्रीमंतीवर मिरविणें व स्वतःचें स्वत्व पार विसरणें ह्या गोष्टींत वास्तविक सुशिक्षित स्त्रियांना कमीपणा वाटला पाहिजे असें ते म्हणत. हिंदुकायद्याप्रमाणें पतीच्या छत्राखालीं स्त्री कितीहि सुशिक्षित असो तिला समाजांत स्वतंत्र स्थान नाहीं. परंतु तें स्थान शक्य तितकें त्यानीं मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उद्यां एखाद्या स्त्रीचा पति निवर्तला तर पतीमुळें तिला मिळालेला तिचा मान व दर्जा चुटकीसरसा नष्ट होतो. डॉक्टराची डॉक्टरीण बाई, प्रोफेसराची प्रोफेसरीणबाई इत्यादि नवऱ्यामुळें मिळालेल्या फुकट पदव्या नवरा नाहींसा झाला कीं त्याहि नाहींशा होतात. अशिक्षित स्त्रिया बिचाऱ्या असहाय असतात, परंतु सुशिक्षित हिंदु स्त्रीनें तरी आपल्या स्वतःच्या विद्येवर आपणाला समाजांत एक स्वतंत्र स्थान निर्माण केलें पाहिजे. तरच त्या शिक्षणाचा उपयोग आणि म्हणून जी. ए. झाल्यानंतर निदान एखादें वर्ष तरी मीं नोकरी करावी व तोही एक अनुभव घ्यावा असें त्यांना वाटे.

१९३० च्या मेमध्यें मी एकाएकीं बरीच आजारी झालें, आजारांतून बरी झाल्यानंतर हवा बदलायला पाहिजे असें डॉक्टरांचें म्हणणें होतें. म्हणून कोठें तरी मी एकटीनेंच जायचें ठरलें. इतक्यांत त्याच वर्षीच्या ऑक्टोबर महिन्याच्या आरंभीं महर्षि आण्णासाहेब कर्वे मला पुण्यास एकदां वाटेंत भेटले आणि त्यांनीं " तूं हवा बदलायला जाणारच असलीस तर बेळगांवला जा, तेथें कांहीं दिवसांकरितां एका शिक्षकिणीची आवश्यकता आहे " असें त्यांनीं मला सांगितलें. ही गोष्ट मीं माधवरावांना सांगितली व ऑक्टोबरच्या सुटीनंतर मी बेळगांवला गेलें. तेथें मी महिनाभरच होतें. महिन्यापुरतीच मीं तेथें नोकरी केली, परंतु तेवढ्यानें माधवरावांचें समाधान झालें.

मी बेळगांवला गेल्याबरोबर इकडे पुणें व कोल्हापूरमध्यें अशी एक अवई उठली कीं, आमचें दोघांचें पटेनासें झालें, म्हणूनच मी बेळगांवला गेलें.

अलीकडे सर्व बाबतींतला त्यांचा पूर्वींचा लहरीपणा जाऊन ते संसारांत पूर्ण रंगून गेले होते. हा त्यांच्यांतील बदल पाहून माधवरावांच्या कांहीं

स्नेह्यांनीं म्हणावें, 'लीलाबाई तुमच्यामुळें माधवरावांचें काव्य नष्ट होईल कीं काय अशी आम्हांला अलीकडे फार भीति वाटूं लागली आहे.' हें ऐकून माधवराव नुसते हंसत.

पुढें आम्हाला मुलें झाल्यावर तर माधवराव त्यांच्या खस्ता खाण्यांत इतके गढलेले असत कीं, दिवसाचा व रात्रीचा त्यांचा बराचसा वेळ मुलांच्यांतच जाई. जात्याच माधवरावांना मुलांची आवड जास्त; त्यांत त्यांना स्वतःला मुलें झाल्यावर तर माधवरावच त्या मुलांची आई झाले होते असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं.

दिनू–सुधा लहान असतांना रात्रीं त्यांना दूध पाजायला मला कधींच उठावें लागलें नाहीं. त्यांना माझ्या आधींच जाग येई. आणि स्टोवर दूध ऊन करण्यापासून तों मुलांचीं दुधाचीं भांडीं विसळून ठेवून त्यांना पुन्हां थोपटून निजवण्याचें काम तेच करीत.

मुलें लहानपणीं त्यांच्याचजवळ झोंपत. रात्रीं त्यांचा अभ्यास होईतोंवर दिनू व सुधा त्यांची वाट पाहात जागीं रहात. ते घरांत आले कीं सुधा त्यांच्या मांडीवर व दिनू खांद्यावर झोंपी जात असत. ते जेव्हां शेवटीं आजारी पडले तेव्हां मुलांना आपल्याजवळ घेऊन झोंपवणें त्यांना शक्य नसे. दोन्ही मुलें माझ्याजवळ झोंपण्याची खळखळ करूं लागलीं. त्यांची कुरकुर "ताता, तुम्ही आम्हाला झोंपवा" म्हणून सारखी चाले. माधवराव तसेच उठून बसत आणि आपण त्यांच्या दोघांच्या मध्यें बसून त्यांना झोंपवत. मुलांच्या बाबतींत ते अत्यंत हळवे होते. सुधा लहानपणीं बरीचशी आजारीच असे. तिला कांहीं होऊं लागलें कीं, माधवरावांच्या हृदयाची कालवाकालव होई. कित्येक प्रसंगीं तिचें दुखणें पाहिलें कीं माधवरावांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रुप्रवाह सुरू होई. दर शुक्रवारीं कोल्हापूरला अंबाबाईची पालखी निघे. आमचें घर अंबाबाईच्या देवळाजवळच होतें. माधवराव न चुकतां मुलांना ती मिरवणूक बघायला घेऊन जात. जाणारे येणारे विशेषतः त्यांना ओळखणारे विद्यार्थी व इतर लोक त्यांच्याकडे तेव्हां मोठ्या कुतूहलानें बघत राहात.

माझ्यापेक्षांही मुलें त्यांच्याच अंगावर जास्त असल्यामुळें त्यांच्या लेखनांत त्या पायीं व्यत्यय येई. मी त्यांना केव्हां तरी म्हणतही असे कीं, "तुम्ही मुलांचे

फार लाड करतां, त्यापायीं तीं तुम्हाला त्रास देतात. त्यांच्या बाबतींत मी असून नसून सारखीच आहे." परंतु ते लेखनांत कितीही व्यग्र असोत मुलांचें रडणें ऐकलें कीं ते आपल्या खोलींतून धांवत येत.

ह्यामुळेंच कित्येक वेळीं कोणतेंही पुस्तक छापण्याची गर्दी उडाली कीं ते मला व मुलांना पुण्याला आणून ठेवीत. परंतु त्यांचें सर्व लक्ष आमच्याकडेच असे.

मुलें लहान होतीं तोंवर म्हणजे १९३० ते ३५ पर्यंत खालील पुस्तकें प्रसिद्ध झालीं. दिनूच्या जन्मदिवशीं १५ ऑ. १९३१ सालीं 'द्राक्ष-कन्या' प्रसिद्ध झाली. विरहतरंग दुसरी आवृत्ति १७ जुलै १९३३ मध्यें प्रसिद्ध झाली. गज्जलांजली व स्वप्नरंजन १९३३-३४ मध्यें अनुक्रमें बाहेर पडलीं. तांबे समग्र कविता १९३५ मध्यें प्रसिद्ध झाल्या. द्राक्षकन्येकरतां १९३० ते ३१ पर्यंत फिजेरल्डच्या पहिल्या आवृत्तींचें भाषांतर चाललें होतें. विरहतरंग व स्वप्नरंजनांतील कविता जरी फार पूर्वी लिहिलेल्या असल्या तरी मधून मधून त्या सुधारण्याचें व नवीन लिहिण्याचें त्यांचें काम अखंड चाले. मधुलहरी हें भाषांतरित काव्य तेव्हांच तयार झालें. त्यांतच काहीं नवीन कविता, व्याख्यानें, सभासंम्मेलनें हाहि कार्यक्रम चाले. त्यांच्या लेखनांत व इतर कार्यक्रमांत त्यांनीं खंड पडूं दिला नाहीं. कित्येक कविता सुधाराव्या, रचाव्या, व्याख्यानांचे विषय तयार करावे, मला वाचून दाखवावे हा कार्यक्रम सतत चाले.

१९३७ सालच्या सुमाराला आमच्या घरांत दोन मृत्यु झाले. एक माधवरावांच्या वडिलांचा व दुसरा माधवरावांच्या चुलत आजी—रमाकाकूंचा—माधवरावांचे वडील—अण्णा वारले त्यांच्या धसक्यानें रमाकाकू आजारी पडल्या. माधवरावांना सुटी मिळणें शक्य नसल्यामुळें रमाकाकूंचें जेव्हां ज्यास्त झालें तेव्हां मीं त्यांच्या सेवेला वाईला जायचें ठरलें. परंतु मुलें बरोबर घेऊन जाणें मला शक्य नव्हतें. म्हणून मुलांना मी कोल्हापुरालाच टेवून वाईला गेलें. पुढें दोन दिवसांतच त्या वारल्या. माझ्या गैरहजेरींत मुलांची सर्वच जबाबदारी माधवरावांच्यावर पडली, परंतु त्यांनीं मुलांचें इतकें व्यवस्थित केलें कीं, मी नव्हतें म्हणून त्यांचें काहीं आडलें नाहीं. त्यांत सुधानें माझा ध्यास घेतला; मी असतांना जी सुधा मुकाट्यानें माधव-

रावांच्या जवळ झोंपत असे ती आतां माझी खंत काढून रडूं लागली. तिनें आई कोठें आहे म्हणून रडावें. तिची समजूत घालून माधवरावांनीं तिला निजवावी. दुपारीं कॉलेजांत जाण्यापूर्वीं मुलांचें सर्व करून ते कॉलेजांत जात. परंतु मुलांच्या काळजीनें कॉलेजांत तास घेण्याचेंहि त्यांना सुचत नसे. कॉलेज सुटल्याबरोबर ते घरीं येत व टांगा करून मुलांना तास दोन तास हिंडवून आणीत. संध्याकाळीं पुन्हां खाणावळीचा डबा येई, परंतु खाणावळीचें जेवण अतिशय तिखट; मुलें जेवीनात. आम्ही ज्यांच्या घरीं भाड्यानें राहात होतों ते रा. नणुंद्रेकर व त्यांच्या घरची सर्व मंडळी आमच्या फार उपयोगी पडत. विशेषतः गणूकाकांची आई—आजी—फार प्रेमळ. त्यांनीं वर यावें, मुलांना खालीं घेऊन जावें व जेवायला घालावें.

रमाकाकूंचें जास्त असल्याची तार मी कोल्हापूरला केली. माधवराव कोल्हापूरहून निघाले, परंतु ते वेळेवर येऊं शकले नाहींत. माधवराव तार गेल्याबरोबर दुपारीं दोन वाजतां मुलांना घेऊन निघाले ते वाठार स्टेशनवर पहाटे चार वाजतां उतरले. दिवस उजाडेपर्यंत वाईला ते येऊं शकले नाहींत. तेथेंच स्टेशनवर होल्डऑल् पसरून एका बाजूला सुधाला व दुसऱ्या बाजूला दिनूला घेऊन निजले. सकाळच्या मोटरनें ते वाईला आले. माधवराव मुलांच्या त्रासानें अगदीं थकलेले दिसले.

तेव्हांच एक मोठा चमत्कारिक प्रसंग घडला. आमच्या रमाकाकूंच्या गळ्यांतील एक तीन पदरी साखळी व हातांतील आंगठी त्या बेशुद्ध झाल्या त्या दिवशींच नाहींशी झाली. मी ही हकीगत माधवराव वाईला आले, तेव्हां त्यांना सांगितली. ते म्हणाले, "आतां त्याबद्दल एक अवाक्षरही बोलूं नका. तें आपलें नव्हतें असें समजायचें व येथून मुकाट्यानें पुण्याला जायचें."

१९३६-३७ सालच्या सुमाराला माझी शेवटची मुलगी गेली. तेव्हां मी बरीच आजारी होतें. मला कावीळ झाली होती व तेंच दुखणें मधून मधून आपलें डोकें वर काढत होतें. डॉक्टरांनीं मला कडक पथ्य सांगितलें होतें. माझ्या औषधपाण्याची व्यवस्था माधवराव स्वतः पाहात.

त्याच सुमारास माझ्या माहेरच्या ओळखीच्या माझ्या आईची मैत्रीण -मावशी-आमच्याकडे आल्या होत्या. मी आजारी असल्यामुळें दोन्ही वेळचा स्वयंपाक त्याच करीत. एके शनिवारीं आमच्या मावशींनीं खिळ्या भाताला

फोडणी घातली होती. तो फोडणीचा भात खाण्याची मला अनावर इच्छा झाली. ह्या सुमारास मला थोडें थोडें बरें वाटूं लागलें होतें, पण पथ्य सुटलें नव्हतें. मला पथ्याचें खाण्याचा अगदीं वीट आला होता. तो भात पाहिला आणि माझ्या तोंडाला पाणी सुटलें. मावशींनींहि थोडा भात मला बशींत दिला. मी त्यांतले दोन, चार घांस खाल्ले असतील इतक्यांत माधवराव कॉलेजांतून आले. त्यांचे पाय जिन्यावर वाजूं लागले. मावशी मला म्हणाल्या, "ताई, तूं भाताची बशी इकडे दे. तुला भात खातांना जर त्यांनीं पाहिलें तर तुझी धडगत नाहीं." पुढें काय होणार ह्याची कल्पना मला होतीच. मी मावशींना म्हटलें, "आतां कांहींहि होवो. मी अपराध केला आहे, आणखी लपविण्याचा प्रयत्न मी करणार नाहीं. काय व्हायचें असेल तें होऊं दे." इतक्यांत माधवराव आंत आले. ते कॉलेजच्या पोशाखांतच होते. एक क्षण आपली भेदक व रागीट नजर त्यांनीं माझ्याकडे रोखली व कांहीं न बोलतां माझ्या हातांतली बशी त्यांनीं घेतली आणि शेजारच्या मोरींत जोरानें भिरकाविली. बशी फुटल्याचा आवाजच फक्त माझ्या कानांत घुमला. वर पहाण्याचें धैर्य माझ्यांत उरलें नव्हतें. मी घट्ट डोळे मिटले. माझ्या अंगांत कापरें भरलें. माधवराव एक अक्षरहि बोलले नाहींत. मुकाट्यानें तेथून निघून गेले. त्यानंतर मला शिक्षा म्हणून त्यांनीं एक आठवडा स्वतः चहा वर्ज्य केला.

ते कांहीं बाबतींत मोठे विचित्र होते.

माधवरावांचा माझा परिचय झाला तरी त्यांना माझें माहेरचें नांव 'गंगू' आहे हें माहीत नव्हतें; तें त्यांनीं आमच्या लग्नपत्रिकेंत वाचलें; व ते अस्थिर झाले. त्यांनीं तावडतोब माझें नांव बदलायचें ठरवलें.

पुढें कोणी माझ्या माहेरची मंडळी भेटली कीं, ती मला 'गंगू' ह्या नांवानेंच हांक मारीत. तें नांव कोणीं उच्चारलें कीं, माधवराव लाल होत; बोलण्याच्या रंगांत आलेले माधवराव एकदम गप्प होत. त्यांनीं मला अनेकदां सूचना दिली होती कीं —मला तुझें 'गंगू' नांव आवडत नाहीं. तुला जे 'गंगू' म्हणतात त्यांना तूं त्या नांवानें मला पुन्हां हांक मारूं नका असें सांग.' मला हें ऐकून हंसूं येई. मीं त्यांना पुष्कळ वेळ सांगितलें कीं, "हें कसें शक्य आहे? जुन्या ओळखीची मंडळी त्या नांवानेंच मला हांक मारणार! ती मला

'लीला' कसें म्हणतील ?" केव्हां केव्हां तर ते मला म्हणत, "मला जर तुझी ओळख होण्यापूर्वी तुझें नांव कळतें तर मी तुझी ओळख करून घेण्याच्या भानगडींत पडलों नसतों. इतका मला ह्या नांवाचा तिटकारा आहे."

आमच्याकडे एक दिवस बेळगांवचे वकील बापूराव बोंद्रे आले. मी बेळगांवला महिनाभर होतें; तेथें माझ्या कांहीं मैत्रिणीहि माझ्यासारख्या शिक्षिकाच होत्या. त्या मला 'गंगू' म्हणत. त्यांच्यामुळें तेथें ज्या कांहीं ओळखी झाल्या त्यांत बापूरावांची ओळख झाली. माझ्या मैत्रिणींच्यामुळें बापूराव मला 'गंगूताई' म्हणूं लागले. ते आले तों त्यांनीं माधवरावांनाच "काय, गंगूताई कोठें आहेत ?" म्हणून विचारलें. माधवराव एकदम चिडले, व त्यांना म्हणाले, "बापूराव तुम्ही लीलाबाईंना गंगूताई ह्या नांवानें हांक मारूं नका, लीलाबाई म्हणत जा." बापूरावांनीं पुन्हा म्हणून मला माझ्या जुन्या नांवानें हांक मारली नाहीं. बापूरावांचा माधवरावांच्यावर फार लोभ होता. एकदां त्यांच्या भगिनी डॉ. इरावतीबाई कर्व्यांनीं मला 'गंगू' म्हणून हांक मारली. माधवरावांनीं त्यांनाही मला त्या नांवानें हांक मारायची नाहीं म्हणून बजावलें. पुढें त्या मला 'लीला' च म्हणूं लागल्या.

एकदां प्रो. वामन मल्हार जोशी आमच्याकडे पाहुणे आले होते. तेही मला 'गंगू' म्हणत. त्यांनीं मला त्या नांवानें हांक मारली कीं माधवरावांचा चेहेरा पाहाण्यासारखा होई. एखादे वेळीं त्यांना असह्य झालें कीं ते तेथून निघून जात. गु. तात्या माधवरावांच्या पेक्षां पुष्कळ वडील. ते माझ्या वडिलांचे स्नेही. इतरांना माधवरावांनीं मला तशी हांक न मारण्याची सूचना दिली, पण त्यांना तात्यांना सूचना देतां येईना. तात्या आमच्याकडे दोन दिवस होते, तोंवर माधवरावांचें चित्त स्थिर नव्हतें आणि त्याला कारण हेंच कीं तात्या मला 'गंगू' म्हणत.

एकदां आमच्या मोलकरणीनें मोठी गंमत केली. मला कोठें तरी बाहेर जायचें होतें. म्हणून तिला मी गंगावेशींतून टांगा आणायला सांगितला. ती टांगा घेऊन येत असतां तिला वाटेंत माधवराव भेटले. माधवरावांनीं टांगेवाल्याला टांगा थांबवण्याबद्दल खूण केली. टांगेवाला नेहमींच्या परिचयाचा होता, त्यानें टांगा थांबवला. टांग्यांत मागच्या बाजूला मोलकरीण

बसली होती ती मात्र जागची हालली नाहीं. तिनें माधवरावांना सांगितलें कीं, 'मला टांगेवाल्याजवळ बसायला लाज वाटते.' माधवराव मुकाट्यानें टांगेवाल्याजवळ पुढें बसले आणि घरीं आले. मला यांतलें कांहींच माहीत नव्हतें. घरीं आल्यावर मला माधवराव म्हणाले, "लीला तुझी मोलकरीण मालकिणीसारखी टांग्यांत मागें बसली होती व मी गड्यासारखा टांगेवाल्या-जवळ बसून आलों. तिला म्हणे टांगेवाल्याजवळ बसायला लाज वाटते. तूं तिला जरा रागें भर." मी आश्चर्य करीत राहिलें. मीं त्यांनाच म्हटलें, 'तुम्ही तिला तेव्हांच कां नाहीं टांग्यांतून उतरायला सांगूं?'

पुढें मीं तिची चांगली कानउघाडणी केली. परन्तु त्यामुळें तिचें मात्र ठाम मत झालें कीं, मालक किती गरीब, चांगले, परन्तु मालकीणबाईंना जरा कांहीं सोसत नाहीं. फारच रागीट!

घरांत कांहीं अडचण असली म्हणजे आम्ही स्वयंपाकीण ठेवीत असूं. सुधा लहान असतांना आमच्या घरीं स्वयंपाकाला एक बाई होत्या. त्यांना आम्ही मामी म्हणत असूं. माधवरावांना तुरीच्या डाळीची खिचडी फार आवडे. परन्तु मसाल्याची किंवा फोडणीची खिचडी त्यांना अगदीं आव-डत नव्हती. मामींना मी अनेकदां साधी खिचडी करा म्हणून सांगावें परन्तु मामींची समजूत कांहीं पटायची नाहीं. त्या मसाला खोबरें घालून फोडणीची खिचडी करून ठेवायच्या. माधवराव पानावर बसत, पहिली खिचडी जेमतेम खात व जेवण झालें म्हणजे मला येऊन सांगत कीं, "तुझ्या बाईच्या फोडणीच्या खिचडीचा आतां मला कंटाळा आला आहे." मात्र मामींना ते एका अक्षरानें कधीं बोलत नसत किंवा दुखवत नसत आणि पानांत कधीं टाकीत नसत. ह्याचा परिणाम असा होई कीं, मी मामींना वारंवार तसें न करण्याबद्दल सांगावें. त्यांना वाटे साहेब कधीं तक्रार करीत नाहींत, बाईंचीच कुरकुर फार. घरांतलीं गडी माणसें माधवरावांच्या-वर खुष असत.

माधवरावांच्या पांढऱ्या केसांनीं एकदां गंमत केली. एकदां आमच्याकडे महादेवशास्त्री दिवेकर पाहुणे आले होते. माझीं मुलें लहान तेव्हां त्यांचें सोंवळें ओवळें व्यवस्थित राहाणार नाहीं म्हणून आम्ही एक बाई स्वयंपाकाला ठेवली होती. माधवराव त्याच सुमाराला कोठेंतरी व्याख्यानाला

परगांवीं गेले होते. त्यांना तिनें पाहिलें नव्हतें. तिला दिवेकर शास्त्री घरचे मालक वाटले. पुढें चार दिवसांनीं माधवराव घरीं आले. त्यांचे केस तिला अगदीं पांढरे शुभ्र दिसले. तिला वाटलें हेच त्यांच्या घरचे पाहुणे. परंतु मुलें पाहुण्यांच्या जवळ बसून जेवतात त्यांच्याच संबयीचीं जास्त, हें कसें ? हें कोडें तिला कांहीं उलगडेना. पुढें तिला कोणीतरी सांगितलें कीं, पांढऱ्या केसांचे तेच घरचे मालक.

एक दिवस मोठा धीर करून तिनें मला विचारलें, " वहिनी तुम्हीं त्यांच्या तिसरेपणची बायको का ?" मी तिला थोडक्यांत उत्तर दिलें," नाहीं, मी त्यांची पहिलीच बायको आहें." तिला आश्चर्य वाटलें. तरी तिला तितकीशी खात्री पटेना. ती माधवरावांना मऊ भाकरी वाढी. त्यांना मऊ भाकरी अगदीं आवडत नसे. त्यांनीं तिला त्यांतल्या त्यांत कडक भाकरी वाढण्यास सांगितलें. तेव्हां ती म्हणाली. " मला असें वाटलें तुम्हाला चावत नसेल म्हणून मी मऊ भाकरी वाढली, " ते म्हणाले, " आजीबाई, माझे दांत चांगले आहेत. मी म्हातारा नाहीं बरें का ? " मग मात्र आजीबाईची मालक म्हातारे नसल्याची खात्री झाली.

कोठें प्रवासाला अगर बाहेर जावयाचें असलें म्हणजे घरांतील माणसांनीं विलंब केलेला त्यांना आवडत नसे. अशा वेळीं ते लहानथोर पहात नसत. कोणी जरा उशीर केला कीं त्यांना राग येई.

एकदां माझ्या वडिलांचे स्नेही आमच्या घरीं कोल्हापुरला पाहुणे आले होते. ते ८–१५ दिवस राहिले व परत पुण्याला जायला निघाले. जायच्या आदल्या दिवशीं माधवरावांनीं मोटरचें तिकिट काढून आणलें होतें. दुसरे दिवशीं सकाळीं ८ वाजतां मोटर दाराशीं येऊन उभी राहिली. अप्पांचें सर्व सामान माधवरावांनीं मोटरींत नेऊन ठेवलें. इतक्यांत अप्पांना विडा खाण्याची लहर आली. ते उभे होते तेथेंच त्यांनीं बैठक मारली व आपली चंची सोडली व ते विडा करूं लागले. त्याबरोबर माधवराव संतापले. आणि त्यांना रागानें म्हणाले " मोटर दाराशीं उभी आणि आप्पा आतां तुम्ही विडा करायला बसलांत ? त्या लोकांचा खोळंबा नाहीं का होत ? आप्पा कांहींच बोलले नाहींत. त्यांनीं चंची तशीच गुंडाळली व ते मोटारींत जाऊन बसले. परंतु ते माधवरावांवर

मुळींच रागावले नाहींत. आमच्या बाबांच्या सर्व स्नेह्यांत माधवराव अगदीं मिळून मिसळून वागत. माधवराव नागपूरला बाबांच्याकडे गेले म्हणजे बाबांच्या सर्व स्नेह्यांचे ते जावईच.न्यायमूर्ति भवानी शंकर नियोगी व न्यायमूर्ति पुराणिकांच्याकडे माधवरावांना एकदां तरी जावई म्हणून थाटाची मेजवानी होई. कारण ते दोघेही बाबांचे स्नेही. एकदां बाबा, पुराणिककाका आणि माधवराव बाबांच्या स्नेह्याकडे इंदूरचे मुनत्‌जीम बहादूर कवि न. शं. रहाळकरांच्याकडे इंदूरला जाण्यास निघाले.माधवरावांनीं आपल्या संवयीप्रमाणें कोठल्या तरी स्टेशनवर पुराणिककाकांना व बाबांना कणसं खायला घातलीं. मैत्रीच्या बाबतींत लहानथोर हा भेद ते अगदीं विसरून जात. त्यांचें कोणाशींहि जमे. सर्वांशीं ते मोकळेपणानें वागत. त्यामुळें बाबांचे जावई माधवराव–बाबांच्या सर्व मित्रांनाही प्रिय झाले होते.

वास्तविक बाबांचे स्नेही म्हणजे माधवरावांच्यापेक्षां वयानें किती तरी वडील. परंतु त्यांच्याशींही ते मोकळेपणानें गप्पा मारूं शकत. त्यांच्या सहवासांत त्यांना कधीं संकोच वाटला नाहीं.

माधवरावांच्यांत असा एक गुण होता कीं, एकदां कोणाचाही स्वभाव त्यांना पटला कीं आपपरभाव त्यांना त्या व्यक्तीबद्दल कधीं वाटत नसे. माझ्या लग्नानंतर माझ्या माहेरीं ते जावई या नात्यानें कधीं वागले नाहींत. गरुडांच्या घरांत ते अगदीं आपलेपणानें वागत.त्यामुळें माझी आई–ती. सौ. बाई व माझी बहीण सुलू–चि. सौ. सुशीला हिंगवे–ह्यांना माधवरावांच्याबद्दल फार प्रेम वाटे. चि. सुलूला तर त्यांनीं आपल्या धाकटया बहिणीप्रमाणें वागविलें व तिलाही त्यांचा अतिशय लळा लागला. ते सुटींत गरुडांच्या घरीं गेले कीं घरांत मोठें आनंदी वातावरण असे.

विशेषतः बाबांचा धीरगंभीर स्वभाव, सोशिक वृत्ति, कोणत्याही प्रसंगाला शांतपणें तोंड देण्याची तयारी, अत्यंत प्रेमळ स्वभाव ह्या सर्वांनींच माधवरावांच्यावर फार अनुकूल परिणाम केला होता. विशेषतः आमचे बाबा फार नीटनेटके, सौंदर्योपासक, भावनाप्रधान, बाबांचें इंग्रजी सुद्धां फार चांगलें. ह्या सर्व कारणांनीं बाबांच्याबद्दल माधवरावांना फार प्रेम व आदर वाटे. बाबांच्या बंगल्यांतील अनेक सुंदर व वेचक वस्तूंनीं सजविलेली

खोली, माधवरावांना फार आवडे. माधवरावांनीं स्वतःचा बंगला बांधला परंतु ते अभ्यासाला व लेखनाला मात्र बाबांच्याकडे जाऊन बसत.

त्यांचें आणि माधवरावांचें नातें जावई सासऱ्याचें असें कधींच नव्हतें. बाबांना ते आपल्या वडिलांच्या ठिकाणीं मानीत. त्यांच्या कोणत्याही अड-चणींत माधवराव मुलाप्रमाणें धावून जात.

माधवराव वारले. बाबांना फार दुःख झालें. परन्तु त्यांनीं माझ्यासमोर अश्रू गाळले नाहींत, बाबुराव हिंगवे—माझे मेहुणे—माधवरावांच्या मृत्यूची बातमी ऐकतांच आले. बाबांच्या खांद्यावर डोकें ठेवून रडले. परन्तु बाबा अगदीं शांत होते. दुःखाचा सुस्कारा देखील त्यांनीं सोडला नाहीं. पर्वताप्रमाणें धीरगंभीर दिसणारी त्यांची मूर्ति माझ्या बिछान्याभोंवतीं व माझ्या आसपास वावरत होती. त्यांच्याकडे पाहून मींहि डोळ्यांतून पाणी न काढण्याचा निश्चय केला. परन्तु माधवरावांच्या मृत्यूनंतर बाबा अर्धे-देखील राहिले नाहींत. त्यांना हृदयाचा विकार जडला.

१९३५ सालीं इंदूर साहित्य संमेलनाला आम्ही गेलों. माझे वडील जवळ जवळ १३, १४ वर्षें इंदूरला होते. त्यांचें कॉलेजचें शिक्षण इंदूरच्या मिशन कॉलेजमध्यें झालें. पुढें कांहीं वर्षें त्यांनीं तेथेंच नोकरीही केली. माझी आई, बहीण, भाऊ इंदूरलाच वारली. माझें लहानपण व प्राथमिक शिक्षण इंदूरला झालें, त्यामुळें माझा ओढा इंदूरकडे होता. मलाही फार दिवस इंदूरला जाऊन झाले होते. एकदां तरी आपलें लहानपण ज्या ठिकाणीं गेलें तेथें पुन्हां एकदां जावें असें मला फार दिवसापासून वाटत होतें. म्हणून माधवराव संम्मेलनाला निघाले व मींही त्यांच्याबरोबर जायचें ठरविलें.

माझ्या आईच्या मार्गे माझ्या वडिलांचे बाल—मित्र ती. न. शं. रहाळकर, यांच्या पत्नी कै. ती. सौ. सरस्वतीबाई ह्यांनीं मला आपल्या मुलीप्रमाणें वागाविलें. आईच्या मृत्यूनंतर आम्ही जोंपर्यंत इंदूरला होतों, तोंपर्यंत कांकूनीं माझें माझ्या भावंडाचें आपल्या मुलाप्रमाणें केलें. तेव्हां आम्ही गरुड मंडळी व रहाळकर मंडळी एकाच घरांत आम्ही खालीं व ते वर राहात होतों.

रहाळकर काकांचें संम्मेलनाकरितां आगत्याचें बोलावणें आलें व आम्हीं इंदूरला गेलों. माधवराव तेथेंही अगदीं घरच्या सारखे वागले. त्या घरांत त्यांना परकेपणा कधीं वाटला नाहीं. लहानांपासून थोरापर्यंत ते सर्वांशीं मोठ्या मोकळेपणानें वागत, वास्तविक माझा तेथें जास्त परिचय, परंतु माधवराव जणूं काय आपली अनेक वर्षांची तेथें ओळख अशा रीतीनें वागले. माधवराव म्हणतील तेव्हां काकू जेवण तयार ठेवीत. ते बाहेर कांहीं कामाकरितां निघाले कीं, काकांची एक मोटर माधवरावांच्या दिमतीला तयार असे. त्या सर्व मंडळींना माधवरावांचें मोठें कौतुक वाटे.

माधवरावांच्या साधेपणाच्या अशा अनेक गोष्टी आहेत. त्यांना आपण कोणी मोठे आहोंत असा वृथाभिमान कधीं झाला नाहीं.

त्याबद्दल त्यांचे स्नेही रा. खरे ह्यांनीं ज्या कांहीं आठवणी मला सांगितल्या त्यांतली एक येथें देण्यासारखी आहे.

खरे त्या वेळीं लिमयांच्या चाळींत राहात होते. तेथें एक दिवस माधवराव ताईंना—खऱ्यांच्या आईला—भेटायला गेले असतां त्या सहज म्हणाल्या, " आम्ही कोळसे जाळतों त्यामुळें भांडीं घासायला आम्हाला चांगली राख मिळत नाहीं." माधवराव त्या वेळीं न्यू इंग्लिश स्कूलचे होस्टेल सुपरिंटेंडेंट होते. एक दिवस रात्रीं त्यांनीं झोळीभर राख सायकलच्या दांडीला अडकवून खऱ्यांच्याकडे आणून टाकली.

आम्ही कोल्हापूरला असतांना १९२९ ते ३० सालीं आमची नवरे शास्त्र्यांशीं ओळख झाली. एखादे वेळीं कोटीतीर्थाच्या बाजूला आम्ही फिरायला गेलों म्हणजे नवरे शास्त्र्यांच्या घरीं क्षणभर बसल्याशिवाय आम्ही घरीं कधीं आलों नाहीं. आमची दोघांचीही तेथें चांगली ओळख झाली होती. केव्हां केव्हां मला कंटाळा आला म्हणजे मी माधवरावांच्या बरोबर फिरायला जात नसे. मी बरोबर फिरायला नसलें कीं माधवराव त्यांच्या साहित्यिक स्नेह्यांपैकीं कोणाच्या तरी बरोबर फिरायला जात असत. एक दिवस असेच ते नवऱ्यांच्याकडे गेले, आणि घरीं परत येतांना त्यांच्या घरचें नासलेलें दुधाचें भांडें घेऊन आले.

बरोबर नवरे शास्त्रीही होते. साधारण रात्रीच्या आठ साडे

आठचा सुमार असेल. मी स्वयंपाक तयार करून वाटच पाहात होतें. माधवराव स्वयंपाकघरांत आले. हातांतील दुधाची तपेली माझ्यापुढें त्यांनीं ठेवली आणि मला म्हणाले, "आज शास्त्रीबुवांच्या घरचें दूध कशानें कोणास ठाऊक पण नासलें. तें कांहीं अजून कडू झालें नाहीं. तूं त्याचा खवा चांगला करतेस असें त्यांना मीं सांगितलें व उगीच त्यांचें हें अर्धा शेर दूध फुकट जाऊं नये म्हणून येतांना घेऊन आलों. ह्याचा त्यांना तूं खवा करून दे." मी म्हटलें "खवा व्हायला वेळ लागेल. इतक्यांत कसा करून देऊं?" त्यांनीं मला सांगितलें. "तुझा खवा होई तोंवर शास्त्रीबुवा बसतील." शेवटीं जेवण खोळंबवून मी तो खवा केला, अर्धा शेर दुधाचा खवा तो कितीसा होणार! शास्त्रीबुवांनीं तो आम्हाला प्रसादासारखा वाटून उरलेला प्रसादच घरीं मासला म्हणून घेऊन गेले.

तसेंच एखादी नवीन कविता झाली कीं, त्यांना कोणीही श्रोता चाले. सौ. काशीबाई हेर्लेकरांच्याप्रमाणेंच ते रा. खऱ्यांच्या ताईनाही मान देत. ताई जरी जुन्या वळणाच्या असल्या तरी मोठ्या कर्तबगार व तडफदार होत्या. खरे जरी माधवरावांचे स्नेही होते, तरी खऱ्यांच्या पेक्षांही खऱ्यांच्या आईचा माधवरावांवर लोभ जास्त. ते गद्रे वाड्यांत राहात असतांना एखादी नवीन कविता झाली कीं, ती ते घेऊन सकाळ असो, अगर दुपार असो, किंवा रात्र असो, खऱ्यांच्या घरीं जाऊन ताई जेथें असतील तेथें त्यांच्या जवळ बसून त्यांना ती वाचून दाखवीत व ताईही त्यांचें मोठें कौतुक करीत.

कवितावाचनाला त्यांना कोणीही श्रोता चाले. विशेषतः त्यांच्यावर ज्यांचा लोभ होता अशीं घरें त्या काळींही पुण्यांत कांहीं कमी नव्हतीं. सुशिक्षित स्त्रियांत सौ. वत्सलाबाई घाटे, मनोरमाबाई रानडे, ह्या जशा त्यांच्या श्रोत्या होऊं शकत होत्या त्याचप्रमाणें खऱ्यांच्या ताई, शंकररावांच्या पत्नी—उमाबाई कानेटकर—म्हणजे माई, राजाभाऊ कर्व्यांच्या मातोश्री—रमाबाई कर्वेही तितक्याच चालत, व त्या सर्व त्यांचें मोठें कौतुक करीत.

कळत न कळत अशा गमती आमच्या ह्या अकरा वर्षांच्या आयुष्यांत पुष्कळ झाल्या. अनेक प्रकारच्या अनुभवानें माधवरावांच्या स्वभावांत पुष्कळ

फरक झाला. पूर्वी म्हणजे १९२८ सालचे कठोर, एककल्ली, हट्टी माधवराव आतां संसारांतील सुखदुःखाच्या झळी लागून शांत व अत्यंत मृदु अंतःकरणाचे झाले होते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे माधवराव आतां माणसाळले होते. त्यांच्या आयुष्यांतला एक काळ मीं असा पाहिला आहे कीं ते आणि मी रस्त्यानें जात असतां पूर्वी फर्ग्यूसन कॉलेजप्रकरणाशीं ज्यांचा प्रत्यक्ष संबंध होता किंवा ज्यांनीं त्यांच्या विरुद्ध चहाड्या करून त्या प्रकरणाला रंग चढवला त्या व्यक्तींपैकीं कोणाची रस्त्यांत गांठ पडली व त्या व्यक्तीनें त्यांना नमस्कार केला तरी त्यांनीं त्या व्यक्तीला उलट नमस्कार कधीं केला नाहीं. परंतु अलीकडे मात्र अशा व्यक्तींच्या नमस्काराचा स्वीकारही ते मोठ्या शांतपणानें सहास्य वदनानें करीत असत.

आतां ते संसारांत व मुलांबाळांत गढून गेले होते. त्यांचें सर्व लक्ष आमच्याकडे कसें होतें हें दाखविणारें एक सबंध पत्र जसेंच्या तसेंच येथें देत आहे.

**प्रिय लीला,** बुधगांव ता. २४-८-३६

सप्रेम नमस्कार, तुझा निरोप घेऊन निघाल्यापासून मनाला कांहीं बरें वाटेना. मी येथें सुखरूप येऊन पोहोंचलों; आणि आतां भोजनोत्तर थोड्या गप्पा मारून तुला पत्र लिहायला बसलों आहें. घरून निघतांना तुझी ती श्रान्त आणि त्रस्त चर्या पाहून कसेंसेंच वाटलें. आणि बाहेर जाऊं नये असेंहि वाटलें. पण एकदां सङ्केत ठरविल्यावर इतरांची सुद्धां निराशा करणें बरें नव्हे म्हणूनच निघालों. वाटेंत आगगाडींत एकीकडे पुस्तक वाचीत होतों आणि दुसरीकडे घरचा विचार करीत होतों. अमुक असें झालें असतें तर बरें झालें असतें असें म्हणण्यांत आणि खेद करण्यांत काय तात्पर्य आहे ? आहे या परिस्थितींत प्रेमपूर्वक कर्तव्य करणें हाच स्वधर्म होय. पैका मिळवण्यापुरता बाहेरच्या जगाशीं संबंध ठेवणें अपरिहार्य असलें तरी नंतर पहिलें कर्तव्य घरांतच आहे. तें आचरण्यांतच तरणोपाय आहे, आनन्द आहे. अशा रीतीनें मनाचा विचार झाल्यावर मनाला शान्तता आली. आणि झाल्या गोष्टीचा वृत्तान्त तुला पत्रानें बुधगांवाहून कळवायचा असें मीं ठरविलें.

सध्या मुलांच्या प्रकृति अगदीं बऱ्या नाहींत, तूं तर कशीतरी उभी राहून कामें करिते आहेस. पण काळजी करूं नकोस, सारे मानवी उपाय आपण करून पाहूं. Let us hope always for the best. शेवटीं आपणच एकमेकांस आहोंत. मुलांनाही आपणच आहोंत. धैर्यपूर्वक आनंदानें संसार करायची आपण संवय लावून घेतली पाहिजे. मी इथें असलों तरी माझें मन तिकडे तुमच्याच भोंवतीं घोटाळतें आहे.

इकडे पूर्वेकडील पाऊस होऊं लागले आहेत. आतां तिकडेहि कदाचित् पडेल. दोन तीन मोठे पाऊस झाले तर पाण्याचें दुर्भिक्ष्य तरी पडणार नाहीं. आतां बाहेर पाऊस पडतोच आहे.

उद्यां मी मिरजेस जाईन. श्री. गद्रेहि तिकडे येणार आहेत. तेव्हां परवां सकाळीं १०॥-१०॥। वाजतां कोल्हापूरला पोचणाऱ्या गाडीनें मी तिकडे येईन. येतांना गडबडींत मुलांचे पापे घ्यायला झाले नाहींत, ते तूं घे. सौ. माईंना विचारायला झालें नाहीं. चुकलें खरेंच, आतां आल्यावर त्यांना विचारून विचारून सोडतों ! श्री. सौ. माईस नि मावशीस नमस्कार आणि नाना नी सुत्ती यास आशीर्वाद.

तुझा
माधव

पुनश्च—चि. दिनूच्या औषधांत परसाकडेला होण्याचें औषध काल घातलें आहे. तेव्हां त्याला आज परसाकडेला रेच होणारच. तेव्हां भिऊं नये आणि थांबण्याचें औषधहि देऊं नये.

माधवराव अत्यंत निष्कपटी व अत्यंत मोकळ्या अंतःकरणाचे होते. केव्हां केव्हां त्यांच्या ह्या स्वभावापायीं अत्यंत जवळच्या माणसांचा त्यांचा हा स्वभाव माहीत असूनही गैरसमज होत असे. आमचें लग्न झाल्यावर ते डायव्होर्सबद्दल कोणाजवळही मोकळेपणानें चर्चा करीत. अशी चर्चा ज्यांच्या जवळ चाले त्यांनाही माधवरावांचें हें करणें चमत्कारिक वाटे. माधवराव तेथून उठून गेल्यावर ते आपापसांत विचारीतही "कां हो, यांचें लग्न नुकतेंच थोडे दिवसांपूर्वीं झालें आहे आणि हे आतांच डायव्होर्सबद्दलही बोलूं लागले आहेत. हा काय प्रकार आहे ?" ज्यांना त्यांच्या स्वभावाची माहिती होती ते म्हणत, "अहो, कोणत्याही विषयावर मोकळेपणानें चर्चा करणें हा त्यांचा स्वभाव आहे. त्याचा अर्थ ते लग्न-



उभे :—रा. ह. गो. गोखले (बंधू). माधवराव पटवर्धन. रा. मोहनराव शहाणे.
बसलेले :—सौ. गोखले. सौ. पटवर्धन. रा. म. वि. सहस्रबुद्धे (माधवरावांचे मामा).

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३८८०७ वि: चरित्र
क्रमांक १२३४ नों दि २।८।६५

विच्छेद करतील असा नाहीं." त्या असल्या वादविवादाची लग्नानंतर मला चांगली संवय झाली होती. केव्हां केव्हां माझ्या मनावर असल्या गोष्टींचा फार परिणाम होई. त्यामुळें त्यांच्या स्वभावाची माहिती असूनही मला असह्य वेदना होत. मी मुकाट्यानें त्या सहन करी, लहानपणापासून कळत न कळत अशा प्रकारची सोशिक वृत्ति माझ्यांत आली होती. संवयीनें ती माझ्या रक्तांत भिनून गेली होती. अत्यंत दुःख झालें तरी त्याचा उच्चार करण्याची सहसा मला संवय नाहीं, त्यामुळें झालेल्या दुःखाची छाया माझ्या चेहेऱ्यावर दिसेच असेंही नाहीं. परंतु माधवरावांच्या अशा वागण्यानें, बोलण्यानें माझें अंतःकरण मलाच खाई. केव्हां वाटे आपल्याला काय वाटतें हें ह्यांना सांगावें, तुम्ही असें बोलत जाऊं नका असें म्हणावें. पुन्हां वाटे तसें नको. आपल्या बोलण्यानें एखादे वेळीं मला दुःख होऊं नये, वाईट वाटूं नये म्हणून कदाचित् मोकळेपणानें कांहीं विषयांवर ते आपल्याशीं बोलणारही नाहींत. त्यांच्या स्वभावांतला मोकळेपणा नष्ट होणेंही बरें नव्हे. म्हणून मी आपलें दुःख गिळून टाकीत असे. किंबहुना त्यांच्या असल्या चर्चेत व संभाषणांत मीही मोकळेपणानें केव्हां केव्हां भाग घेत असे. त्या त्यांच्या स्वभावाची ओळख आमच्या बाबांना थोडीबहुत झाली होती. परंतु कधीं कधीं त्यांनाही आपल्या मुलीचें कसें होईल अशी काळजी मायेच्या पोटीं वाटे.

एकदां बाबांच्या जवळ माझ्याबद्दल त्यांनीं थोडीशी तक्रार केली. संसारांत पूर्णपणें गढून जाणारा माझा स्वभाव माधवरावांना फारसा आवडत नसे. ते बाबांना म्हणाले, "ही अशी सदोदित टापटीप, डाळ, तांदूळ, स्वयंपाक, माझें जेवण याबद्दल काळजी करीत बसते. मला हें असह्य होतें. माझी काळजी कोणी फार घेऊं लागलें कीं मला घरांतून पळून जावें असें वाटतें. शिवाय हिच्या सारख्या सुशिक्षित स्त्रियांनीं समाजांत स्वतंत्र कांहीं तरी स्थान मिळवलें पाहिजे; त्याकरितां कांहीं तरी खटपट केली पाहिजे. लग्न झाल्यावर स्त्रिया आपल्या नवऱ्यांत, आपल्या संसारांत इतक्या गढून जातात कीं भोंवतालच्या जगाची त्यांना आठवणही राहत नाहीं. हा असला स्वभाव मला आवडत नाहीं. स्त्रियांनीं आपल्या पायावर उभें राहाण्याची खटपट केली पाहिजे. नवऱ्याच्या नांवलौकिकावर जगण्यांत त्यांना वास्तविक कमीपणा वाटला पाहिजे. तुमची मुलगी हुशार

आहे. परंतु ती आपल्या हुशारीचें कांहींच चीज करीत नाहीं. मला हें पसंत नाहीं. ”

बिचारे बाबा ! त्या संभाषणानंतर त्यांना माझी अतिशय काळजी वाटूं लागली. त्यांना या दोघांचें पटत नाहीं कीं काय असाही दाट संशय येऊं लागला. त्यांनीं त्याबद्दल एक दिवस मला विचारलें, मीं त्यांना सांगितलें, तो त्यांचा स्वभाव आहे त्यावरून त्यांचें माझें पटत नाहीं असें मुळींच नाहीं. तरी ते केव्हां केव्हां असें कांहीं माधवराव बोलले म्हणजे त्याचा उल्लेख मोठी काळजी वाटून रा. घाटयांच्या जवळ करीत. विठ्ठलराव बाबांची समजूत घालीत, “माधवरावांचा तो स्वभाव आहे. तुम्ही तशी काळजी करूं नका,” तुमचा स्वभाव आतां थोडा बदला ना; जरा माणसासारखें वागा. असें ते माधवरावांना मित्रत्वाच्या नात्यानें बजावीत. एकदां ‘ गोवर्धनदास सुंदरदास मेडिकल कॉलेजाचें, वार्षिक संम्मेलन होतें. माधवराव त्या संमेलनाचे अध्यक्ष होते. त्या सुमारास मी मुलांना घेऊन पुण्यास आमच्या नव्या घरांत रहात होतें. माधवराव संमेलनाला परस्पर कोल्हापुरहून मुंबईला गेले. परत येतांना पुण्याला जाऊन एखादा दिवस मुक्काम करण्याइतका त्यांना वेळ नव्हता. परंतु कोल्हापूरच्या गाडीला तास दोन तास अवकाश असल्यामुळें त्या अवधींत मला व मुलांना भेटून जावें म्हणून टॅक्सी करून स्टेशनवरून ते घरीं आले. टॅक्सींतून आलेल्या माधवरावांना पाहून मला आश्चर्य वाटलें. सहसा माधवराव असा वृथा पैसा खर्च करणार नाहींत हें मला चांगलें माहीत होतें. मी विचारलें, “ आज मोटारीनें आलांत ? ” माधवरावांनीं उत्तर दिलें, “ आजच रात्रीच्या गाडीनें मी कोल्हापूरला जाणार आहें. मध्यंतरीं फार थोडा वेळ आहे. टांग्यानें घरीं आलों असतों, म्हणजे बराच वेळ वाटेंत गेला असता. घरीं तितका वेळ मिळाला नसता म्हणून मोटारीनें आलों. वास्तविक तुलाच स्टेशनवर बोलावणार होतो. परंतु तुला तें गैरसोयीचें झालें असतें म्हणून मचि आलों. ” माधवराव आले; मला व मुलांना आनंद झाला. सम्मेलनासंबंधीं त्यांनीं हकीगत सांगितली व अशाच इतर गोष्टीवरही आम्ही खूप बोललों. बोलतां बोलतां माधवराव एकदम मला म्हणाले, “लीला अलीकडे मला संन्यास घ्यावासा वाटूं लागला आहे. मला तुमची फार काळजी वाटते. इतकें

संसारांत लक्ष असणें बरं नव्हे." आम्ही इतक्या आनंदांत होतों. पुन्हां आतां हे जातील, कदाचित् लवकर येणार नाहींत. आपली भेट लवकर होणार नाहीं, अशा प्रकाराची हुहूर मला लागलेली, आणि माधवरावांचे हे उद्गार ऐकले, माझ्या अंत:करणांवर कुणींतरी कुऱ्हाडीनें घाव घालावा इतकें दु:ख मला झालें. परंतु त्या वेळीं मी एकही अक्षर बोललें नाहीं. मनाला झालेल्या दु:खाची जाणीव त्यावेळीं यत्किंचित्‌ही बाहेर दिसूं दिली नाहीं.

माधवराव त्या दिवशीं रात्रीं ९ च्या गाडीनें कोल्हापूरला गेले. परंतु भेटीनें झालेल्या माझ्या आनंदाचा विरस करून गेले. त्यानंतर मी त्यांना बरेच दिवस पत्र धाडलें नाहीं. माझ्या मनांत उत्पन्न झालेल्या वादळाची त्यांना यत्किंचितही कल्पना नव्हती. माझ्या पत्राची वाट पाहून त्यांची एक तार व लगेच दुसरे दिवशीं पत्र आलें. मीं पत्राचें उत्तर लिहिलें. त्यांत "तुम्ही आतां निवृत्तिमार्गाला लागण्याचा विचार करीत आहां, दहा वर्षांतच संसाराचा तुम्हाला वीट आला आहे. किंबहुना तुमचें मन तुम्हाला आपण न कळत संसारांत फारच रमत आहोंत, तेव्हां संसारांचीं बंधनें तटातट तोडून त्यांतून मोकळें व्हावें असें सांगत आहे म्हणून आतां संन्यास घेण्याच्या गोष्टी बोलतां आहांत. माझ्या पत्रानें तुम्हाला न कळत संसाराचा मोह होईल. तेव्हां तुमच्या वैराग्यवृत्तीला हें पोषक नाहीं म्हणून मीच आपल्या मनाला आवर घातला. म्हणून पत्र लिहिण्याचें मुद्दाम टाळलें. परंतु तुमच्या एका वाक्यानें तुम्ही माझ्या आनंदाचा विरस करून गेलांत" असें लिहिलें. माधवरावांचें मला खालीप्रमाणें उत्तर आलें.

राजाराम कॉ०

ता. ६ सप्टेंबर १९३८

तुझें पत्र मला अर्ध्या तासापूर्वींच मिळालें आणि मी अविलम्बेंच त्याचें उत्तर कॉलेजांतूनच लिहून टाकीत आहे. तूं पत्र लिहून टाकलेंस हें फार चांगलें केलेंस. पण याहिपेक्षां त्याच वेळीं तूं कांहीं बोलली असतीस, थोडी भाण्डली असतीस तर मी तेव्हांच तुझ्या मनांतला गैरसमज लगेच दूर केला असता आणि हा तुला झालेला त्रास लगेच दूर झाला असता. मी तें वाक्य सहज बोलून गेलों त्याचा अनर्थ इतका

होईल त्याची कल्पना तेव्हां मला खरोखरच आली नाहीं. शब्दांचे अर्थ हे कृतीच्या सन्दर्भानें करावयाचे असतात हें तूं पुन्हां विसरलीस वाटतें. माझ्या वर्तणुकीच्या सन्दर्भानें तूं अर्थ केला नाहींस हें उघड आहे. मला ह्या झालेल्या वादळाची कांहींच कल्पना नव्हती. सर्व कांहीं सुखरूप आहे असें पाहून मी निघालों. आतां १० वर्षांच्या अनुभवानें तर मला वाटलें तूं शब्दापेक्षां कृतीला अधिक महत्त्व देशील. आतां तुझा कांहीं अपसमज होणें शक्य नाहीं म्हणून मी बोललों—आणि मनमोकळेपणानें तोंडाला आलें तें बोललों. न बोलणें अशक्य नाहीं. पण तूंच सांग, अशा रीतीनें मनांत आलेले कांहीं विचार लपविणें आपल्या दोघांत आणि तेही आपल्या दोघांविषयीं इष्ट आहे का? मनमोकळेपणानें जो ज्ञानाधिष्ठित विश्वास जडेल तो जपून बोलण्यानें जडेल का? आपण अनेक धाग्यांनीं जखडले जात आहोंत—निरनिराळे सहानुभव—यांनीं आपण एकमेकांना अधिक ओळखतों, एकमेकांशीं अधिक निकट येतों. या सर्वांत अमुक एक धागा विशेष प्रभावी वाटला—तर इतर धागे नाहींतच अथवा ते क्षीणच आहेत ते कां म्हणून? खेद करण्याचें काय कारण आहे? धागे कोणते कां असेनात, कार्य होत आहे ना? तूं कार्यांत कां वरं दृष्टी फेकूं नयेस. तुला भेटण्याकरतां मी मोटरनें आलों तें मला कांहीं वाटत नव्हते म्हणून का? पण इतक्या वर्षांनंतर तूं अजूनही मनाला गोष्टी लावून घेतेस? मोकळेपणानें तेव्हांच्या तेव्हां बोलून टाकीत नाहींस. काय म्हणावें तुला!! मी खात्रीनें इतक्यांत संन्यास घेत नाहीं. तो विचार तात्पुरता होता. एका भावनेनें आपण अधिक जखडले जात आहोंत असें वाटूं लागलें कीं तद्विरुद्ध विचार माझ्या मनांत तावडतोब येतात. त्याचा अर्थ लगेच मी तसें करीन असा होत नाहीं."

अशा प्रकारचे झगडे आमचे वारंवार चालत. माझ्या मनांतील वादळ थांबलें म्हणजे त्यांच्या निष्कपटी स्वभावानें माझें मन त्यांच्याकडे अधिक ओढलें जाई. अशा भांडणांनीं आमच्यांत वितुष्ट कधींच आलें नाहीं. माधवरावांनीं प्रेमविवाह केला असता तरी हा त्यांचा स्वभाव नाहींसा झाला नसता. तो वारंवार आड आलाच असतां यांत शंका नाहीं.

आम्ही एकमेकांशीं जुळतें घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतों. त्याकरितां आमची शेवटपर्यंत धडपड चालली होती. त्या धडपडीला अलीकडे पुष्कळ

यश आलें होतें, यांत शंका नाहीं. या धडपडीला खात्रीनें आणखीही यश आलें असतें, परंतु दुर्दैवानें आम्हीं एकमेकांना पूर्ण ओळखूं लागलों. आणि त्या धडपडीचा अंत शेवटीं माधवरावांच्या मृत्यूच्या धडपडींत विराम पावला. एकमेकांना समजावून सुखानें कालक्रमण करायला आम्हांस वेळच मिळाला नाहीं ! !

शेवटच्या दोन चार वर्षांत त्यांचे नातेवाईक त्यांच्याकडे येऊं जाऊं लागले होते. बडोद्याचे मामंजी आमचा संसार पाहायला मुद्दाम कोल्हापूरला आले होते. ते माधवरावांचे जवळ कांहीं दिवस राहिलेही. पुढें १९३९ सालीं आमच्या दिनूची मुंज झाली. तेव्हांही ते आपल्या भाच्याजवळ येऊन महिनाभर राहून गेले. जातांना माधवरावांनीं मामांना मनगटावरचें एक चांदीचें घड्याळ त्यांच्या आवडीप्रमाणें दिलें. सासूबाई मधून मधून येऊन राहात असत. माधवरावांच्या शेवटच्या दिवसांत त्या त्यांच्या जवळच रहात होत्या. लहानपणीं जीं माणसें त्यांना दुरावलीं होतीं, तीं सर्व पुढें त्यांच्या जवळ आलीं. सर्वांच्याकडून माधवरावांनीं चांगलेंच म्हणवून घेतलें. दिनूची मुंज म्हणजे माझ्या सासरच्या व माहेरच्या सर्व मंडळींचें एक सम्मेलनच झालें. त्या सर्व स्त्री–पुरुषांना आपल्या शक्तिप्रमाणें माधवरावांनीं आहेर दिले. माधवरावांनीं जणू काय त्या निमित्तानें आपलें इतकें दिवसांचें ऋण फेडलें. या सर्वांत त्यांना व मला जास्त सहवास घडला यमूताईचा. यमूताई सर्व भावंडांत लहान. माधवरावांच्या व त्यांच्या वयांत पुष्कळ अंतर. माधवरावांना त्या मुलीसारख्याच होत्या. माधवराव लहानपणींच घरांतून बाहेर पडले होते त्यामुळें त्या दोघांचा संबंध फार थोडा आला. यमूताईना समजूं लागल्यावर त्या आपण होऊन माधवरावांच्याकडे येत. पुढें माधवरावांनींच त्यांचें लग्न रा. मोहनरावांशीं करून दिलें. यमुताईचें लग्न झाल्यावर त्यांचें आमचें संघटण जास्त वाढलें. माधवरावांच्या मृत्यूच्या वेळीं यमूताई नागपूरहून आल्या. माधवराव वारले; पण यमूताई मला अधिक जवळच्या झाल्या. आमच्यांत नणंद–भावजईचें नातें न राहातां आम्ही एकमेकींच्या मैत्रिणी झाल्यों. माधवराव वारले त्या दिवशीं यमूताई रात्रभर माझ्या जवळ बसून होत्या. नंतरच्या दहा दिवसांत माझी समजूत घालून लहान मुलांसारखें मला

जेवूं घालण्याचें काम त्या करीत होत्या. केशवराव भाओजींही माधवरावांना आपल्या थोरल्या बंधूंना मान देत. त्या दोघांचें नातें पहिल्यापासून चांगलें राहिलें. माधवरावांच्या शेवटच्या दुखण्यांत भाओजींनीं माधवरावांची मनापासून सेवा केली.

माधवराव गेले. सर्वांना अत्यंत दुःख झालें.

अलीकडे त्यांना महाराष्ट्रांत जसजशी प्रसिद्धी मिळूं लागली तसतसें संसारांतील बारीक सारीक गोष्टींकडे त्यांना लक्ष द्यायला वेळच मिळेनासा झाला. घरांत पाहुणे जरी आले तरी त्यांची सर्व व्यवस्था ठेवण्याचें काम माझेंच असे. विशेषत: आमच्या पुण्याच्या घरांतील सर्व आंतली व बाहेरची व्यवस्था माझ्याकडे असे.

सन १९३८ सालीं माधवराव-विठ्ठलरावांचे स्नेही बनारस कॉलेजचे प्रोफेसर चुणेकर ह्यांचें लग्न आमच्या 'निवान्त' बंगल्यांतच झालें. लग्नाच्या दोन दिवस आधींच माधवराव कै. चंद्रशेखरांच्या फोटोच्या अनावरण समारंभाला मुख्य पाहुणे म्हणून बडोद्याला निघून गेले. लग्नाचा मांडव घालण्यापासून, येणाऱ्या पाहुण्यांची व्यवस्था ठेवण्यापर्यंतचें काम माझें एकटीचेंच होतें. रा. विठ्ठलराव घाटे व सौ. वहिनी सर्व पाहुण्यांसह आले. लग्न झालें. सर्व वऱ्हाड मुंबईला गेलें. रा. विठ्ठलराव व सौ. वहिनी दुपारीं माधवरावांच्या येण्याची वाट पाहून मुंबईला परत गेले; व माधवराव त्याच दिवशीं रात्रीं घरीं आले.

यावरून एक प्रसंग मला आठवला. आमचा बंगला नुकताच बांधून झाला होता. माधवराव साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष झाले म्हणून व नवें घर बांधलें म्हणून कांहीं साहित्यिक व आमचे कांहीं स्नेही यांना आमच्या घरीं मोठी मेजवानी देण्याचें आम्हीं ठरविलें. परन्तु ज्या दिवशीं आमच्या घरीं मेजवानीचा बेत ठरला त्याच दिवशीं सकाळीं डॉ. केतकर वारले. आमचीं बोलावणीं वगैरे सर्व कांहीं तयारी झाली होती. आचारी येऊन स्वयंपाकाला लागले. इतक्यांत प्रो. वा. म. जोशी आले. त्यांनीं मला सांगितलें, "तूं आतां हा आजचा बेत रहित कर" माझ्याही मनांत ही गोष्ट हजार वेळ आली. परन्तु जवळजवळ शंभर पानांचा बेत; अर्धवट स्वयंपाक झालेला! आतां बेत रहित करणें माझ्या आटोक्याबाहेरचें होतें. मग सर्वांच्या विचारें असें ठरविलें कीं साधाच स्वयंपाक करावा;

स्मशानयात्रा आटोपली कीं मंडळींनीं येथें येऊन जेवण करून जावें. माधवराव जे सकाळीं डॉ. केतकरांच्या स्मशानयात्रेकरितां म्हणून बाहेर पडले ते इतर निमंत्रित मंडळींबरोबरच घरीं जेवायला आले.

कोणतेंही एखादें पुस्तक लिहून बाजूला झालें कीं लगेच ते दुसऱ्या विषयाचा विचार करूं लागत व थोड्याच दिवसांत त्या विषयाच्या पुस्तकाचें हस्तलिखित तयार होई. स्वस्थ बसून काल घालवायचा त्यांना माहीतच नव्हतें. एकदां एखाद्या गोष्टीचा विचार ते करूं लागले कीं त्यांत त्यांचें चित्त रमून जाई. तसाच प्रकार भाषाशुद्धीचा. १९३३ ते ३९ सालपर्यंत त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं भाषाशुद्धीवर व्याख्यानें दिलीं, त्या व्याख्यानांचा एकत्र संग्रह म्हणजे ‘ भाषाशुद्धी विवेक ’ हा ग्रंथ होय. कांहीं लिहायला घेतलें किंवा एखादी गोष्ट मनाला पटली कीं मग त्यांचें कशाकडेच लक्ष नसे. त्यांत ते इतके गुंग होत कीं त्यांना कशाचेंही भान राहात नसे. तीच गोष्ट भाषेच्या चळवळींसंबंधीं त्यांनीं केली. मराठी भाषेचें संवर्धन आणि उन्नति झाली पाहिजे असें त्यांना १९३३ सालपासून वाटूं लागलें. भाषाशुद्धीचें महत्त्व पटल्याबरोबर त्यांनीं आपल्या स्वतःच्या कवितेंतील परके शब्द तर काढून टाकलेच. परन्तु स्वतःच्या बोलण्यांत व लिहिण्यांतही ते शक्य तेवढें इंग्रजी, फारशी, व अरबी शब्द न येण्याची खबरदारी घेत. मग त्यांचें बोलणें, लिहिणें केव्हां केव्हां हास्यास्पद झालें तरी त्याची पर्वा त्यांनीं कधीं केली नाहीं.

१९३७सालची गोष्ट;दिनू आमचा सहा वर्षांचा होता. त्याच्याशीं बोलतांनाहि माधवराव शक्य तेवढें शुद्ध बोलण्याचा प्रयत्न करीत. ते त्याला एक दिवस म्हणाले,“ दिनू चल माझ्या संगती; आपण भाजी आणूं ” दिनूच्या ध्यानांत तातांनीं संगती शब्द वापरलेला चांगला राहिला. तो मला म्हणाला, ‘आई आपले ताता सारजाबाई (आमची मोलकरीण) सारखे काय ग बोलतात?’ मीं म्हटलें “ अरे बाबा, ते शुद्ध मराठी बोलतात. ”

संवयीनें माधवराव मराठी निर्भेळ बोलूं लागले. जळगांव महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या माधवरावांच्या भाषणानंतर डॉ. केतकर व वामन मल्हार जोशी यांनीं दोघांनींहि “माधवरावांचें भाषण म्हणजे शुद्ध मराठीचा एक सुंदर नमुना आहे” असे उद्गार काढले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६७० वि: चारि
क्रमांक १२३८ नों दि २।७।६

जळगांव महाराष्ट्र साहित्यसम्मेलन
१९३७



माधवराव पटवर्धन, अत्रे, वरेरकर.

ते स्वतः शुद्ध बोलण्याचा प्रयत्न करीत. भाषेंतील परके शब्द खड्यासारखे निवडून काढीत. कांहीं शब्दांच्या बाबतींत मला त्यांचें म्हणणें पटत नसे. उदाहरणार्थ, मनिऑर्डर ह्या शब्दाला ते 'द्रव्याज्ञा' म्हणत. लेटर पॅडला 'लघुपत्र' म्हणत. माझें म्हणणें कांहीं शब्दांनीं भाषा क्लिष्ट होते. "तुम्ही चागले सोपे शब्द प्रचारांत आणा. आम्ही तुमचें अनुकरण अवश्य करूं." परंतु त्यांनीं आपलीं मतें माझ्यावर लादलीं नाहींत. भाषाशुद्धीची चळवळ माधवराव जेव्हां मनापासून करूं लागले, तेव्हां कांहीं लोक त्यांच्या 'माधव ज्यूलियन' या नांवाची हेटाळणी करून हसत. एकदां कोणी तरी माझ्या वडिलांच्या जवळ म्हणालें, 'अहो, त्या पटवर्धनाला म्हणावें, आधीं आपल्या नांवाची शुद्धि कर आणि मग मराठी भाषेचें शुद्धिकरण कर.' त्या गृहस्थांना माधवराव हे गरुडांचे जांवई आहेत हें कदाचित् माहीत नसावें म्हणून त्यांनीं अगदीं एकेरी भाषेंत त्यांच्यावर टीका केली असावी. बाबांना तें ऐकून जरा चमत्कारिक वाटलें. आपल्या 'माधव ज्यूलियन' या नांवाबद्दल त्यांनीं सुधारक पा. १७२ मध्यें पुढीलप्रमाणें म्हटलें आहे.

परि कविचें कां कथितां नांव न ?
'कवि कवितेला विटला आतां,
अर्धा ख्रिस्ती नांव पहातां,
परि हृदयानें हिन्दु मराठा,
जन्मानें जरि तो चित्पावन'

अशी स्वतःवरच त्यांनीं टीका केली आहे. मी सुद्धां त्यांना केव्हां तरी म्हणत असे कीं, खरेंच तुम्ही 'माधव ज्यूलियन' हें नांव बदलून टाका. तेव्हां ते म्हणत, "काव्याला नुकतीच सुरवात केली असती तर अवश्य नांव बदललें असतें. आतां त्या नांवांत मला मोठें रहस्य वाटत नाहीं. परंतु माझें बरेंचसें काव्य ह्या नांवानें प्रसिद्ध झालें आहे. ह्या नांवानेंच मी महाराष्ट्रांत ओळखला जातों. तेव्हां आतां ह्या भानगडींत न पडणें बरें. म्हणून दुसऱ्या अर्थानें मी आतां म्हणतों "नांव न सुललित अडलें...कोठें?" त्याचप्रमाणें आपल्या समाजांतील कांहीं चालीरितींचाही उल्लेख त्यांनीं आपल्या काव्यांत केलेला आढळेल. उदाहरणार्थ सुधारक व नकुलालंकारमधील अनेक

व्यक्तींचीं नांवें–आडनावें त्यांनीं मासलेवाईक घातलीं आहेत. हिंदु लोकांचीं नांवें व आडनांवें मोठीं चमत्कारिक असतात. ज्यांचीं तीं चमत्कारिक असतात ते त्याबद्दल बहुतेक निष्काळजी असतात. एकदां कांहीं कारणानें पडून गेलेलीं नांवें आडनांवें कोणाला बदलावींशीं वाटत नाहींत. तेव्हां अशीं अनेक मासले-वाईक नांवें-आडनांवें त्यांनीं आपल्या काव्यांत ज्या व्यक्ती निर्माण केल्या आहेत त्यांना मुद्दाम दिलीं आहेत. नांव ठेवावयाचें लांबलचक आणि हांक मारा-यला सोपें जावें म्हणून त्या नांवाचें आखूड नांव करून हांक मारायची अशी कित्येकांना संवय असते. नकुलालंकारांत नकुलरावांच्या दुसऱ्या बायकोचें नांव माधवरावांनीं 'सौदामिनी' ठेवलें आणि नकुलराव स्वतः बायकोला 'सौदी' म्हणतात, असें त्यांना आधीं लिहावयाचें होतें. परंतु त्या नांवाचा अपभ्रंश 'सोदी' असाही होण्याचा संभव असतो. तेव्हां हें बदला असें मीं त्यांना म्हटलें. त्यांनीं तें बदललें.

त्यांना असें एक उदाहरण माहीत होतें कीं, एका गृहस्थांची पहिली पत्नी लंगडी होती. तेव्हां बायकोचें नांव कसें घ्यावयाचें म्हणून ते गृहस्थ आपल्या बायकोला 'लंगडे' ह्या नांवानें हांक मारीत. पुढें त्यांची पहिली बायको वारली, त्यांनीं दुसरी केली. तिलाही ते लंगडी नसतांना 'लंगडे' म्हणूनच संबोधीत.

एकदां माधवराव एका गांवाला आपल्या एका स्नेह्याकडे गेले होते. तेथें कोणी कुंटे नांवाचें कुटुंब रहात होतें. ते ज्या घरीं गेले होते त्या घरां-तील स्त्रियांची व कुंट्यांच्या घरांतील स्त्रियांची चांगली ओळख, तेव्हां एक दिवस माधवराव तेथें असतांना ते जेथें उतरले होते त्यांच्या घरांतील एका स्त्रीनें आपल्या मुलाला सांगितलें कीं, "बाळू, जा रे **कुंटीण काकूंना** बोला-वून आण." माधवराव हंसून म्हणाले, "पहा मी म्हणतों तें खरें आहे कीं नाहीं तें– कांहीं आडनांवामुळें कसा अर्थाचा अनर्थ होतो आणि तो ज्याचा त्याला कसा समजत नाहीं. मी जर ह्या कुंटीण काकूंच्या जागीं असतों तर अशा हांक मारण्याला हरकत घेतली असती. चांगल्या कुलीन घरांतील स्त्री आपल्या आडनांवामुळें "कुंटीण" बनते."

अशीं अनेक प्रकारचीं हास्यास्पद उदाहरणें त्यांना माहीत होतीं. नकुल-रावांची सौदामिनी ही दुसरी पत्नी. बिजवराची दुसरी पत्नी लाडकी.

नकुलराव आतां कालपरत्वें सुधारले होते. तेव्हां बायकोला नांवानें हांक मारावी म्हणून त्यांनीं 'सौदी' म्हणायचें असें ठरवलें. पण ते तिला नुसतें 'सौ' च म्हणूं लागले, असें नकुलालङ्कार पान ४ मध्यें आहे. त्याचप्रमाणें सुधारकांत रावबहादुर ठोसर ह्यांचें नांव केरो विष्णु होतें असा उल्लेख आहे.

—नांव जरी केरो विष्णु असलें तरी
दोष कुणाचा ? अडलें कोठें ?
पदवी मिळवुन झाले मोठे.

असा उल्लेख पृष्ठ ९, १० ह्यावर आहे. तेव्हां मुलाचें किंवा मुलीचें नांव ठेवतांना तें विचार करून ठेवावें. तें नांव किंवा आडनांव हास्यास्पद होऊं नये म्हणून आईबापांनीं असलीं नांवें ठेवूं नयेत व जुन्या वळणाच्या आईबापांनीं कांहीं कारणानें तशीं ठेवलीं तर पुढल्या पिढीनें ती अवश्य बदलून टाकावींत, असें त्यांचें म्हणणें असे. म्हणून त्यांनीं आपलें 'महादेव' हें नांव बदलून त्याचें 'माधव' केलें.

सुधारक सुशिक्षित समाजांतील झब्बूशाही पाहिली कीं त्यांना मनापासून राग येई. माधवरावांची निरीक्षणशक्ति फार दांडगी होती. कोणावर रिकामा अन्याय जुलूम झालेला त्यांना खपत नसे. असा जुलूम, अन्याय करून आपण मात्र बाहेरून सभ्यतेचा आव आणणारीं माणसें पाहिलीं कीं त्यांना मोठें नवल वाटे. अशा प्रकारच्या माणसांचीं शब्दचित्रें कोठल्या तरी काव्यांत रेखाटावीं असें त्यांना १९३३, ३४ सालपासून वाटत होतें.

वास्तविक ज्या हेतूनें काव्य लिहिण्यास त्यांनीं सुरुवात केली त्यांचा तो हेतु शेवटपर्यंत अनेक कारणांनीं टिकला नाहीं. नकुलालङ्कारांतील प्रत्येक व्यक्ति म्हणजे झब्बूपणाचा एक एक नमुना आहे. अनेक प्रकारचे हास्यास्पद दोषांचे नमुने त्यांनीं रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबरोबर रचनेच्या दृष्टीनें दिसून येणारी मर्मभेदक लेखनपद्धति, कोट्या, अर्थचमत्कृति, यमकादि शब्दालंकार, व अनेक अर्थालंकारांचीं उदाहरणें ह्या काव्यांत दिसून येतील. त्यांचें हें काव्य मोरोपंतासारखेंच आर्यावृत्तांत आहे. हें काव्य लिहीत असतांना समाजांतील दोषाविष्करण हा हेतु माधवरावांनीं आपल्या डोळ्यापुढें ठेवला होता, त्याप्रमाणें भाषाचमत्कृतिकडेही त्यांनीं पुढें पुढें जास्त लक्ष दिलें.

त्यामुळें नेहमीच्या सवयीनें प्रथम रचलेल्या आर्या त्यांनीं पुनःपुन्हा सुधारल्या. त्याच काळांत 'पद्यप्रकाश' मुलांच्याकरितां रचला गेला. वरील सर्व पुस्तकें १९३३ ते ३९ सालपर्यंत एकामागून एक लिहिलीं गेलीं व छापलीं गेलीं. त्या काळांत माधवराव सतत उद्योगांतच राहिले. त्यांना मंडळींत बसायला व गप्पा मारायला आवडत असत. परन्तु घरांत पाहुण्यांची गर्दी झाली कीं माधवराव बावरून जात. सन १९३९ सालच्या मे महिन्यांत आमच्या दिनूची मुंज झाली. ती अगदीं जुन्या पद्धतीप्रमाणें झाली नाहीं. धर्मनिर्णय मंडळाच्या नियमाप्रमाणें झाली. आवश्यक तेवढेच विधि केले माधवरावांनीं आपल्या सर्व इष्टमित्रांना व नातेवाइकांना मुंजीला बोलावलें होतें. जवळच्या सर्व मंडळीस व नातेवाइकांस त्यांनीं यथायोग्य आहेर केले. त्यांच्या हातून हेंच शेवटचें कार्य झालें. त्यानंतर माधवराव महिन्यांनींच आजारी पडले.

ते कोल्हापूरला एकटेच दोन दोन, चार चार महिने राहूं लागले. परन्तु मला त्यांच्या प्रकृतीची काळजी वाटे. एकदां ते लिहूं लागले, म्हणजे खाणें—जेवण याकडे त्यांचें दुर्लक्ष होई. त्यांत जेवण खाणावळीचें. मी पुष्कळ वेळ सांगून पाहिलें, परन्तु माझ्या सांगण्याचा परिणाम झाला नाहीं. एकदां विठ्ठलराव घाटे त्यांना भेटायला कोल्हापूरला गेले होते. त्यांनींही "तुम्ही आतां एकटे राहूं नका" असें सांगितलें. त्यांचें म्हणणें त्यांना थोडेंबहुत पटलें. परन्तु पुन्हां ते कोल्हापूरला एकटे व मी पुण्याला अशी राहाण्याची पाळी आलीच नाहीं. एकटे राहाण्याचें दुसरें आणखी एक कारण असें होतें : आतां आमच्या दिनूला आठवें वर्ष लागलें होतें. त्यांचें म्हणणें मुलांचें शिक्षण पुण्यालाच व्हावें. घर बांधलें, आयती सोय आहे. तेव्हां कांहीं दिवस मुलें मोठीं होऊन कोठें वसतिगृहांत राहूं लागतील तोंवर मी व मुलांनीं पुण्याला राहावें. त्याप्रमाणें मी एक सहा महिने मुलांना घेऊन पुण्याला राहिले. तोंच जूनच्या आरंभींच माधवराव कावीळीनें आजारी झाले व मला कोल्हापूरला जावें लागलें.

सन १९३९ साल कसें गेलें तें समजलें देखील नाहीं. त्याच वर्षी माधवराव डी लिट् झाले. दिनूची मुंज व दोन तीन नवीन पुस्तकांचें प्रकाशन

( भाषाशुद्धिविवेक, पद्यप्रकाश, नकुलालङ्कार ), अनेक मेजवान्या यांतच माधवराव चूर होते. मुंज मे महिन्यांत झाली व माधवरावांचा आजार तेव्हांपासूनच सुरू झाला. परंतु हा आजार म्हणजे मोठा भयंकर स्वरूपाचा असेल अशी कल्पनाही आमच्या मनाला शिवली नाहीं. आरंभीं सर्वांगाला नुसती कंडच सुटत होती. आम्ही त्यावर अनेक घरगुती उपाय करीत होतों. त्यांतच माधवरावांचा नित्यक्रम नियमित चालला होता. जून १३ ला आम्ही कोल्हापूरला गेलों. माधवराव त्या वर्षी मुंबई युनिव्हर्सिटीच्या एम. ए. ला मराठीचे परीक्षक होते. ते गठ्ठे तपासून नुकतेच झाले होते. त्याच महिन्याच्या १८ तारखेला ते मुंबईला युनिव्हर्सिटीच्या मीटिंगला गेले. तेव्हां त्यांचा आजार हळूं हळूं वाढूं लागला होता. ते मुंबईला गेले म्हणजे दादरला रा. घाट्यांच्याकडे उतरत. माधवराव ज्या दिवशीं मुंबईला गेले त्याच दिवशीं त्यांचे डोळे पिवळे झाल्याचें सौ. वत्सलाबाईच्या ध्यानांत आलें, आणि त्यांनीं तसें बोलूनही दाखविलें. माधवराव कोल्हापुरला ता. २० ला परत आले. तेव्हां मलाही ते जरा जास्त दमलेले दिसले. दुसरे दिवशीं म्हणजे ता २१ ला डॉक्टरांनीं त्यांना तपासलें व कावीळ झाल्याचें सांगितलें. काविळीवरच जवळ जवळ तीन महिने औषध सुरू होतें. परंतु रोग हटेना. दिवसेंदिवस माधवराव क्षीण होत चालले. त्यांतच तापानें त्यांच्या अंगांत ठाण मांडलें; तरी माधवरावांचें कॉलेजचें काम व्यवस्थित चाललें होतें. पुढें पुढें हळूं हळूं क्षीणता वाढत चालली तरी त्यांचें छंदोरचनेचें इंग्रजींत भाषांतर करणें जोरांत चालूं होतें. दिवसा ते क्वचितच विश्रांति घेत. मी मात्र घाबरून गेले होतें. केव्हां केव्हां मी तसें बोलून दाखवी तर ते माझें बोलणें थट्टेवारी नेत. कॉलेजची पहिली टर्म संपत आली. एक दिवस कॉलेजला सुटी होण्याच्या १५ दिवस आधीं रा. वि. स. खांडेकर आले व माधवरावांना आग्रहानें डॉ. भडकमकरांच्याकडे मिरजेला घेऊन गेले. त्या वेळची माधवरावांची आठवण ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे माधवराव व खांडेकर डॉक्टरांच्याकडे मिरजेला सकाळीं गेले होते. डॉक्टरांनीं माधवरावांना आग्रहानें जेवायला ठेवून घेतलें. जेवायची वेळ झाली. सर्व मंडळी सोंवळें नेसली. माधवरावही नेसले. ही गोष्ट घरीं आल्यावर मला त्यांनीं मुद्दाम सांगितली.

ते म्हणाले, “ मला कांहीं भडकमकरानीं मी सोवळें नेसलों नसतों तर तें नेसण्याचा खात्रीनें आग्रह केला नसता; परंतु जेथें जावें तेथें त्यांच्या प्रमाणें वागावें असें आतां मला वाटूं लागलें आहे. थोडक्यांत मनुष्याचें समाधान होत असेल तर ती गोष्ट अवश्य करावी. त्याचा अर्थ मला सोवळें ओवळें आवडतें असा नाहीं. ” माधरावांनीं पहिले डॉक्टर अद्याप बदलले नव्हते. त्याचें कारण त्यांचा कोणत्याहि डॉक्टरांच्या औषधावर विलक्षण विश्वास असे. डॉ. थत्त्यांच्या औषधानें गुण येईना तेव्हां मीं व त्यांच्या अनेक चहात्यांनीं, तुम्ही आतां कोणत्या तरी मोठ्या डॉक्टरकडे जावें असें सांगितलें तर ते आम्हांला म्हणत, “ तुमच्यापेक्षां डॉक्टरना जास्त समजतें. डॉक्टरच्या औषधाचा परिणाम सावकाश होतो. उतावीळपणानें का रोग बरा होतो?” आम्ही नाइलाजानें निरुत्तर होत होतों. डॉक्टर सांगतील त्याप्रमाणें पथ्य व वेळेवर औषध घेणें ह्यांत त्यांनीं कधीं हयगय केली नाहीं. डॉ. भडकमकरांनीं त्यांना तपासलें. त्यांना लिव्हरला कॅन्सर असल्याचा संशय तेव्हांच आला. परंतु त्या वेळेस तो त्यांचा नुसता संशयच होता; आणि त्याबद्दल थोडेंसें बोलणें रा. खांडेकरांशीं झालेंही. पुण्याला भडकमकर बाबांना भेटले आणि त्यांनीं सांगितलें कीं, तुम्ही जाऊन स्वतः माधवरावांना येथें घेऊन या; त्यांना विश्रांतीची आवश्यकता आहे. पंधरा दिवसांनीं पुन्हा कोल्हापूरहूनच माधवराव मिरजेला डॉक्टरांच्याकडे गेले; ह्या खेपेस त्यांना माधवरावांच्या प्रकृतींत बरीच सुधारणा झालेली दिसली; परंतु त्यानंतर दोन चार दिवसांनींच माधवरावांच्या पावलावर सूज दिसूं लागली. मला हें लक्षण कांहीं बरें दिसेना. माधवरावांचें तेज तर कधींच लुप्त झालें होतें. त्यांचा आतां हाडांचा नुसता सांपळा राहिला होता. ह्यानंतर दोन तीन दिवसांत कॉलेजला सुटी झाल्यावर आम्ही पुण्यास येण्यास निघालों. घरीं आल्यावर दसऱ्याच्या सुमारास माधवरावांचें दुखणें जास्त झालें. पावलांवरची सूज पावलांवरच न राहातां छातीपासून पावलापर्यंत वाढली. तरी माधवराव आपला नित्याचा क्रम स्वतः आपल्या पायानें जाऊनच उरकीत होते. एक दिवस रात्रीं मला झोंप लागली होती. मध्यरात्रींच्या सुमारास माधवरावांना तहान लागली. ते स्वतः पलंगावरून उठले आणि पाण्याच्या तांब्याकडे पाणी पिण्याकरतां जाऊं लागले. परंतु मध्येंच

झोक जाऊन सपशेल खालीं पडले. मी आवाज झाला म्हणून खडबडून जागी झालें. तों माधवराव फर्शीवर निपचीत पडले होते. त्यांच्यांत उठण्याचीही ताकद नव्हती. तेव्हांपासून त्यांनीं स्वतः धडपड करण्याचें सोडून दिलें. परंतु सर्व सेवा दुसऱ्याच्या हातून करून घेणेंही त्यांना कमीपणाचें वाटूं लागलें. आतां तर त्यांना पाठीला आधार देऊन पलंगावर उठवून बसवावें लागत असे. परंतु ते स्वतःचें तोंड धुणें, जेवणें हें स्वतःच करीत असत.

ह्याच सुमारास आणखी एक गोष्ट घडून आली. आमचे बँकेंत जे पैसे असत. ते दोघांच्या नांवावर असत, एकदां महाराष्ट्र बँकेकडून स्पेसिमेन सिग्नेचर मागवलें होतें. मी आपली सही केली, परंतु पूर्वींच्या व त्या सहींतल्या अक्षरांत फरक पडला. माधवराव माझ्यावर रागावले. त्यांनीं त्या दिवशीं माझ्याकडून जवळ जवळ एक तासभर माझी सही घोटवून घेतली. आतां मी आपली ठराविक सही झोंपेंतही करीन, घोटण्याचा परिणाम माझ्यावर इतका झाला.

अलीकडे त्यांचें लेखन मात्र भडकमकरांच्या धाकामुळें व हातांत लिहिण्याची शक्ति नसल्यामुळेंच सुटलें. परंतु आतां नुसतें पडून राहणें त्यांना बिलकूल आवडेना. त्यांनीं तशाही स्थितींत लिव्हरच्या अनेक रोगांचीं लक्षणें एका इंग्रजी पुस्तकांतून वाचलीं व कोणी आलें तरी त्यांना ते सांगत कीं, “ मला सिरॉसिस ऑफ द लिव्हर झालें आहे. माझीं सर्व लक्षणें त्या रोगाप्रमाणेंच आहेत. ” आपण ह्या दुखण्यांतून उठणार अशी त्यांना पक्की खात्री होती. शेवटपर्यंत मला स्वतःला व माधवरावांना त्यांना कोणता रोग झाला आहे हें माहीत नव्हतें. मी तर माधवराव वारल्यावर दुसरे दिवशीं ज्ञानप्रकाशांतच त्यांना कॅन्सर झाल्याचें वाचलें; पण माधवराव शेवटपर्यंत अज्ञानांतच राहिले. केव्हां केव्हां त्यांच्याकडे पाहिलें कीं माझा सर्व धीर खचून जाई; आणि अशा क्षणाला ते माझीच समजूत घालीत, त्यांनीं समजूत घातली कीं मलाही असें वाटे कीं, हे खात्रीनें ह्या दुखण्यांतून उठणार. शेवटच्या घटकेपर्यंत माधवरावांनीं जसें पथ्य डॉक्टरांनीं सांगितलें होतें तसें केलें. किंबहुना मीच कधीं तरी औषध, जेवण किंवा सूप घेण्याची वेळ थोडीशी बदलली तर त्यांना तें बिलकूल खपत नसे. एकदां मीं त्यांच्या नेहमींच्या वेळेच्या

थोडें आर्धी ताक दिलें. त्याना तें खपलें नाहीं. त्यांनीं डॉक्टरांच्या कडून कोणत्या वेळीं काय घ्यायचें त्याचें एक वेळापत्रक करवून घेऊन मला दिलें आणि त्याप्रमाणेंच त्यांनीं खाणें-पिणें व औषध घेणें शेवटपर्यंत ठेवलें. त्यांना चहा अत्यंत प्रिय असे; परंतु आजारी पडल्यापासून त्यांनीं चहाच्या थेंबाला स्पर्श केला नाहीं.

इतक्या आजारपणांतहि मी आपली स्वतःची खाण्यापिण्याची आबाळ करतें कीं काय ह्याकडे त्यांचें लक्ष असे. जोंपर्यंत त्यांना चालवत होतें तोंपर्यंत माझ्या जेवायच्या वेळीं ते माझ्या जवळ येऊन बसत. मलाहि अलीकडे बावरल्यासारखें झालें होतें. माझें मन ठिकाणावर नव्हतें. मलाहि जेवण जाईनासें झालें होतें. त्यांना स्वतःला जेव्हां स्वयंपाकघरांत येववेनासें झालें तेव्हां माझें जेवण झाल्यावर मी कांहीं कारणानें बाहेर बैठकींत गेलें म्हणजे मी काय जेवलें, किती जेवलें, केव्हां जेवलें त्याची चौकशी ते करीत, आणि माझ्या सांगण्यावर भरंवसा बसला नाहीं तर ते माझ्या जेवण्याखाण्याची विचारपूस सासूबाईंच्या जवळ करीत. त्यामुळें माझ्या जेवणाच्या वेळीं सासूबाई माझ्याजवळ बसूं लागल्या, त्यांच्यामुळें मला अळेंबळें खावें लागे.

मी एक दिवस नुसत्या बटाट्याच्या किसावरच राहिलें. हें माधवरावांना समजतांच त्यांना तें बरें वाटलें नाहीं. त्यांनीं मला सांगितलें, 'तूं जर स्वतःचे असे हाल करणार असलीस तर मी तुझ्याशीं बोलणार नाहीं.' मी मुकाट्यानें जेवूं लागलें. माधवरावांचें दुखणें जास्त झाल्यावर केशवराव भावोजी, सौ. यमूताई, मोहनराव ही सर्व मंडळी त्यांच्या समाचाराकरतां एकत्र जमली. एक दिवस सूप करण्याकरतां मी कांहीं पालेभाजी चिरत होतें. एकाएकीं माझा आंगठा कापला व बरेंच रक्त त्या आंगठ्यांतून गेलें. यमूताईंनीं आयोडिन आणून लावलें व माझ्या आंगठ्याला चिंधी बांधली. सूप तयार झाल्यावर मी तें कपांत घेतलें व माधवरावांच्या बिछान्याशेजारीं त्यांना पाजण्याकरतां उभी राहिलें. माधवरावांची घालमेल चालली होती. उशांचा उंच ढीग करून माधवराव त्यावर कपाळ टेकून बसले होते. माझ्या हातांतला कप त्यांनीं पाहिला. आणि त्यांचें लक्ष एकदम माझ्या आंगठ्याकडे गेलें. त्यांना

अनुक्रम ३६८०८
क्रमांक ९२३८



बसलेले :— ती. गं. बा. गरुड.   ती. सौ. कमलाबाई गरुड.

उभे :— सौ. सुशीला हिंगवे.   चि. दिनू.

असह्य वेदना होत असतांही त्यांनीं काय झालें ह्याची चौकशी केली व आयोडिन लावलें कीं नाहीं, असें विचारलें व पाण्यांत हात घालूं नको म्हणून बजावलें. डॉ. भडकमकरांनी माधवरावांच्या बाबतींत कोणत्याही प्रकारची हयगय केली नाहीं. केव्हां केव्हां त्यांच्या दिवसांतून दोन तीन खेपा होत, तरी डॉक्टर त्याही मोठया काळजीनें व स्मरणपूर्वक करीत. अलीकडे माधवराव दुखण्याला अगदीं कंटाळले होते. केव्हां तरी ते एखाद्या लहान मुलासारखें रडूं लागत. अलीकडे त्यांना झोंप येईनाशी झाली होती. सबंध रात्र उशांचे ढीग डोक्याखालीं घेऊन, ते त्यावर डोकें टेकून बसून काढीत. परंतु त्यांनीं कधीं कोणाला त्रास दिला नाहीं. मला दिवसभर श्रम होत. केव्हां तरी रात्रीं मला न कळत माझा डोळा लागून जाई. परंतु झोपेंतून त्यांनीं मला कधीं उठवलें नाहीं.

आमचा दिनू सकाळीं उठल्याबरोबर त्यांच्या तोंडधुण्याची तयारी करून ठेवी. तें पाहून माधवरावांचें अंतःकरण भरून येई. पुढें पुढें माधवरावांनीं मुलांना जवळ घेण्याचें सोडून दिलें. तीं नुसतीं जवळ खेळतांना दिसलीं तरी ते कावरेबावरे होत. एकदां सुधा कांहीं तरी हट्ट करून रडत होती. त्यांनीं तिला जवळ बोलावलें आणि त्यांनीं तिची समजूत घातली. ते तिला म्हणाले, " सुधा, ह्यापुढें तूं आईचें ऐकलें नाहींस तर मला आवडणार नाहीं." त्यानंतर ते आजारी होते तोंवर सुधानें कधीं हट्ट केला नाहीं.

हळुहळूं माधवरावांचा एक डोळा साफ मिटला. मोठया प्रयासानें ते आपल्या हातानें तो उघडण्याचा प्रयत्न करीत, तोंड वांकडें झालें, सर्वांगावर सूज येऊं लागली आणि माधवरावांच्या रूपाचें बेरूप झालें. माझ्यानें त्यांच्याकडे बघवेना. मी त्यांची सेवा शेवटपर्यंत केली. परंतु त्यांच्या तोंडाकडे बघण्याचें धैर्य मला होईना. केव्हां तरी बोलण्याचा किंवा पाहाण्याचा प्रसंग आला कीं मला धसका बसे. माझेही डोळे न कळत पाण्यानें भरून येत. माझी ते समजूत घालीत. " तूं माझी इतकी सेवा करतेस. परमेश्वर तुझ्या सेवेला खात्रीनें यश देईल; तूं घाबरूं नकोस. " शेवटीं शेवटीं त्यांना झोंप येईनाशी झाली. रात्रीं नऊ वाजले कीं ग्रामोफोनच्या रेकॉर्डस् त्यांच्या करमणुकीकरतां आम्ही लावीत असूं. परंतु दुखण्याच्या तळमळींत त्यांचें लक्ष त्याकडे लागत नसे. रात्रीं गरम पाण्याची पिशवी पोटाशीं घेऊन ते झोंपत,

पण झोंप कशी ती त्यांना लागतच नसे. पिशवींतील पाणी निवलें कीं ते जागे होत. परंतु मला दिवसभराच्या श्रमानें गाढ झोंप लागे. एक दिवस रात्रीं नित्यक्रमाप्रमाणें मीं पिशवींत गरम पाणी घातलें. व पिशवी माधवरावांच्या जवळ दिली. थोड्या वेळांतच मला गाढ झोंप लागली. कांहीं वेळानें माधवरावांनीं मला हांक मारली. परंतु मला जाग आली नाहीं. त्यांचा आवाज अत्यंत क्षीण झाला होता. त्यांनीं जवळच ठेवलेल्या टेबलावरचें पाण्याचें फुलपात्र घेऊन टेबलावर त्यानें आवाज केला, मी एकदम जागी झाले. पलंगाजवळ जाऊन पाहातें तों बिछाना व कपडे पिशवींतील पाणी सांडून ओले झालेले. मला फार वाईट वाटलें. परंतु माधवराव यत्किंचितही रागावले नाहींत; वास्तविक ती माझीच चूक होती. पिशवीला बूच मी लावलें, परंतु तें घट्ट लागलें नाहीं, त्याचा हा प्रताप होता. मला ते इतकेंच म्हणाले कीं, "चालायचंच, अशा चुका माणसाच्या हातून घडतात. हें तूं खात्रीनें मुद्दाम केलें नाहींस. परंतु कित्येक वेळां फार महत्त्वाच्या गोष्टींत तुझी हयगय पाहिली म्हणजे मला राग येतो." त्यानंतर दोन दिवसांची गोष्ट, मला अशीच झोंप लागली. इतक्यांत माधवरावांना खोकल्याची उबळ आली. मी जागी झालें. जवळ जाऊन पाहिलें तो सारें तोंड रक्तानें भरलेलें! मी घाबरलें. मोहनराव शेजारच्या खोलींत झोपले होते. त्यांना मी मोठ्यानें हांक मारली. परंतु माधवरावांनीं आपल्या क्षीण आवाजांत "घाबरूं नकोस" असें सांगितलें. त्यांनीं आपल्या हातानें रुमालानें तोंड पुसलें; मीं दिलेल्या पाण्यानें त्यांनीं चूळ भरली आणि पुन्हां ते म्हणाले, "तूं अगदीं घाबरूं नकोस. मी सावध आहें."

अनेक मंडळी भेटायला येत. त्यांत एक गृहस्थ एक दिवस दुपारीं आले. त्यांनीं मला माधवरावांच्या समोरच "त्यांच्या पोटांतलें पाणी काढलें कां?" म्हणून विचारलें. मी मानेनें हो म्हणून खूण केली. इतक्यांत माधवरावांनीं डोळे उघडले आणि ते त्यांना उद्देशून म्हणाले, "मला कांहीं जलोदर झाला नाहीं!" पुन्हां ते गृहस्थ मलाच विचारतात "कांहो, हे शुद्धीवर आहेत कां! माधवरावांनींच त्यांना उत्तर दिलें, "मी शुद्धीवर आहें." थोड्या वेळानें ते गृहस्थ गेले. परंतु माधवरावांना मात्र अस्वस्थ करून गेले. त्याचा परिणाम शेवटीं डॉक्टरांनीं आंत भेटायला कोणींही येतां कामा नये असें मला बजावलें.

माधवरावांचें जसजसें जास्त झालें, तसतसा सासूबाईंचा धीर सुटूं लागला. केव्हां केव्हां त्यांच्या डोळ्यांत पाणी उभें राही. त्या दिवसांत त्यांच्या सेवेला मोल नव्हतें. त्यांच्याकडे पाहूनही माधवरावांचे डोळे अश्रूंनीं भरून येत. त्यांचें व सासूबाईंचें जरी कधीं फारसें पटलें नाहीं तरी शेवटीं सासूबाईंनीं केलेली सेवा पाहून माधवरावांचें अन्तःकरण भरून येई. अशाच प्रसंगीं त्यांनीं आपली शेवटची कविता आपल्या आईवर लिहिली, ती पुढीलप्रमाणें:—

'वाटे तुझ्यापाशीं धावतच जावें, डोकें खुपसावें कुशीमध्यें
रडून करावा जीवींच्या या भार हलकासा, फार थोडा तरी
दुखण्यांत धावे पुन्हां बाल्याकडे हें वेडेंवाकडें मन माझें
गोंजारुं दे मला माउलीचा हात सन्जीवनी त्यांत सांठविली
तुझ्या दृष्टीपुढें न ठरे अदृष्ट, करावया कष्ट पाठव तूं
काय करुं साङ्ग जेणें पर्यायानें डोळ्याचें पारणें तुझ्या फिटे

ही कविता त्यांनीं ता. १७ ऑक्टोबर १९३९ रोजीं लिहिली.

माझा स्वतःचा देवावर व दैवावर फारसा विश्वास नाहीं. त्यामुळें माधवरावांच्या जिवावरच्या दुखण्यांतही मी नवससायास कधीं कांहीं केले नाहींत. परंतु एक दिवस शाहूरावांनीं मला सांगितलें, "वहिनी, तुम्ही माझी एक गोष्ट ऐका. दर मंगळवारीं व गुरुवारीं दत्ताला जा, व तेथला अंगारा आणून माधवरावांना लावा," मीही विचार केला कीं, ह्या उपायांनीं जर कदाचित् गुण येणार असला तर हेंही करून पाहावें. आणि अगतिक झाल्यावर मनुष्य दैववादी बनतो. माझी स्थिति ह्या बाबतींत तशीच झाली. मी दर मंगळवारीं व गुरुवारीं दत्ताला जाऊं लागलें, भक्ति–भावानें जाऊं लागलें. माधवरावांचें दुपारचें जेवण झालें म्हणजे मी दत्ताला जात असे व तेथला अंगारा आणून माधवरावांना लावीत असे. त्यांना हें पाहून आश्चर्य वाटलें, त्यांनीं मला विचारलें, "मी बरा व्हावा, ह्या आशेनें कोणा साधूबिधूकडे जात नाहींस ना?" मी कांहीं झालें तरी तसें कांहीं करणार नाहीं, याची खात्री बाळगा असें म्हटलें आणि त्यानंतर ते मी आणीत असलेला अंगारा मुकाट्यानें लावूं लागले. कित्येक वेळां तेहि माझी श्रद्धा पाहून गहिंवरून जात.

मृत्यूच्या आदल्या दिवशीं विठ्ठलराव घाटे माधवरावांना भेटायला आले. तो दिवस मंगळवारचा होता. ते दुपारपासून रात्रीं ९ वाजेपर्यंत यांच्या जवळच होते विठ्ठलराव आले व माधवरावांच्या जवळ जाऊन बसले. मी-ही तेथेंच होतें. माझ्याकडे पाहून माधवराव म्हणाले, "त्यांना मला काय काय होतें हें सविस्तर सांग" मी काय सांगणार ? माझ्या डोळ्यांतून अश्रु-प्रवाह मात्र सुरू झाला. तितक्यांत त्यांनीं पुन्हा मला सांगितलें. "विठ्ठल-रावांना चहा दे" मी संध्याकाळीं डॉक्टरांचें औषध आणलें. परंतु शारीरिक व मानसिक दुःखाच्या ताणानें माझ्या अंगांत उभें राहण्याचीही शक्ति उरली नव्हती. कसेंबसें मी औषध कांचेच्या ग्लासमध्यें ओतलें. परंतु मला घेरी आली. त्यांच्यापुढें अशा स्थितींत आपण उभें राहूं नये म्हणून मी तेथून झटकन् दुसऱ्या खोलींत गेले. माधवराव सारखे घालमेल घालीत होते. तशाही स्थितींत विठ्ठलरावांना त्यांनीं मला बोलावण्यास सांगितलें. मी जवळ गेलें. ते क्षीण आवाजांत म्हणाले, "तूं काळजी करूं नकोस. तूं मला सांभाळ, मी तुला संभाळीन, आपण दोघे मिळून तुझ्या बाबांना संभाळूं" मला गहिंवरून आले. तेथें उभें राहवेना. मी मोठ्या कष्टानें माझे अश्रु आवरले.

मृत्यूचा दिवस उजाडला. माधवरावांच्या चेहेऱ्यावर मृत्यूची छाया स्पष्ट दिसूं लागली. ता. २९ बुधवारीं सकाळीं ९ वाजतां डॉ. घारपुरे आले. त्यांनीं माधवरावांना तपासलें. माधवरावांनीं त्यांना विचारलें, "माझी प्रकृति कशी आहे ?" डॉक्टरांनीं त्यांना उत्तर दिलें "You are improving" माधवराव हंसले. डॉक्टर इंजेक्शन देऊन गेले. परंतु सूज आलेल्या त्या कातडींतून इंजेक्शनमधून घातलेलें औषध आंत जाऊन पोहोंचलेंच नाहीं. तें थेंब थेंब बाहेर गळूं लागलें. माधवरावांनीं त्यानंतर तोंड धुतलें. कपडे बदलले. थोडासा मऊ भात खाल्ला. परंतु हें सर्व त्यांनीं आमच्या समाधानाकरतां केलें. त्यांची घालमेल विलक्षण वाढली होती. दुपारीं ३ वाजेपर्यंत ते सावध होते. दुपारीं तीन वाजतां त्यांनीं अर्धा कप कॉफी घेतली, आणि त्यांना वात झाला. अर्धवट शुद्धींत अर्धवट बेशुद्धींत ते असंबद्ध बोलूं लागले.

सासूबाई घाबरल्या. त्या त्या दिवशीं पहाटे चार वाजल्यापासून तोंडांत पाण्याचा थेंबही न घालतां बसल्या होत्या. मी जेम–तेम संध्याकाळीं सात

वाजेपर्यंत कांहीं तरी करीत होतें. परंतु, मी काय करीत होतें ह्याचें भान मलाच नव्हतें. संध्याकाळीं सात वाजतां माझ्या उसन्या अवसानानेंही दगा दिला. माझे पाय लटपटूं लागले. समोर जाण्याची ताकद आणि धैर्य दोन्ही-ही माझ्यांतली नष्ट झाली !

मला थडथडून हिंव भरलें. बाबा, माई, उमाबाई, यमूताई, सर्व माधव-रावांच्या उशापायथ्याशीं जमले. मी शंकररावांना निरोप पाठवला. ते आले; केशवराव भाऊजी आले आणि मी पलंगावर निजलें, माझी शुद्ध नाहींशी झाली.

त्या दिवशीं रात्रीं माधवरावांनीं ११॥ वाजतां इहलोक सोडला.

मला काय झालें याची कल्पना होती. परंतु माझें शरीर बधिर झालें, रडण्याचीही ताकद माझ्यांत उरली नाहीं. सावध झाल्यावर माधवराव नेहमीं एक श्लोक म्हणत असत त्याची मला आठवण झाली. तो श्लोक म्हटला कीं, त्यांच्या डोळ्यांत पाणी उभें राही. ते मला म्हणत, "लीला, जन्माची सहचरीही मृत्यूनंतर बरोबर येत नाहीं. ती देखील घराच्या दारांतच उभी राहते; शेवटीं माझी वेळ आली कीं, मी एकटाच माझ्या मार्गानें जाणार आहे; तूं आपल्या मार्गानें जाशील. जें बरेंवाईट एकमेकांचें आपण करूं, तें सर्व येथेंच राहाणार हा विचार मनांत आला कीं, अलिकडे मला कसेंसेंच होतें." व तो श्लोक म्हणत असलेली माधवरावांची खिन्न मूर्ति माझ्या डोळ्यांपुढें उभी राहिली. माझ्या हृदयाची कालवाकालव झाली. घराच्या दारापर्यंत तर पोहोंचविण्याचें राहोच, पण प्राण जातांना देखील मी त्यांच्या जवळ नव्हतें; इतकेंच नाहीं तर माझी शुद्धिही नष्ट झाली होती. खरोखरच मी एकटी राहिलें. त्यांच्या गोड आठवणी तेवढ्या आतां माझ्या जवळ शिल्लक उरल्या.

तो श्लोक पुढीलप्रमाणें—

> धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे, भार्या गृहद्वारि जनः स्मशाने ।
> देहश्चितायां परलोकमार्गे कर्मानुगो गच्छति जीव एकः ॥

ते वारले. कायमचे मला दिसेनासे झाले. मी त्यानंतर रडून ओरडून जरी पुष्कळ त्रागा केला असता तरी ते पुन्हां परत भेटणें शक्य नव्हतें. मी अगदीं शांत होतें. परंतु अकरा वर्षांचा चित्रपट माझ्या डोळ्यांसमोर

उभा राहिला. आणि दुःखद आठवणीपेक्षां अनेक सुखदायक स्मृति मला होऊं लागल्या. त्यांतली एक अगदीं अलीकडली आठवण मला झाली.

माधवराव पथ्याला अतिशय कंटाळले होते. त्यांना कांहीं तरी आंबट खाण्याची इच्छा होई. म्हणून माझ्या बहिणीनें—सुलूनें—त्यांना दोन मोठे आंवळे आणून दिले होते. ते मला दिसूं नयेत म्हणून माधवरावांनीं उशाशीं अंथरुणाखालीं ठेवले होते. त्या दिवशीं मी दवाखान्यांतून औषध घेऊन परत आलें. माधवरावांच्या खोलींत दिवा नव्हता. माधवराव पडल्या पडल्या तोंड हालवीत होते. मी दिवा लावला औषध मेजर ग्लास-मध्यें ओतलें. तें देण्याकरतां पलंगाजवळ गेलें. माधवरावांच्या हातांत मला आवळा दिसला. मी थोडीशी रागावलें. हातांतला आवळा तर मी टाकून दिलाच, पण आणखी आहे का म्हणून विचारतांच उशीखालीं आहे, म्हणून त्यांनीं मला सांगितलें. "आतां पुन्हां आवळे खायचे नाहींत; तुम्हाला माझी शपथ आहे" असें मी त्यांना म्हटलें. माधवरावांनीं डोळ्यांत पाणी आणून आतां मी पुन्हां खाणार नाहीं, म्हणून माझ्याजवळ कबूल केलें. असाच पुन्हां एकदां सुलूनें आवळा त्यांना दिला. त्यांनीं तो न खातां माझ्याजवळ दिला. माधवराव वारले, आणि ही गोष्ट माझ्या मनाला कायमची लागून राहिली. माझ्या बहिणीनें त्यांच्या तोंडाला चव नव्हती, म्हणून तो त्यांना खायला दिला. परंतु मी रागावेन म्हणून त्यांनीं तो घेऊन मुकाट्यानीं ठेवून दिला. त्या गोष्टीचा परिणाम माझ्या मनावर फार झाला. आणि माझ्यावरील त्यांचा विश्वास व प्रेम पाहून मला फार समाधान वाटलें.

अशा अनेक गोष्टी आज माझ्या डोळ्यांपुढें उभ्या राहातात. आणि एका थोर विभूतीचें अगाध प्रेम मला शेवटीं मिळालें, या जाणीवेनेंच सध्याच्या माझ्या दुःखांत मला समाधान वाटतें.

६६२४

## डॉ. माधवराव पटवर्धन यांचा जीवनपट

( जन्म : २१ जानेवारी १८९४. मृत्यु : २९ नोव्हेंबर १९३९ ).

२१ जाने. १८९४ जन्म बडोदें.

| | |
|---|---|
| १८९४–१९०३ | बालपण. |
| | भडोच, बडोदें, आवळस. |
| | प्राथमिक शिक्षण (आवळस) |
| | इंग्रजी शिक्षण–बडोदें, अहमदाबाद, मुंबई. |
| १९०९ | मॅट्रिक |
| १९१६ | बी. ए. सेकंड क्लास, बडोदा कॉलेज. |
| १९१८ | एम्. ए. सेकंड क्लास एलफिन्स्टन कॉलेज (मुंबई). |
| | डी. ई. सोसायटींत प्रवेश, |
| | प्राध्यापक, फर्ग्युसन कॉलेज. |
| १९१९ ते १९२५ | डी. ई. सोसायटी, आजन्म सेवक. |
| १९२२ | रवि-किरण मंडळाचे सदस्य. |
| १९२३–९ सप्टेंबर | * " **किरण** ". |
| १९२४–२३ जानेवारी | * " **काव्यविचार** ". |
| ९ मे | * " **उषा** " |
| २० ऑक्टो. | * " **मधुमाधव** ". |
| १९२५–२८ आगस्ट | " डी. ई. सोसायटी राजीनामा. |
| १९२५–९ सप्टें. | " **शलाका** ". |
| २३ डिसें. | " **फार्शी-मराठी कोश** ". |
| १९२६ | शिक्षक, प्रताप हायस्कूल, अमळनेर. |
| १९२६–१ आगस्ट | शिक्षक, म. ए. सोसायटी हायस्कूल, पुणें. |
| १९२६–९ सप्टेंबर | " **विरहतरंग.** " |
| १९३३–१९ जुलै | " दुसरी आवृत्ति. |

| | |
|---|---|
| १९२७ | **छंदोरचना.** |
| १९३७–२३ जानेवारी | छंदोरचना दुसरी आवृत्ति |
| १९२७–९ सप्टें. | **" प्रभा ".** |
| १९२८–२१ जाने. | **" सुधारक ".** |
| १९२८–२९ मे | विवाह. |
| १९२८–९ जून | प्राध्यापक, राजाराम कॉलेज, कोल्हापूर |
| १९२९–२९ मे | **उमरखय्यामकृत रुबाया** ( फार्शीवर भाषांतर ). |
| १९३१–१५ आक्टो. | **द्राक्षकन्या.** (फिटस् जेराल्ड य इंग्रजी भाषांतरावरून ). |
| १९३३–२९ मे | **गज्जलांजली.** |
| | **मधुलहरी** ( रुबायांचें संपूर्ण भाषांतर |
| १५ जुलै | विरहतरंग ( २ आ. ). |
| | अध्यक्ष, कविसंमेलन, नाशिक. |
| १९३४–२७ नोव्हें. | **स्वप्नरंजन.** |
| १९३६–१० नोव्हें. | अध्यक्ष, साहित्यसंमेलन, जळगांव. |
| १९३७–२३ जाने. | छंदोरचना (D. Litt साठीं प्रबंध). |
| १९३८–२१ जाने. | **' तुटलेले दुवे '.** |
| १ एप्रिल | **भाषाशुद्धिविवेक.** |
| ५ नोव्हें. | **पद्यप्रकाश.** |
| १९३९–१५ फेब्रु. | " डॉक्टर ऑफ लेटर्स " (D. Litt) |
| २९ मे | **नकुलालंकार.** |
| १९३९–२९ नोव्हें. | मृत्यु ( पुणें ). (रात्रौ ११-३५ ). |

* या ग्रंथांत रविकिरण मंडळांतील सदस्यांच्या बरोबर माधवरावां कांहीं कविता समाविष्ट आहेत .

REFBK-0006624